म. ग्रं. सं. ठाणें.
क्र. ५९८



# नर्मदे हर

र.रा.गुण्ये

REFBK-0028454

५८५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना . खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

25 SEP 1996
9 OCT 1996
12 OCT 1996
16 OCT 1996
19 OCT 1996
23 OCT 1996
2 NOV 1996
8 DEC 1996
28 DEC 1996
15 JAN 1997
19 MAR 1997
26 APR 1997
14 MAY 1997
11 JUN 1997
12 JUL 1997
2 AUG 1997
23 AUG 1997
७।१०।१९९७
२५।१०।९७
29/11/
(कृ.मा.पहा.)
१६०८/२२-९५
MAR 1998

# नर्मदे हर

(नर्मदा परिक्रमेचा अनुभवसिद्ध भ्रमणवृत्तांत)

रघुनाथ रामचंद्र गुण्ये

प्रस्तावना

डॉ. वि. रा. करन्दीकर

REFBK-0028454

REFBK-0028454

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह

स्नेहल १६४

**प्रकाशक-मुद्रक**
सौ. अंजली रवींद्र घाटपांडे
स्नेहल प्रकाशन
३६ ब, गुरुदत्त सहवास, दक्षिणमुखी मारुतीजवळ
४७०/४९८ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.
दूरध्वनी क्रमांक :४५२९११

© र. रा. गुण्ये
वेरळ, ता. लांजा, जि. रत्नागिरी

**मुखपृष्ठ**
अनिल उपळेकर

**प्रथमावृत्ती**
२८ मार्च १९९६

**टाइपसेटिंग**
प्रमोद पिंटर्स
प्रमोद वि. बापट
११२० सदाशिव पेठ
निंबाळकर तालीम चौक
पुणे ४११०३०

**मुद्रणस्थळ**
स्मिता प्रिंटर्स,
प्रमोद वि. बापट
१०१९ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

**मूल्य ९० रुपये**

*देहाच्या कणाकणात सामावलेली माझी **जन्मदात्री माई,***
*श्वासाश्वासात प्रस्फुरित झालेली **श्रीगुरुमाउली स्वामी स्वरूपानन्द***
*आणि रोमारोमात भिनलेले **गुरुदेव श्रीबाबा आर्वीकर***
*यांच्या पुण्यस्मृतीस सादर समर्पण.*

# स्वागताचे चार शब्द

श्री रघुनाथ रामचंद्र गुण्ये यांनी लिहिलेले 'नर्मदे हर' हे पुस्तक ही एका आगळ्यावेगळ्या वृत्तीच्या केलेल्या नर्मदापरिक्रमेची कथा आहे. नर्मदा नदीला उजव्या हाताला ठेवून उगमापासून मुखापर्यंत पायी चालत तिला प्रदक्षिणा घालणे म्हणजे नर्मदापरिक्रमा होय. ही परिक्रमा म्हणजे एक आध्यात्मिक साधना आहे, असे अनेक शतके मानले गेले आहे. हिमालयाचा सारा परिसर किंवा गंगायमुनांच्या तीरावर असलेली स्थाने ही तपश्चर्या करण्यासाठी योग्य मानलेली आहेत. नर्मदातीरालाही तेच महत्त्व प्राचीन कालापासून दिले गेलेले आहे.

एखाद्या नदीला संपूर्ण प्रदक्षिणा घालण्याची कल्पनाच मुळात अभिनव आहे. 'रेवं द्रक्षस्युपलविषमे विंध्यपादे विशीर्णाम् ।' या शब्दांत, विंध्यपर्वताच्या खडकाळ प्रदेशातून फेसाळत जाणाऱ्या नर्मदेच्या प्रवाहाच्या आकाशमार्गाने जाणाऱ्या मेघांला घडणाऱ्या मनोहर दर्शनाचे वर्णन कालिदासाने मेघदूतात केले आहे; त्याची नर्मदपरिक्रमेच्या संदर्भात कोणालाही आठवण होईल. त्या नर्मदेच्या तीरावरून केलेल्या परिभ्रमणात, तिच्या प्रवाहाने घेतलेली वळणे-वाकणे, त्या प्रवाहाला रोखू पाहणारे छोटेमोठे डोंगर, काठावर डुलणारे उंचउंच वृक्ष आणि पसरलेली घनदाट अरण्ये, क्वचित कोठे आढळणारा वैराण प्रदेश तर अनेक स्थळी बहरणारी भरदार शेते, दोन्ही बाजूंच्या तीरांवर वास्तव्य करणारे भिन्नभिन्न लोकसमूह आणि त्यांचे विविधरंगी जीवन, जनमानसात भक्तिभावाचे स्थान मिळवून राहिलेली अनेक मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे, आणि कोठे कोठे महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांच्या स्मृतींना जाग आणणारी स्थाने; अशा सर्वांची साथसंगत घेत घेत आणि नर्मदातटाकावरील परिसराचे समग्र रूप न्याहाळत वाटचाल करणे, हा मुळातच एक रोमांचकारक अनुभव आहे. निसर्ग आणि समाज या दोहोंचे निरीक्षण करण्याची आधुनिक दृष्टी ठेवूनही नर्मदेची परिक्रमा कोणी जिज्ञासू करू शकेल.

पण परंपरागत श्रद्धेच्या भावनेतून केल्या जाणाऱ्या नर्मदापरिक्रमेला एक वेगळे महत्त्व आहे, जसे हिमालयातील बद्रीकेदारच्या किंवा काशीरामेश्वरच्या यात्रेला आहे. हिमालयातील बद्रीकेदारच्या वाटेवरून चाललेले यात्रेकरू समोरून येणारा कोणी भेटला की, 'जय बद्री विशाल' किंवा 'जय केदारनाथ' अशा घोषणा करतात. नर्मदेची परिक्रमा करणारे यात्रिक 'नर्मदे हर' असा घोष करतात. हर म्हणजे शिव. ही देवता निसर्गाच्या विराट स्वरूपामागे उभ्या असलेल्या शक्तीचे प्रतीक आहे.

कोणत्याही नदीच्या दोन्ही काठांवरच्या नाना प्रकारची रूपे धारण करणारा सारा प्रदेश

हा निसर्गाचाच आविष्कार असतो. त्यामुळे तेथील अधिष्ठात्री देवता शिव आहे. नर्मदातीरावर सर्वत्र अनेक शिवमंदिरे उभी आहेत. म्हणून तिची परिक्रमा करणारे यात्रेकरू परस्परांना अभिवादन करताना 'नर्मदे हर' हे शब्द उच्चारतात. आपल्या परिक्रमेची कथा सांगणाऱ्या या पुस्तकाला गुण्ये यांनी ते नाव दिले आहे.

गुण्ये हे केवळ भाविक किंवा अल्पशिक्षित यात्रेकरू नाहीत. ते स्थापत्यशास्त्राचे पदवीधर म्हणजे एंजिनियर आहेत. त्यांना आधुनिक विज्ञानाचा चांगला परिचय आहे, आणि त्यामागे उभा असलेला बुद्धिनिष्ठ दृष्टीकोण ते उत्तम प्रकारे समजू शकतात. कोकणातील राजापूरजवळ आडबाजूला असलेल्या वेरळ या गावात ते लहानाचे मोठे झाले. स्थापत्यशास्त्राचे शिक्षण घेतले, पण तो व्यवसाय त्यांनी केला नाही, नोकरी धरली नाही, आणि प्रपंचही मांडला नाही. त्यांनी घर सोडले वा संन्याशाची वस्त्रे धारण केली, असेही घडले नाही. पण त्यांच्या अंतःकरणात अध्यात्माचा झरा सतत झुळझुळत राहिलेला आहे. त्या मार्गाने ते कोठवर पोचले, हे आपण कसे सांगू शकणार ? ते त्यांचे त्यांना माहीत. पण जे त्यांच्या निकट परिचयात येतात, त्यांना त्यांची अनासक्त आणि निरहंकारी वृत्ती जाणवल्याशिवाय राहत नाही. ते आपल्या कुटुंबात राहिले आहेत, आणि अडल्यानडल्या वेळी अर्थार्जनाच्या दृष्टीने त्यांनी इतरांसाठी कष्टही घेतले आहेत. पण त्यातून स्वतःचा काही आर्थिक लाभ व्हावा, अशा इच्छेचा स्पर्श त्यांच्या चित्ताला कधी झालेला नाही. ते आपल्याच आनंदात मग्न असतात. तो विश्वचालक परमेश्वर आपल्या आयुष्याचे जे काही करावयाचे असेल ते करील, अशी धारणा ठेवून समोर येणाऱ्या हर एक प्रसंगाला ते सामोरे जातात. भविष्याविषयीच्या कोणत्याही चिंतेचा स्पर्श त्यांच्या मनाला झालेला आढळत नाही, आणि आतापर्यंतच्या आयुष्यात जे काही चांगले आपल्या हातून घडले त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही. मनाची अशी निर्लेप वृत्ती फार दुर्मिळ असते. पावसचे स्वामी स्वरूपानंद आणि बाबामहाराज आर्वीकार अशा सत्पुरुषांशी गुण्यांचा निकटचा संपर्क आला आहे. अशा संपर्कातून जे सत्त्व प्राप्त करून घ्यावयाचे असते, ते त्यांनी आपलेसे केले आहे. ही सारी एक प्रकारची पुण्याई असते. तिच्या बळावर मनाची एक वासनाशून्य आणि ऐहिकाच्या अतीत पोचणारी वृत्ती आत्मसात करता येते. त्यामधून हळूहळू एक वेगळे व्यक्तिमत्त्व साकार होत असते. ते ओळखण्याची दृष्टी ज्याला असेल, त्याला गुण्यांचे वेगळेपण जाणवल्याशिवाय राहणार नाही.

अशी धारणा असलेल्या गुण्यांनी एका क्षणी उठलेल्या ऊर्मीसरशी नर्मदेची परिक्रमा करण्याचा रस्ता धरला. कशी केली त्यांनी ही परिक्रमा ? अनवाणी पायी चालत तर केलीच, पण इतरही काही बंधने स्वतःवर घालून घेतली. अंगावरचे दोन-तीन कपडे, एक पंचा, एक पातळशी शाल, एक तांब्या, दैनंदिनी लिहिण्यासाठी वही, आणि बॉलपेन, एवढ्याच वस्तू जवळ ठेवल्या. हाताने स्वयंपाक करावयाचा नाही असे ठरवल्यामुळे कोणी शिधा दिला तरी त्याचा काही उपयोग नव्हता. पण भिक्षा मागावयाची नाही किंवा कोणाकडे भोजनासाठी

याचना करावयाची नाही, असेही ठरवले. त्यामुळे कोणी आपण होऊन दिले, तरच पोटात दोन घास अन्न जाणे शक्य होते. चहाकॉफी आणि कांदालसूण हे पदार्थ वर्ज्य. नर्मदेत स्नान आणि त्यानंतर रुद्राची एकादशणी केल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचे नाही. असे हे नियम. आपण आपल्या मनाशी सहज विचार करून पाहावा की, घरच्या घरी अशा काही नियमांचे पालन करावयाचे आपण ठरवले, तर ते आपल्याला सहजासहजी जमेल का ? एवढा विचार केला, तरी गुण्यांनी केलेली ही परिक्रमा किती कठीण असेल, त्याची थोडीफार कल्पना येईल. सामान्यपणे दररोज अठरावीस किलोमीटर अंतर ते चालत असत. काही वेळा ही चाल पस्तीस-चाळीस किलोमीटरपर्यंत झाली आहे. परिक्रमेस प्रारंभ करण्यासाठी गुण्ये नेमावर येथे पोचले. कोकणातील आपल्या घरापासून तेथवरचा प्रवास केल्यावर त्यांच्याजवळ चाळीस रुपये उरले होते. तेथे विश्वनाथजींच्या आश्रमात तेही पैसे त्यांनी समर्पण करून टाकले. कारण रोख पैसा जवळ ठेवावयाचा नाही, असाही एक नियम त्यांनी ठरवला होता.

अशा या परिक्रमेत आपल्याला आलेल्या विविध अनुभवांचा पट गुण्यांनी या पुस्तकात आपल्यासमोर उलगडून ठेवलेला आहे. त्यात बरे अनुभव आहेत, तसेच वाईटही आहेत. अपार शरीर कष्टभोगांचे आहेत, तसेच मन तृप्त होऊन जावे असेही आहेत. शूलपाणीश्वरच्या मंदिरानंतर जंगलाचा प्रदेश लागतो. तेथील भिल्ल वाटमारी करतात. त्या झाडीत भिल्लांनी संपूर्णपणे लुबाडल्यावर अंगावर फक्त लंगोटी उरली, तर एका हातात मडके आणि दुसऱ्या हातात बांबूची काठी जवळ राहिली. हा अनुभवही गुण्यांनी घेतला आहे. कोणा ट्रकटायर दुरुस्त करणाऱ्या सोहनलाल साहूच्या घरी अन्नात लसूण होती. गुण्यांना लसूण वर्ज्य आहे हे त्याला माहीत नव्हते, त्याने आपल्या मुलीला स्नान करून पुन्हा स्वयंपाक करावयास सांगितले व गुण्यांना भोजन दिले. आणखी एका ठिकाणी अन्न देणारा आपण हरिजन आहोत असे म्हणाला. 'स्वच्छ अन्न शिजवा' एवढेच सांगून गुण्यांनी त्यांच्या अन्नाचा स्वीकार केला आणि 'तुमचा भाव महत्त्वाचा' असे म्हटले. तो मनोमन आनंदून गेला. दुसऱ्या एका ठिकाणी गुण्ये आश्रमाच्या बाहेरच्या बाजूस उपाशी झोपले होते. थोड्या वेळाने जाग आली, तर आतल्या बाजूस तेथील संन्यासी यथेष्ट जेवण करीत होता. आपण रात्री जेवत नाही, असे गुण्यांना म्हणून त्याने त्यांना जेवण देण्याचे टाळले होते. एक शेतकरी, एक हरिजन, तर एक संन्यासी. यात्रेकरूला दोन घास अन्न देणाऱ्यांचे हे तीन नमुने. असे सारे अनुभव गुण्यांनी डोळसपणाने घेतले आहेत. 'थंडी फार असणार, तेव्हा हा रग जवळ ठेवा,' हा सल्ला मानण्यापुरता त्यांनी आपला नियम बाजूला ठेवला आहे, आणि पुढे कोणी यात्रिक थंडीने फार कुडकुडतो आहे हे पाहिल्यावर त्याला देऊनही टाकला आहे. अशी ही निर्मळ आणि निरिच्छ वृत्ती या परिभ्रमणात गुण्यांची अखेरपर्यंत साथ करीत राहिली आहे.

नर्मदेच्या तीरावर ठायीठायी अनेक मंदिरे आहेत, मठ आणि आश्रम आहेत, त्यांत

कोठेकोठे प्रेमळ संन्यासी आणि सत्त्वशील तपस्वी आहेत. सारा प्रपंच पुरा करून वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केलेले काही सेवाभावी सज्जनही आहेत. अशा प्रवृत्तीच्या सत्पुरुषांबद्दल आसपासच्या गावकऱ्यांच्या मनात नितांत आदराचा भाव आढळतो. अत्यंत विशुद्ध अंतःकरणाच्या अशा वैराग्यशील व्यक्तींचे दर्शन हा एक फार वेगळा अनुभव असतो. पण केवळ भगवी वस्त्रे परिधान केली, म्हणजे मनुष्य सत्त्वगुणसंपन्न होतो असे नाही. खरा संन्यास ही मनाची एक धारणा असते, हे गुण्ये पूर्णपणाने जाणून आहेत. त्या दृष्टीने निरनिराळ्या साधूबैराग्यांशी त्यांचे झालेले छोटेछोटे संवाद फार अर्थपूर्ण आहेत. गुण्यांचे आध्यात्मिक ग्रंथांचे चांगले वाचन आहे. ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा, महिम्न किंवा रामरक्षा अशी स्तोत्रे, शंकराचार्यांच्या त्या प्रकारच्या अनेक रचना, भगवद्गीता असे त्यांचे विस्तृत पाठांतर आहे. तत्त्वज्ञानातील सिद्धांत ते चांगल्या प्रकारे जाणतात. त्यांच्याशी होणाऱ्या संवादांत याचे साहजिकच प्रतिबिंब पडत असे.

पण असे असूनही एक छोटासा अपवाद वगळता गुण्यांनी कोठेही प्रवचन वगैरे केलेले नाही. काही संन्याशांनी त्यांचा आंतरिक अधिकार ओळखला आहे. दिनेशानंद किंवा विश्वनाथजी असे त्यांना भेटलेले संन्यासी श्रेष्ठ धारणेचे आहेत. दुधी नदीच्या संगमावरील आश्रमातील प्रमुख धनराजगिरी. गुण्यांनी आपले उत्तराधिकारी व्हावे, असा आग्रह ते करतात. दुसऱ्या एका आश्रमाचे प्रमुख मनमोहन निरालाजी. दारावर आलेल्या अतिथीचे स्वागत करण्यासाठी ते आपला रामायणाचा नित्यपाठ बाजूला ठेवतात. त्यांना त्या दिवशी पहाटे स्वप्न पडलेले असते की, आज कोणी अधिकारी अतिथी येणार आहे. दुपारी गुण्ये आल्यावर हाच तो अतिथी असा त्यांचा भाव होतो. ते गुण्यांना योगानंद म्हणतात. हे असे प्रसंग वाचताना गुण्यांच्या ठिकाणी काही एक आंतरिक तेज असले पाहिजे, असे आपल्या मनात आल्याशिवाय राहत नाही. पण अशा कोणत्याही प्रसंगात ते गुंतत नाहीत, किंवा स्वतःच्या चित्ताला अहंकाराचा निसटता स्पर्शही होऊ देत नाहीत. त्यांची निर्लिप्त वृत्ती जशीच्या तशी अभंग राहते. बुद्धिवादी दृष्टीने विचार केला, तरी अशी धारणा सांभाळणारे हे मन एका उदात्त पातळीवर पोचलेले आहे, असे मानावे लागेल.

अशी एक आध्यात्मिक धारणा असलेल्या सुविद्य व्यक्तीने लिहिलेला हा भ्रमणवृत्तांत आहे. तो आपल्याला एका वेगळ्या विश्वात घेऊन जातो. अध्यात्माच्या केवळ गूढ आणि स्वप्निल वातावरणात बुडून जाऊन गुण्ये आपले वास्तवाचे भान सुटू देत नाहीत. आध्यात्मिकतेच्या बुरख्याआड लपून राहणारी दांभिकता त्यांच्या दृष्टीआड होत नाही, त्याचबरोबर नर्मदेकाठच्या अरण्यप्रदेशातील लोकांचे अज्ञान आणि दारिद्र्य त्यांना खोलवर जाणवल्याशिवाय राहत नाही. नर्मदा नदीवर होणारा सरदार सरोवराचा प्रकल्प त्यांना माहीत आहे. त्यातील प्रचंड धरणामुळे त्या प्रदेशातील लोकजीवनावर कोणते अनुकूल-प्रतिकूल परिणम होतील, याविषयीचे विचार त्यांच्या मनात डोकावून जातात. विज्ञानाचे युग चढत्यावाढत्या गतीने येत आहे. त्याचा स्वीकार करणे आवश्यक आहे. पण तसे झाल्यावर

आणखी काही वर्षांतच नर्मदेच्या तीरावरचा हा सारा प्रदेश बदलून जाईल. कोठेकोठे समृद्धी येईल, तर काही लोकांच्या जमिनी धरणाच्या पाण्याखाली गेल्यामुळे त्यांचे पुनर्वसन करावे लागेल. ते नीट होणार की नाही हा प्रश्नही गुण्यांना पडतो, किंबहुना ते चांगल्या प्रकारे होणार नाही असे रास्त भय त्यांच्या मनात दाटून येते. ऐहिकातील प्रश्नाची अशी एक रोखठोक जाण त्यांना आहे. पण त्या प्रश्नात अधिक शिरण्याची ही जागा नव्हे, याचे भान त्यांना आहे.

गुण्यांचे मन नर्मदापरिक्रमेच्या आध्यात्मिक वातावरणात मात्र पुरेपूर रमलेले आहे. नर्मदेचा उल्लेख त्यांनी सर्वत्र मैय्या म्हणजे माता या शब्दाने केलेला आहे. त्या मातेचा आशीर्वादच आपल्याला साऱ्या अडचणीतून पार नेणार आहे, अशी दृढ श्रद्धा त्यांच्या मनात आहे. ती एवढी स्वीकारशील आहे की, भलेमोठे काटे पायांत रुतल्यामुळे ते रक्तबंबाळ होणे, किंवा अतिसाराचा उपद्रव होऊन शरीर गलितगात्र होऊन जाणे, अशा क्लेशकारक अनुभवांचा स्वीकारही मन कोणत्याही प्रकारे विचलित होऊ न देता 'मैय्याची इच्छा' या भावनेच्या बळावर ते सहजपणे करू शकतात. त्याचबरोबर दिवसरात्रींच्या निरनिराळ्या प्रहरांतील आणि स्वच्छ सूर्यप्रकाश किंवा शीतल चांदण्याची बरसात अशा क्षणातील नर्मदामैय्याच्या परिसरामधील सुंदर दृश्यांची मनोरम शब्दचित्रे ते उभी करतात. त्यांच्या रसिक वृत्तीची साक्ष तेथे पटते. ही सारी वर्णने अतिशय आल्हाददायक उतरली आहेत. छोटीछोटी वाक्ये, समर्पक शब्दयोजना, प्रवाही निवेदनशैली आणि निरनिराळ्या धार्मिक ग्रंथांतील औचित्यपूर्ण अवतरणे, ही गुण्यांच्या लेखनाची भूषणे आहेत. प्रसंगांत विविधता आहे. सतत भेटणारी माणसे भिन्नभिन्न प्रवृत्तींची आहेत. प्रत्येक दिवस एखादा ना एखादा नवा अनुभव घेऊन समोर येणारा आहे. मार्गावर कोठे घनदाट अरण्ये दिसतात, तर क्वचित खडकांचे उंच सुळके डोळ्यांसमोर उभे राहतात. आणि त्याच वेळी पायांना अणकुचीदार दगड टोचत असतात. मांडूगडावर रूपसंपन्न रूपमती भेटते, आणि उंच स्थानावरील तिच्या भग्न महालातून सभोवारचे विशाल दृश्य दिसते; तर महेश्वरच्या सुंदर घाटाच्या वरच्या बाजूस जुन्यापुराण्या राजवाड्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवीची नित्याची बसण्याची अगदी साध्या गादीची बैठक दिसते आणि तिच्या परम सात्विक जीवनाच्या चित्रासमोर आपले मस्तक नम्र होते. असे हे परिक्रमेचे नाना अनुभव उभे करणारे गुण्यांनी शब्दांकित केलेले वर्णन आपले मन समृद्ध करून जाते.

नर्मदेच्या तीरावरील हा सारा परिसर आता आधुनिक विज्ञानाच्या स्पर्शाने बदलून जाणार, नवनव्या सुविधांनी संपन्न होणार, आणि एकंदरीत विचार केला तर तेथील जनजीवन सुधारणार, यात शंका नाही, पण त्याचबरेबर आणखीही काही बदल अपरिहार्यपणे होणार आहे. हिमालयाच्या कुशीतील हरिद्वार. हृषीकेशचा शंभर वर्षांपूर्वीचा परिसर, केवळ पक्ष्यांच्या मधुर किलबिलाटानेच जेथील शांततेचा भंग होत असे आणि जेथे तपस्वी संन्याशांचे दर्शन घडत असे, अशा निसर्गरमणीय ऐश्वर्याने नटलेला व आध्यात्मिक

वातावरणाचा प्रत्यय आणून देणारा होता. आता तो तसा राहिलेला नाही, तर सिमेंटच्या प्रचंड इमारतींनी गजबजलेला एक आधुनिक औद्योगिक संकुल होऊन गेला आहे. थेट लक्ष्मणझूल्याजवळचा स्वर्गाश्रमही आज एक बाजार झाला आहे. असाच बदल नर्मदेच्या काठावरील प्रदेशाचा होणार आहे. तसे झाल्यावर नर्मदापरिक्रमा ही गोष्ट आजवरच्या अर्थाने इतिहासजमा होणार. शतकाशतकांची ही स्थिती बदलत असल्याच्या संधिकालाशी, सहजसुंदर असे प्राकृतिक निसर्गवैभव आणि विशुद्धपावन असे आध्यात्मिक वातावरण बऱ्याच प्रमाणात शिल्लक असताना गुण्यांनी ही नर्मदापरिक्रमा केली आहे, आणि तीमधील आपले अनुभव येथे शब्दबद्ध केले आहेत. आणखी पाचपंचवीस वर्षे उलटल्यावर येणाऱ्या पुढील पिढ्यांना केवळ स्मृतिरूपाने उरणाऱ्या नर्मदामैय्याच्या एका वेगळ्या वैभवाचे दर्शन या पुस्तकाच्या द्वारे घडू शकेल, ही त्याची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. असे पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल स्नेहल प्रकाशनच्या संचालिका सौ. अंजली रवींद्र घाटपांडे या अभिनंदनास पात्र आहेत. आपले आगळेवेगळे अनुभव उपलब्ध करून दिल्याबद्दल रसिक वाचक श्री. गुण्ये यांचे मनापासून ऋणी राहतील, यात संशय नाही.

**वि. रा. करन्दीकर**

विनायक रामचन्द्र करन्दीकर
१३, क्षिप्रा सहनिवास, कर्वेनगर
पुणे-४११०५२

# *अंतरीचे गुज*

एकोणीसशे त्र्याऐंशीच्या जानेवारी ते जून अशा पाच महिन्यांमध्ये नर्मदापरिक्रमेचा योग आला. रोजच्या प्रवासाची नोंद करण्यासाठी दैनंदिनी बाळगिली होती. दिवसभराच्या शिणवट्यातून वेळ मिळेल तेव्हा लिहीत असे. एका आगळ्याच मस्तीत भ्रमण चाललेले असल्यामुळे आणि लेखनकामाठीसाठी उपयोग करण्याची सुतराम् शक्यता नसल्यामुळे लेखनात नव्हता बांधेसूदपणा, भाषेत नव्हते सौंदर्य आणि वर्णनात नव्हती चिकित्सक, अभ्यासू दृष्टीची प्रगल्भता. परिक्रमेच्या पूर्तीनंतर रत्नागिरीच्या वैद्य वकिलांनी रत्नागिरी आकाशवाणी केंद्रासाठी मुलाखत आयोजित करण्याची कल्पना मांडली होती, तथापि आपण काही विशेष केले आहे असा भ्रम नसल्यामुळे साहजिकच त्या वेळी माझ्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

पाच वर्षांपूर्वी माझ्या वडील बंधूंचे 'ज्ञानेश्वरीचे भावविश्व' हे पुस्तक मॅजेस्टिक प्रकाशन छापत असताना पार्ल्यात होतो. डॉ. गुण्यांचे मराठी भाषेवरील निरपवाद प्रभुत्व, कोणत्याही विषयात डूब देण्याची चिकाटी व अभ्यासू वृत्ती, कुशाग्र बुद्धिमत्तेला व्यासंगाची जोड हे सारेच मोठे विलोभनीय. संभाषणाच्या ओघात ते एकदा म्हणाले, "तुझ्याजवळ एवढा चांगला विषय आहे. तुलाही लिहिता येईल. कागदपेन घेऊन बसायचे. शब्द आपोआप सुचतात !" अर्थात हा झाला त्यांचा विचार, पण आपला स्वभाव आणि आवाका यांची जाणीव असल्याने मी आजही त्यांच्याशी सहमत नाही. प्रत्येक माणूस मूलतःच वेगळा असल्याने त्याची वागण्याबोलण्याची, विचार करण्याची तऱ्हा भिन्नच राहते. कागदपेन घेऊन तुम्ही सारे शब्दांच्या टाकसाळी उघडाल, पण त्यांना साहित्याचा साज चढेल असे नाही. प्रज्ञाप्रतिभेच्या अलौकिक परिसस्पर्शातूनच साहित्यसोनियाच्या खाणी प्रकटतात. सहजता, उत्स्फूर्तता हेच प्रतिभेचे लक्षण आहे. प्रयत्नांनी ती वश होत नसते असे आपले माझे प्रामाणिक मत आहे.

पार्ल्यातच गुरुवर्य डॉ. वि. रा. करन्दीकरांची भेट झाली. 'मीही काही लिहावे' असे ते सहज बोलून गेले. काही दिवस उलटल्यावर अचानक एके दिवशी पेन घेऊन कागदावर 'नेमावर नर्मदेचे नाभिस्थान' हे पहिले वाक्य लिहिले. दोन दिवसांत भराभर पंचवीसेक पृष्ठांचा मजकूर लिहून लेखणी जी थंडावली ती तीन वर्षे उलटल्यावर एकोणीसशे त्र्याण्णवच्या नोव्हेंबरमध्ये पुनः सरसावली. एकवार लिखाण पुरे करावे असा विचार जागला, पण पुस्तकासाठी किमान दीडदोनशे पृष्ठांचा तरी मजकूर हवा ना ? त्यासाठी मग प्रसंगांची जुळणी करून कच्चा मसुदा तयार केला आणि नंतर सुयोग्य मांडणी करीत लिहू लागलो.

या लेखनाला श्रोते मिळाले सौ. मंगलावहिनी पाध्ये, श्रीमती विमलकाकू पाध्ये व श्रीमती भागीरथीकाकू पराडकर हे. त्यांना लिखाण रुचले-भावले- त्यामुळे हे लेखन सर्वसामान्यांनाही भावेल असा भरवसा वाटला. लेखन पुरे होता होता डॉ. करन्दीकरांकडून काही मार्गदर्शक सूचना मागवाव्यात म्हणून त्यांना पत्र लिहिले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांनी आनंदाने लिखाण वाचण्याचे मान्य केले. लेखनाची हस्तलिखित प्रत वाचून त्यांचे जे पत्र आले, ते तर मोठे विलक्षण असेच होते. 'आंधळा मागतो एक आणि देव देतो दोन' असा तो प्रकार होता. त्यांनी केवळ लेखन आवडल्याचेच कळविले नाही, तर ते लोकांपर्यंत जायला हवे अशी आपली इच्छा व्यक्त करून त्यासाठी प्रकाशक पाहण्याची तयारीही दाखविली. हा गुरुवर्यांचा केवढा मोठा अनुग्रह होता !

तत्पूर्वी रत्नागिरीचे डॉ. शरद प्रभुदेसाई व श्री. सुरेश गर्दे या आप्तांनी पुस्तक छापायचे झाल्यास आस्थेवाइकपणे आर्थिक साह्य करण्याची तयारी दाखविली होती. अर्थात तो अखेरचा उपाय होता, पण डॉ. करन्दीकरांच्या प्रयत्नातून स्नेहल प्रकाशनच्या संचालिका सौ. अंजली घाटपांडे व श्री. रवी घाटपांडे यांनी पुस्तक प्रसिद्ध करण्याचे मान्य केल्यामुळे तो प्रश्नच संपला होता. डॉ. करन्दीकरांच्या स्नेहार्द्र व सौजन्यशील कृपादृष्टीमुळे त्यांच्यावरच सारा भार सोपवून मी निर्धास्त झालो.

आपल्या आनंदासाठी आपण लिहितो असा काहींचा दावा असतो. वस्तुतः कोणताही भावनाविष्कार एकात्म असूच शकत नाही. वाङ्मय, म्हणूनच, 'स्वान्तःसुखाय' असत नाही. तर ते 'बहुजनसुखाय' निर्माण होत असते. अर्थात त्यात ते कितपत यशस्वी होईल हे लेखकाच्या समर्थ शैलीवर अवलंबून राहील. 'स्वान्तःसुखाय बहुजनसुखाय च' असा सुरेख संगम साधला जाणे हा दुग्धशर्करायोगच म्हणायचा. 'नर्मदे हर' चे प्राथमिक वाचक सौ. सुधा गर्दे, सौ. अंजली गुण्ये, श्री. आप्पा गुण्ये व डॉ. शरद प्रभुदेसाई हे. या साऱ्यांनाच लेखन पसंत पडल्याने 'शुभारंभ म्हणजेच अर्धकार्यपूर्ती' ही उक्ती सार्थ वाटली. हे पुस्तक प्रकाशित होत असल्याने या प्राथमिक वाचकांकडे व श्रोत्यांकडे त्या कार्यपूर्तीतील अर्धे श्रेय सुपूर्द करताना आपला भार हलका होत असल्याची सुखद जाणीव होत आहे.

या परिक्रमेचा अनवट आणि अवघड मार्ग चोखाळण्याची इच्छा कुणा सश्रद्ध वाचकाच्या मनी उपजली तर त्याला काही जुजबी माहिती असावी यासाठी नर्मदामाईचा नकाशा व प्रवासमार्गावरील ठिकाणांची माहिती पुस्तकात समाविष्ट केल्यास बरे होईल असे वाटले. योगायोग असा की, प्रकाशकांचीही तशी इच्छा असल्याचे डॉ. करन्दीकरांनी कळविले. म्हणून परिशिष्टांमध्ये ती देण्यात आली आहे. या कामी मध्यप्रदेश शासनामध्ये सचिवपद भूषविलेले आमचे स्नेही इंदूरनिवासी श्री. स. म. देव, आय्.ए.एस्. यांनी तत्परतेने पाठविलेल्या 'नर्मदे हर' याच नावाच्या छोट्याशा पुस्तिकेचा बहुमोल उपयोग झाला. तसेच रत्नागिरी येथील महाराष्ट्र शासनाच्या नगररचना खात्यातील स्नेही श्री. कवढणकर यांनी अत्यंत आपुलकीने सुबक नकाशा बनवून दिला. इतके झाल्यावर परिक्रमेच्या पाऊलवाटेवर

म्हटली जाणारी मैयाची आरती आणि आचार्यांचे नर्मदाष्टक व त्याचा मराठी अनुवाद यांनाही पुस्तकात स्थान असावे अशी जाणीव झाली. नर्मदाष्टकाचा अनुवाद रत्नागिरीला अखंड ज्ञानयज्ञ चालविण्याचे व्रत स्वीकारलेल्या पं. पुरुषोत्तम शास्त्री फडके, व्याकरणतीर्थ यांनी अगत्याने अवलोकन करून आवश्यक त्या सूचना केल्या.

या पुस्तकाला जे सर्वांगसुदर देखणेपण लाभले आहे त्याला उपरोल्लेखित साऱ्या व्यक्तींच्या इतकीच चित्रकार श्री. उपळेकर आणि मुद्रण विभागाची व व्यवस्थापनाची बाजू उत्तमपणे सांभाळणाऱ्या साऱ्यांच्या अथक परिश्रमाची जोड लाभलेली आहे हे विसरून कसे चालेल ? लहानमोठ्या अनेक घटकांवरच कोणत्याही गोष्टीची परिपूर्णता व यशस्विता आधारलेली असते. त्यामुळे प्रत्येक घटक आपापल्या स्थानी महत्त्वाचाच असतो याचे यथार्थभान असणे आवश्यक असते. लहानशा पुस्तकांच्या प्रकाशनामध्ये उल्लेखित तसेच अनुल्लेखित अनेकांचे सहकार्य लाभले म्हणून या साऱ्यांना धन्यवाद देऊन त्यांच्या ऋणातून अल्पांशाने का होईना उतराई होणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याचे लेखकाला वाटते. या लेखनाने वाचकांना सुद्धा आनंदलाभ घडला तरच या लेखनाचे सार्थक झाले म्हणावयाचे. तसे होवो अशी श्रीगुरुदेवचरणी विनवणी करून हे अंतरीचे गुज येथेच संपवितो.

अक्षय्यतृतीया, शके १९१७ — र.रा.गुण्ये

वेरळ, लांजा, रत्नागिरी.

५८५
२८४५४

नेमावर नर्मदेचे नाभिस्थान. उत्तरतटावरील विश्वनाथजी ब्रह्मचारींचा आश्रम मैयाच्या पात्रापासून पन्नास-पाऊणशे फूट उंचावर. तिन्हीसांजा झाल्या आहेत. सारे कसे शांत शांत. पैलतीरावरील हंडिया गावातील नर्मदामंदिरामधून शंखध्वनी आणि घंटानाद निनादत आहेत. मैयाची सायंआरती सुरू आहे, यापरता कसलाही आवाज नाही. शेजारच्या पुलावरूनही तुरळक वाहतुकीशिवाय अन्य वर्दळ नाही. वर-खाली दूरवर पसरलेली मैया. तिचे ते नित्यनूतन नेत्रसुखद दर्शन. या ग्रीष्म ऋतूतसुद्धा तिच्या विस्तीर्ण निळसर पात्रावरून येणाऱ्या मंद शीतल वायुलहरी अंगावर रोमांच उठवून जाताहेत. याच मैयाच्या अंगावर गेले पाच महिने अगदी मनसोक्त बागडलो आणि लवकरच तिची ताटातूट होणार या जाणिवेने अंतःकरण हेलावून जात आहे. तरीसुद्धा जिच्या दोन्ही तटांवर अगणित साधुसंत, योगी, ज्ञानी, भक्त, विरागी वास करून राहिले, देवादिकांनीसुद्धा जेथे घोर तपश्चर्या केली आणि आजही जिच्या पावन स्पर्शाने आपल्या जीवनाचे सार्थक व्हावे ही आस अंतरी बाळगून कित्येक साधक, सिद्ध, जपी, तपी जिची उपासना करीत असतात, जिच्या केवळ दर्शनानेही तृप्त होतात, त्या नर्मदामाईने आपल्यालाही आपल्या कृपापंखाखाली वाढविले, याचे एक आगळेच समाधान, एक विलक्षण धुंदी सर्वांगाला व्यापून राहिलेली आहे. जीवनाचा चित्रपट दृष्टीपुढून सरकत आहे– संथपणे. अगदी मैयाच्या प्रवाहासारखा.

नर्मदापुत्रांची अशी गाढ श्रद्धा आहे की, मैयाच तुम्हाला तिच्यापाशी खेचून आणते. अनेकांचा अनुभवही तसाच आहे. तिची इच्छा असली तरच नर्मदा परिक्रमा पुरी होते, अन्यथा नाही. नाहीतर परिक्रमेमध्ये काही ना काही विघ्ने उपस्थित होतात. कुणी आजारी पडतात, कुणी कष्टांनी थकतात, कुणी मनाने खचतात – आत्मविश्वास गमावून बसतात. अनंत अडचणी, आपत्ती कोसळून परिक्रमा खंडित होते. क्वचित् कुणी मृत्युमुखीही पडतात, पण ते भाग्यवान होत. श्रद्धावंतांना मात्र ती आपल्या पदराखाली घेते. ममतेने, कारुण्याने आपल्या लेकरांना सांभाळते. कुठला कोण मी ! किती अंतरावरचा, पण इथे मैयातटाकी कसा निश्चिंत मनाने विसावलो आहे. गुरुदेवांची असीम करुणा म्हणा किंवा नर्मदामैयाची ओढ म्हणा, येथपर्यंत येऊन पोचलो आणि परिक्रमेचे आवर्तन पुरे करू शकलो.

तालपुरा गावातील त्या पंजाबी साधूंच्या मठीतील ती रात्र आठवते. दोघे बहीण-भाऊ राहतात. उमर ऐंशीच्या घरातली. आपादमस्तक शुभ्र आणि अंतर्बाह्य शुद्ध. दृष्टी कशी

नितळ, पारदर्शी, कारुण्याने ओथंबलेली. चेहऱ्यावर प्रसन्नता फुललेली. असे प्रशात ८२।न क्वचितच घडते.

स्वातंत्र्याच्या आसपास स्वामीजी बहुधा इकडे आले असावेत. तेराव्या वर्षी घराबाहेर पडल्यावर हरिद्वार, बद्रिकेदार, वृंदावन, मथुरा अशा यात्रा त्यांनी तीन-तीनदा केल्या. भारतभ्रमणही केले. लाहोरला असताना एके रात्री स्वप्नामध्ये कुणा दिव्य स्त्रीने कमरेवर तीन लाथा हाणून म्हटले, 'ऊठ. तिकडे दक्षिणेकडे नर्मदा-तीरावर चल.' त्याबरोबर अमरकंटक येथून नर्मदापरिक्रमा सुरू केली आणि नंतर नर्मदातीरावरील या गावी कुटी बांधून राहिले. आजही ही स्मृती कशी मोगरीच्या फुलांसारखी टवटवीत आहे. असे हे मैयाचे सामर्थ्य !

कुणीकुणी विचारीत की, तुम्ही महाराष्ट्रातील. तुम्हाला नर्मदा कशी माहिती ? मी म्हणे की, बाबांनो, शाळेमध्ये भूगोलामध्ये नद्यांची माहिती असते. शिवाय आमच्या महाराष्ट्राला लागूनच ती वाहते ना ? 'नर्मदे सिन्धु कावेरी जलेऽस्मिन् संनिधिं कुरू' किंवा 'गंगा सिन्धु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा. .' असे स्मरण आम्ही करतोच ना ? अर्थात अशिक्षित वा अल्पशिक्षित लोकांना हे कसे कळणार ? त्यांना अचंबा वाटायचा. त्यांचे म्हणणे असे की, मैयानेच मला तिच्यापाशी आणले, आणि मीही त्यांची ही श्रद्धा मान्य करीत असे.

संपूर्ण भारतातून लोक नर्मदाकिनारी येतात. हौशे, नवशे आणि गवशे अशा तिन्ही प्रकारच्या लोकांचा परिक्रमेत भरणा असतो. साधू-संन्यासी आणि गृहस्थी लोक कोणत्या ना कोणत्या उद्देशाने येथे येतात. साधू-संन्याशांची तीर्थयात्रेची, मनःशांतीची भावना तर सांसारिकांची कोणती ना कोणती तरी कामनापूर्ती व्हावी ही इच्छा ! हा संसारच मुळी अडीअडचणींनी पुरेपूर भरलेला. पुरतेपणा कुठे तो नसतोच. कुणाचे लग्न होत नसते, कुणाला मनपसंत जोडीदार मिळत नसतो, कुणाला शिक्षणात अपयश येते, तर कुणाला नोकरी नसते. कुणाला उद्योगधंद्यात खोट बसत असते, तर कुणा गर्भश्रीमंताला मूलबाळ होत नसते. कुणावर लक्ष्मीची अवकृपा असते तर कुणाला नाना व्याधींनी ग्रासलेले असते. कुणा महाभागांना सर्व सुखे दाराशी लोळण घेत असली तरी चित्तशांती लाभत नसते. अशा या साऱ्या विवंचना दूर करणारी, भक्तकामकल्पलता अशी ही मैया. केलेले नवस फेडण्यासाठी मग परिक्रमा ! केवढे कष्ट ! ! किलोभर साखरेवरच देवाला भागविणाऱ्या भक्तांपेक्षा अशा या भक्तांची श्रद्धा किती उत्कट ! पुण्यसलिलेच्या दर्शनाने पावन होण्यासाठीच निष्कामपणे परिक्रमेचा मार्ग चोखाळणारे महामना नाहीतच असे नाही, पण विरळाच ते !

नागा संप्रदायाचा एक संन्यासी मोहतारा गावात भेटला होता. महाराष्ट्रीय. नागपूरकडील. कुणी मराठीभाषक भेटला की, चित्तवृत्ती उल्हसत असत. कुठल्यातरी शाळेमध्ये तो शिपायाची नोकरी करीत होता. बायको-मुलांचा संसार, पण अचानक पायांना कसलीशी गंभीर स्वरूपाची व्याधी जडून नोकरी गमवावी लागली. बायकोमुलांनीही त्याचा त्याग केला. ऐन तारुण्यात अशी दयनीय अवस्था प्राप्त झाल्यामुळे जीव उबगला. जीवनाची

समाप्ती करावी अशी अनिवार इच्छा मनी दाटायची. तशातच उज्जैनला कुंभमेळ्यात एका सत्पुरुषाची भेट झाली. त्यांनी नर्मदापरिक्रमा करण्यास सुचविले. पायांत चालण्याचेही त्राण नाही आणि एवढी अवघड परिक्रमा कशी करायची हे मोठेच प्रश्नचिन्ह उभे राहिले. तरीही स्वामीजींनी सांगितले, 'सर्व काही ठीक होईल. मैयावर श्रद्धा ठेव. ती तुला व्याधिमुक्त करील !' झाले. नर्मदा परिक्रमा करताकरताच याची व्याधी समूळ दूर झाली. आज या फक्कडाची निष्ठा एवढी जाज्वल्य की, मैयाशिवाय दुसऱ्या कुणालाही तो मानीत नाही. असे सश्रद्ध लोक पाहिले की, ऊर भरून येतो.

पण मी इथे का आलो ? मला ना कसली आस. नर्मदामाईकडून ना काही मागून घ्यावयाचे ना काही मिळवायचे. केवळ मैयाचे आकर्षण एवढेच म्हणता येईल. एरवी कोणत्याही तीर्थयात्रा वा देवदर्शनाबाबत उदासीन असलेला मी नर्मदामैयाकडे आकृष्ट होतो ना !

हर्द्यास आगगाडीतून उतरलो आणि उर्वरित रात्र प्रतीक्षाकक्षामध्ये कुडकुडत काढली. नेमावरला जायचे आणि तेथूनच परिक्रमेचा आरंभ करावयाचा एवढेच काय ते ठरविलेले. तेथे कुठे उतरावे, काय करावे, काहीच ठाऊक नाही; पण बसमध्ये एक इसम भेटला. त्याने दोन वर्षांपूर्वीच परिक्रमा केलेली होती. कोणत्यातरी कामनापूर्तीसाठी आज तो मैयावर स्नानासाठी आलेला होता. त्याच्या सोबतीने निघालो. मैयाचे सुभग दर्शन होताच प्रसन्न वाटले. एक अनामिक हुरहूर अंतरी दाटली. एकाकीपणा जाणवला. येथे ना कुणाची ओळखदेख. स्नानासाठी मैयावर गर्दी झालेली. आबालवृद्ध स्त्री-पुरुष भाविकांचा, श्रद्धाळूंचा तो समुदाय उघड्यावरच स्नान करीत होता. ना कसला संकोच ना भीती. कसे मुक्त वातावरण ! नर्मदामैया धन्य धन्य तुझी. आज तुझ्यापाशी आलो आहे. तुझी इच्छा म्हणून. सांभाळ या लेकराला.

स्नान आटोपले आणि त्या भगताने सुचविल्यावरून विश्वनाथजींच्या आश्रमात येऊन दाखल झालो. आश्रमाची इमारत अगदी साधी; पण स्वच्छ. कुठेही कचरा नाही. एक बैठकीची मोठी खोली आणि त्याला लागूनच एक छोटी ब्रह्मचारीची खोली. तिला लागून बाहेर ओसरी आणि त्याच्याबाहेर गच्चीसारखे अंगण– जमिनीपासून दोन फूट उंचीवर. सर्वत्र फरशी बसविलेली. अंगणाला तीन फूट उंचीचा रुंद कठडा. बैठकीच्या खोलीखाली तशीच मोठी खोली. आश्रमाच्या पाठीमागेच खालच्या बाजूला सिद्धेश्वराचे प्राचीन मंदिर. उत्तुंग शिखर आणि मंदिराच्या काळ्या दगडांवर पायापासून कळसापर्यंत संपूर्ण मूर्तिकाम. स्थापत्यशास्त्राचा आणि कलाकुसरीचा अप्रतिम नमुना असलेले मी पाहिलेले हे पहिलेच मंदिर. इस्लामच्या आक्रमणाच्या असंख्य जखमा अंगाखांद्यावर वागवीत हे प्राचीन शिल्प आजही ताठ मानेने उभे आहे.

विश्वनाथजी ब्रह्मचारी सत्तरीच्या घरातील. मूळचे कर्नाटकातील. पुण्याच्या गुळवणी महाराजांच्या गुरूंचे– लोकनाथ तीर्थांचे– गुरुबंधू. शुभ्र दाढीजटा. क्वचित कुठे काळा

कुंतल. दृष्टी सौम्य, विझलेली, अंतर्मुख. पाहताक्षणीच आदरभावना जागी व्हावी असे व्यक्तिमत्त्व. शरीर स्थूल.पोट सुटलेले; पण बेढबपणा नाही. सकाळी व रात्री आठच्या सुमारास आपल्या खोलीतून बाहेर येऊन दर्शनेच्छूंना दर्शन. इतर वेळी खोलीत बंद. बोलायचे झालेच तर खोलीतून. खोलीचा खिडकीसारखा छोटासा दरवाजा. त्यातूनच दर्शनार्थींना तीर्थप्रसाद. या खोलीतच ब्रह्मचारीजी स्वहस्ते भोजन बनवितात. कुणाकडूनही कसलीही सेवा नाही हा शिरस्ता.

आज आश्रमात वर्दळ नव्हती. ओसरीवर दोन-तीन जण बसलेले होते. ब्रह्मचारींच्या भेटीस आलो असून परिक्रमा करण्याचा मानस असल्याचे बोललो. काही वेळाने ब्रह्मचारींनी आत बोलाविले. मी महाराष्ट्रीयन असल्याचे कळल्यावर मराठीतून संभाषण सुरू झाले. अस्खलित वाणी. स्वामी स्वरूपानंदांना ते ओळखत असावेत. थोडी प्राथमिक चौकशी झाल्यावर म्हणाले-

"अध्ययन झाले आहे ?"

मुद्दाम म्हटले, "अध्ययन म्हणजे ? शाळा-कॉलेज ?"

"त्याला शिक्षण म्हणतात. अध्ययन म्हणजे काही म्हटले आहे का? संध्या करता का ?"

"पुरुषसूक्त, रुद्र म्हणतो. संध्या करीत नाही. संध्येतील प्राणायामाला मी महत्त्व देतो. 'सोऽहं' जप म्हणजे प्राणायामच ना ? कर्मकांड मी मानीत नाही."

"विचारलेल्या प्रश्नांचीच उत्तरे द्या. अधिक बोलू नका."

"------"

मृदू स्वरात म्हणाले, "ही दिव्याची काच. अशी काढली की, ज्योतीचा उजेड पाहा आणि तीच दिव्यावर बसविली की, तोच उजेड कसा दिसतो पाहा. मनोबुद्धीवर संस्कार व्हायला हवेत. काही बंधने, नियम आवश्यक असतात."

संभाषण संपले. आत स्टोव्हवर ठेवलेली कॉफी पेल्यामध्ये ओतून तो माझ्यापुढे ठेवला. म्हटले–

"मी चहा, कॉफी काही घेत नाही."

पुन्हा त्या महापुरुषाने स्टोव्हवर दूध तापविले आणि पेला भरून माझ्या पुढ्यात ठेवला. धन्यता वाटली. आनंदाने तो कृपाप्रसाद ग्रहण केला. निरोप देताना म्हणाले-

"परिक्रमा सुरू करण्यापूर्वी भेटा."

"तुमचे मार्गदर्शन, आशीर्वाद हवा आहे. आज इथेच राहीन म्हणतो. तुम्ही सांगाल तेव्हा निघेन !"

दुपारच्या जेवणाची ब्रह्मचारींनी चौकशी केली. माझ्यापाशी काहीच नव्हते. 'भिक्षां देहि' करायचे नाही असे ठरविलेले. तेव्हा त्यांनीच आपल्या स्वयंपाकातील वरणभात एका थाळीतून मला पाठवून दिला आणि ते अन्न घेऊन येणाऱ्या भक्तालाच अधिक अन्न

देण्याची सूचना दिली.

चाळीसहून अधिक वर्षे ब्रह्मचारीजी येथे वास्तव्य करून आहेत. सध्या त्यांचे एक वृद्ध गुरुबंधू येथे आहेत. त्यांची सेवा करण्यात ते मग्न असतात. अशी सेवामूर्ती पाहून समाधान होते.

*सेवाधर्मः परमगहनो योगिनामव्यगम्यः ।*

या चालत्या-बोलत्या ज्ञानाच्या मूर्तीपुढे कुणीही नतमस्तक व्हावे ! ।

दुसऱ्या दिवशी मैयावर स्नानासाठी नुसती झुंबड उडाली.

संक्रान्त, पौर्णिमा, अमावास्या, ग्रहण अशा पर्वकाळी मैयावर स्नान करणे पुण्यप्रद मानले गेले आहे. कुठून कुठून भाविकजन येतात. संगमावर तर अधिकच गर्दी उसळते. स्नानोत्तर सिद्धेश्वराचे दर्शन आणि नंतर ब्रह्मचारींसारख्या महामनाचे शुभ दर्शन हा येथील परिपाठ. त्यामुळे आश्रम नुसता गजबजून गेला. संतदर्शनासाठी रिक्तहस्ताने जाण्याचा प्रघात नाही. त्यामुळे कुणी मेवामिठाई, कुणी फळफळावळ, कुणी धन, कुणी धान्य असे काहीबाही ब्रह्मचारींच्या समोर ठेवतात. दर्शनानंतर ब्रह्मचारीजी दर्शनार्थीच्या हातावर मूठभर फुटाणे वा शेंगदाण्याचे कूट प्रसाद म्हणून ठेवतात. लहान असो वा मोठा असो, त्यांच्या प्रसादाची मूठ मात्र भरलेलीच ।

सकाळी दहाच्या सुमारास मैयावर स्नानासाठी गेलो असताना एका युवकाने 'नर्मदे हर' असे अभिवादन केले. तो गुजराती तरुण परिक्रमा सुरू करणार होता. ब्रह्मचारींना भेटला होता. त्यांच्याकडूनच त्याला माझी माहिती मिळाली होती. एकत्र परिक्रमा करावी अशी त्याची इच्छा होती. मनात विचार चमकला, 'मी असा सडाफटिंग. जवळ काही न बाळगणारा. कसलेही बंधन न ठेवलेला, कुणाबरोबर राहायचे म्हणजे बंधन आले. त्याच्या चालीने चालायला हवे. तो जाईल तिकडे जायला हवे. म्हणेल तिथे राहायला हवे. कसे जमणार हे ? पण जमेल तितके दिवस राहू बरोबर.' त्याला म्हटले, "आज दुपारनंतर निघायचे मी ठरविले आहे. आपण येणार असलात तर निघू बरोबरच."

तो म्हणाला, "मला अजून ब्रह्मचारींची परवानगी घ्यायची आहे. येथे पंधरा दिवस तरी राहण्याची माझी इच्छा आहे."

म्हटले, "मी कोणत्याही परिस्थितीत आज निघणारच. तुमचा विचार तुम्ही ठरवा."

असे म्हटले खरे; परंतु अजूनही आत थोडी धाकधूक होतीच. कसे होईल ? अडीअडचणीतून पार होऊ ना ? की परिक्रमा अर्धवटच सोडून द्यावी लागेल ?

स्नान केले. मैयाला मनोमन वंदन केले. हात जोडून उभा राहिलो. माथ्यावरील तळपत्या सूर्यनारायणाच्या साक्षीने पुटपुटलो-

"मैया, तुझ्यापाशी आलो आहे. अकिंचन होऊन. कसलीच अपेक्षा नाही. तुझ्या परिक्रमेसाठी निघालो आहे. कुणाकडेही कसलीही याचना करणार नाही. स्वतः अन्न शिजविणार नाही. आकाशवृत्तीने राहणार. तुझ्यावर सगळा भार आहे."

घरातून आईचा निरोप घेऊन निघालो तेव्हा तिने वाटेत खाण्यासाठी भाजलेले शेंगदाणे दिले होते. त्या पुडीतील चिमूटभर शेंगदाणे मैयाला समर्पित करीत म्हटले-

"हीच तुझी कडाही आणि हेच कुमारी भोजन. त्याचा स्वीकार कर."

सिद्धेश्वराचे दर्शन घेऊन रुद्राची एकादष्णी पुरी केली. आश्रमात येऊन दुपारचे भोजन आटोपले. तीनच्या सुमारास ब्रह्मचारींना भेटायला आत गेलो. म्हटले-

"आता परिक्रमेस निघणार, आशीर्वाद असावा. प्रवासात उरलेले हे चाळीस रुपये आपल्यास समर्पीत आहे."

"प्रवासात पैसे जवळ असावेत. खर्चासाठी लागतात."

"मी जवळ काही ठेवणार नाही. कुठे काही मागणार नाही असा नियम आहे."

"बरे. जरूर पडल्यास कळवा."

केवळ अंगावरील वस्त्रे, पंचा, पांघरायला एक सुती शाल, रोजनिशी व बॉलपेन एवढेच सामान जवळ ठेवलेले व कसले भाडेही घेतलेले नव्हते; पण पाणी पिण्यासाठी वा शौचविधीसाठी एखादे पात्र आपल्यापाशी असावयास पाहिजे असा पोक्त सल्ला एका वृद्ध गृहस्थांनी दिला. मूळचे पुण्याचे हे पानसे नामक सज्जन. दोन परिक्रमांचा अनुभव गाठीशी. एकदा तर निव्वळ चहावरच परिक्रमा केलेली! त्यांच्या सांगण्यावरून ब्रह्मचारींपाशी एक तांब्या मागितला. तेव्हा त्यांनी एक लहानसा मिश्रधातूचा तांब्या दिला. परिक्रमा पुरी झाल्यावर त्यांचा त्यांना परत करावयाचा असे ठरविले. ब्रह्मचारींनी दोन फळे– एक सफरचंद व एक पेरू– हाती दिली. तो प्रसाद ग्रहण करून आदरपूर्वक नमस्कार करून आश्रमातील सर्वांचा हार्दिक निरोप घेतला आणि परिक्रमेचे पहिले पाऊल पडले.

परिक्रमेचे नियम अनेक. कर्मकांडात्मक. कोणतीही साधना असो, नियम ओघानेच आले. आहार-विहार-आचार-उच्चार-विचार या सर्वच बाबतींत परिमितता असणे कोणत्याही अभ्यासाला आवश्यक असते. नर्मदामैया हे आराध्यदैवत म्हटल्यावर तिची उपासना श्रद्धापूर्वक व्हायलाच हवी. श्मश्रू वर्ज्य, नखेही काढावयाची नाहीत. दुसऱ्याच्या हातचे जेवायचे नाही. भिक्षा मागूनच स्वयंपाक करावयाचा. त्या अन्नातील एक भाग नर्मदेतील मीनमत्स्यांना, एक भाग तीरावरील गाईगुजींना, एक आकाशीच्या पाखरांना आणि मग उरलेले अन्न आपले. नेहमी जमिनीवरच बसावयाचे वा झोपावयाचे. खाटेवर बसावयाचे नाही. नर्मदाजलात प्रवेश करावयाचा नाही. प्रवाह ओलांडावयाचा नाही. एवढेच काय, पुलावरदेखील चढावयाचे नाही. अनवाणी चालावयाचे. परिक्रमा सुरू करताना नर्मदापूजन करावयाचे. प्रसाद करावयाचा. कुमारीभोजन करावयाचे. संतसज्जन, गोरगरीब यांना प्रसादवाटप करावयाचे. कठोर ब्रह्मचर्य पाळावयाचे. असत्यभाषण, विनोद वर्ज्य. त्रिकाल स्नान करायचे. संगमावर स्नान करायचे, संगमाच्या ठायी तीन दिवस वस्ती करायची. अन्य तीर्थक्षेत्रांचा महिमा गावयाचा नाही. शिवाचीच उपासना करायची. स्त्रियांच्या ठायी माता वा भगिनीभाव ठेवायचा. हिंसा,चोरी करायची नाही. एकभुक्त

राहायचे. भजनाव्यतिरिक्त अन्य गीते गायची नाहीत. छत्री वापरायची नाही. कांदा, लसूण, गाजर, वांगे वर्ज्य. आरसा वापरायचा नाही. डोळ्यांत सुरमा, काजळ घालायचे नाही. विडासुपारी त्याज्य. दात घासायला तंबाखूची मशेरी वापरायची नाही. असे अनेक.

पण माझे नियम मीच बनविलेले. मैयाच्या किनाऱ्यावरूनच शक्यतो भ्रमण करायचे. दिवसभरात कधीही मैयाच्या जलानेच स्नान करायचे. प्रवासात यदाकदाचित किनारा सुटला तरी सायंकाळी मुक्काम मैयाच्या किनाऱ्यावरील गावातच करायचा. साधू-संन्याशांच्या कुटींमध्येच आसरा शोधायचा. ते जमले नाही, तर मंदिर, धर्मशाळा यांचा आश्रय घ्यायचा. सन्मानाने पाचारण केले तरच कुणा श्रद्धावान गृहस्थाच्या घरी वस्ती करायची. कुणापुढे हात पसरायचा नाही. पैसाअडका बाळगायचा नाही. जे मिळेल ते मैयाचा प्रसाद म्हणून खायचे. स्वतः जेवण बनवायचे नाही. तयार भोजन असेल तरच जेवायचे. मैयाच्या जलाने स्नान केल्यावर रुद्राची एकादष्णी करायची आणि मगच जेवायचे. याशिवाय अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य यांसारखे इतर नियम आपोआप पाळले जाणार हे ओघानेच आले; परंतु काही कर्मकांडात्मक, विधानात्मक व आहाराचे नियम मात्र मी बंधनकारक मानायचे नाहीत असे ठरविले.

गेले कित्येक महिने घराबाहेर विशेष पडलेलोच नव्हतो. त्यामुळे तळवे अगदी गुलाबपाकळीसारखे नाजूक बनलेले. माझी वहिनी नेहमी माझ्या पावलांचे कौतुक करीत असे. लहानपणापासून भटकंतीची सवय असल्यामुळे, परिक्रमा पायी करण्याची धास्ती अशी कधीच वाटली नाही. ज्याच्या पायांवर चक्र पडलेले असते त्याच्या पोटऱ्या फुगीर असतात असा एक संकेत आहे म्हणतात. महाभारतामध्ये कुठेसा असा उल्लेख आहे की, अर्जुनाच्या पीळदार पोटऱ्यांकडे द्रौपदी कौतुकाने पाहते. म्हणूनच की काय अर्जुनाला तीर्थयात्रा करीत हिंडावे लागले! शरीराला ठराविक वेळीच अन्न पाहिजे, पोटभरच हवे असल्या कौतुकाची सवय केलेली नाही. जे जसे, जेवढे व जेव्हा मिळेल त्याचा संतोषाने स्वीकार करावयाचा असा स्वभावच बनून गेलेला जसा काही!

*सुखी संतोषा न यावे। दुःखी विषादा न भजावे।*
*आणि लाभालाभ न धरावे। मनामाजी॥*

ही माऊलीची शिकवण मनीमानसी जागती राहणे महत्त्वाचे असते.

पौष महिना. संक्रान्त जवळ आलेली. त्यामुळे थंडीचा कडाका भयंकर असणे अगदी स्वाभाविक. पहिल्याच दिवसापासून थंडीने आपली चुणूक दाखवायला सुरुवात केली. यापुढील दोन महिने खडतर परीक्षेला तोंड द्यावयाचे आहे याची जाणीव झाली. दोन दिवसांतच अनवाणी पाय मैयाच्या काठावर रुळू लागले.

मैयाच्या किनाऱ्यावर तूर, मसूर, मूग, हरभरा, वाटाणा, गहू अशी उभी पिके बहराला आलेली, दाणे भरू लागलेली. क्वचित कुठे कापणीस आलेली.

त्या दिवशी सकाळी स्नान आटोपून नित्याचा रुद्राचा पाठ करीत मार्गक्रमणा सुरू

झाली. नदीकाठानेच जायचे असे ठरविले; पण पुढे लागले वाळवंट आणि नुसते काटेच काटे. बिचकलो. कगारीकडे जाणारी एक पायवाट दिसली म्हणून वर आलो तर तुरीचे रान लागले. पुरुषभर उंचीची ताटे. त्यातून वाट काढता काढता दम फुटायची पाळी आली. कुठून अवदसा आठवली आणि या मार्गास लागलो असे वाटले. तेवढ्यात एक इसम दृष्टीस पडला. 'नर्मदे हर' चा पुकारा करताच थबकला. परिक्रमावासी म्हटल्यावर इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. त्या शेताचा तो मालक होता. मूठभर शेंगा त्याने खायला दिल्या. आपल्या घरी चलण्याचा त्याचा आग्रह मोडून पुढे निघालो. चांगला रस्ताच सापडेना. टळटळीत दुपार. माथ्यावरचा सूर्य आग ओकतो आहे. मैया खूप अंतरावर. पाण्याचा टिपूस नाही. तुरीच्या शेंगा खाऊन घशाला अधिकच कोरड पडलेली. शक्तिपात झाल्यासारखी अवस्था झाली. तेवढ्यात मैयाचे दर्शन होताच एकदम हुरूप आला. जवळ गेलो. आकंठ जलपान केले. काठावर मंदिर दिसले. त्यात जाऊन कोसळलो. ग्लानी आलेली. एक पाऊलही टाकण्याची शरीराची क्षमता नव्हती. ब्रह्मांड आठवले. अरे, सुरुवातीलाच ही अशी दशा होत असेल तर परिक्रमा कशी पुरी करणार, असा विचार क्षणभर तरळून गेला. झोप कधी लागली ते कळलेसुद्धा नाही.

जाग आली तेव्हा सूर्य ढळलेला होता. जरा टुकटुकी जाणवली. उठून बसलो. कुणीतरी सांगितले की, शेजारीच धुनीवाले दादाजींचा आश्रम आहे. सारे बळ एकवटून उठलो. दुरूनच आश्रम दिसला. शेपन्नास फूट उंचीवर असावा. कसाबसा आश्रमामध्ये पोचलो. 'नर्मदे हर' हे परवलीचे शब्द पुकारले.

"हर नर्मदे. क्यो भई, परिकम्मावासी हो ?"

"जी हाँ !"

"कहाँसे पधारे ?"

"नेमावर से उठायी परिक्रमा."

"ठीक है. आराम करो. भंडारा खतम हुआ है. भोजन हुआ क्या ?"

"नही."

तो मंदिराचा पुजारी होता. पुढे अधिक बोलला नाही. स्वस्थ बसून राहिलो. एवढ्यात एक वृद्धा बाहेर आली. अस्मादिकांची चौकशी झाल्यावर त्या भल्या गृहस्थाला म्हणाली-

"अरी, इन के भोजन का कुछ प्रबंध करो. कुछ बचा नहीं है तो पासमे देखो."

तो सज्जन उठला. मंदिराच्या आडोशाला राहणाऱ्या एका ब्राह्मण कुटुंबात त्याने माझ्या भोजनाची व्यवस्था केली. गृहस्वामिनी पंचविशीच्या आतील युवती. प्रसन्नवदना. परिक्रमावासी पाहून हरखलेली. चंद्रमौळी झोपडी. हातपाय पसरायला मिळेल एवढीच काय ती जागा. त्यात सगळा संसार. वर्षभराचा तान्हा मुलगा. झोपडीबाहेर सवत्स धेनू. पतीचा व्यवसाय भिक्षुकीचा. महिनाकाठी पाचपन्नास रुपयांचा खुर्दा पडशीत जमत असेल नसेल; पण तरीही समाधानी, आतिथ्यशील. दारिद्र्यामुळे चित्त गलबलले.

भाकरी आणि वांग्याची भाजी असे साधेच जेवण, पण त्यात जिव्हाळा ओतप्रोत भरलेला. याहून चांगले जेवण अतिथीला वाढू न शकल्यामुळे ती वारंवार हळहळत होती. भोजनदक्षिणा म्हणून पंचवीस पैसे दिले ते तिच्याच पदरात टाकले. अशा गरिबीतसुद्धा त्या कुटुंबाच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता लोपली नव्हती. हा दैवी संपत्तीचाच भाग होय. तिच्या सुहास्य वदनाकडे पाहता मला माझ्या प्रेमळ वहिनीची आठवण झाली.

*देखें अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता ।*
*तेथ रिगणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ॥*

दैवी संपत्ती लाभलेल्या व्यक्तींना भगवंत वश होतो असे स्वामी स्वरूपानंद म्हणतात.

धुनीवाले दादाजी म्हणजे त्या भागातील प्रसिद्ध सत्पुरुष. मध्य प्रदेशातील प्रत्येक साधूच्या कुटीत धुनी असायचीच. धुनी व चिमटा ही साधूची मालमत्ता. या धुनीवरच दूध तापवायचे, चहा करायचा, भोजन बनवायचे आणि धुनीतील अंगारावरच गांजाची चिलीम पेटवायची. सामुदायिक गांजासेवन व्हायचे तेही धुनीच्याच साक्षीने. धुनीपासूनच थंडीचे निवारण करायचे. दादाजींची भक्तमंडळी दूरवर पसरलेली असून, त्यांच्या पुण्यतिथीला येथे मोठा मेळा जमत असतो. त्या वेळी भंडारा होतो. नुकतीच ही पुण्यतिथी होऊन गेली होती. या वेळी मात्र सर्वत्र सामसूम होते.

थंडीचा जोर वाढलेला. मैयाचा काठ. त्यामुळे बोचरे वारे अंगाला झोंबत होते. रात्री उशिरा दादाजींचे उत्तराधिकारी शिष्य स्वामी नर्मदानंद ग्वाल्हेरहून आले. गौरवर्ण, उंचापुरा उमदा माणूस, मुंडित मुद्रा, सौम्य शांत स्वभाव. मितमृदुभाषी. अंगावर भगवी वस्त्रे. आमची आवभगत झाली. त्यांच्या पंगतीचा लाभ झाला. धुनी अखंड प्रज्वलित ठेवण्यासाठी लाकडाची व्यवस्था करावी लागते. आश्रमखर्चासाठी पैशाची आवश्यकता असते. यासाठी ते ग्वाल्हेरला गेले होते. धुनीभोवती बसून नंतर गप्पागोष्टी झाल्या. आश्रमात असलेल्या एका वृद्ध माताजीला माझ्याबद्दल कुतूहल होते. मी एवढ्या तरुण ( !) वयात परिक्रमा करावी याचे आश्चर्य तिच्या बोलण्यातून व्यक्त झाले. म्हणजे चाळिशीतही मी तिला तरुण वाटत होतो तर ! तिच्या ओळखीचा एक मुलगा घरदार सोडून पळाला होता. तो मीच आहे की काय याबद्दल तिने शहानिशा करून घेतली; पण तिचा भ्रमनिरास झाला.

नंतरही एकदा भेडाघाट परिसरात रस्त्याने चाललो असताना पाठीमागून 'भैया, भैया' अशा हाका मारीत कुणी एक दहा-बारा वर्षांचा मुलगा धावत आला. थबकलो. तो आर्जवे करून मला घरी चलण्याची विनंती करू लागला. प्रथम समजेना ही काय भानगड आहे; पण मग लक्षात आले की, त्याचा मोठा भाऊ काही वर्षांपूर्वी घरातून भांडून निघून गेला होता. माझ्याशी त्याचे साधर्म्य जाणवल्यामुळे हा मुलगा धावत आला; पण त्याची समजूत काढून 'तो मी नव्हे' असे मला पटवून द्यावे लागले. निराश होऊन तो परतला खरा; पण हरवलेला भाऊ सापडल्याच्या आनंदावर विरजण पडल्यामुळे त्याच्या निरागस चेहऱ्यावर पसरलेले ते निराशेचे सावट काळजाला स्पर्शून गेले.

छिपानेरला मैयाचे पात्र केवढे विस्तीर्ण. दूरवर पसरलेले निळेनिळे पाणी. पात्रात दगडगोट्यांचा नुसता खच आणि झुडपांची दाटी. पलीकडल्या काठावर जाण्यासाठी येथे तर आहे. अमरकंटकपासून रेवासागरापर्यंत नर्मदेवर सहा-सातच पूल आहेत. बाकी वाहतूक होड्यांतूनच चालते. उथळ पाण्यात काही ठिकाणी पावसाळ्यानंतर कच्चे पूल बांधतात. हे लाकडी पूल बांधण्याचे कंत्राट शासन ठेकेदारांना देते आणि ठेकेदार वाहतूकदारांकडून करवसुली करतात. महाराष्ट्रात असली प्रथा अस्तित्वात नसावी. माझ्या हृदयात वास करून राहिलेल्या नर्मदाकाठच्या काही रम्य स्थानांपैकी छिपानेर हे एक. येथील आश्रमातून दृष्टीस पडणारे ते नयनमनोहर सृष्टिसौंदर्य आणि ते भणाणणारे वारे. आश्रमाला आधुनिकतेचा स्पर्श झालेला आहे. स्वच्छता आहे; पण वर्दळ मात्र नाही. महापुरुषाच्या निर्वाणानंतर त्याच्या स्थानाला जी अवकळा प्राप्त होते ती याही ठिकाणी आढळून आली.

दादाजी असताना हेच स्थान कसे गजबजलेले असेल! कित्येकजण त्यांच्या दर्शनासाठी आसुसलेले असतील. त्या संतपुरुषाची कृपादृष्टी लाभावी आणि आपले जीवन उजळून निघावे या विचाराने कुठून कुठून आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी भक्तांची येथे ये-जा चालू असेल! कितीक जण त्यांच्या सेवेसाठी हात जोडून तत्पर असतील! त्या पुण्यपुरुषाचा स्पर्श झालेला या परिसरातील कण न् कण आजही त्यांचे अस्तित्व या ठिकाणी असल्याचे सांगतो. स्वामी नर्मदानंदांची शालीन आणि आर्जवी मुद्रा त्यांच्याच कृपेचे लाघव होय.

मनुष्याचा अहंकार हरण करणारी ही नर्मदा माई. 'नर्मदे हर' हे शब्द उच्चारताच अहंपणाचा लोप झाला तरच परिक्रमा सार्थकी लागली असे म्हणावे. परिक्रमा करण्याचा उद्देशच मुळी असा की, माणसाचा ताठा कमी व्हावा, नाहीसा व्हावा! मैया तर तुम्हाला पदोपदी धडे देत असते की, तुम्ही किती क्षुद्र आहात! पण माणसाचा मीपणा असा थोडाच कमी होणार असतो? जन्माबरोबरच तो त्याला चिकटून राहिलेला. वेळ येताच तो सारखा फणा वर काढीत असतो. मैयाच्या काठी भ्रमण करताना क्षणभरही अहंकार जागा होऊन उठला की, मैया त्याला फटका मारते याचा अनुभव सर्वांनाच येतो. क्रियेएवढीच प्रतिक्रिया होत असते, हा निसर्गाचा नियम परिक्रमेमध्ये मात्र चटकन प्रत्ययास येतो.

मैयाच्या काठावर शिवालये खूप. भगवान शंकरांची ती कन्या. शिवाय ती कुमारी. शिवोपासनेशिवाय अन्य कोणत्याही दैवताची उपासना तिच्या काठी करायची नाही. त्यामुळे जागोजाग शिवमंदिरे उभारलेली. त्यांतील कित्येकांची दैना उडालेली. हिंदूंची देवालये म्हणजे अस्वच्छतेची आगारेच जशी काही! इतर धर्मीयांची प्रार्थनास्थळे कशी स्वच्छ आणि शांत असतात! मंदिरातील गोंगाट हा आमच्या स्थायीभाव! झोपलेल्या देवाला जागे करण्यासाठी किंवा देवाची झोपच उडविण्यासाठी जणू हा गजर असावा! आमचा देवसुद्धा झोपाळूच. त्यामुळे त्याचे या हिंदू भक्ताकडे दुर्लक्ष होत असावे. बऱ्याचशा मंदिरांतील मूर्ती छिन्नभिन्न अवस्थेतील. पडझड झालेल्या भिंती, खडबडीत जमीन,

उखडलेल्या फरशा, घुमटीवर माजलेले गवत आणि गाभाऱ्याचा ताबा वटवाघळांनी घेतलेला. त्यांच्या विष्ठेचा उग्र दर्प गाभारा भरून राहिलेला. असा सगळा आनंदी आनंद. पुजारीसुद्धा पोटार्थीच. नीलकंठेश्वराचे मंदिर याला अपवाद नाही. तरीसुद्धा तिथे विसावल्यावर अननुभूत शांतीचा लाभ झाला हे मात्र सत्य.

नीलकंठ महादेवापासून पुढे झालो त्या वेळी माईच्या गहिऱ्या नीलवर्ण जलाशयाचे दर्शन खरोखरच डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. सकाळची वेळ. सूर्यनारायण नुकताच कुठे प्राचीच्या अंकावर विराजमान झालेला. विस्तीर्ण जलाशयावर पसरलेली ती कोमल किरणाची स्वर्णिम आभा अंतःकरणात आगळ्यावेगळ्या सुखाचा प्रत्यय करून देणारी. पाण्याच्या पृष्ठभागावरील मंदमंद लहरींवर झुलणारे ते स्वच्छ शुभ्र वर्णाचे सारस पक्षी आणि त्यांचा तो कलकल ध्वनी ! मन हेलावले. मातेच्या दर्शनाने बालकाची समूळ भीती नाहीशी व्हावी, अशी ती अवस्था होती.

*गतं तदेव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा ।*

काठावरील अरुंद पाऊलवाटेने प्रवास करणारा मी एकटाच नि शेजारी मैया अशी करुणार्द्र.

मैयाच्या प्रवाहाजवळून प्रवास करायचा म्हटले, तरी प्रवाह खूप दूरवर राहत असे. मैया कधी या तटाला तर कधी त्या तटाला बिलगते. काही काही ठिकाणी तर अनेक प्रवाहांनी ती वाहते. कधी दोन्ही काठ सोडून मधूनच मुसंडी मारून जाते. पलीकडच्या काठाजवळ प्रवाह असला— आणि बऱ्याच वेळा असेच घडे— म्हणजे मध्ये प्रचंड वाळवंट असे. पांढरीशुभ्र वाळू, जाडे, बारीक, मध्यम, मोठे गोटे असे नाना प्रकार. थंडीच्या दिवसांतून या वाळूमधून चालत जायचे आणि त्यात पाय फाटलेले असले म्हणजे मोठे दिव्यच ते ! प्रवाहापर्यंत पोचायला कधी पाच मिनिटेही लागावीत ! उन्हाळ्यात वरून तप्त ज्वालामुखी आग ओकीत असताना, या वाळूत पाय घालायलासुद्धा मन कचरायचे. दहा वाजल्यानंतर कुठला प्रवास ! ही वाळू कधी कधी मात्र पायांना गुदगुल्या करायची, तर कधी बोचकारायची. मायमाऊल्या हे वाळवंट तुडवीत डोक्यावरून पाण्याने भरलेल्या हंड्यांची उतरंड वाहताना पाहून गलबलून यायचे. किती कष्ट, किती यातना !

सुरुवातीला अगदी प्रवाहालगत प्रवास करायचा असे ठरविले; पण थोड्याच दिवसांत त्यातील अडचणी लक्षात येऊ लागल्या. कुठे नुसती वाळूच. त्यातून चालताना पोटरीत पेटके यावेत. कुठे जाड गोटेच, नुसते घट्ट बनलेले. ते हळव्या तळव्यांना असे काही टोचत की, मस्तकापर्यंत कळा जाव्यात. कुठे कुठे काटेरी झुडपेच झुडपे तर कुठे प्रचंड काचर. त्यामुळे पायांत काटे मोडावेत तर कधी पाय ओरबाडून निघावेत. कुठे पात्रात लहान-मोठे खडकच खडक. त्यांच्यामधून अगदी डोळ्यांत तेल घालूनच प्रवास करावा लागे. नाहीतर गुडघे व पायाच्या नळ्या फुटायला वेळ नाही लागायचा ! कुठे उंचच उंच कगारी. त्यातूनच बारीकशी पायवाट, नाहीतर कधी एकदम पुढची वाटच बंद असा प्रकार. मग अशा वेळी

प्रवाहापासून दूर व्हावे लागे. मैयाचा प्रवाह जवळ आहे ना, या विचाराने काठावरीलच चांगली मळलेली पायवाट पकडावी आणि मार्गक्रमण करावे ! अनुभवाने शहाणपण येत गेले.

त्या दिवशी प्रवाहाजवळून जाताना काट्यांचा नुसता खच पाहिला नि काठावर आलो, तर सर्वत्र बाभळीची झाडेच झाडे. मैयाच्या तटावर बोरी-बाभळी फार. काट्यांमध्ये कपडे अडकले. कोकणातील खैराच्या काट्यांची स्मृती जागृत झाली. काट्यांतून सुटका करून घेताना मोठीच पंचाईत झाली. तेवढ्यात एक इसम दिसला. 'नर्मदे हर'चा पुकारा केला. पायवाट सापडल्याचा आनंद झाला. आँवली घाटापर्यंत मजल मारायचा निश्चय सकाळी केलेला, त्यामुळे त्या भल्या माणसाला विचारले. खूप दूरचा पल्ला असल्याचे सांगून तो म्हणाला–

"आपल्या येथे एक महात्मा राहतात. तेव्हा आपणही येथे थांबावे. आम्हाला आनंद होईल."

त्याच्या आर्जवी विनंतीला मान देऊन पुढे जायचा बेत रहित करून त्याच्याबरोबर निघालो.

सुंदरलाल त्याचे नाव. महात्म्याच्या कुटीमध्ये त्याच्याबरोबर दाखल झालो. दहा-साडेदहाची वेळ असावी. महात्मा लाकडी बाजेवर तुलसी रामायणाचा पाठ करीत बसलेले.

"नर्मदे हर."

"हर नर्मदे महात्मा. पधारिये. सुंदरलाल, कहाँ मिले ये महात्मा ?"

सुंदरलालने थोडक्यात त्यांना सांगितल्यावर त्यांनी मला आसन द्यायला सांगून म्हटले–

"बिराजिये. चाय लोगे ?"

"चाय नही पीते."

"तो दूध ले लो."

"रहने दो जी. आप अपना पाठ पूरा कीजिये. हम बैठे रहेंगे. बादमें बाते करेंगे."

"अरे भई, रामायण का पाठ तो रोजाना होता ही है अतिथी का स्वागत करना यही हमारा प्रथम पाठ है. आश्रम का अर्थ है आनेवाले व्यक्तीका श्रम हरण करनेवाला. रामायणमें जो लिखा है उसका आचरण होना चाहिये. सिर्फ पन्ने पलटने से क्या फायदा ?"

महात्म्याच्या अंतरंगातील प्रकाश बाहेर पडला ! एका वाक्यात त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान प्रकट झाले. रामचरितमानसाला वंदन करून ते मिटून बाजूला ठेवले आणि महात्मा उठले. स्टोव्हवर दूध तापवून पेला पुढ्यात ठेवला. सुंदरलालला काही सूचना दिल्या आणि मन पुन्हा प्रेमालाप सुरू झाले.

मनमोहन निरालाजींचे वय पस्तिशीचे असेल-नसेल. भगवी वस्त्रे. छोटीशी काळीभोर

दाढी व जटा. तेजःपुंज करारी मुद्रा, तरीही दृष्टीतून प्रेमवर्षाव. स्पष्ट आणि मधुर मृदू वाणी. आग्रही पण लाघवी स्वभाव. प्रथमदर्शनीच आमची तार जुळली. असा प्रामाणिक महात्मा सापडणे विरळाच ! कोणत्याही बाबतीतली मते ठाम. भिडस्तपणा औषधालाही नाही. अत्यंत चोख आचरण. त्यामुळे गावकऱ्यांच्या मनी अपार श्रद्धा आणि आदर. सर्व जण त्यांच्या विचाराने वागणारे. कोणत्याही गोष्टींत स्वामीजींचा सल्ला महत्त्वाचा. कधी भांडण-तंटा उपस्थित झाला, तर त्याचे निराकरण करण्याचे कामही त्यांचेच. अशा रीतीने गावातील सर्वांशी समरस झालेल्या या महात्म्याचा योगक्षेम गावकरी आनंदाने चालविणारच.

दुपारचे जेवण टिक्कड आणि वरण. गव्हाची जाड भाकरी व तुरीचे घट्ट वरण– असे दोनच पदार्थ; पण चविष्ट. मैयाच्या दुधाची चवच काही न्यारी.

महात्मा मूळचे भोपाळचे; पण परिक्रमा करताना त्यांना हे स्थान आवडले. लोकांनाही या महात्म्याचे गुण भावले. त्यांच्या मनी श्रद्धा जागली. सुंदरलालच्या मामांनी त्यांना आपल्या शेतात सिमेंटची लहानशी कुटी बांधून दिली. एकच खोली. त्यात एक बाज, दोन-चार भांडीकुंडी, स्टोव्ह, छोटेसे कपाट, बसायला चटाई, रामचरितमानसाची पोथी, असा संन्याशाचा संसार. कुटीत तळघर. तिथे साधना करायची. या तळघरातच आपले देहविसर्जन व्हावे अशी त्यांची मनीषा आहे. सहजपणे बोलले–

"योगानंदजी, हम ऐसे वैसे साधू को कुटी में नही लेते. गांजेवाले, भंगडीवाले साधू को बाहर सेही निकाल देते हैं. सुबह सपने में एक साधू आनेवाला है ऐसा दृश्य देखा था और आप पधारे. समाधान हुआ."

भांडी घासली तीही कशी लख्ख ! भांड्यांवर एकदा पाणी ओतायचे आणि मग राखेने ती अशी चकचकीत करायची की, त्यांना पुन्हा पाणी लावायचे नाही. वापराच्या वेळी विसळून घ्यायची इतकेच. त्यामुळे पात्रांवर डाग पडत नाहीत. नीटनेटकेपणा, स्वच्छता आणि निर्व्यसनी वागणूक ही यांची वैशिष्ट्ये. दोनच दिवस त्यांच्या सहवासात राहिलो. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' हेच खरे. पावसला भेटलेल्या गुरुबंधू कानडे यांची या वेळी आठवण आली.

मैयाच्या दुसऱ्या किनाऱ्यावर– दक्षिणतटावर– भिलाडिया घाटावर आलो त्या वेळी निरालाजींना चिठी पाठविली, तर दुसऱ्या दिवशी आठ-दहा गावकऱ्यांना सोबत घेऊन ते भेटायला आले. संक्रांतीच्या दिवशी त्यांच्या आश्रमातून निरोप घेऊन निघालो होतो, म्हणून परतभेटीमध्ये [illegible] आठवणीने तिळाच्या वड्या आणि लोटाभर दूध आणले. असे निर्व्याज प्रेम लाभणे ही मैयाचीच कृपा नव्हे तर काय !

आमच्याबरोबर शिवभारतीनामक एक नागा साधू होते. त्यांना विडी-गांजाची सवय होती. तरुण वय. निरालाजींशी संभाषण चालले असताना ते विडी ओढत बाजूला बसून होते. निरालाजी गरजले–

“फेंक दो बीडी. हम बातें कर रहे हैं और आप बीडी पीते है ?”

नागाजी वरमले. बोलले–

“आदतसे मजबूर हूँ.”

त्यावर उसळून ते म्हणाले–

“आदतसे मजबूर हूँ ? आदत को मजबूर करो. अरे, सब कुछ छोडा और यह मामुली आदत नहीं छोड सकते ? हम साधूओंने ही साधुसमाज बिगाड दिया है.”

आणि माझ्याकडे वळून म्हणाले–

“योगानंदजी, आप भी इन्हें कुछ नहीं सिखाते ?”

सहजपणे म्हटले–

“निरालाजी, हमारा स्वभाव ऐसा है की, जो कुछ करता है उसे सिखानेवाले, टोकनेवाले हम कौन ? जिसे जो करना है वो करने दो.”

असा मनस्वी माणूस. ‘बोले तैसा चाले’ असा नेमस्त, तरीही जीवाजीवांबद्दल अंतरी कळवळा दाटलेला. सेवाभावी आणि निगर्वी. मैयाकिनारी नाना प्रकारचे साधू आढळले. प्रत्येकाची तऱ्हा वेगळी; पण त्यांतही वैशिष्ट्यपूर्ण असे काही मोजकेच भेटले.

काही शहरांचे अपवाद वगळता मैयाच्या प्रवाहात सांडपाणी सोडलेले नाही वा कोणी जलामध्ये प्रातर्विधी उरकत नाही. त्यामुळे नर्मदाजल अजूनपर्यंत तरी दूषित झालेले नाही. मैयाच्या तटावर ठायी ठायी घाट बांधलेले आढळतात. काही बरेच जुने, तर काही अलीकडेच बांधलेले. बुधनी येथील घाट कुणा शेठजीने नुकताच बांधलेला– जवळजवळ सत्तर-पंचाहत्तर पायऱ्यांचा. रुंदी अधिक नसली तरी सोपान पद्धतीचा. उंच डगरीमध्ये कोरलेला जिनाच जणू काही. बांधकाम अप्रतिम आणि घाटाची स्वच्छता चांगली राखलेली. घाटाच्या बाजूलाच तटावर नर्मदामंदिरही बांधलेले– छोटेसे पण सुबक. येथे मैयाचा प्रवाह थबकल्यासारखा संथ. विस्तीर्ण जलाशयाचे निळे पाणी पायऱ्यांशी हितगूज करते आहे. या नर्मदामंदिरातच रात्रीचा मुक्काम. कुणी महात्मा मंदिरात नर्मदापुराणाचे पारायण करीत होते. थोडा वेळ श्रवण केले आणि हळूच डोळा लागला.

सुरुवातीला सकाळी सकाळीच मैयावर स्नान आटोपायचो. मग कुठे मंदिरात रुद्राची एकादष्णी करायची आणि भ्रमण सुरू करायचे; पण नंतर मात्र यात बदल केला. स्नान उरकताच एकादष्णीला आरंभ करायचा आणि चालू लागायचे. धुतलेले कपडे अंगाखांद्यावर टाकायचे. वाऱ्याच्या झुळकांनी व उन्हाच्या तिरपीने ते तासाभरात वाळायचे. तोपर्यंत एकादष्णीही उरकायची. रस्त्यात कोणी भेटलाच तर ‘नर्मदे हर’ असे अभिवादन करून आपल्यातच मग्न होऊन पुढे जात राहायचे.

त्या दिवशी दिवस कासराभर वर आलेला असावा. शहागंज कुठवर आहे हे कुणाला तरी विचारायला हवे होते. पाठीमागून एक सायकलस्वार येताना दिसला. त्याला अभिवादन करताच ‘नर्मदे हर’ म्हणत तो पायउतार झाला.

"शहागंज का रास्ता सही है न ?"

"जी हाँ. आप किधर से आये ?"

"परिक्रमावासी हूँ."

त्याच्या मनी आपुलकी दाटली. सुशिक्षित माणूस परिक्रमेचा मार्ग चोखाळतो याचे अप्रूप त्याच्या चेहऱ्यावर उमटले. पुरोहितनामक तो सज्जन, विश्व हिंदूपरिषदेचा शहागंज शाखेचा उपाध्यक्ष असून, शिक्षक होता. शहागंज येथील मैयाच्या वाळवंटात सुरू असलेल्या यज्ञाच्या ठिकाणी सप्तशतीचे पाठ वाचण्यासाठी तो निघालेला होता. गडबडीत होता. आजच यज्ञसमाप्ती होती. यज्ञाचे ठिकाण सांगून तेथे येऊन भेटायला सांगून तो निघून गेला.

यज्ञाच्या जागी मंडप उभारलेला. मोठा मेळा जमलेला. हातपाय धुतले. ताजातवाना होऊन मंडपात दाखल झालो. बाहेर रणरणीत ऊन. आजूबाजूला गोंगाट. ठिकठिकाणी चहाची हॉटेले, मेवामिठाई, फुटाणे, लाह्या, खेळणी इ. वस्तूंची दुकाने. कुठे कसरतीचे खेळ चालले आहेत, तर सानथोर स्त्री-पुरुष आकाशपाळण्यात बसून आनंद लुटताहेत. तिकडे एकीकडे ध्वनिक्षेपकावरून शास्त्रीजींचे प्रवचन, तर दुसरीकडे 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है' असा अमिताभ बच्चनचा तारस्वर. यज्ञशाळेत देवीच्या दर्शनासाठी भाविकांची झुंबड उडालेली. प्रदक्षिणा घालताना लाह्या, फुटाणे आणि फुले देवीवर उधळणारी भक्तमंडळी. असा एकच गलका.

पाठ उरकून पुरोहित जवळ आले. आस्थेवाईकपणे चौकशी करून खजुराची पुडी पुढ्यात आणून ठेवली आणि पुन्हा पाठाकडे वळले. दुसऱ्याही एका भाविकाने खजूर आणून दिला. जराशाने पाठ आटोपले. ब्रह्मवृंद उठला. त्यांतील एक वृद्ध जवळ आले. मध्य प्रदेश सरकारच्या वन खात्यातील अधिकारी म्हणून निवृत्त झालेले हे गृहस्थ. पंचाहत्तरीची उमर. दाढीजटा आणि भुवयाही पांढुरक्या. धीरगंभीर मुद्रा. करडी नजर. उंचीपुरी शरीरयष्टी. अस्मादिकांचे महाविद्यालयीन शिक्षण झालेले समजल्यावर इंग्रजीमधून बोलण्याची त्यांना लहर आली. मैयाची परिक्रमा करण्याची तीव्र इच्छा असूनही वृद्धाप्यामुळे आता ती अपुरीच राहणार, याबद्दल विषादाची भावना त्यांच्या उद्गारातून उमटत होती. तरुण वयात आम्ही परिक्रमा करीत असल्याचे कौतुक त्यांच्या नजरेतून ओसंडत होते.

मघाशी प्रवचन करणारे शास्त्रीजीही भेटून गेले. मुंबईत पार्ल्याच्या संन्यासाश्रमात पंधरा वर्षे येत असत. मला काही बोलायचा– प्रवचन करण्याचा– आग्रह त्यांनी केला. म्हटले–

" 'नायमात्मा प्रवचनेन लभ्यः' अशी श्रुती आहे ना ? प्रवचन करण्याकडे माझा कल नाही. आपण इतके चांगले बोलला याहून अधिक चांगले मी बापुडा काय सांगणार ?"

सायंकाळी पुरोहितजींच्या घरीच जेवण आणि वस्ती. इकडच्या-तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर काही पुस्तके दिसली. दिव्याच्या अंधुक प्रकाशात काही चाळली. एका

पुस्तकामध्ये श्रीमदाद्यशंकराचार्यकृत नर्मदाष्टक दृष्टीस पडले. मला हवेच होते ते. लगेच उतरून घेतले. शंकराचार्यांची स्तोत्रे इतकी सुंदर, रसाळ आहेत की, मन हरखून जावे! भावपूर्ण, सुबोध, पदलालित्याने विनटलेली व गेय अशी त्यांची स्तोत्रे. रेखीव, कमनीय शरीरसौष्ठव, रसरशीत तारुण्य, सुवर्णचंपक अंगकांती, सुमधूर वाणी, मोहक विभ्रम अशा रमणीय सुंदरीला नखशिखांत वस्त्रालंकारांनी सजवावे तशी आचार्यांची ही कवितासुंदरी!

*सबिन्दुसिन्धुसुस्खलत्तरङ्गभङ्गितं*
*द्विषत्सुपापजातजातकारिवारिसंयुतम् ।*

किती नादमधुर, अलंकारप्रचुर आणि प्रासादिक रचना! परिक्रमावासीयांच्या पडशीमध्ये नर्मदामाईची तसबीर असते. स्नानोत्तर आणि भोजन करण्यापूर्वी तिचे पूजन करून नैवेद्य दाखविणे, सायंकाळी धूपारती करणे हा परिपाठ असतो. माझ्यापाशी यातले काहीच नव्हते. आता नर्मदाष्टक पाठ करायचे व दिवसाकाठी केव्हाही म्हणत जायचे असे ठरवून टाकले. अखंड चालत राहण्याचे व्रत. सुरुवातीला मी मुकाट चालत असे; पण नंतर मात्र सायंकाळ झाली की, नर्मदाष्टक, रामरक्षा, महिम्नादी स्तोत्रे, ज्ञानेश्वरी नित्यपाठ, गीतेचे अध्याय असे पठण सुरू व्हायचे. सकाळी प्रातःस्मरण, ईशावास्योपनिषद्, वगैरे.

प्रवचने करण्याची आवड मूळचीच असावी लागते. काही लोकांना 'शहाणे करूनि सोडावे । सकल जन' अशी परोपकाराची जाणीव असते. ते मग प्रवचनकाराचा व्यवसाय सुरू करतात. नंतर त्याचे व्यसनच जडते. प्रवचनासाठी व्यासंग करावा लागतो. खूप वाचावे लागते. पाठांतर हवे. सुसंगतपणे विचार मांडण्याची कला अवगत करायला हवी.

तुकाराम महाराजांसारख्या संतांची गोष्टच वेगळी. 'सेवितो हा रस वाटितो आणिकां' अशी स्वाभाविक ज्ञानदानाची ऊर्मी त्यांच्या अन्तर्गर्भात उमटते आणि 'अंतरीचे धांवे स्वभावें बाहेरी!' या न्यायाने ओतप्रोत कारुण्याचा सागर नुसता उसळत राहतो; पण व्यवहारातील गोष्ट मात्र याहून निराळी असते.

गीतेने स्पष्टच बजावलेले आहे की,

*इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।*
*न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥*

ज्याच्यापाशी तप करण्याची क्षमता नाही वा इच्छा नाही, ज्याच्या ठायी भक्तिभाव नाही, म्हणजेच सांगणाऱ्याबद्दल ज्याला आदर वाटत नाही, ज्याच्याजवळ श्रवण करण्याची पात्रता नाही वा जिज्ञासा नाही आणि जो परमेश्वराचा द्वेष करतो, म्हणजेच जो नास्तिक आहे अशा माणसाला गीताशास्त्र म्हणजे अध्यात्मशास्त्र मुळीच सांगू नये. जी गोष्ट अध्यात्माची तीच इतर कोणत्याही गोष्टीची. यामुळेच की काय मंत्रसाधना, तंत्रविधी गुप्त राखण्याकडे कल वाढत गेला. प्राचीन ग्रंथांतील गूढ प्रमेये आणि आचारातील गतानुगतिकता आज अनाकलनीय वाटतात, याचेही कारण ही प्रवृत्तीच होय. आपण आचरीत असलेल्या वा सांगत असलेल्या गोष्टीचा यथायोग्य मान राखला जाणे गरजेचे असते आणि त्यामुळेच

'अशिष्याय न देयम्' किंवा 'नष्टं वाक्यमश्रृण्वति' अशी वचने रूढ झाली. गरजवंतालाच विद्या दिली जात असे. योग्य ती किंमत चुकवावी लागत असे.

*गुरुशुश्रूषया विद्या पुष्कलेन धनेन वा ।*
*अथवा विद्यया विद्या चतुर्थी नोपलभ्यते ॥*

असे एक सुभाषित आहे. ज्ञानदेवांनी या संदर्भात किती मार्मिक ओव्या लिहिल्या आहेत !

*तें ज्ञान पैं गा बरवे । जरी मनीं आथी जाणावें ।*
*तरी संतां यां भजावें । सर्वस्वेंसीं ॥*
*जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंठा ।*
*तो स्वाधीन करीं सुभटा । वोळगोनि ॥*
*तरी तनुमनुजीवें । चरणांसी लागावें*
*आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ॥*
*मग अपेक्षित जें आपुलें । तेंही सांगती पुसिलें ।*
*जेणें अंतःकरण बोधले । संकल्पा न ये ॥*

आज समाजात शिक्षणाची जी वाताहत झालेली दिसते आहे, ती या विद्यादानाच्या सवंगपणामुळे होय.

असे जरी असले तरी परिक्रमेमध्ये दोन-तीनदा आपले विचार मांडण्याची वेळ आलीच. प्रेमळांचा आग्रह मोडणेसुद्धा ज्या वेळी अशक्य होते, तेव्हा असे घडते. छत्तरपूर गावातील ती रात्र या संदर्भात लक्षात येते. सायंकाळ झाली, पुढचा पल्ला गाठणे कठीण हे उमजताच भगवा ध्वज पाहून काठावर आलो. किंचित उंचावर लुहारबाबांची ती छोटीशी कुटी होती. पाच-पंचवीस जणांचा समुदाय बाबांच्या दर्शनासाठी जमलेला. विभूती देऊन बाबा रोग बरे करतात म्हणून ठिकठिकाणचे आर्त रुग्ण तिथे आलेले होते. गावातील काही तरुणही तिथे होते. त्यांनी गावांत वस्ती करावी अशी विनंती करताच त्यांच्याबरोबर निघालो. शांतिलालबाबानामक एक गुजराती महात्मासुद्धा त्यात होते. त्यांनी काही वर्षांपूर्वी परिक्रमेत असताना या गावी चातुर्मास केलेला होता आणि नंतरही अधूनमधून ते येथे येत असतात. प्रेमळांच्या आग्रहाखातर काही दिवस सत्संग होत असतो.

गावात शिरताच आजूबाजूची आणखी भक्तमंडळी एक एक करून गोळा होत गेली. तरुणांमध्ये भाविकतेचे प्रमाण चांगलेच. परस्परांतील स्नेहभाव वाखाणण्याजोगा. आमच्यासाठी रात्री जे जेवण बनविले त्याची चवच काही और ! रसना तृप्त झाली. नंतर शांतिलालबाबांनी आरती केली. नंतर खोलीत तीस-पस्तीस जण तरी जमले. खोली खचाखच भरून गेली आणि मी त्यांना काही ऐकवावे, अशी सर्वांनी आग्रहाची विनंती केली. यांना काय सांगावे हा नित्याचाच प्रश्न. मग शांतिलालबाबांना म्हटले, "आधी तुम्ही बोला." थोडा वेळ त्यांचे प्रवचन झाले, पुन्हा माझी पाळी.

संभाषण सुरू करून त्यातीलच एक धागा पकडला आणि मग काही दृष्टान्तांतून

आपले विचार मांडले. गृहस्थाश्रमातील आपापले कर्तव्य चोखपणे बजावत राहिल्यास ती परमेश्वराचीच सेवा होते. आत्मज्ञान कोणी कोणाला देऊ शकत नाही, तर ज्याचे त्यानेच ते करून घ्यावयाचे असते, अशासारखे काहीबाही सहजपणे सुचेल ते बोलत राहिलो. खोलीतील निःशब्द वातावरण आणि जीवाचे कान करून ऐकणारे ते श्रोते !

*वक्ता तो वक्ताची नोहे । श्रोतेनिविण ॥*

किंवा

*वक्तृत्वा अवधानाचा होय चारा ।*
*तरी दोंदे पेलती अक्षरां । प्रमेयांची ॥*

आणि

*भावाचा फुलौरा होत जाये मतिवरी ॥*

हे ज्ञानदेवांचे वक्ता आणि श्रोता यांच्यामधील नाते विशद करणारे शब्द किती सार्थ ! श्रीगुरुदेवांच्या अगाध लीलेपुढे नतमस्तक झालो.'चालविसी हाती धरूनिया' याचा प्रत्यय आला.

थंडी रोज वाढतच चाललेली. सर्वच ठिकाणी काही मनाजोगती सोय होईल, असा प्रकार नव्हता. त्यात काही डावे-उजवे असायचेच आणि एकदा सारे काही फुंकून टाकल्यावर जे जे प्राप्त होईल ते ते आनंदाने स्वीकारायला नको का ? त्यात कुरकुर करणे ही आत्मवंचना नव्हे काय ?

*जे पावे ते निवांता । साहोनि जावे ॥*

असे माउलीने नाही का सांगितलेले ? भर्तृहरीसुद्धा म्हणतोच ना.

*मनस्वी कार्यार्थी गणयति न दुःखं न च सुखम !*

कधी परांचा बिछाना, तर कधी काटेरी शय्या, कधी सुग्रास भोजन, तर कधी शिळेपाके बेचव अन्न, कधी भरजरी वस्त्रेप्रावरणे तर कधी लक्तरे, कधी मधुर प्रेमालाप तर कधी कर्णकटू शिव्याशाप. जगाची ही रीत हृदयात सदैव जागती असली म्हणजे जीवनातील हर घडी आनंदाचीच साक्षी असते.

आदल्या दिवसाच्या मुक्कामी पुढील मार्गाची, साधूसंन्याशांच्या कुटीची वा स्थानांची चौकशी करूनच सकाळी मार्गक्रमण सुरू होत असे. त्या दिवशीचा मुक्काम नादनेर येथे करावा असे ठरविले होते. मार्गावर हरभरा-वाटाण्याची, गव्हाची शेते लागत. अगदी सुरुवातीस, बहुधा बुधनीच्या अगोदर, ज्या वेळी फिर फिर फिरून पुन्हा मूळ जागेपाशीच आल्याची जाणीव झाली अशा चकव्यात सापडलो त्या वेळी भुकेपोटी गव्हाची काही कोवळी कणसे ओरबाडून खाल्ली होती. त्याने भूक शमली थोडीच ? पण मग लक्षात आले की, हा चोरीचाच एक प्रकार आहे. त्याबरोबर ठरवूनच टाकले की, कुणी आपणहून दिले तरच शेतातील धान्याला-पिकाला हात लावायचा. अन्यथा माईच्या दुधावरच गुजराण करीत तिच्याच स्मरणात मस्त रमायचे !

नादनेरच्या अलीकडील नारायणगाव. मावळतीकडे कललेला सूर्यदेव. हिवाळ्यातील हे लहान दिवस. त्यामुळे बघता बघता सूर्यास्त व्हायचा आणि अंधाराचे साम्राज्य पसरायचे. फर्लांगभर अंतरावरील मैयाचा खळखळाट कानावर आदळून आपण तिच्या सान्निध्यात असल्याच्या समाधानात हरभरा-वाटाण्याच्या भरलेल्या पिकांतून वाटचाल करीत असताना अचानक दोन किशोरवयीन बालके समोर उभी.

"नर्मदे हर, गुरुजी !

"हर नर्मदे !"

"गुरुजी, बटरी खार्येंगे ?"

अचंब्याने म्हटले, "क्यों नही ? खिलाओगे तो जरूर खाऊंगा !"

मुलांचा आनंद गगनात मावेना. ती निरागस बालके लगेच धावली आणि त्यांनी रोपटी उपटून माझ्यापुढे आणून ठेवली. घरगुती गप्पा सुरू झाल्या. त्यांची ती कोमल भावमुद्रा चित्तावर एक अनोखा ठसा उमटवून गेली. किती प्रेमादराने ती माझे शब्द कर्णसंपुटात साठवीत होती !

"आपको देखकर भगवान ही चल रहे हैं ऐसा लगा !" असे त्यांनी म्हणताच उत्तरलो,

"मेरे गुरुदेव ही आपके रूपमें मेरे सामने खडे है !"

बालकांचा प्रेमळ निरोप घेऊन पुढे निघालो तेव्हा दिवस बुडाला होता. नर्मदेवरील थंडगार वारा अंगाशी झटी घेत होता. झपझप पावले उचलीत नादनेर गाठले. तोवर चंद्र चांगलाच वर आला होता. मैयाच्या स्थिर पात्रावील कौमुदीचा तो पदन्यास मनाला भुरळ घालीत असतानाच हातपाय धुतले. पाण्याने तांब्या भरून घेतला आणि काठावरील कुटीत पाय ठेवीत म्हटले–

"नर्मदे हर. परिक्रमावासी हूँ. रात बितानी है. सोने के लिये जगह चाहिये."

"यहाँ जगह नही है. पास में मंदिर है, है उधर देखो. नही तो पंडितजी के घर चले जाओ."

गावात प्रवेशताच कुणीतरी सुचविले होते की, येथील पंडितजींच्या घरी सोय होईल; पण आमचा नियम होता ना ? साधू-संन्याशांच्या कुटीतच विसावायचे. मैयाच्या काठी अनेक वेळा महात्म्यांच्या सान्निध्यात राहिलो. त्यांच्याकडून आदरातिथ्यही स्वीकारले; पण अजिबातच धुडकावून लावण्याचे प्रसंगही आले नाहीत, असे नाही. क्वचित असे विपरीत अनुभवही मैयाने दिले.

*तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येनकेनचित् ।*
*अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥*

ही गीतेची शिकवण नाही का ?

जवळच्या मंदिरात सायंआरती चालली होती. तिथेही नकारघंटाच कानी आली. मग मात्र धर्मशाळेत रात्र काढायची, या निश्चयाने वाट पुसत निघालो. एका मुलाने एका चौकातून

पुढची वाट दाखविली आणि तो निघून गेला. तिकडे निघणार इतक्यात त्या धूसर चंद्रप्रकाशातून कानांवर शब्द आले–

"नर्मदे हर."

"हर नर्मदे," असा प्रतिसाद दिला. कोटाच्या खिशात हात घालून उभी असलेली ती व्यक्ती विचारती झाली–

"परिक्रमावासी हो ?"

"जी हाँ. यहाँ धर्मशाला किधर है ?"

'आप ब्राह्मण है ?"

"जी हाँ."

"तो चलो हमारे घर. पासमें ही है."

आपणहून आग्रह करून घरी घेऊन जाणारा हा तरुण, पंडित हरगोविंद पाठक यांचा मुलगा विनोदकुमार. एम. ए. झाल्यावर जवळच कुठे माध्यमिक शाळेत शिक्षकाची नोकरी करतो. सुटी असल्याने घरी आलेला. रात्रीच्या जेवणानंतर शतपावलीसाठी बाहेर पडलेला असताना योगायोगाने आमची गाठ पडली.

घरी आलो. सत्तरीच्या पलीकडील वृद्ध पंडितजी जेवायला बसलेले होते. हातपाय धुऊन त्यांच्या शेजारीच मांडलेल्या आसनावर जेवायला बसलो. अगदी आस्थेवाईकपणे चौकशी करीत आग्रहाने पंडितजींनी अतिथीचे स्वागत केले. तृप्त मनाने उठलो. गुरुदेवांच्या अगाध लीलेचा प्रत्यय आणखी एकदा आला. ज्यांच्या घरी जायचे नाही, असे ठरवूनसुद्धा त्यांच्याकडे राहण्याचा योग यावा, अगदी सन्मानपूर्वक, याला काय म्हणायचे ? पंडितजींबरोबर गप्पागोष्टी करता करता झोप कधी लागली ते कळलेसुद्धा नाही.

पंडितजींचा व्यवसाय भिक्षुकीचा. थोडी शेती. वृत्ती धार्मिक. अत्यंत सरल, आर्जवी स्वभाव. आर्थिक परिस्थिती बेतास बात असली, तरी चेहऱ्यावर समाधान. सुखी नेटका परिवार. दुसऱ्या दिवशी सकाळी निरोप घेतला तर त्यांच्या डोळ्यांमध्ये आसवे तरळली. भोजन करून निघावे, अशी त्यांनी केलेली विनवणी नाकारून पुढे जायचा बेत सांगितला. वृद्धाने पायांवर मस्तक ठेवून समोरच्या तीरावर आल्यावर भेटीस बोलवावे, असे सांगितले. केवढी विनम्रता आणि शालीनता ! अहंभाव लाजून चूर व्हावा अशी अवस्था. आपण नर्मदा परिक्रमा करू शकत नाही म्हणून आमच्यासारख्या परिक्रमावासीयांच्या दर्शनानेच धन्य होणारे असे महाभाग दुर्मिळ !

असे सज्जन मैयाकिनारी जागोजाग आढळले तरी याच्या विपरीत अनुभवसुद्धा कधी कधी आले नाहीत असे नाही. आँवली घाटावरील त्या पंजाबी संन्याशाच्या कुटीतील रात्र आठवते. सायंकाळी त्यांच्या कुटीत वस्तीस आलो. पोटात चार घास गेले असते तर चालले असते; पण स्वामीजींनी आम्हाला सांगितले की, ते रात्री भोजन करीत नाहीत. तसाच निजलो. मध्येच गारव्याने जाग आली. पाहतो तो महाराज खुशाल जेवताहेत. गंमत वाटली.

"जेवणार काय ?" असे त्यांनी विचारले; पण इच्छाच झाली नाही. साधू-संन्यासी बनूनसुद्धा असत्याचरण !

पंडितजींची भोजनाची विनंती नाकारली. केवळ तिळाचा एक लाडू प्रसाद म्हणून खाल्ला आणि बगलवाडा येथे सायंकाळी वस्ती करायची असे ठरवून पुढील वाट पकडली. दिवसभरात अन्नाचा कण पोटात गेला नाही. फक्त मैयाचे दूध पीत राहिलो. वाटेत दोघा जणांनी आपल्या गावी राहायचा आग्रह केला होता, पण उद्दिष्ट होते बगलवाडा येथील बनखंडी महाराजांच्या कुटीचे. सांज झाली तेव्हा कुठे मुक्कामावर दाखल झालो. शीतल चांदण्यात हातपाय धुऊन, तांब्या भरून वर आलो. यज्ञाची सांगता आजच झालेली. यज्ञमंडपाबाहेर बनखंडी महाराजांच्या समवेत चार-सहा मंडळी कोंडाळे करून बसलेली. यज्ञाच्या जमा-खर्चाची चर्चा सुरू असल्याने आपण त्यात नाक खुपसून रंगाचा बेरंग व्हायला नको म्हणून ताटकळत उभा राहिलो. शरीर कुडकुडत होतेच, त्यामुळे रात्रीच्या थंडीपासून बचाव करणे अगत्याचे होते. बराच वेळ कोणी ढुंकून बघेना. अखेर वेळ साधून 'नर्मदे हर'चा पुकारा केला. महाराजांनी नजर टाकलीसे केले. रात्रीची सोय व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली तर म्हणाले, "यज्ञशाळेत झोपा."

यज्ञशाळा म्हणजे बांबूच्या कामट्यांची चौकट– संपूर्ण उघडी व चंद्रमौळी. थंडी तर मी म्हणतेय. कुडकुडतच म्हटले– "आत झोपायची व्यवस्था होईल काय ?" उत्तर आले– "आत स्वयंसेवक आहेत, सामानसुमान आहे."

त्यांचे म्हणणे चूक नव्हते. तिऱ्हाइताला आत कसे घेणार? हजारो रुपयांच्या गप्पा करणारे महाराज आमच्यासारख्या फाटक्याला आत घेणार कसे? गुरुदेवांच्या या स्वरूपालाही मनोमन वंदन करून धर्मशाळेकडे निघालो. वाटेत एक पाठशाळा आढळली. तिथे गेलो; पण रात्रीच्या वेळी विश्वास कुणावर ठेवणार ? अखेर मैयाची इच्छा प्रमाण मानून पाठशाळेच्या व्हरांड्यातच फरशीवर टेकलो. आंथरायला काही नाही. पांघरूणही एक शाल. दात कडकडू लागले. पिशवीचे आसन करून पद्मासन, सिद्धासन, मुद्रा, बंध, प्राणायाम, भस्त्रिका सर्व प्रकार करून पाहिले. थंडीचा जोर प्रबळच. शेवटी पोटाशी पाय मुडपून आडवा झालो. थकव्याने ग्लानी आली. थोडाच वेळ. पुन्हा थंडीने गारठल्यामुळे उठून बसलो. शेकोटी पेटवून बसलेल्या गावकऱ्यांमध्ये मिसळलो. शरीराची ऊब काहीशी टिकवत गप्पागोष्टी करीत उजाडेपर्यंत बसून राहिलो. मैयावर जाऊन जलपान केले. पुन्हा एकवार हातपाय शेकले आणि अरुणाचलावरील त्या बालसूर्याच्या साक्षीने मार्गास लागलो.

कुणाच्या रूपात मैया समोर उभी राहील हे काही सांगता यायचे नाही. त्यामुळे गावकऱ्यांनी केलेला आग्रह डावलला म्हणजे पुढे अडचणींची रासच मांडून ठेवलेली आहे असे समजून यायला काही दिवस लागले. भ्रमणाची धुंदी काही विलक्षणच असे. त्या दिवशी राधाकृष्णाच्या मंदिरात काही मंडळी जमलेली दिसली. वाट पुसत चाललो होतो.

घटकाभर बसून पुढे झालो. किनाऱ्यावरील पुळणीत एक इसम भेटला. सायंकाळ झाल्यामुळे येथेच वस्ती करावी, असा आग्रह त्याने केला; पण पुढील गावच्या संन्याशाच्या कुटीत आजचा मुक्काम करायचा असे ठरविल्यामुळे किती अंतर आहे असे विचारले. कोसभर अंतर म्हटल्यावर पुढे जातो असे सांगितले. सूर्य कलंडला असला तरी पायाखाली दिसत आहे तोवर मुक्काम गाठता येईल असे वाटले. येथल्या खेडुतांची बोलीच मजेशीर.

"नर्मदे हर भय्या, आँवली घाट कितनी दूरीपर है ?"

"जे ही है."

"याने कितना दूर ?"

"होगा करीब कोस दो कोस."

या लोकांना कोस काय, मैल काय किंवा किलोमीटर काय सर्व सारखेच. सर्वत्र समभाव. यामुळे आपण त्यांच्या भरवंशावर राहिलो तर अडचणीत सापडणार हे नक्कीच. तसेच झाले. त्या संन्याशाच्या कुटीत रात्र काढायची अशा निश्चयाने हिरापूरच्या लोकांचा आग्रह डावलून पुढे झालो तो दिवस कधीच बुडाला. वाळूचे मैदान संपता संपेना. चंद्रप्रकाशामुळे पायाखाली काही दिसत तरी होते. एकेक चांदणी डोकावू लागली. मैया निःशब्द. पलीकडील तीरावरील गोंगाट लोपू लागला. मधूनच कुणाचा एखादा शब्द. कोंबड्यांचा कलकलाट व कुत्र्याचे भुंकणे नीरव शांततेचा भंग करी इतकेच. झपझप पावले उचलीत राहिलो, पण वस्ती व कुटी कुठे आढळेना.

एवढ्यात एक पाऊलवाट दिसली म्हणून वर झालो, पाहतो तर तुरीचे प्रचंड शेत. दुतर्फा डोकीवर उंच वाढलेली ताटे. मनुष्यवस्ती दिसेना. माघारी वळलो. पुनः वाळवंट. पुढे एक गाडीरस्ता दिसला. त्याने वर निघालो; पण कुठेच कसली हालचाल नाही चुकलो बहुधा म्हणून परत मागे. पुन्हा मार्गक्रमण; तरीही ठिकाण येईना. आता मात्र गांगरलो. पुढे जावे की मागे अशा द्विधा मनःस्थितीत सापडलो. अखेर काहीही होवो गाडीरस्त्यानेच जायचे ठरविले आणि मागे आलो. काही अंतर गेल्यानंतर शेतातील माणसांचा आवाज कानी आला. समाधानाचा सुस्कारा सोडला. त्या रोखाने निघालो. शेकोटीपाशी चार जण बसले होते. होला खात गप्पाविनोद चालले होते. "नर्मदे हर"चा पुकारा केला.

"हर नर्मदे. आइये महाराज. कहाँसे पधारे ?"

शेकोटीवर हात धरीत म्हणालो—

"भई, क्या तुम्हारी रीत ! जेही है जेही है बताते है. लेकीन ठिकाना नजदीक ही नही आता ! कितना घूमना पडा ! आखिर तुम्हारा दर्शन होना था !"

"ठीक तो है ! बटरी खाओ और आराम करो."

त्यांच्यापैकी तिघे जण निघून गेले. शेताचा मालक चंद्रभान पाठक राखण करायला शेतावरच राहतो. जराशाने म्हणाला—

"मैयाका जल लाता हूँ. आप थोडा आराम कीजियेगा !"

मैयावरून त्याने कळशी भरून आणली. भाकरी भाजल्या आणि टोमॅटो भाजून त्यांचे भरीत केले. अशा मस्त गरमगरम जेवणाने जठराग्नी शांत झाला. दिवसभराचे कष्ट कुठल्या कुठे पळाले. त्या शेतावर काय मिळणार होते ? पण माईची कृपाच अगाध ! जेवणानंतर गप्पागोष्टी करीत कधी झोपी गेलो हे समजलेच नाही.

कानाला खडा लावला की यापुढे मैयाची आज्ञा उल्लंघायची नाही. रामपुरा घाटावरचाच अनुभव. सायंकाळचा पाचचा सुमार. मैयाच्या पात्रात हातपाय धूत एक जण. पृच्छा केली–

"नर्मदे हर. भई, भेडा घाट कितनी दूरीपर ?"

"कुछ पाँच किलोमीटर होंगा."

"याने नजदीक है. आसानीसे पहुँच जाऊंगा."

"नही महात्मा. बहुत अडचन है. झाडी है. तकलीफ होगी." "बेहतर आप इधरही ठहरिये. यहीं एक साधूमहात्मा रहते है. उनके पास रात बिताइये."

मैयाची आज्ञा प्रमाण मानली. हातपाय धुतले. तांब्या जलाने भरून घेतला. धूळमाखल्या रस्त्याने निघालो. दोन्ही अंगांना शेते पसरलेली. संध्यासमयीचे रंग क्षितिजावर उधळलेले. वातावरण अगदी निःस्तब्ध.

साधूमहात्मा कुटीत नसल्यामुळे एका केवटाच्या– नावाड्याच्या घरी त्या माणसाने आणून सोडले. घर कसले ! खोपटच म्हणावयास हवे. समोरच्या अंगणात बकऱ्या व गाई बांधलेल्या. त्यामुळे त्यांच्या शेणामुताचा वास आसमंतात दरवळून राहिलेला. घरमालक लोकराम मल्लाह. अतीव आदराने त्याने कांबळे अंथरले. भोजनाची चौकशी केल्यावर त्या तसल्या वातावरणात जेवायला मनच होईना. तसे स्पष्टच सांगितले. दुसरे काही दिल्यास खाईन असे म्हटल्यावर त्या गरीब पण श्रद्धावान गृहस्थाने चार-सहा टोमॅटो, हरभऱ्याच्या शेंगा आणि लोटाभर– अर्धा लीटर दूध तापवून दिले.

केवट मोठा धार्मिक. गायत्री-उपासक. नर्मदातटी काही ठिकाणी गायत्रीची मंदिरे आढळली. उत्तरेकडे हा एक नवीन संप्रदाय उदयास आला आहे. त्याचे अनुयायी गावोगावी आढळतात. तिन्हीसांजेला सामुदायिक जप व मैयाची आरती करून मग जेवायचे, असा या लोकरामचा नियम. त्या दिवशी माझ्यासारखा परिक्रमावासी त्याच्या घरी आल्याचे त्याला केवढे अप्रूप ! माझ्याकडून त्याने आरती करविली. नंतर मंत्रपुष्प म्हटल्यावर त्याला किती आनंद झाला म्हणून सांगू ! त्याचे घर पावन झाले, असे वाटले त्याला !

सकाळी त्याने पुन्हा लोटाभर दूध प्यावयास दिले. त्याचा प्रेमळ निरोप घेऊन पुढे निघालो. भेडाघाटला पोचायला दुपारचे साडेअकरा वाजले. मार्गात एवढे खडक, काटेकुटे, झाडेझुडपे आणि चिखल की काल सायंकाळी त्या तरुणाने सांगितलेली गोष्ट न जुमानता तसाच निघालो असतो तर या दुस्तर संकटाला आमंत्रण दिल्यासारखेच झाले असते आणि मैयाची आज्ञा अनुल्लंघनीय आहे, असा जो निर्णय घेतला होता तो योग्यच होता याची

खात्री पटली.

मध्य प्रदेशमध्ये अजूनही संस्कृत पाठशाळा आहेत. महाराष्ट्रात आजमितीस अशा पाठशाळा आहेत का हे ठाऊक नाही. वेदशाळा मात्र महाराष्ट्रात आहेत. मॉगरौल येथे वृंदावनच्या बोपोडीबाबांचा आश्रम आणि रेवाविश्राम संस्कृत पाठशाळा मैयाच्या काठावर आहे. पहाडी प्रदेशांतून मैया वळणे घेत घेत येथे उत्तरवाहिनी झाली आहे. समोर तिचे विस्तीर्ण पात्र. त्यावर सूर्यकिरणांची चमचम. पंचेचाळीस पायऱ्यांचा येथील घाट सुस्थितीत आहे. बगलवाडा येथील पूर्वीचा घाट वाहून गेलेला, पण जीर्णोद्धाराची काही योजना नाही. उलट फरशांचा उपयोग मंदिराच्या बांधकामासाठी करणार आहेत म्हणे.

रेवाविश्राम पाठशाळेत दुपारी दाखल झालो आणि किशोरवयीन विद्यार्थी सभोवार जमले. त्यांचे आचार्यद्वय सीताराम पांडेजी आणि ॐ प्रकाशजी कटारे भेटायला आले. दोघेही तरुण. काशी येथून 'आचार्य' ही पदवी संपादन केलेले. भोजनाची चौकशी करून व्यवस्था झाली. या पाठशाळेत मध्यमा परीक्षेपर्यंतचे अध्ययन चालते. शास्त्री, आचार्य या पदव्यांसाठी काशीला परीक्षा द्यावी लागते.

आचार्यांच्या ठायी विनम्रभाव. महाराष्ट्रीयनांबद्दल इकडे आदराची भावना आढळते. 'विद्वान की पहचान होती है उसकी जबानसे' हे ॐकारेश्वरच्या मार्कण्डेय आश्रमातील सुवचन ! माणसाच्या भाषेवरून वा वाणीवरून त्याच्या सुसंस्कृतपणाची वा विद्वत्तेची पारख होत असते.

इंजिनिअरिंगची पदवी घेतलेला एक माणूस सर्व सोडून परिक्रमा करतो याचे नवल येथील जनांच्या मनी दाटलेले. पाठशाळेच्या वरील मजल्यावरील खोलीत चित्रकूटनिवासी सीतारामजींची भेट झाली. चाळिशीचीच उमर असेल; पण दाढीजटा संपूर्ण पिकलेल्या. या साधूचे महाविद्यालयीन शिक्षण झालेले होते. नोकरीसुद्धा काही वर्षे केलेली होती. नर्मदा परिक्रमा, चारीधाम यात्रा असे भ्रमणही त्यांनी केलेले. अधूनमधून या आश्रमात ते येत असतात. त्यांनी परिक्रमेतील आपले काही किस्से ऐकविले. मौनव्रत आणि अकिंचनावस्थेतच त्यांनी परिक्रमा केलेली. शूलपाणीच्या झाडीत भिल्लांनी त्यांना मुळीच त्रास दिला नाही म्हणे !

सायंकाळी गच्चीवर आठ-दहा जण भजनासाठी बसलो. आग्रह झाल्यामुळे तुकोबांचा 'शरण शरण नारायणा ' हा अभंग म्हटला. उत्तरेकडील व महाराष्ट्रातील भजनांत फरक आहे. अर्थात धांगडधिंगा तोच. तिकडे आरत्यांची चाल एकच. 'जय जगदीश हरे' हीच एकमेव चाल. आपल्याकडे पुण्या-मुंबईतील लोक जसे सगळ्या आरत्या 'सुखकर्ता दुःखहर्ता' या चालीवर म्हणतात ना तशी. कोंकणातील रत्नागिरी जिल्ह्यात मात्र गावागावांतील पारंपरिक उत्सवांमध्ये आरत्यांच्या पंधरा-वीस विविध चाली आढळतील. त्यामुळे एक आगळाच रंग भरत असतो.

दुधी नदीचा संगम. सायंकाळ झालेली. सहस्ररश्मी आपली किरणे आवरत निघालेला.

उंच कगारीखाली थकले-भागलेले शरीर टेकले आणि मैयाचे पाचूसारख्या रंगाचे जल अपलक नेत्रांनी न्याहाळू लागलो. समोरच्या तीरावर पांढरे शुभ्र वाळवंट. मैयाचा प्रवाह उत्तरतटाकडे झुकलेला. वाऱ्याच्या मंद मंद झुळकांनी पृष्ठभाग कसा हलकासा आंदोळतोय. सारसांचे थवे मुक्तपणे विहरताहेत. हिरव्यागार साडीवरील पांढऱ्याशुभ्र फुलांची नक्षीच जणू काही! मधूनच त्यांचा कलकल ध्वनी निनादतो आहे. आईचा वात्सल्यभरा हात अंगावरून फिरल्यावर सारे कष्ट दूर व्हावेत तसा दिवसभराचा शिणवटा कुठल्या कुठे पळून गेला.

उंच टेकाडावरील लहानशी कुटी. कुटीच्या सभोवार आंबा, वड, पिंपळ यांची रोपटी आणि फुलझाडे लावलेली आहेत. पाच-पंचवीस केळीची झाडे आणि पन्नास लिंबांची झाडेही वाढविली आहेत. भिक्षा मागून आणि स्वकष्टातून हा आश्रम महंतांनी उभा केला आहे. नुकतीच कुठे सुरुवात आहे. नर्मदातीरावर प्रथमच केळीची झाडे आढळली. आश्रमाचा महंत वा साधू म्हटला म्हणजे दाढीजटा, सर्वांगाला भस्म वा गंध, गळ्यात माळा असा वेष कुणाच्याही नजरेसमोर उभा राहणे स्वाभाविक. त्यामुळे तेथे आमच्यासारख्याच वस्तीस आलेल्या एका पंजाबी संन्याशालाच महंत समजून अभिवादन केले; परंतु नंतर मात्र खरे बिनदाढीजटेचे धनराजगिरी महंत उपस्थित झाल्यावर आश्चर्याचा थोडा धक्का बसला.

महंत भारी जिद्दीचा माणूस. स्वभावाने प्रेमळ. चाळिशीची उमर; पण चेहरा वार्धक्याची खूण मिरवणारा. ऐन तारुण्यात अखंड अफूसेवन आणि अपरिमित शारीरिक श्रम करून शरीराची पार धूळधाण उडालेली. आज मात्र अफूच्या व्यसनातून मुक्त आहेत. थोडेसे गांजासेवन चालते तेवढेच. साधू म्हणजे गांजाभांग सेवन हे समीकरण जनमानसांत रूढ झालेले. भोलेनाथाचे उपासक ना ते! सामूहिक गांजासेवन हा साधू समाजामधील शिष्टाचार मानला गेलेला आहे. त्यामुळे भगवान शंकराचा प्रसाद नाकारणे हे औद्धत्याचे लक्षण होय. तो अक्षम्य अपराध समजला जातो. असे कुठेसे वाचलेले होते; पण आमचा अनुभव मात्र वेगळा आहे.

रात्री महंतजींनी धुनीवर बनविलेल्या जेवणात आम्ही तिघे-चौघे जेवलो. त्यानंतर धुनीभोवतीच गप्पागोष्टी करीत शेकत बसलो. गांजाची चिलीम फिरू लागली, हात जोडले आणि 'पीत नाही' असे नम्रपणे सांगितले. अधिक आग्रह झाला नाही. कुणी रागावलेही नाही. उलट मी चहा, कॉफी, विडी, तंबाकू, भांग, गांजा यांसारख्या कसल्याच व्यसनात अडकलेलो नाही यामुळे त्यांच्या ठिकाणी आदराचीच भावना रुजली. एकदा एक माणूस म्हणाला की, आयुष्यात प्रथमच त्याला माझ्यासारखा चहाही न पिणारा माणूस भेटला. आपणासारखे आपले जग असते हा सिद्धान्तच आपणास अनुभवास येत असतो.

मोठा आश्रम बांधावा. त्याभोवती बागबगीचा असावा. आश्रमात येणाऱ्यांच्या उदरनिर्वाहाची सोय व्हावी अशी मनीषा धनराजगिरी बाळगून होते. आश्रमाची देखभाल करणारा उत्तराधिकारीही त्यांना हवा होता. माझ्याकडून त्यांना तशी अपेक्षा असावी असे

त्यांच्या उद्गारांतून जाणवले; पण या स्वच्छंदी पाखराला पिंजरा कसा रुचणार ? धुनीभोवती गप्पा रंगल्या. प्रत्येकाने एक कथा सांगावी असा प्रस्ताव खुद्द महंतजींनीच मांडला आणि त्यांनी एक छोटीशी बोधप्रद कथा ऐकविली–

खूप मोठे अरण्य. त्यात भले थोरले डेरेदार वृक्ष. नाना जातींचे. त्यांच्यावर विविध पक्ष्यांचे वास्तव्य. दिवस सुखात जात होते. एके दिवशी त्या अरण्यात एक ट्रक आला. त्यातून भराभर माणसे उतरली. काही जणांच्या खांद्यावर धारदार कुऱ्हाडी. वृक्षांची आपापसात कुजबूज सुरू झाली. आपला नाश करण्यासाठी या कुऱ्हाडी आल्या आहेत तेव्हा यांचा बंदोबस्त कसा करावा या विचाराने त्यांना ग्रासले. त्यांतीलच एक जुनाट वृक्ष म्हणाला, "बाबांनो, या कुऱ्हाडींना बोल लावून काय फायदा ? त्या आपल्या खऱ्या शत्रू नाहीतच मुळी. केवळ कुऱ्हाडीची पाती आपले काहीच नुकसान करू शकत नाहीत; त्यांच्या जोडीला कोण आहे ते पाहिले का ? तो तर आपलाच भाईबंद आहे ! त्यांच्यामुळेच तर हा सारा उत्पात घडणार आहे. आपणच आपले खरे शत्रू आहोत !"

*आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ।*

असे गीतेने जे सांगितले आहे ते याच अर्थाने.

पंजाबी संन्याशांनी पुराणांतरीची दुधी नदीच्या उत्पत्तीसंबंधातील कथा रसाळपणे कथन केली. रावणवधानंतर सीतामाईसह राम अयोध्येकडे निघाले. मार्गामध्ये पुष्पक विमान एका पर्वतावरून जात असताना मारुतीरायांना आपल्या अंजनीमातेची आठवण झाली. या पर्वतावरच ती भगवतचिंतनामध्ये मग्न होती. आपल्या प्रभूचे तिला दर्शन घडावे आणि तिच्या जन्माचे सार्थक व्हावे या उद्देशाने हनुमानांनी प्रभू रामचंद्रांना तेथे उतरण्याची विनंती केली. परमप्रिय सेवकाची इच्छा जाणून श्रीरामांनी पुष्पक विमान त्या पर्वतावर उतरविले. मारुतीराय आपल्या मातेच्या दर्शनास गेले. साक्षात भगवंत येथे अवतरले असून डोळे उघडून त्यांचे दर्शन करावे अशी त्यांनी मातेला विनवणी केली; परंतु अंजनीमाता रामरायाचे नाव ऐकताच क्रोधायमान झाली. मिटल्या डोळ्यांनीच ती आपल्या पुत्रावर कडाडली, "रावणवधासाठी ज्या रामाला वानरांची मदत लागली तो कसला भगवान ? आणि तुझ्यासारख्या बलभीमाला रावणाला मारणे काही अशक्य नव्हते. माझे दूध फुकट गेले. मला तुझे तोंडही पाहायला लाज वाटते." क्रोधातिरेकाने या वानरीच्या स्तनांतून दुधाचे झरे स्रवले. तीच ही दुधी नदी.

दुधी नदीच्या फेसाळणाऱ्या पाण्याकडे पाहून बहुधा कुणा कथाकाराला ही अद्भुत कथा लिहिण्याची कल्पना सुचली असावी !

धनराजगिरी महंतांचा प्रेमळ निरोप घेऊन सकाळी निघालो. सूर्यनारायणाचा लपंडाव सुरू होता. शिवाय बोचऱ्या वाऱ्याची अंगलट. त्यामुळे शरीर काकडत होते. पायांना खडे टोचत होते. तरीसुद्धा मैयाची जवळीक सर्व काही विसरायला लावीत होती. मध्येच कुणी 'नर्मदे हर' करून अभिवादन केले, तरच प्रतिसाद द्यायचा, एरवी आत्मानुसंधानात दंग.

माध्यान्ही मात्र सूर्याने दृष्टी पूर्णपणे उघडली आणि मग मात्र त्या चंडकिरणांनी धरा व वाळवंट भाजून निघाले. वाळूच्या त्या प्रचंड मैदानातून वाटचाल करताना चटके बसून कष्ट होऊ लागले. उद्या भर उन्हाळ्यात सकाळच्या दहानंतर प्रवास करायलाच नको, असे आजच जाणवू लागले. दुपारी एकाच्या घरी विसावलो आणि उन्हे कलल्यावर पुढील रस्ता पकडला.

मैयाचा तीनचतुर्थांश प्रवाह मध्य प्रदेशातून वाहतो. नद्यांना आपण लोकमाता म्हणतो. साऱ्या संस्कृती या नद्यांच्याच काठी वसल्या, वाढल्या; पण मैयाच्या किनाऱ्यावर मात्र ठायी ठायी दारिद्र्यच आढळले. प्रचंड पहाड फोडून मैया आपली जलसंपत्ती सागरास अर्पण करीत असते; परंतु काठावरील गावांना मात्र पिण्याच्या पाण्यापुरताच तिचा उपयोग. शेती होते ती फक्त पावसाच्या पाण्यावर. त्यामुळे नर्मदाकाठ बहुतांशी मागासलेलाच आढळला.

पतईच्या अलीकडे एक परिक्रमावासी भेटले. दोन-तीनदा चारी धामांच्या यात्रा त्यांनी केलेल्या. पंचावन्नची उमर, गोरेगोमटे गरगरीत शरीर. तोंडाची टकळी अखंड चालू. पतई घाटावर नर्मदामैया परिकम्मावासीयांजवळ काही कमी असेल तर त्याची पूर्तता करते असे बोलले. मुकाट सर्व ऐकत चाललो होतो. पतईला येऊन पोचेपर्यंत चंद्र चांगलाच वर आला होता. मैयावर हातपाय धुतले. चमचमणारे चंदेरी वस्त्र ल्यालेल्या त्या नर्मदामातेचे ते विलाभनीय रूप पाहून भक्तिभावाने हात जोडले आणि नर्मदाष्टक म्हणत आश्रमात प्रवेश केला.

पतई घाटावरील स्वामी बालकराम स्वरूपानंदांचा आश्रम. विस्तीर्ण आवार. स्वामीजींची राहण्याची खोली. त्याबाहेर ओसरी. मध्ये मोकळे पटांगण. समोर सर्वसिद्धेश्वर मंदिर. स्वतः स्वामीजींनी बांधलेले. दुमजली. त्याला लागूनच धर्मशाळा व स्वयंपाकघर. आश्रमाची गोशाळाही आहे. मैयातटाकींचा गजबजलेला आश्रम. सर्वसिद्धेश्वर मंदिरामध्ये सर्व धर्मांतील पंथोपपंथांतील थोर सत्पुरुषांची चित्रे रेखाटण्याचा स्वामीजींचा मानस. सगळ्या धर्मांची मूलतत्त्वे एकच असल्याने धर्माधर्मांत भेदभाव करण्यात काही अर्थ नाही, असा सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वामीजींपाशी असल्याचे आढळून आले

प्रवासातील सोबती स्वामीजींना भेटून त्यांच्या खोलीतून बाहेर पडला आणि मी ओसरीवर चढलो. भोजनाची वेळ झाली होती. पंगतीला पाच-पंचवीस जण होते. भोजनानंतर आरती झाली. स्वामींच्या खोलीत प्रवेश केला. बरोबर सहप्रवासी होताच: हात जोडून अभिवादन करून भुईवर बसलो.

स्वामीजींची मुद्रा प्रसन्न, गंभीर. गौरवर्ण काया. सडसडीत बांधा आणि मध्यम वय. कषायवस्त्रधारीमूर्ती. खोलीत पाच-सात मंडळी अगोदरच बसलेली आणि त्यांच्याशी संभाषण चालू. वाणीमध्ये अप्रतिम गोडवा. कसलाही अभिनिवेश नाही. दृष्टी कशी शांत, निवलेली. जवळच धुनी पेटलेली आणि प्रसादाचा डबा. धुनीमुळे खोलीत उबदार वातावरण. भक्तांच्या चेहऱ्यावर सगळीकडेच आढळणारी मख्ख भावुकता. आदबशीर

आदरभावना दाटलेली. स्वामीजींनी वळून विचारले–

"परिक्रमावासी हो?"

"जी हाँ."

"कहाँ से उठायी?"

"नेमावर से."

"कितने दिन हुए?"

"कुछ पंद्रह दिन हुए होंगे."

"याने अभी अभी परिक्रमा शुरू की है. लेकीन ये दाढी-जटाएँ कैसी? आपने मुंडन नही किया? परिक्रमा के नियम नही रखते? तुम्हारी परिक्रमा नियमबाह्य है. उसका फल नही मिलेंगा."

निर्धाराने म्हटले–

"इसको परिक्रमा कहो या परिभ्रमण, उस से हमे कोई मतलब नही. हम तो आनंद से मैया के किनारे भ्रमण कर रहे है. फल मिले या न मिले उसकी हमे कोई चिंता नही है."

"घर से भागे है क्या?"

"नही."

"आपके पास कुछ वस्त्र-पात्र नही दिखते. आप साधू भी नही दिखते. फिर साधू के नियम क्यों रखते? इतने कष्ट किसलिये उठाते?"

गालातल्या गालात हसू आले. आपण साधू आहोत याची जाहिरात का करायची असते? साधूची वृत्ती अंगात बाणावी लागत असते. ती तुमच्या आचार-विचारांतून प्रकट होत असते. साधू असणे आणि साधू बनणे यांत महदंतर असते हे यांच्यासारख्या ज्ञान्याला काय सांगायला हवे.

गोरखपूरच्या अलीकडे–दक्षिणतटावर– असाच आपल्याच मस्तीत सडकेने चाललो होतो, तर रस्त्यावरल्या हॉटेलवाल्याने हाक मारली. जवळ गेलो तर त्याने तिथे उभ्या असलेल्या साधूची हकिकत सांगितली. आदल्या रात्री त्या साधूची सारी मालमत्ता कुणी चोरट्यांनी लांबविली होती. मैयाची तसबीरसुद्धा त्यांनी नेली. त्यामुळे हे साधूमहाशय दुःखीकष्टी झाले होते. मी त्याला काही मदत करावी, चार शब्द सांगावेत असे त्या हॉटेलवाल्याचे म्हणणे. म्हटले–

"साधू झालास ना? म्हणजे सर्व काही धुऊन टाकायला हवे. सारे फुंकून टाकल्यावर, स्वतःच लुटविल्यावर आणखी चोरी कशाची होणार? आणि त्याचे दुःख कसले करतोस? नर्मदामाईची तसबीर गेल्यामुळे हळहळतोस? अरे, नेणारीही तीच आणि देणारीही तीच. तिची इच्छा म्हणूनच चोरी झाली असे समज. द्यायचे झाले तर ती देईलही!"

तर स्वामीजींची प्रश्नावली संपलेली नव्हती. पुन्हा म्हणाले–

"आप दीक्षित नही दिखते."

आता मात्र बोलायलाच हवे असे वाटले. कारण त्यांनी अगदी मुळालाच हात घातला होता. हा निर्णायक क्षण होता. म्हटले–

"हूँ"

"कौनसा संप्रदाय है आपका ?"

"नाथसंप्रदाय."

"आपके लक्षण तो कोई नही दिखते ! कौनसे नाथ है आप ? अघोरनाथ, अवघडनाथ— ?"

ठामपणे बोललो–

"हम बाह्य लक्षण नही बल्की आंतरलक्षण मानते है. ज्ञानेश्वर से चला आया संप्रदाय है हमारा." असे म्हणून "आदिनाथं मच्छिन्द्रंच. . . . स्वरूपानन्दाय नमः' ही गुरुपरंपरा घडाघड ऐकविली. स्वामीची अवाक. ज्ञानदेवांचा वचकच एवढा की, कुणीही त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे. स्वामी स्वरूपानंदांचा उल्लेखही त्यांना कुठेतरी स्पर्शून गेला असावा.

नंतर बराच वेळ ते बोलत राहिले. त्यातून शंकासमाधान होत राहिले. अस्खलित वाणी. शीतल चंद्रिकेचा अनवरत वर्षावच जसा काही ! संभाषणाच्या ओघात दोन-तीन दृष्टान्तकथा त्यांनी सांगितल्या. त्यावरून त्यांच्या अधिकाराची जाणीव व्हावी. सात्विक तेजापुढे राजस आणि तामस बल निष्प्रभ ठरते. जगातील व्यावहारिक नाती नाममात्र असतात. कोणी कोणाला काही देत नाही, कोणी काही घेत नाही. आपणच आपला उद्धार करून घ्यायचा असतो अशा प्रकारचे प्रतिपादन विषयांच्या अनुषंगाने ते करीत राहिले. त्यांनी सांगितलेली इंद्रध्वज राजाची कथा मात्र चांगलीच स्मरणात राहिली.

चौदा चौकड्यांचा अधिपती लंकाधीश रावण. आपल्या सामर्थ्याचा भारी गर्व त्याला. राणी मंदोदरीच्या कक्षात प्रेमालाप करताना मध्येच त्याने आपल्या सामर्थ्याची बढाई मारली. तेव्हा मंदोदरी सहजपणे बोलून गेली की, इंद्रध्वज राजाचे सामर्थ्य हे खरे सामर्थ्य ! पत्नीने परपुरुषाचा केलेला गौरव कोणता स्वाभिमानी पुरुष सहन करील ? रावण संतापला. म्हणाला, "या त्रिभुवनावर माझी सत्ता. साऱ्या देवादिकांना मी बंदिवासात टाकले आहे. नवग्रह माझ्या सेवेस तत्पर असताना तू इंद्रध्वज राजाची महती गातेस ! असा कोण आहे हा ?" मंदोदरी म्हणाली, "त्याची सत्ताच मुळी आहे तशी !" हे ऐकताच रावण अधिकच खवळला. आपल्या सामर्थ्याच्या वल्गना करू लागला. मंदोदरी उद्गारली, "तुम्ही समर्थ आहात ना ? मग या सौधांत दाणे टिपत असलेल्या या कबुतरांना त्यापासून परावृत्त करून दाखवा ना !" रावण हसला. म्हणाला, "एवढेच ना ? हे असले क्षुल्लक काम करायला कितीसा वेळ लागणार !" त्याने सेवकांना कबुतरांना पकडून त्यांच्या मुंड्या मुरगळून टाकायची आज्ञा केली. मंदोदरी चट्कन म्हणाली, "अहो यात कसले आहे सामर्थ्य ? मी तुम्हाला कबुतरांना मारायला सांगितलेले नाही, तर त्यांना केवळ दाणे वेचण्यापासून थांबवायला सांगितले आहे !" रावणाला समजेना. तो म्हणाला की हे कसे काय शक्य आहे.

राणी उपहासाने उद्गारली, "अहो, हेच खरे सामर्थ्य ! तुम्हाला इंद्रध्वजाचे सामर्थ्य पाहायचे आहे ना ? पाहा !" असे म्हणून तिने कबुतरांना आदेश दिला, "इंद्रध्वज राजाच्या आज्ञेवरून तुम्ही दाणे टिपणे थांबवा." तत्क्षणी कबुतरे स्वस्थ झाली. रावण चमकला. राणीने पुढे म्हटले, "इंद्रध्वजाच्या नावात एवढे सामर्थ्य आहे. मग त्याच्या ठायी केवढे सामर्थ्य असेल !"

नाममहिमा, भक्तिगौरव स्वामीजींच्या मुखातून बाहेर पडत होता आणि सर्व जण मौनपणे श्रवणसुखाचा आस्वाद घेत होते. नीरव शांत वातावरण. पावसला स्वामी स्वरूपानंदांच्या खोलीत प्रवेशल्यावरही अशीच निवांत अवस्था जाणवत असे.

सर्व जण उठले. बाहेर येऊन ओसरीवर अंथरूण टाकून पहुडलो. सर्वत्र निजानीज झाल्यावर स्वामीजींनी हलकेच आपल्या खोलीचे दार उघडले– आणि सेवकाला बोलावून माझ्या अंगावर पांघरूण घालायला सांगितले. मी डोळे मिटून ऐकत होतो. सेवकाने एक रग अंगावर पांघरविला. नंतर झोप लागली. रात्री अचानक जाग आली सहप्रवाशाच्या हुडहुडण्यामुळे. वास्तविक ढगाळ हवेमुळे थंडी कमीच होती; पण त्याची हुडहुडी पाहून माझ्यापेक्षा त्यालाच पांघरुणाची अधिक गरज आहे, या भावनेने माझ्या अंगावरील रग मी त्याच्या अंगावर घातला नि झोपी गेलो.

सकाळी मैयावर जाऊन नित्यविधी उरकून आलो. मंदिरात जाऊन रुद्राची एकादष्णी पुरी केली. तेवढ्यात सेवकाने रात्रीच्या पांघरुणाची चौकशी केली. मी तो रग सहप्रवाशापाशी असल्याचे सांगितले. त्याचा नित्यपाठ चालू होता. सेवकाने त्याच्या अंगावरील रग जेव्हा परत मागितला तेव्हा मात्र तो उखडला. बोलला–

"मैयाका प्रसाद वापस माँगते क्या ? मैंने तो थोडे ही माँगा था ?"

सेवक बोलला–

"हमने तो यह इनपर ओढा था !"

"लेकिन सबेरे यह मेरे बदन पर देखकर मैंने इसको मैया का प्रसाद माना. आप दिया हुआ दान वापस माँगते हैं. आप को पातक लगेगा !"

तो अद्वातद्वा बोलू लागताच मला त्याला समजवावे लागले आणि वस्तू ज्याची त्याला परत करायला हवी हे सांगावे लागले, तरीही तो तावातावाने बोलतच राहिला. सकाळी सकाळीच एवढी काय गडबड चालली आहे हे पाहायला स्वामीजींनी दार किलकिले करून बाहेर डोकावून पाहिले. प्रकार लक्षात येताच म्हणाले–

"खालीपिली क्यों गडबड मचाते हो ? झगडने से थोडे ही कुछ मिलता है ? उनका भाव देखो तो जरा."

–तो माणूस खट्टू झाला. कुरकुरतच त्याने अंगावरील रग भिरकावून दिला आणि तेथून नंतर तो कुठे गेला कळले नाही.

आश्रमाच्या परिसरात कडुनिंब, चिंच, वड अशी बरीच झाडे लावलेली. येथील नर्मदा मैयाचा परिसर कसा हिरवागार. तटावरील शेते तुरे मिरवीत उभी. समोर मैयातील चमचम

करणारी पांढरीशुभ्र वाळू. आताशा कुठे या वाळूमध्ये टरबुजांची लागवड सुरू झालेली. वाळूत लहानसे खड्डे खोदायचे आणि त्यात थोडेसे शेण घालून बिया रुजत घालायच्या. पाणी लावण्याची गरजच नाही. मैयाकिनारी बऱ्याच जागी खरबूज, टरबुजांच्या वाड्या आढळतात. आश्रमातील वडाच्या पारावर बसून दैनंदिनी लिहिली. कुणा परिक्रमावासी माईने केलेल्या कडाहीतील एक लाडू प्रसाद म्हणून खाल्ला.

भोजन आटोपून स्वामीजींचा निरोप घेण्यासाठी त्यांच्या खोलीत प्रवेश केला. नमस्कार करून प्रस्थानाची अनुज्ञा मागितली. त्यांनी बसायला सांगितले. आपल्या शेजारी घडी केलेल्या रगाकडे बोट करून बोलले–

"नर्मदामाईका प्रसाद है. हम नही दे सकते. इसे अपने हाथ से उठा लीजिये."

"मुझे इस की जरूरत नही है. मेरे पास बोझ रखने के लिये जगह ही नही है."

"हमे कुछ नही मालूम ! यह मैया का प्रसाद है. इसे आप अस्वीकार नही कर सकते. लेकीन हमारी एक शर्त है. उस आदमी को नही देना. नही तो आप रास्ते में उसको दे देंगे ! जब तक सर्दी के दिन हैं, तब तक यह चीज अपने पास रखने की हैं. उस के बाद जी चाहे वैसा करो. वचन दीजिये !" त्यांना तसे वचन दिले. त्या माणसाला मी ओळखतही नाही असे सांगितले. मग ते आपुलकीने म्हणाले–

"तुम्ही आपल्याजवळ काहीच का राखत नाही ? थंडीचे दिवस आहेत हे ! एवढे कष्ट कशापायी उठवायचे ? तुमच्यापाशी पांघरूण कमी म्हणून आम्ही तो रग तुमच्या अंगावर घातला. मग तुम्ही तो त्याला का दिला ? तुमच्या पाशी तो असता तर आम्ही तो परत मागितला नसता. आता हा नवीन रग आहे. एवढे कष्ट घेऊ नका. ज्ञानेश्वरांची एखादी तसबीर आहे का तुमच्यापाशी ?"

म्हटले–

"कुणाचीच तसबीर मी बाळगीत नाही. तुम्हाला पाहिजे असतील त्या संतांची चित्रे पाठवायला भावाला पत्र लिहून कळवितो."

त्याप्रमाणे पत्रे लिहायला घेतली. जरा वेळाने त्यांनी दार उघडले आणि कृपाळूपणे विचारले–

"आप को वस्त्र, पात्र, पैसा चाहिए क्या ?"

निरिच्छपणे बोललो–

"मुझे कुछ भी नही चाहिये. आप का प्रेम मिला, सबकुछ पाया."

"जितना चाहे उतने दिन आश्रम में रहो. अपना ही आश्रम है समझो. संकोच की बात नही."

"अभी नही. फिर कभी आऊँगा जरूर."

त्या पुण्यपावन पुरुषाचा प्रेमळ निरोप घेऊन पुढील रस्ता पकडला.

परिक्रमेचा शास्त्रोक्त कालावधी तीन वर्षं तीन महिने तेरा दिवसांचा. रोज ठराविक

अंतरच चालायचे. अशी मर्यादेने परिक्रमा करणारे नाहीत असे नाही. एकूण एक नियम प्राणपणाने सांभाळणारे जसे असतात तसे आमच्यासारखे झटपट परिक्रमा उरकणारेही असतात आणि बारा वर्षे झाली तरीसुद्धा अर्धी परिक्रमाही न झालेले महाभागही क्वचित आढळतात.

कुणीतरी सांगितले की, बारा वर्षे परिक्रमेत असलेले एक महात्मा यज्ञ करणार आहेत. आवडेल त्या जागी मैयाच्या पात्रामध्ये आसन लावायचे. सकाळपासून सायंकाळपर्यंत तुलसीरामायणाचा वा सप्तशतीचा पाठ करायचा. मधूनमधून प्रज्वलित अग्नीला आहुती द्यायची. व्रतपूर्तीनंतर मोठा याग करून अन्नसंतर्पण करायचे. हजारो लोकांना प्रसाद वाटायचा. असा त्यांचा कार्यक्रम असतो. अशा सोहळ्यात ठिकठिकाणचे त्यांचे भक्त गोळा होतात. नवीन मुक्कामात भक्तगणांत आणखी भर पडत राहते.

ढगाळ वातावरणामुळे सूर्यनारायणांनी दडीच मारलेली. अचानक पावसाचे थेंब ठिबकू लागले आणि मग रिमझीम जलधारा कोसळू लागल्या. उघडीप येईपर्यंत कुठें घराच्या पावळीखाली उभे राहून मग पुढे सरकलो. केरपाणीच्या अलीकडील रस्ता संपूर्ण डोंगराळ. खडकाळ. आणि झाडाझुडपांमधील त्या पायवाटेवरून चालताना खडे असे काही टोचत की, ताशी एक मैल या गजगतीनेच पावले पडत होती. भोवताली विंध्याद्रीचे हिरवे-निळे डोंगर आपले ते मुक्त सौंदर्य उधळत होते आणि अशा या कष्टप्रद वाटचालींतही एका आगळ्या सुखाचा शिडकावा करीत होते.

झलोन गावी मैयावर स्नान उरकले आणि साडेपाचच्या सुमारास छरोवा घाटावर येऊन ठेपलो. दुरूनच मैयाच्या पात्रातील साधूमहाशयांचे मचाण दृष्टीस पडले. सुमारे सहा फूट लांब व चार फूट रुंद अशी ती लाकडी बैठक किनाऱ्यापासून चार फूट दूर पात्रात बसविलेली. त्यावर महाराज विराजमान होऊन कसल्या तरी पोथीचे पठण करताहेत. बाजूला धुनी प्रज्वलित केलेली. मधूनच धुनीत हवन चाललेले. त्यागी प्रेमदासजी राजस्थानमधील. धिप्पाड शरीरयष्टी, कृष्णवर्ण, माथ्यावर भरगच्च जटासंभार बांधलेला, शुभ्र दाढी, उन्हाने शरीर रापलेले, कमरेला कौपीन. मुखावर आपल्या अधिकाराची जाणीव असल्याचा सुप्त भाव, तरीही आदर वाटावा असे लोभस व्यक्तिमत्त्व. महाराजांच्या समोरच किनाऱ्यावरील वाळूत एक मध्यमवयीन शुभ्रवसना ललना उभी. कुणा ठाकुराची कन्या. महाराजांच्या सेवेसाठी हात जोडून तत्पर. जवळच जाऊन उभा राहिलो. त्यांनी पठण थांबविले. अभिवादन करून वर कुटीत चलण्यास सांगितले.

कुटीत आसन लावले. आपला कार्यक्रम आटोपून प्रेमदासजी कुटीत आले. स्वतः कॉफी घेत असून माझ्यासाठी दूध मागविले. नंतर भोजन. महात्मा नावाप्रमाणेच प्रेमळ, शांत, निगर्वी स्वभाव. दंभ दर्प नाही. मैयातीरावरच कायम वास्तव्य करावे, अशी त्यांनी सूचना केली, ; परंतु 'आपल्या हाती थोडेच आहे ? जशी मैयाची इच्छा' असे सांगितले. संकल्प करावा आणि त्याप्रमाणे घडू नये असे बऱ्याच वेळा अनुभवास येते. या विश्वाच्या पसाऱ्यात

आपली भूमिका कळसूत्री बाहुलीचीच असते याची जाणीव झाली म्हणजे माणसाची सारी धाव थांबते.

बऱ्याच साधू-संन्याशांच्या कुटीत रात्रो काढल्या. दिवसासुद्धा सहवासात राहिलो. दशनामी संन्यासी, वैष्णव, रामानंदी, नाथ सांप्रदायिक, नाना पंथांचे, नाना आखाड्यांचे साधू! सर्वसंगपरित्याग करून विधिवत संन्यास घेतलेले लोक पाहिले आणि वाटले संन्यास कशाचा आणि कशासाठी? ऐन जवानीत रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्या वाङ्मयाच्या प्रभावाने संन्यासाश्रमाबद्दल आकर्षण निर्माण झाले होते. स्वामी स्वरूपानंदांनीही पत्राद्वारे काही मौलिक मार्गदर्शन केले होते. त्याच वेळी आळंदीला वास्तव्यास असलेल्या एका तरुण संन्याशाची याच संदर्भात भेटही घेतली होती. हे स्वामी तल्लख बुद्धीचे होते. त्यांचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आणि भाषेवर प्रभुत्वही चांगले होते. त्यांची वाणी मुलायम असून, त्यांच्यापाशी कवित्वशक्तीही वास करून होती. प्रकृतीने नाजूक असलेले हे स्वामीजी स्वभावाने चिरचिरे आणि तापट होते. मनाविरुद्ध झालेले काहीही त्यांना अजिबात खपत नसे. संसारातून वैतागून त्यांनी चतुर्थाश्रम स्वीकारलेला होता आणि आपण संन्यासी म्हणजे या जगातील समस्त जीवांहून कोणी वेगळे आहोत, अशा भावनेने ते पछाडलेले होते. अमुक प्रकारचा वेष करून आल्यासच आपली भेट होऊ शकेल हे वाक्य ज्या क्षणी त्यांच्या मुखकमलातून स्रवले त्याच क्षणी संन्यासाबद्दलची सारी आशंका फिटली होती!

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षड्विकार, अहंकार, आशा-आकांक्षा, एषणा यांच्यापासून स्वाभाविक निवृत्ती जोपर्यंत होत नाही, मस्तक गळून पडत नाही, तोपर्यंत संन्यास काय कामाचा? आपण कोणीतरी आहोत ही अहंपणाची भावना जोंवर अंतःकरणात रुतलेली आहे तोवर संन्यास म्हणजे लोहशृंखला सोडून सुवर्णशृंखला अडकवली आहे एवढाच अर्थ!

जबलपूरला स्वामी प्रेमानंदांच्या आश्रमात रात्र काढली. नव्वदीचा माणूस. उंचापुरा आणि तगडा. तुंदिलतनु आणि मुंडित चर्या. अंगावर भगवी वस्त्रे. त्यांची जी मुक्ताफळे श्रवणसंपुटात प्रविष्ट झाली त्यावरून ते पूर्वाश्रमीचे कोणी शास्त्रकोविद असावेत असे वाटले. बुद्धिमान असले तरी विद्येचा फुंज फुरफुरणारा. आत्मप्रौढीशिवाय अन्य काहीही ऐकायला मिळाले नाही. त्यांच्या साहचर्याने अर्वाच्य शिव्यांचेही श्रवण घडले. प्रचलित शासन, पीठाधीश शंकराचार्य, ब्रह्मवृंद, विद्यार्थी या सर्वांवर टीका करण्यात त्यांनी आपली जीभ नासवली.

*नमिता मानापमान गळाले!*

किंवा

*नम्र झाला भूता! तेणे कोंडिले अनंता!!*

अशी संतवचने आहेत. नम्रपणा अंगी बाणल्याशिवाय खराखुरा संन्यास घडतच नाही.

स्वामी स्वरूपानंदांनीही म्हटले आहे–

*आता काय मज संन्यासाचे काज ! निजांतरी गुज प्रकटले ! !*
*प्रकटता घडे सहजसंन्यास ! नैष्कर्म्यपदास गांठियेले ! !*

असे लोकविलक्षण सहजस्थिती प्राप्त झालेले महापुरुष देवदुर्लभच होत !

दक्षिणतटावरील डिंडोरी मुक्कामी एका संन्याशाची गाठ पडली. मैयाकिनारी प्रशस्त गायत्री मंदिर. मंदिराचे विश्वस्त जीवनलाल सोनपाली यांनी भोजनाची व्यवस्था केलेली. एवढ्यात हे संन्यासी महाशय उपस्थित झाले. त्यांच्याशी काही आध्यात्मिक चर्चा झाली. विद्वान होते. भोजनाची व्यवस्था आहे असे सुचवूनसुद्धा 'नारायण' करून म्हणजे भिक्षा मागून आले. रात्री आमच्या जेवणातील अर्धेअधिक अन्न त्यांनी रिचविले आणि तरीही पोटभर मिळाले नाही म्हणून रंजीस ! गृहस्थांनी साधू-संन्याशांची सेवा करायला हवी, गृहस्थांमध्ये सत्पुरुष असत नाहीत, त्यांना महात्मा म्हणता येणार नाही, संन्यास सर्वश्रेष्ठ होय असे त्यांचे विचार ऐकून गंमत वाटली. संन्यासी वा साधू हे समाजाचे गुरू असल्याकारणाने गृहस्थांनी त्यांचा आदर केला पाहिजे, असा समज साधूसमाजामध्ये प्रचलित आहे. आत्मचिंतनामध्ये दंग न होता अफू-गांजा-भांग इ. मादक पदार्थांच्या सेवनातच ब्रह्मानंद मानणारे आणि विकाराधीन साधू समाजाला ललामभूत न होता तिरस्करणीय वाटतात हे यांच्या गावीही नसते.

गृहस्थाश्रम आणि संन्यासाश्रम हे दोन्ही आपापल्या परीने श्रेष्ठ होत, यासंबंधीची एक कथा मला अत्यंत आवडलेली. एका राजाने संन्याशांना प्रश्न केला की, श्रेष्ठ कोण ? गृहस्थ की संन्यासी ? ज्यांना संन्यासाचे महत्त्व पटवून देता येणार नाही त्यांना विवाह करून गृहस्थाश्रम स्वीकारावा लागेल अशीही अट होती. बऱ्याच जणांना गृहस्थ बनावे लागले. राजाचे समाधान करू शकणारा कोणी भेटेना.

काही दिवस गेल्यावर एक तपःपूत संन्यासी राजदरबारात उपस्थित झाला. त्याने राजाला सांगितले– गृहस्थ व संन्यासी दोन्ही आपापल्या परीने श्रेष्ठ होत. राजाने ते सिद्ध करायला सांगितले. संन्यासी म्हणाला की, राजाने त्याचे शिष्यत्व स्वीकारायला हवे. राजा तत्काळ त्याचा शिष्य बनला. दोघे जण राज्याबाहेर पडले. फिरत फिरत दोघे एका नगरात आले असताना त्यांच्या कानांवर राजकन्येच्या स्वयंवराची दवंडी पडली. राजकन्या ज्याला वरील त्या भाग्यवानाला तिच्या बापाचे अर्धे राज्य मिळणार होते. हे गुरू-शिष्य स्वयंवर मंडपात इष्ट काली प्राप्त झाले. स्वयंवराची सुरुवात झाली. मंडप पुरेपूर भरलेला. हे गुरू-शिष्य एका कोपऱ्यात गुपचूप गंमत पाहत राहिले. राजकन्येची सखी एकेका राजपुत्राची माहिती सांगत होती. राजकन्येला कोणी पसंत पडेना. सर्वांना उत्सुकता लागून राहिलेली. राजकन्येच्या मनात काय आहे कोणालाच कळेना. तेवढ्यात मंडपद्वारात मूर्तिमंत तेजाचा पुतळा असलेला एक तरणाबांड संन्यासी सहज काय चालले आहे हे पाहण्यासाठी डोकावला. राजकन्येची नजरानजर झाली. झपाझप पावले टाकीत डोळ्यांचे पाते लवते न

लवते तोच तिने त्या संन्याशाच्या गळ्यात ती विवाहमाला घातली. संन्यासी गडबडला. हे काय अकल्पित ! काय हा मूर्खपणा म्हणून त्याने ती माला काढून टाकली. राजकन्येने परत उचलून ती त्याच्या गळ्यात घातली. पुन्हा ती माला भिरकावत संन्याशाने पाठ वळविली आणि भराभर पावले उचलीत तो तेथून बाहेर पडला. राजकन्यासुद्धा भान विसरून त्याच्यामागून निघाली. कारण आता तोच तिचा प्राणेश्वर होता. गुरू आपल्या शिष्याला म्हणाला, "चला यांच्यामागून."

तो तरुण संन्यासी पुढे, त्याच्या मागे ती राजकन्या आणि काही अंतर राखून हे गुरू-शिष्य चालले. सायंकाळ झाली आणि एका निबिड अरण्यात तो तरुण संन्यासी शिरला आणि दिसेनासा झाला. त्या राजकन्येला त्याचा माग लागेना. ती रडू लागली. लगेच हे गुरू-शिष्य धावले. काही माहीत नसल्याचे नाटक करीत त्यांनी तिचे सांत्वन केले. तिची समजूत घातली व सकाळ झाल्यावर पुन्हा तिच्या पित्याकडे पोचविण्याचे आश्वासन दिले. काळोखी रात्र. मी म्हणणारी थंडी. रात्र कशी गुजरायची हा मोठा प्रश्न तिघांपुढे उभा राहिलेला. अंथरूण, पांघरूण नाही आणि दिवसभराचा उपवास.

ज्या वृक्षातळी हे तिघे विसावले होते त्यावर एक पक्ष्याचे घरटे होते. त्यात पक्षी, पक्षीण आणि त्यांची दोन-तीन पिले होती. पक्षी म्हणाला, "आपल्या घरी आज पाहुणे आलेले आहेत. थंडीपासून संरक्षण देणे गृहस्थ या नात्याने आपले कर्तव्य आहे." तो लगेच उडाला आणि त्याने काही वेळाने एक जळती काड़ी आणून त्यांच्या पुढ्यात टाकली. लगेच त्यांनी शेकोटी पेटविली. आज रात्री थंडीपासून बचाव झाला या समाधानात त्यांच्या गप्पा सुरू झाल्या.

पक्षी पक्षिणीस म्हणाला, "आपण या भुकेल्या अतिथींची जेवणाची व्यवस्था केली पाहिजे. तेव्हा मी या शेकोटीत मला झोकून देतो. तू पोरांचा सांभाळ कर." पत्नी म्हणाली, "तुम्ही राहा. तुमच्या पाठी मी जगून काय उपयोग ? म्हणून मी प्राणत्याग करते." दोघांचे एकमत होईना. पिल्ले म्हणाली, "आम्हीच जातो." शेवटी तो नर फडफड करीत शेकोटीत कोसळला. त्याच्या पाठोपाठ ती पक्षीणही त्यात पडली. आई-वडिलांचा तो त्याग बघून पिल्लेही प्रभावित झाली.

*एथ वडील जे जे करिती । तया नाम धर्म ठेविती ।*
*तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥*

या न्यायाने त्या पिल्लांनीही एकापाठोपाठ एक असा आपला देह त्या अग्निनारायणाच्या स्वाधीन केला. झाले. त्या तिघांची भूक शमली.

सकाळ झाली. तिघे अरण्यातून बाहेर पडली. राजकन्येला तिच्या पित्याच्या हवाली करून गुरू-शिष्य परतले. गुरू शिष्याला म्हणाले, "तुझ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली ना ?" शिष्याला उमजले नाही. तेव्हा गुरुजी म्हणाले, "त्या तरुण संन्याशाला अर्धे राज्य आणि सुस्वरूप राजकन्या यांचा लाभ होऊनही त्याचा मोह पडला नाही आणि त्याने या

सगळ्याकडे पाठ फिरविली.

*वाटला संन्यास घ्यावा ज्या कारणे ।*
*तेथे लक्ष उणे कामा नये ॥*

याचे भान त्याच्या ठिकाणी जागे राहिले. असा संन्यास श्रेष्ठ होय आणि त्या पक्ष्यांनी प्राणत्याग करून आपला गृहस्थधर्म पाळला, असा गृहस्थधर्म श्रेष्ठ होय. म्हणून संन्यासही श्रेष्ठ व गृहस्थाश्रमही श्रेष्ठ होय."

राजा आनंदला आणि त्याने खरेखुरेच त्या संन्याशाचे शिष्यत्व पत्करले.

आद्य शंकराचार्यांची नर्मदातीरावरच गोविंद यतींशी भेट झाली. त्या वेळी आचार्यांचे वय होते आठ वर्षांचे. त्यांना संन्यास दीक्षा घ्यावयाची होती, म्हणून गोविंद यतींपाशी त्यांनी तशी मागणी केली. परीक्षा म्हणून गोविंद यतींनी खडीसाखरेचा एक तुकडा त्या बालकाच्या जिभेवर ठेवला व थोड्या वेळाने तो खडा पाहिला तर तो जसाच्या तसा कोरडाच. असे कडकडीत वैराग्य पाहून यतींनी त्यांना संन्यास दीक्षा दिली.

अमरकंटकपासून रेवासागरापर्यंत नर्मदामाईचा प्रवाह अक्षुण्ण, अखंडित. प्रवाहाचे पावित्र्यही अबाधित. अपवादात्मक स्थानींच प्रदूषण आढळेल. एरवी मैया कशी शुद्ध, पवित्र. परिक्रमेची परिपाठी पुराणांतरी वर्णिलेली म्हणजे किती सहस्र वर्षांची असेल याबद्दल निश्चित स्वरूपात काही सांगता येणार नाही; परंतु ही सनातन परंपरा अशाच पद्धतीने राहील काय आणि मैयाची प्रवाहाची अखंडितता अशीच राहील काय याबाबत मात्र मन साशंक होऊ लागले आहे. कारण मैयावर आता ठिकठिकाणी प्रचंड आकाराची धरणे बांधली जात आहेत. या धरणांमुळे मैयाचे समुद्रामध्ये रिचवले जाणारे पाणी थोपविले जाणार असले आणि त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी आणि वीजनिर्मितीसाठी केला जाणार असला, तरी त्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रामधील अनेक गावे जलमय होणार आहेत. तेथील रहिवासी कायमचे निराधार, निर्वासित बनणार आहेत. त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन नाहीसे होणार आहे. शासन या भूमिपुत्रांना केवळ मामुली आर्थिक मोबदला देऊन विस्थापित करणार आहे; पण त्यांच्या पुनर्वसनाबाबत मात्र मोठेच शून्य नजरेसमोर उभे आहे. धरणांच्या खालील प्रदेशांचे नंदनवन बनताना वरील प्रदेशाचा विध्वंस होतो याची योग्य जाण कोणीच ठेवीत नाही, याची बोच लागून राहते.

जबलपूरजवळील बर्गी धरणाखाली सुमारे १८४ गावे बुडणार आहेत. या धरणाची उंची दोनशेबारा फूटच आहे; परंतु नवागाव येथील सरदार सरोवर प्रकल्पाची संकल्पित उंची याच्या तिप्पट आहे. त्याखाली याहून अधिक गावे निश्चितच बुडणार ! हजारो कोटी रुपये खर्च करून अशा प्रचंड योजना राबवायच्या, त्यापासून किती लाभ होईल याचा योग्य विचार करायचा नाही, त्यामुळे अशा योजना सफल होत नाहीत वा त्यांतून अन्य समस्या निर्माण होतात, असे सर्वसाधारण दृश्य आहे.

धरणग्रस्तांची अवस्था अत्यंत हलाखीची आहे. अडाणी लोकांच्या हाती पैसा

आल्याने व्यसनांपायी त्याची राखरांगोळी होते आणि अखेर हे लोक दरिद्रीच राहतात. यापेक्षा धरणाखालील भागातील लाभधारकांच्या जमिनीतील काही जमिनी या लोकांना देण्याची वा अन्य ठिकाणी पुनर्वसनाची योजना आखण्याची शासनाची कृती लोककल्याणकारी समजली गेली असती. यामुळे या लाभधारकांना झळ पोचली असती तर त्यांच्या अरेरावीपणावरही अंकुश बसला असता ! भोगाबरोबरच त्यागाची भावना रुजणे आवश्यक असते.

एका गावी झाडाखाली पाच-सहा इसम रेडिओ ऐकत बसलेले. जवळ जाताच क्रिकेट सामन्याचे धावते समालोचन असल्याचे समजले. कोणाचा सामना आहे, कोण खेळतोय अशी चौकशी केली; पण ते माझ्या तोंडाकडेच पाहत राहिले. पुन्हा ज्या वेळी विचारले तेव्हा तो रेडिओ माझ्या हाती देत म्हणाले, "तुम्ही ऐका आणि आम्हांलाही सांगा !" "बाबांनो, समजत जर नाही तर रेडिओ लावला कशासाठी ?" असे विचारताच म्हणतात कसे, "काही तरी आवाज येतोय् ना म्हणून लावलाय झाले !"

आणखी एके ठिकाणी एक माणूस फटफटी उडवीत वेगात निघून गेला. कुणी म्हणाले, "धरणग्रस्तांना मिळालेल्या पैशांवर ऐष चालली आहे. आज हातात लक्ष्मी खेळते आहे तिचा उपभोग घ्यावा, उद्याची चिंता कशाला करा, असा अध्यात्मविचार तर नाही ना यांच्या ठायी रुजलेला ?"

तर या धरणांमुळे परिक्रमेचा परंपरागत रूढ मार्गच बदलावा लागणार आहे. मैयाचा अनिरुद्ध प्रवाह आता अवरुद्ध होणार आहे. आजच काही गावांतून मार्ग बदलले आहेत. त्यामुळे आता चोखाळाव्या लागणाऱ्या नवीन वाटेवर पूर्वीच्या सुविधा उपलब्ध होतील का ? मैयाच्या तीरावरील गावांतून जी भाविकता जागताना आढळते ती आता नवीन भागात असेल का ? एक ना अनेक प्रश्न सर्वांना भेडसावीत आहेत. बऱ्याच ठिकाणी लोक बांधकामाबाबत विचारणा करायचे. धरण होणार काय, बांधकाम कुठपर्यंत आले आहे, कधी पुरे होईल, हे बांधकाम टिकेल काय, असे नाना प्रश्न. काही श्रद्धावंतांची भावना एवढी दृढ की, मैया ही धरणे टिकू देणार नाही. ते म्हणायचे की, प्रचंड पहाड फोडून जी गतिमान झाली आहे तिला अडविण्याचे दुःसाहस कोणी केले, तर ही माता नर्मदा ते सहन करील की काय ? या लोकांच्या चेहऱ्यावरील उदासी मात्र काळजाचा ठाव घ्यायची.

जबलपूरच्या वरील प्रदेश मागासलेला. डोंगराळ. मंडलाच्या अगोदर विंध्याद्रीच्या अरण्यात असा काही भरकटलो की, विंध्य पर्वताचीच परिक्रमा घडते की काय अशा संदेहात सापडलो. या भागातील आदिवासींची परिस्थिती हलाखीची. अविकसित भागातील प्राथमिक शाळांची स्थिती आणखीच दयनीय. पाचवीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलांना जोडाक्षरांचे ज्ञान नव्हते. अर्थात आमच्या महाराष्ट्राची याहून वेगळी अवस्था नाही. दहावीतील विद्यार्थ्यांना दुसरीतील गणित येत नसते हा अनुभव आहे. गोंड इलाख्यातील या शाळेत शिकणाऱ्या मुलांना शासनातर्फे डाळभाताचे जेवण मिळते; परंतु गावचा सरपंचच

अर्धेअधिक जेवण गिळंकृत करतो असे एके ठिकाणी ऐकायला मिळाले.

नर्मदाकाठी बहुतेक पांढरी वाळू आढळते; परंतु केरपाणीच्या जवळ कुठेतरी काळी वाळू आढळली. नर्मदाकाठची माती काळी, धुरळा कसा पांढरट; परंतु या गोंड भागात काही जागी लाल माती आढळली. या भागात पाऊस बराच पडतो. त्यामुळे तांदळाची पैदास होते. डोंगरात हरीक, नाचणी ही पिके घेतली जातात. मध्य प्रदेशात नर्मदातीरावर बरील भागात शेंगदाणे वा शेंगतेल आढळले नाही. बहुतेक ठिकाणी शुद्ध तूप किंवा राईचे तेल वापरले जाते. नेमाड भागात भुईमुगाचे पीक घेतात.

पद्मीपासून मंडलापर्यंत मैयाच्या किनाऱ्याकिनाऱ्यानेच पक्की डांबरी सडक गेली आहे. माईचा प्रवाह फारच लहान. चिरई डोंगरी येथील चकाचक बाबांच्या कुटीतून सकाळीच प्रयाण केले. थंडीची लाट सर्वत्र फैलावलेली. त्यामुळे स्नान न करताच निघालो. दुतर्फा झाडीने वेढलेला रस्ता सुस्थितीत आढळला. सर्वत्र विंध्याद्रीच्या रांगाच रांगा. वृक्षराजीमुळे दुपार झाली तरी अंगावरील पांघरूण दूर करावेसे वाटले नाही.

या भागात प्रथमच फणसाचे झाड दृष्टीस पडले. पारे लागलेले होते. प्रवासमार्गावर आयनाची खूप झाडे. जबलपुराकडे सागवान बरेच. आंबा, चिंच, आवळा यांची झाडेसुद्धा अनेक. खैराची खुरटी झुडपेही आढळली. इकडे चिंचा खूप असल्या तरी भोजनामध्ये आंबट रस नाही. गूळही कुठे आढळणार नाही. एके ठिकाणी आमराई आढळली. मालकाशी बोलताना कळले की, इकडच्या लोकांना साठे, आंबावडी हा प्रकारच ठाऊक नाही. एके जागी भुकेल्या पोटी भेळ्याची फळे फोडून खाल्ली आणि बालपणाच्या गोड स्मृतीत रमलो. काही ठिकाणी खाटी बोरे खायला मिळाली.

दोन दिवस उजव्या पायात वाधना आला होता; पण त्याने विशेष त्रास दिला नाही. कारण मात्र कळले नाही. गेली सतरा वर्षे डाव्या गुडघ्यातील मागील बाजूची शीर मधून मधून खूप दुखायची; पण हल्ली त्रास कमी झाला आहे. मध्यंतरी चवडे व बोटे फार दुखत. रात्री विसावल्यावर आणि सकाळी निघताना पायांची सेवा करावी लागे. हल्ली त्याचा त्रासही जरा कमी आहे. आता पुन्हा डोंगरातील भ्रमंती करावी लागणार आहे. अमरकंटकला महाशिवरात्रीला मोठी जत्रा भरते. अस्मादिकांना जत्रेचे आकर्षण नसले तरी कोणीतरी सुचविल्यामुळे महाशिवरात्र अमरकंटकला करायची असे ठरविले.

मंडलाच्या अलीकडील तीन मैल रस्त्याच्या दुतर्फा केवळ आंब्याचीच मोठाली झाडे. दिवसभरात सूर्यकिरणांना क्षणभरही रस्त्यावर डोकावून पाहता येऊ नये अशा दाटीवाटीने ती वाढलेली. त्यामुळे भरदिवसाही रस्त्यावर काही अंतरावरचे अजिबात दिसू नये. सगळीकडे अंधारच दाटलेला अशी स्थिती.

दुपारी एक वाजण्याच्या सुमारास, सुमारे अठ्ठावीस किलोमीटर अंतर पार करून मंडला शहरात प्रवेश केला. हे जिल्ह्याचे ठिकाण. कपडे खूप मळल्यासारखे वाटू लागले. जवळ पैसा नाही. त्यामुळे एका दुकानातून जवळ असलेल्या आंतर्देशीय पत्र व कार्ड यांच्या

मोबदल्यात एक रिफील आणि एक साबणवडी खरीदली. अंगाला साबण लावायचा नाही हा नियम असला तरी कपडे साबणाने स्वच्छ धुवायचे असे ठरविले.

स्नान करण्यासाठी हनुमान घाटाकडे प्रयाण केले. येथेच सीतारामदासजी नामक सत्पुरुषाचा आश्रम आहे. विदर्भातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ते समकालीन आणि गुरुबंधू असावेत. आश्रमाचे आवार प्रशस्त. जागोजाग वृक्ष लावलेले. शंकर आणि हनुमान यांची मंदिरे. आश्रमाच्या लांबलचक इमारतीत सीतारामदास जेथे वास्तव्य करीत त्या खोलीत त्यांचा पितळेचा आसनस्थ पुतळा बसविलेला आहे. आतच विहीर, संडास, स्नानगृह, जेवणघर आणि तळघरही. मैयातीरावरील हे एक रमणीय ठिकाण. शहर भागात असूनही येथे वर्दळ अजिबात नाही. वठलेल्या वटवृक्षाला पक्ष्यांनी सोडून जावे त्याप्रमाणे महापुरुषांच्या निर्वाणानंतर त्यांच्या आश्रमास अवकळा येत असते.

आश्रमात प्रवेश केला त्या वेळी सगळीकडे सामसूम होती. हनुमान मंदिरापाशी त्याचे वंशज वास्तव्य करून राहणे अगदी स्वाभाविक. प्रवेशद्वारावर त्यांनीच स्वागत केले. अगदी हस्तांदोलन करण्याइतपत त्यांचे धाष्टर्य पाहून कौतुक वाटले. आम्ही निःसंग, त्यामुळे त्यांना आमच्यापाशी काय मिळणार? तरीही स्वभावानुसार त्यांनी आमचा डोळा चुकवून स्नान करण्याच्या वेळी पिशवीची पुरी तपासणी केली. येथील घाट स्वच्छ. काळ्या दगडाचे सुबक बांधकाम. मैयाचा प्रवाह संथ. गहन, गूढ, प्रशांत. एकांतासाठी चांगले स्थान. स्वस्थ चित्ताने मैयाचे ते पोवळ्याच्या रंगाचे पाणी डोळे भरून पाहत राहावे ! आसमंतामध्ये वृक्षराजी. दिवस कलू लागला, तरीसुद्धा गारठा कमी झाला नाही.

या आश्रमाच्या मालकीची तीस एकर जमीन असून भात, गहू, हरभरा, मटार, मटकी अशी पिके मिळतात आणि आश्रमाचा निर्वाह चालतो. मैयाकिनारी असे बरेच आश्रम आहेत की, ज्यांच्या मालकीच्या खूप जमिनी आहेत. येथे सीतारामबाबांच्या पुण्यतिथीला मेळा जमतो. आश्रमाची गोशाळाही आहे. तेथे एक महात्मा राहतात. रात्री भोजनोत्तर गजाननदासांनी शिवरात्रीपर्यंत इथेच राहावे असा आग्रह केला; पण उद्दिष्ट होते अमरकंटकला पोचण्याचे.

सीतारामदासजींचे एका संत संमेलनातील भाषण 'अमृतवाणी' म्हणून आश्रमाच्या भिंतीवरील फलकावर कोरलेले आढळले.

## अमृतवाणी

*झूठ बोलना छोड दो।*

*राजा, भिखारी, पंडित, मूर्ख, शब्द, अशब्द इन सबको मेरे राम नही देखते। चीनी, तिब्बती, रुसी, जापानी, मद्रासी, पंजाबी, बंगाली, पहाडी मेरे राम को नही दिखते। चमार, भंगी, तेली, महाली, ब्राह्मण, क्षत्री, शूद्र ये मेरे राम को नही दिखते। हमारे राम को केवल मनुष्य ही दिखता है। जो घास नहीं खाता वह मनुष्य ऐसा हमारे राम समझते है। मांसभक्षी*

*या नरमांसभक्षी भी ऐसा राक्षस क्यों न हो हमारे राम उसे मनुष्य ही कहते है। क्यों? वह घास नही खाता। घास पशु खाता है। राक्षस, चमार, भंगी या ब्राह्मण आदि यह जो है ये हैं मनुष्य के संस्कार। इसीलिये जिस का संस्कार जैसा उसका संसार वैसा ही रहता है। संस्कार जैसे बनेंगे वैसा संसार होगा। संस्कार बनाना यह अपना काम है। बस, हम लोगो को यह समझना है कि संसार से ही वेद की शिक्षा हमारे राम को मिलती है। वेद वो है जहाँ भेद नही। श्रुति याने सुनना, सब की आवाज लेना, उस का मनन करना। स्मृति याने याद रखना, जो सुना है, मनन किया है, उस को न भूलना। उस की याद रखना याने स्मृति। हमारे राम की यह सीधी सादी व्याख्या है। हमारे राम तो कोई पढे लिखे नही हैं।*

*हमारे राम तुम को पूछते हैं कल क्या होगा? तुम को मालूम है। तुम सब कहते हो मालूम नहीं। अरे भाई, झूठ क्यों बोलते हो? कल चोरी करोगे, जेल जाओगे यह तुम को मालूम नही? तुम किसी का खून करोगे, कल तुम फाँसीपर जाओगे यह तुम को मालूम नहीं? फिर क्यों झूठ कहते हो कि कल क्या होगा यह हम को मालूम नहीं? याद रखो, तुम चाहे साहब हो या करोडपति तुम्हारी एक दिन पेशी होनेवाली है। और तुम्हें उस पेशी के लिये अवश्य कचहरी जाना पडेगा। वह कचहरी कौनसी है? जानते हो? कबरस्थान या स्मशान ! वहाँ तुम्हारी साहब्बी, करोडपति, ब्राह्मण, शूद्र, ज्ञान आदि सब खत्म होनेवाली है।*

*हमारे राम का जन्म तुम्हारे लिये ही है। तुम्हारे लिये हमारे राम सिफारिश करेंगे। क्षमा करने की पूरी कोशिश करेंगे। हमारे राम तो तुम्हारे ही है। परंतु दुख इतना ही है कि हमारे राम को तुम अपना नही मानते। स्वामीजी हम सब आपके हैं ऐसा सच्ची कह दो। ऐसा कब कह सकते हो झूठ बोलना छोडोगे तब। बस यही समझना है। "जय सियाराम."*

सीतारामबाबांचा अधिकार यावरूनच कुणाच्याही ध्यानी यावा. आत्मरत, आत्मतृप्त संतांच्या मुखातूनच असे उद्गार बाहेर पडू शकतात. जे त्यांच्या सहवासात राहिले, वाढले, त्यांच्या अमृतरूपी वाणीने सुस्नात झाले ते खरोखरच धन्य होत.

संतांच्या वास्तूमध्ये रात्रीची निवांत झोप मिळाली. पहाटे लवकर जाग येऊनही उशिरानेच उठलो– सूर्य बराच वर आल्यानंतर. उत्तर भारतामध्ये हिमलहरीने आक्रमण केलेले होते. त्यामुळे सकाळचे दहा वाजले तरीही पायाच्या गारठलेल्या बोटांना चेतना येत नव्हती. उन्हात बसूनही शरीराला कापरे भरलेले होते. तशा त्या थंडीतच मैयाच्या थंड जलाने स्नान उरकले आणि मंदिरातील फरशीवर बसून रुद्राची एकादष्णी केली ती तशीच कुडकुडत. मैयाचा काठ, हिवाळ्याचे दिवस, डोंगराळ प्रदेश, वृक्षराजी यांच्या भरीस थंडीची लाट असे मेतकूट जमल्यावर हुडहुडीशिवाय अन्य काय होणार?

भोलादास आणि गजाननदासांच्या समवेत भोजन करून पुढील प्रवासाला निघालो, तेव्हा अकरा वाजले होते. गजाननदासांनी फिरून एकवार राहण्याचा आग्रह केला; पण

अमरकंटक हे लक्ष्य समोर होते. त्यांचा प्रेमळ निरोप घेऊन सरळ सडक पकडली आणि सायंकाळी दिवस मावळल्यावर मानोट गावी मैयाच्या पुलानजीक असलेल्या विस्तीर्ण वटवृक्षाखाली आसन लावले. गावात ना मंदिर ना धर्मशाळा. चाळीस-पन्नास घरांचा गाव. वस्ती इतर जातीची. अठरा मैलांची रपेट झालेली. रस्त्याचे काम चालू असल्यामुळे खडी वर आलेली. पाय हळवे बनलेले. त्यामुळे चाल मंदावली. मैयाचे दर्शन करून हातपाय धुऊन वडाच्या पारावर आलो. आज उघड्यावरच ठेवायचा माईचा निर्धार. तथापि समोरील देवगावच्या रहिवाशांनी शेकोटीची व्यवस्था केली. गावातील दलित समाजातील दुकानदार भोजनाची चौकशी करून गेला. छोटे छोटे बटाटे उकडून आणून पुढ्यात ठेवले. रात्रीची झोप यथातथाच. पोट गार पडले की, कूस वळवायची तर जरा वेळाने पाठ गार पडायची, मग पुन्हा कूस बदलायची. असे सव्यापसव्य रात्रभर चालूच राहिल्याने झोपेचे खोबरे होणे अगदी साहजिकच !

सूर्यनारायणाची कृपादृष्टी कधी होते याची वाट पाहत सकाळी बसून राहिलो आणि मध्येच कुठेतरी स्नान करायचे असे ठरवून निघालो. टुपट्टा संगनावर स्नान केले. या ठिकाणी संपूर्ण दगडाळ वाटा. उभाच्या उभा कडा आणि त्याच्या खालून अरुंदशी पायवाट. त्याखाली खडक आणि मैयाचा प्रवाह. अगदी डोळ्यांत तेल घालूनच वाटचाल करायला हवी. नाहीतर सरळ खाली प्रवाहामध्येच गच्छंती व्हायची ! विंध्याद्रीच्या रांगाच रांगा सर्वत्र पसरलेल्या. हिरव्यागार वृक्षांनी भरलेल्या. चकदई गावात पोचलो त्या वेळी दिवस बुडायला आला होता. हिमलाटेचा जोर ओसरलेला नव्हताच. शिवाय हा गाव म्हणजे चारी बाजूंनी जंगलाने वेढलेला. साग, आइन, जांभूळ, अर्जुन, भेळा, अशा विविध वृक्षांचे सोटच्या सोट आकाशाशी स्पर्धा करीत असलेले. अशी प्रचंड झाडे पाहण्यात आली नव्हती. वाहतुकीचे साधन नसल्यामुळेच ती बचावली असावीत. दिवसभर अनशन आणि अखंड भ्रमण, त्यामुळे शरीर थकले. पुढचा पल्ला गाठणे अशक्य असल्याचे जाणवल्यामुळे चकदई गावात वस्ती करायचा विचार केला. गावात राहण्यासाठी ना कुटी, ना मंदिर ना धर्मशाळा. कुठे अंतराअंतरावर घरे म्हणजे खोपटीच दिसत होती. थंडीपासून रक्षण व्हवे यासाठी आसऱ्याची गरज होती. त्यामुळे गावचा पटेल व्यवस्था करतो म्हणून त्याच्या घरी पोचलो.

अंगणातून 'नर्मदे हर'चा पुकारा केला. पटेल सत्तरीचा. उंचापुरा गडी. त्याने आपल्या घराच्या बाहेर असलेल्या खोपटाकडे बोट दाखवून तिथे रात्र काढण्यास सांगितले. अंथरायला एक कोरे गोणपाट दिले. शेकोटीची सोय होणार नाही असे स्पष्ट सांगितले. 'माते नर्मदे, जशी तुझी मर्जी,' असे म्हणून त्या खोपटातील अडगळीशिवाय एका माणसाला पुरेल एवढीच जी जागा होती तिच्यात आसन लावले. अंधार पडू लागलाच होता.

माघ महिना. शिवरात्र जवळ आलेली. त्यामुळे थंडीला भलताच जोर चढलेला. काल रात्री काही बटाटे पोटात गेलेले आणि आज संपूर्ण दिवस मैयाने उपाशीच राखलेले.

पटेलांनी एका अक्षरानेही भोजनाची चौकशी केलेली नाही. साहजिकच आहे. माझ्या नियमाचे उल्लंघन झालेले होते हे आज लक्षात येत आहे. गृहस्थाच्या घरी मी आसरा शोधण्यास गेलो ही ती तत्त्वच्युती होय आणि या अपराधाबद्दल मैयाने दंड केला असेच म्हणायला हवे.

सर्व कपडे अंगभर लपेटून घेतले. डोळे मिटून आसनावर बसलो होतो- स्वस्थ. एवढ्यात कानावर कुणा स्त्रीचे शब्द आले, "बाबाजी, प्रसादी ले लो." डोळे तसेच मिटलेले. काळोखही मिट्ट. कुठे प्रकाशाचा किरण त्या काळोखात प्रतीत झाला नाही. (डोळे मिटल्यावरही प्रकाशाची जाणीव होत असते.) उजवा हात पांघरुणातून बाहेर काढून पुढे केला. तळहातावर कसलासा लाडू पडल्याची जाणीव झाली. तो निमूट तोंडात टाकला आणि पुन्हा स्वस्थ राहिलो.

थंडीचा कडाका वाढू लागला. सर्व पांघरुणांना पार करून ती जेव्हा हाडांपर्यंत पोचली तेव्हा शरीराची ऊब राखण्यासाठी पद्मासन, सिद्धासन, मुद्रा, बंध, भस्त्रिका, प्राणायाम हे सारे प्रकार करून पाहिले. पोटाशी पाय घेणे, भिंतीस टेकून बसणे, डावी-उजवी कूस बदलणे अशाही कसरती करून झाल्या; पण कशाचाही परिणाम झाला नाही. अखेर थकव्यामुळे झोप लागली.

मध्यरात्रीनंतर थंडीचा जोर पुनश्च वाढला व मग झोप पार उडाली. पहाटे अगदी नाइलाज झाला तेव्हा शेकोटीच्या खोलीत गेलो. पटेलाची माणसे सभोवार झोपलेली. तेथेच कुठेतरी कशीबशी बसण्यापुरतीच जागा मिळवून धग मिळविण्याचा प्रयत्न केला. मध्येच डुलकी यायची. विस्तवात पडून भाजायला होणार नाही याचीही खबरदारी घ्यावी लागे; पण तरीही एक निखारा उडून गोणपाटाचा काही भाग जळाला आणि अपराध्यासारखे वाटले.

सकाळ झाली. शेकोटीपाशी पटेल बसलेले. मीही बसलो. त्यांना पत्ता विचारला आणि म्हटले, "तुम्हाला काही दिवसांनी पाच रुपयांची मनिऑर्डर येईल ती घ्यावी." 'कशाबद्दल' असे त्यांनी विचारताच म्हटले, "हे तुमचे नवीन गोणपाट माझ्या हातून जळाले. तेव्हा त्याची किंमत द्यायला नको काय?" त्यांना वाईट वाटले. म्हणाले, "त्याची काही आवश्यकता नव्हती." मी उत्तरलो, "अहो, तुम्हाला न सांगताच तसेच ते जळके गोणपाट इथे सोडून मी गेलो असतो, तर तुम्ही उद्या कुणाचाही थारा इथे केला नसता. माझ्यामुळे इतर परिक्रमावासीयांचे नुकसान नसते का झाले? तेव्हा तुम्ही काही विचार करू नका. पाच रुपये कुठून आले असा संभ्रम तुम्हाला पडू नये एवढ्यासाठीच तुम्हाला मी याची कल्पना दिली."

पटेलांनी मग मी रात्री जेवलो की नाही याची चौकशी केली. उपाशीच झोपलो हे कळल्यावर ते फार हळहळले, पण 'पटेलीणबाईंनी लाडू दिला' असे सांगितल्यावर ते काही बोलले नाहीत; पण आता मात्र शिधा घेऊन जा असे म्हणाले. मी माझ्यापाशी काही संग्रह करीत नाही आणि जेवणही बनवीत नाही असे सांगून म्हटले, "अगदीच आग्रह असेल तर

मूठभर शेंगदाणे द्या." पण त्या भागात शेंगदाणे दृष्टीस पडण्याचीच भ्रांत! अखेर चिमूटभर हरभरे रस्त्याने चावीत निघालो.

ज्यांच्या घरी शेंगदाणे नाहीत, हरभरेही जेमतेम चिमूटभरच मिळाले, तेही कसे चिमटलेले, त्यांच्याकडे गोडधोडाचा पदार्थ कुठला? ज्यांनी पाथंस्थाला जेवणाबाबतही विचारले नाही, त्यांनी त्याला प्रसाद कसला दिला? आरती नाही, काही पूजाबिजा नाही, मग हा प्रसाद कसला? शिवाय घरात पुरुष असताना परपुरुषाच्या हातावर काळोखामध्ये एक स्त्री प्रसादाचा लाडू ठेवून जाते याचा अर्थ काय? परिक्रमेच्या संपूर्ण कालावधीमध्ये स्त्रियांशी संभाषण करण्याचे प्रसंग क्वचितच आले आणि आपली भारतीय परंपरा अशी आहे की, कोणीही साध्वी, सभ्य स्त्री अनोळखी पुरुषाशी भाषणही करीत नाही, मग इतर व्यवहाराची गोष्टच दूर राहिली. त्यामुळे हा प्रकार काय असेल बरे?

परिक्रमेमध्ये मैया कधी उपाशी झोपू देत नाही असे ऐकले होते. त्याचा प्रत्यय हा असा आला; पण मैयाची किमया अशी की, तिने परिक्रमेच्या कालावधीत याचा विचारही उत्पन्न होऊ दिला नाही. आज स्वस्थ चित्ताने परिक्रमेचा आढावा घेत असताना याचा अर्थ कळून येत आहे. मैयाने आपल्या लेकराला आपत्तीत सांभाळले आहे. स्वामी स्वरूपानंदांनी एका पत्रातून कळविले होते—

*स्वयें जगन्नाथ साधकाचा हात। धरोनिया नीट चालवितो॥*
*असो द्यावा चित्ती एकनिष्ठ भाव। भक्तालागी देव सांभाळितो॥*

शेतातील धूळमाखले रस्ते. चवडे बुडतील एवढी धूळ असायची. काही दिवसांतच तळपाय राठ बनले आणि नंतर काही रेषा पडू लागल्या. हरभरा आणि वाटाण्याच्या लहान रोपट्यांमधून चालताना घोट्याच्या वरील चामडी घासटायची आणि मग ती चिराळली की, रोपट्यावरील पडलेले दहिवर त्यात मिसळायचे. त्या वेळी असे काही चुरचुरायचे की, यंव् रे यंव्! पण तिकडे लक्ष न देता आपल्याच मस्तीत दंग राहून भ्रमंती चालूच राहायची. शरीराचे चोजले पुरवायची सवयच नसल्यामुळे असे घडत असेल. लहानपणी एकदा बेलाच्या झाडावरून घसरत खाली आलो. काट्यांनी सारे शरीर ओरबाडले गेले; पण प्रथम कमरेची चड्डी फाटली की काय हे पाहिले, कारण वर्षाकाठी दोनच चड्ड्या मिळायच्या. तेव्हा शरीराचे लाड न पुरविण्याची प्रवृत्ती!

थंडीमुळे काही काहींचे तळपाय आणि बोटे एवढी भेगाळायची की, त्यांना एक पाऊलही पुढे टाकता येऊ नये! ब्रह्माण घाटाच्या वर धुवाँधारजवळील गुर्सी गावातील धर्मशाळेमध्ये दोन परिक्रमावासी भेटले होते. त्यांचे पाय पुरते चिराळून रक्तबंबाळ झालेले, त्यामुळे त्यांना तिथेच काही दिवस राहावे लागणार होते. अशी वेळ माझ्यावर जरी आली नाही तरी एक-दोन बोटे चिराळली होती. मंडलाच्या वरील पर्वतीय प्रदेशात ठेचा लागून दुखरी बोटे अधिक त्रासू नयेत यासाठी जपावे लागत होते आणि वाटा तर अधिकच बिकट व किचकट बनलेल्या. डांबरी रस्त्यावरून बरेच अंतर चालले की, तळपाय झिजून जात,

त्यांना बारीक छिद्रे पडायची- सिमेंटने पडतात तशी. त्यांना खडे टोचले की, जीवघेण्या कळा येत. त्यामुळे डांबरी रस्त्यापेक्षा धुळीचे रस्ते बरे म्हणायची पाळी यायची! सकाळी सकाळीच या धुळीचा स्पर्श कसा मृदू मुलायम लागे! मखमली पायघड्यांवरूनच चाललो आहोत असे वाटावे!

फडकी गावातील मैयाकाठची संन्याशाची कुटी शे-पाऊणशे फूट उंच पहाडामध्ये. स्वामीजी अग्नी आखाड्याचे असल्याने अग्नीपाशी बसायचे नाही असा त्यांचा नियम. त्यामुळे आम्ही स्वहस्ते जेवण बनवावे, आटा-डाळ देतो असे त्यांनी सांगितले. म्हटले, "मी जेवण बनवीत नाही, पण अगोदर स्नान करून येतो. मग पाहू काय करायचे ते!" हा भाग एवढा निर्मनुष्य की, दहा-बारा मैलांवरील निवास या तालुक्याच्या ठिकाणाहूनच कोणतीही वस्तू आणावी लागे. स्वामीजी पासष्टीच्या घरातले. रेल्वे खात्यात डॉक्टर होते. निवृत्तीनंतर संन्यास स्वीकारून परिक्रमा केली व या दुर्गम नि निर्जन स्थानी कुटी बांधून राहिले. नर्मदामैयाच्या सानिध्यात कोण कुठून कसा येईल आणि कुठे स्थिरावेल याचा काही नेम नाही!

स्नान उरकून रुद्रपाठ करीत कुटीत प्रवेश केला तेव्हा स्वामीजी म्हणाले, "जेवण तयार केलेले आहे. ते जेवून घ्या." कुणा भक्ताकडून त्यांनी वरणभात व पोळ्या तयार करून घेतल्या होत्या; पण वरणात लसूण घातलेली. वरणाने भिजलेला जवळजवळ सर्वच भात बाजूस ठेवला. उर्वरित अन्नावरच आपले नाव आहे असे मानून लोणच्याबरोबर जेवलो. स्वामीजींची प्रकृती बरी नसल्याचे त्यांनी सांगितले. अमरकंटकपर्यंतचा पल्ला शिवरात्रीपर्यंत गाठता येईल असेही म्हणाले. तथापि ही ब्याद रात्री येथे मुक्कामाला राहू नये या उद्देशापोटीच त्यांनी असे सांगितले असावे, असा माझा ग्रह झाला. अर्थात आपल्याला थोडेच तेथे थांबायचे होते! कित्येक जणांनी आग्रह करकरूनही अस्मादिक भ्रमणातील धुंदीत दंग होऊन राहिलेले असल्यामुळे त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतच पुढील मार्ग पकडला.

डोंगराळ प्रदेशातून नागमोडी वळणे घेत घेतच मैया पुढे सरकली आहे. केवढे प्रचंड खडक फोडून ती निघालेली आहे! फडकी येथे तिने अर्धचंद्राकार वळण घेतले आहे. त्यामुळे हा परिसर खरोखरच मोठा रमणीय बनला आहे. कुटरी घाटापर्यंतचा रस्ता अगदी मैयाच्या जवळून आणि वाटही सपाट व निष्कंटक. त्यामुळे गती वाढली. सफेद रंगाचे अर्जुन वृक्ष दोन्ही तटांवर हारीने उभे. लाकडाचा उपयोग जळणासाठीच होत असल्याने त्यांची वाढ अगदी निरंकुश अशी!

वातावरण ढगाळ. त्यामुळे थंडी कमी. प्रथमच हरकाचा भात खायला मिळाला. मागास भाग. त्यामुळे गरिबी पाचवीला पूजलेली. त्यामुळे जेवणात स्निग्ध पदार्थांची वाण. नर्मदातटावर बहुतेक ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात हाच प्रकार. दही-ताकाचा लवलेशही जेवणात आढळत नाही. केरपाणीला एका ब्राह्मणाच्या घरी भोजनाचा योग आला. तिथे

कळले की, येथील लोक ताक गुरांना पाजतात, क्वचित कढी करतात. स्निग्धतेच्या अभावी शरीरावरील तजेला लोपू लागला आणि कातडी कोरडी पडू लागली

संपूर्ण दिवस पायपीट करणे, ऊन असो वा पाऊस वा थंडी, सतत चालत राहणे हा नित्यक्रमच होऊन बसलेला. रात्रीची सुरुवातीची दोन-तीन तासांची झोप एवढीच काय ती शरीराला मिळणारी विश्रांती ! उर्वरित रात्र उजाडते कधी याची प्रतीक्षा करीत थंडीचे चावे सहन करीत करोत काढायची. आता याचीही शरीराला सवय होऊन गेलेली. चांगले फटफटले म्हणजे शरीर झटकून पुढील मार्ग सुधारायचा. उगमाकडील या दुर्गम प्रदेशात लोकांना आपले पोट भरण्याचीही जिथे भ्रांत तिथे परिक्रमावासीयांचे आदरातिथ्य कोण करणार ? याबाबतची स्पष्ट कल्पना नेमावरला सुरुवातीलाच मिळालेली होती.

पुण्याचे पानसेनामक वृद्ध गृहस्थ नेमावरला ब्रह्मचारी विश्वनाथजींच्या आश्रमात भेटले होते. अठ्ठ्याहत्तर वर्षे वय, डोळ्याने अधू. त्यांनी संपूर्ण भारतभ्रमण व दोनदा नर्मदापरिक्रमा केलेली. रामदासी पंथाचे. आग्रहीपणाचा अभाव. सर्व दैवतांचे स्वरूप एकच असल्यामुळे मैयाकिनारी केवळ शिवस्मरणच करायचे असा अट्टाहास त्यांनीही ठेवलेला नव्हता. अयाचित वृत्तीने परिक्रमा करायची म्हटल्यावर त्यांनी सांगितले की, नियम थोडेच करावेत; पण ते प्राणपणाने पाळावेत. काही मागायचे नाही म्हटले तरी गोंड इलाख्यात श्रद्धा कमी, साधुसंतांच्या कुटी नाहीत आणि अठराविश्वे दारिद्र्याचे वरदान. तेथे खरी कसोटी लागेल असे ते म्हणाले. म्हटले,'जशी गुरुदेवांची इच्छा !'

त्या दिवसासारखी पायपीट आणि थकवा यापूर्वी कधी जाणवला नव्हता, असा तो संस्मरणीय दिवस ! पर्वतातून चढ-उतार, जंगलात रस्ता चुकणे, मैयाच्या पात्रातील दगडगोट्यांतून खाली-वर भ्रमंती, झाडेझुडपे आणि काटेकुटे यांच्या जोडीला मनुष्यवस्तीचा अभाव असे सारे एकवटून आले. तीन डोंगर चढलो व उतरलो. या भागातील खडे पायांना रुपतात याची कल्पना लोकांनी दिली होतीच. 'जितने कंकर उतने शंकर' अशी भावना मनी बाळगणे आवश्यक असते, अशी शिकवण द्यायलाही काही जण विसरले नव्हते. अशा परिस्थितीत अमरकंटकला शिवरात्रीपर्यंत पोचणे अशक्य असल्याचे जाणवू लागले. तथापि 'यत्न तो देव जाणावा !' ही समर्थोक्ती मनी बाणवून वाटचाल करीत होतो. ताकीम घाटावरील कुटीमध्ये तीन साधू वास्तव्य करून असतात व ती नजीकच आहे असे चुकून जो कोणी भेटे तो सांगे, पण सायंकाळ झाली तरी खोपट काही दृष्टिपथात येईना. परिक्रमा अर्धवटच सोडून द्यावी लागणार की काय अशी कुशंकाही क्षणभर चाटून गेली; पण एवढ्यात दुरून डोंगरातून 'नर्मदे हर' अशी साद कुणीतरी घातल्याबरोबर 'हर नर्मदे' म्हणून आनंदित अंतःकरणाने प्रतिसाद दिला. खळाळणाऱ्या अर्धचंद्राकार मैयाच्या पात्रात डुबी दिली. पावसाळी हवेमुळे थंडी जराशी कमी झाली होती.

स्नान आटोपून रुद्र म्हणत शंभर एक फूट उंचीवरील त्या कुटीकडे प्रयाण केले. त्या डोंगरउतारावरील वाटेच्या बाजूला पन्नासेक केळीची झाडे लावलेली पाहून समाधान वाटले.

डोंगरातही केळी तग धरून होत्या, त्या अर्थी या जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता असावी किंवा कुठे पाझर असावेत. कुटीत धुनी प्रज्वलित करून तीन महात्मा भोजन बनवीत होते. तोंडाने रुद्र म्हणत असतानाच त्यांना अभिवादन केले. त्यांनी आदरपूर्वक धुनीजवळ बसायला दिले. आपल्याला आज 'महाग्यानी' दृष्टीस पडल्याचे उद्गार ते काढू लागले. यांतील दोघे जण आदल्याच दिवशी अमरकंटकहून येथे आलेले. वैष्णवांच्या रामदिगंबर आखाड्याचे गुरू-शिष्य. अयोध्येकडे निघालेले. 'चहा घेत नाही, फक्त भोजन घेईन, पण माझी एकादष्णी झाल्यावर', असे म्हटल्यावर तर त्यांचा आदर दुणावला.

पाठ आटोपल्याबरोबर त्यांनी माझी चौकशी केली आणि प्रथम जेवायला वाढले. आपण सर्व जण एकदमच बसू या असे म्हटल्यावर ते म्हणाले, "आम्ही दुपारी जेवलो आहोत. तुम्ही उपाशी आहात. अतिथी-अभ्यागताचे स्वागत प्रथम करायचे. उरलेला प्रसाद आम्ही नंतर सेवन करू." नाइलाजाने जेवायला बसलो. हरकाचा गरम गरम भात, उडदाचे गरम वरण, वांगे-टोमॅटो-मटार अशी रसदार भाजी आणि तुपात तळलेल्या पुऱ्या असे ते जेंवण कित्येक दिवसांनी आज दृष्टीस पडत होते. त्यांचे प्रसन्न आदरातिथ्य आणि सुग्रास भोजन यामुळे सारा शीण दूर झाला. अवशिष्ट अन्नात ते पाच-सात जण जेवले. आपल्यासाठी आजूबाजूच्या गावांत फिरून भिक्षा मागून आणलेले अन्न अतिथीला जेवू घालायचे– संतुष्ट मनाने ! केवढे पुण्य जोडले त्यांनी ! धन्य धन्य !

परिक्रमा सरता सरता उत्तरतटावरील धावडीकुंड येथील शिवमंदिरामध्ये एक दशनामी संन्यासी भेटले होते. त्यांनी भोजनाची चौकशी केली. मला वाटले की, ते तेथील रहिवासी असावेत; पण ते त्याच दिवशी तेथे आलेले होते. त्यांची संपूर्ण भारतभर भ्रमंती सुरू असते. परिक्रमासुद्धा पुरी केलेली. त्यामुळे प्रवासामधील अडचणींची पुरेपूर कल्पना आलेली. एवढा अनुभव घेतल्यानंतर त्यापासून काही शिकलो आणि त्यानुसार वागलो तर त्याला काही अर्थ असतो. भ्रमंतीतील कष्ट जाणवल्यावर इतरांनाही ते तसेच होत असतील, त्यांनाही उपासतापास घडत असतील अशी सहवेदना जर अंतःकरणात उमटत असेल, तरच या धांडोळ्याचा काही उपयोग !

*आपणासारिखे दुसऱ्यासी । लेखीत जावे ॥*

असे रामदासस्वामी म्हणतात.

*जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥*
*तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥*

किंवा

*भुकेल्यासी अन्न सत्पात्री ते दान । भावे दिल्याविण राहू नये ॥*

या संतवचनांचा जीवनात जर काही आविष्कार होत नसेल, तर ती पोपटपंची वा खटाटोप काय कामाचा ?

स्वामीजींनी भोजनाची जी व्यवस्था केली ती याच भावनेतून. अशा या परहितनिरत

संतजनांचे उतराई कसे व्हायचे? त्यांच्या वर्तणुकीतला एक कण जरी आपल्या जीवनात उतरला तरी खूप म्हटले पाहिजे.

रात्री ताकीम घाटावरील त्या कुटीत धुनीपाशी आणखी एक जण निजला होता. सकाळ होताच त्या साधुमहाशयांना अभिवादन करून पुढे प्रयाण करणार इतक्यात हा इसम म्हणाला, "मीही निघतो बरोबर." मनोमन आनंदलो. मैयाच उभी राहिली असे वाटले. दोघे मार्गस्थ झालो. हा सोबती माझ्याहून निःसंग। अंगावरील कपडे आणि एक छोटा कटोरा एवढीच काय ती याची मालमत्ता. अंथरूण नाही की पांघरूण नाही. मांगरौलला मिळालेले शुभ्र वस्त्र त्याला देऊन टाकले. पायाने तो जरा लंगडत होता, तरीही चाल जोराचीच. ॐकारेश्वराहून परिक्रमा सुरू केली असे म्हणे. यापूर्वी या भागातून फिरल्यामुळे इकडील प्रदेश ओळखीचा आहे, असेही तो सांगे. याव्यतिरिक्त त्याच्याशी कसलेही संभाषण होत नसे. महिनाभरात खूप चाल झालेली. त्यामुळे पाय भारी थकलेले. शरीर रापून कृश झालेले तथापि चित्तवृत्तीं टवटवीत. हा माणूस पुढे आणि आपण मागे असे बरेचदा घडे. कधी कधी फर्लांग वा अधिक अंतरही तो पुढे असायचा. मधूनच दृष्टी उचलून त्याची आकृती निरखायची आणि निमूटपणे त्याच्यामागून चालायचे. बाकी या अवघड आणि ओसाड भागात आपल्याला सोबत मिळाली या समाधानाच्या आगळ्याच धुंदीत भ्रमण चालू राही.

घूसिया गावातील मास्टरजी हिरालाल नंदेहा कोळी जमातीचे. घराशेजारीच एक इमारत त्यांनी बांधलेली. आजूबाजूला फळांनी लगडलेली पपईची झाडे. स्वच्छ सारवलेल्या त्या इमारतीत आसन लावले. धुनी पेटवली गेली. रात्री सोबत्याने सुंदर जेवण बनविले.

हे गाव डोंगरात वसलेले. कोकणातल्यासारखी लाल माती. कौलारू छपरांची विटांची घरे. कौले मात्र गावठी. कूपनलिकाही शासनाने काही ठिकाणी खणलेल्या, त्यांवर हातपंप. मध्य प्रदेश शासनाने रोजगार हमी योजनेतून कच्चे रस्ते बनविलेले आहेत. या भागात पावसाळ्यात एका गावाचा दुसऱ्या गावाशी संपर्क उरत नाही, असेही काही प्रदेश आहेत. कूर्मगतीने का होईना सुधारणांचा प्रवेश होत आहे एवढेच समाधान.

दुसऱ्या दिवशी जेवणाचा शिधा मास्टरजींनी अगदी अगत्यपूर्वक दिला. दिवसभर चालतच राहिलो. सायंकाळी आकाशात ढग जमू लागले आणि वारेही जोरात वाहू लागले. जोगी टिकरिया गावातील त्या डोंगराळ पायवाटेने दोनचारशे फूट खाली उतरलो. मैयाच्या श्रुतिमधुर संगीताने देहभान विसरून. ते विहंगम दृश्य तर भलतेच लोभसवाणे! डिंडोरीला जोडणाऱ्या पुलापाशी स्नान उरकले आणि पुढे निघालो. पोटापाण्याची व्यवस्था करायला हवीच होती. सोबत्याने स्नान करून तीन दगड मांडले. शेणी गोळा करून विस्तव पेटवला आणि आपल्या कटोरीमध्ये आधण ठेवले. तोवर मी स्नान उरकून रुद्रपाठ करीत बसलो. डाळ तयार झाल्यावर ती माझ्या तांब्यात ओतून ठेवली. पुन्हा कटोरीत भात शिजत ठेवला.

आता जेवायचे कशावर हा मोठा गहन प्रश्न उपस्थित झाला. रुंद पाने मिळती तर

पत्रावळ शिवता आली असती, पण कुड्यासारखी बारीक पाने. काय करायचे ? काही उपाय सुचेना. पण हा सोबती भलताच चलाख निघाला. त्याने दगडाची एक पातळशी पाथर शोधून काढली. स्वच्छ धुतली. लगेच आणखी एक पाहिली आणि आमची भोजनपात्रे तयार झाली. एकादष्णी पुरी होईतो जेवणही तयार. म्हणाला–

"बसा जेवायला, वाढून घ्या."

"तुम्हीच वाढा," असे म्हटले.

सोबत्याचा स्वभाव असा की, त्याने कधीही मला प्रथम वाढून घ्यायला सांगावे, पण मी खट. त्यालाच वाढायला सांगे. आम्ही त्या दिवशी एक आगळेच वनभोजन साजरे केले– दगडाच्या पाथरीवरील.

आज असा विचार येतो की, अजूनही उत्तर भारतामध्ये ब्राह्मणांना समाजात आदराचे स्थान आहे. ठिकठिकाणी मला जे आदरातिथ्याचे अनुभव येत गेले, त्याला हेही एक कारण नसावे ?

महाशिवरात्रीस अमरकंटकला पोचायचेच अशा हट्टाने वाटेतील लोकाग्रह (अर्थात नर्मदामैयाची इच्छा) मोडून निघालो खरा, पण ते शक्य झाले नाही. कसे होईल ? त्यामुळे वसंतपूर गावातील प्राथमिक शाळेच्या इमारतींच्या पडवीतच उघड्यावर महाशिवरात्र कुडकुडत व्यतीत केली. शेकोटीही नव्हती.

तळपाय आणि पोटऱ्यांमधून कळा येत असल्या तरीही सोबत्याबरोबर एका विलक्षण धुंदीत गुरुदेवस्मरणात मस्त भ्रमण चालू राही. आपल्या साह्याला या कठीण समयी गुरुदेव धावून आले असे वाटले. ॐकारेश्वराहून आलेला साक्षात ॐकारेश्वरच नसेल ना हा, असा विचारही तरळून जाई. नाथांच्या घरी भगवंत तीन तपे विविध रूपांमध्ये सेवा करीत राहिले, पण नाथांना त्याची यत्किंचितही जाणीव झाली नाही, तसे नसेल ना हे अशा भावनेने दिवसभर अगदी मूकपणे पथक्रमण चाले, परंतु जेव्हा केव्हा तो गांजाविडीसाठी गावोगावी फिरत राही, तेव्हा नको याची संगत, आपण उगाच कुठेतरी भरकटत तर नाही ना, अशी उबगाची भावनाही क्षणभर उसळी मारायची. पुन्हा आपली ही परीक्षा तर नसेल असाही विचार उगवायचा. आपण कायमचे थोडेच बरोबर राहणार आहोत, अमरकंटकपर्यंतच राहायची आहे आपली संगत– तेव्हा होऊ द्या काय व्हायचे असेल ते, अशी समजूत घालून पुन्हा मस्त रमायचे. सहाव्या दिवशी दुपारी भोजनानंतर सोबत्यानेच आम्हाला पुढे जाण्याचा मार्ग मोकळा करून दिला.

परिक्रमावासियांचा अनुभव आहे की, मैया त्यांच्या संकटकाळी धावून येते आणि आपल्या लेकराचा प्रतिपाळ करते. दोन परिक्रमावासी एकत्र आले की, ते आपले अनुभव एकमेकांना सांगत. प्रत्येकाचा अनुभव वेगळा. कोणी विचारी, "माईने कधी स्वप्नात दर्शन दिले काय ? तुमचा काय अनुभव आहे ?"

मी म्हणे–

"माझ्याबरोबर मैया अखंड असताना, सतत तिचे दर्शन होत असताना, ती स्वप्नात कशाला येईल बरे ? आणि तिचे तसे दर्शन व्हावे अशी माझी मुळी अपेक्षाच नाही ना !"

'मनी वसे ते स्वप्नी दिसे' असे म्हणतात. स्वप्न हा आपल्या मनाचा म्हणजे आपलाच प्रक्षेप होय; परंतु असे असले तरी काही लोकांचे अनुभव अगदी अलौकिक, विलक्षण असेच ! जसा पटेलांच्या खोपटातील प्रसाद !

एक जण शूलपाणीच्या झाडीतून प्रवास करीत असताना संध्याकाळ झाली. जवळ कुठे वस्ती नाही. अरण्यात एकटे राहण्याचा प्रसंग. जंगली श्वापदांपासून रक्षण होणे गरजेचे असल्याने, लाकूडफाटा गोळा करून अग्नी चेतविला आणि आसन लावून नर्मदेची आरती केली. नंतर स्वस्थ बसून राहिला. इतक्यात पाठीमागून एक अवाढव्य असामी त्याच्यासमोर येऊन उभी राहिली. सात-आठ फूट उंचीचा ताडमाड वाढलेला तो धिप्पाड पुरुष पाहून, तर त्या माणसाची बोबडीच वळली. त्या इसमाने या परिक्रमावासीयाला भोजनाबाबत विचारले. अर्थात त्या झाडीत कुठले जेवण ? त्या पुरुषाने लगेच आपल्या डोईचे मुंडासे काढले आणि त्यातील गरमागरम अशा दोन भाकऱ्या त्या परिक्रमावासीयाच्या हातावर ठेवल्या. त्याचे हात पोळलेच जसे काही ! त्या पुरुषाने त्याला रात्री काही गरज लागली तर हाक मारण्यास सांगितले आणि त्या काळोखात तो अदृश्य झाला.

अमरकंटकला रामघाटावरील नामदेवांच्या कुटीत आणखी एकाने आपला अनुभव सांगितला लक्कडकोटची झाडी जवळजवळ सोळा मैलांची. त्यात वाघासारखे हिंस्र पशू. तेव्हा रात्रीचा मुक्काम जंगलात करणे धोक्याचे, पण दिवसभरात त्याला हे अंतर पार करता आले नाही. तिन्हीसांजा झाल्या. आता जंगलातच वास्तव्य करणे भाग आहे हे कळून चुकले. जवळपास कोठे मनुष्यवस्तीचाही ठावठिकाणा नाही. रात्र कशी काढायची अशी चिंता पडली. तेवढ्यात समोरून घोड्यावर स्वार झालेली एक स्त्री आली. हातात तळपती तलवार ! त्या तेजस्विनीने सांगितले, "येथे श्वापदांचा वास येतो आहे. पुढे जा." ती आली तशी लगेच निघूनही गेली. तो तसाच थोडा वेळ चालत राहिला. तेव्हा त्याला एक झोपडी मिळाली व त्याने रात्र तेथेच घालविली.

आळंदीला शास्त्राध्ययन केलेले अनंतानंद सरस्वतीनामक एक तरुण संन्यासी, दक्षिणतटावरील देवगाव येथे भेटलेले. मैयाचा प्रवाह त्यांनी मुळीच सोडलेला नव्हता, अशी खडतर वाटचाल केलेली. भेडाघाटाच्याही वर कुठेतरी मैया अगदी खोल दरीतून वाहते. दोन्ही बाजूंना उंचच उंच कडे. एका कड्यावर चढताना अर्ध्या अंतरावरच त्यांना पुढील मार्ग सापडेना. मागे वळणेही दुरापास्त. या बिकट अवस्थेत काय करावे हे सुचेना. मती दिङ्मूढ झाली; पण क्षणभरातच त्यांच्या नजरेला एका वृक्षाची मुळी लागली. आनंदित होऊन त्यांनी मैयाचे आभार मानले आणि त्वरित वरचा पल्ला गाठला.

दक्षिणतटावरील होशंगाबादनंतर शिवभारतीनामक एका नागा साधूची संगत लाभली, ती पार शूलपाणीची झाडी संपेपर्यंत. तिशीच्या आसपास वय. बारावीपर्यंतचे शिक्षण. साधू

असूनही बालबुद्धी. चेष्टेखोर आणि किंचित घमेंडखोर स्वभाव. तरीही लाघवी, मायाळू तसाच सेवाभावी. या नागाजींनीही आमच्या उदरभरणाची चिंता वाहिली. निरलसपणे, आपणहून संगतीस राहिले आणि आपणहूनच साथ सोडून दिली. तथापि शेवटपर्यंत आमच्याबद्दलचा आदरभाव किंचितही उणावला नाही.

मी मैयाच्या ठायी निर्भर तर हे महाशय स्वकर्तृत्वावर विश्वस्त. मैयावर विसंबले म्हणजे ती सारे काही पुरवते असे म्हटले की, ते म्हणत की, आपण कर्म केल्याशिवाय काही मिळत नाही. माई जर पुरवीत असेल तर तिने आपल्या पुढ्यात अन्नाचे ताट आणून ठेवले पाहिजे, म्हणजेच आपण तिला मानू. मी म्हणे की, तुमच्या रूपाने मैयाच माझी सारी व्यवस्था करतेय, मला जेवू घालतेय ना ! माझ्या पुढ्यात ती ताट भरून ठेवतेच की !

सातमात्राच्या अलीकडे धावडी कुंड. या कुंडातील बाण प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी मैया धबाबा कोसळते. धबधबा असेल पंधरा-वीस फूटच उंचीचा; पण तो घनगंभीर नाद सारा आसमंत घुमवून सोडतो. मैलभर अंतरावरून त्याची चाहूल लागते. संपूर्ण काळाकभिन्न कातळ कातरीत मैया येथे उडी घेते आणि कुंडातून पुढे एखाद्या नागिणीसारखी नागमोड्या चालीने मार्गस्थ होते. कुंडामध्ये खडक वर आलेले. येथील कातळाचा स्पर्शही किती मृदू मुलायम. कुंडामध्ये नाव चालते आणि नावाडी कुंडातून बाण काढून देतो. कुणी सांगे कुंडाची खोली सातशे फूट आहे. त्या ॐकारेश्वरलासुद्धा अशीच खोली असल्याचे ऐकले; पण किती अतिशयोक्त विधान असावे बरे ! सत्तर फूट तरी खोली असेल की नाही याचीही वानवा !

दक्षिणतटावरील पहाडात सागवानाचे जंगल तर उत्तरतटावर काही झोपडीसदृश घरे. दक्षिणतटावर वस्ती नाही. शंभरेक फूट उंचीवर एका महात्म्याने बांधलेले शिवालय आज पुरते उजाड. त्या महात्म्यास चोरट्यांनी पिटाळून लावले म्हणे ! हा प्रदेश निर्मनुष्य असला तरीही विलोभनीय असा ! उन्हाळा सुरू झालेला. पर्णगळ होऊन सारे जंगल उघडे बोडके आणि त्यामुळे अंग भाजून टाकणाऱ्या उन्हाच्या झळा !

मैयाच्या जलाने स्नान केल्यावरच भोजन करण्याचा नियम. पुनासापासून सातमात्रापर्यंत मधील अरण्यामुळे मैयाचे दर्शन दुर्लभ. दुपार झालेली. त्यामुळे संध्याकाळपर्यंत सातमात्राला पोचणे अशक्य असल्याचे लक्षात आले. म्हणून नजीकचे ठिकाण कोणते अशी चौकशी केल्यावर धावडीकुंड या सहा मैल अंतरावरील स्थानाची माहिती समजली. तिथे ना जेवणाची सोय. त्यामुळे प्रत्येक जण कुरकुरू लागला. माझा निश्चय पक्का असून, मैयावर माझी श्रद्धा होती. त्या विजनातसुद्धा ती आपले ब्रीद राखील याचा विश्वास माझ्या ठायी पुरेपूर असल्याचे निक्षून सांगताच मात्र सारे जण तिकडे जायला निघाले.

पुन्हा एकदा धावडीची वाट विचारावी म्हणून समोरच्या गुरे चारणाऱ्या इंसमाला विचारले. त्याने रस्ता दाखविला, पण आता दुपार झाली. तेथे पोचायला उशीर होईल. स्नान

विहिरीवर करून आपल्या घरी भोजन करून मग पुढे जावे, अशी आग्रहाची विनंती त्याने केली; पण मला मैयाचेच स्नान करायचे होते. इतरांनी तेथे भोजन करावे आणि माझे जेवण आपण घेऊन जाऊ असेही सुचविले. त्यालाही कोणी तयार होईना. अखेर त्या गंगाराम गवळ्याच्या घरी सर्वांनी ताक प्राशन केले. तांदूळ, आटा, डाळ, गूळ असे भोजनसाहित्य घेऊन धावडीचा रस्ता पकडला. मैयाच्या पात्रात नथूभाई नामक नावाडी नाव चालवितो. त्याला हाक मारून भांडीकुंडी व इतर जिन्नस अधिक लागल्यास मागून घ्यावेत, असेही त्याने सांगितले. कुंडापाशी पोचल्यावर स्नान केले. नथूभाईला बोलावून साहित्य मागविले. सारी व्यवस्था उत्तम होऊन नागाजींनी भोजन बनविले. दिवस मावळल्यावर साऱ्यांनी आकंठ भोजन केले. या निर्जन स्थळी देखील आमची अगदी सहजपणे सोय झाली. हे मैयाचे कृपालाघव नव्हे तर काय ! तिनेच ताट वाढून ठेवले नव्हे ? नागाजींना मी हे नेहमी सांगे आणि त्यांनी 'भिक्षां देही' करूनही– कर्म करूनही (त्यांच्या अपेक्षेने)– जेवण मिळाले नाही असे प्रसंगही आले हेही सांगे– तरीही त्यांना ते पटत नसे. त्यांचे पालुपद कायमच. 'स्वभावो दुरतिक्रम:' हेच खरे !

शोभनाथ येथील चौबेजी पटवारींनी नुकत्याच बांधलेल्या धर्मशाळेपाशी महाशिवरात्रीचा मेळा जमलेला. अमावस्येच्या पर्वणीला स्नान करण्यासाठीही गर्दी बरीच जमली असावी. जेवणाने पोट जडावलेले. धर्मशाळेच्या आवारात येताच चौबेजी हात जोडून सामोरे. 'नर्मदे हर. पधारिये स्वामीजी' असे स्वागत करीत बळेबळेच त्यांनी त्या नव्या इमारतीत चालविले. जेवण झाल्यामुळे मोठा पेलाभर दूध पुढ्यात आले. कशावर वासना नव्हती; पण प्रेमादराचा अनमान करता येत नव्हता. अखेर ते दूध कसेबसे रिचवले. सततच्या प्रवासाने शिणलेल्या शरीराला थोड्याशा आरामाची आवश्यकता होतीच. आग्रहाच्या विनंतीमुळे मुक्काम करण्यास आनंदाने होकार दिला. आभाळ आलेले होतेच. त्यामुळे निवाराही हवाच होता.

प्रतिमापूजन, व्यक्तिपूजा हा आम्हा भारतीयांचा स्थायीभाव. त्यामुळे कोणा व्यक्तीविषयी आपण चट्‌कन आदर दाखवितो आणि आपल्या मनाविरुद्ध आढळले की, लगेच अनादर वा निंदा करायलाही मागेपुढे पाहत नाही. खूप लोक पाया पडून गेले. कोणी घरी चलावे म्हणून विनवले. कुणी 'नको नको' म्हणत असतानाही हातपाय चांगलेच रगडून काढले. जणू कोणी महापुरुष त्यांना गवसला होता ! या धर्मशाळेत आणखीही चार परिक्रमावासी वास्तव्याला होते. मंदिराचे पुजारी होते. या सर्वांच्या ठायी आमच्याबद्दल अपार आदराची भावना. परमकारुणिक गुरुदेवांचे शिष्याच्या ठायी असलेले हे निस्सीम प्रेम नव्हे तर काय !

*जय जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे ॥*
*अनवरत आनंदे । वर्षतिये ॥*

गुरुमाउलीच्या अविरत प्रेमाची अखंड ज्योत हृदयात तेवत राहिलेली.

*'सा त्वस्मिन्परमप्रेमरूपा अमृतस्वरूपा च'*

ही नारदभक्तिसूत्रातील भक्तीची व्याख्या अंतःकरणात घोळत राहिली. रात्री भोजनानंतरही आध्यात्मिक प्रेमालाप !

*आनंदाचे डोही आनंद तरंग ! आनंदचि अंग आनंदाचे ! !*

अशी भावविभोर अवस्था होऊन राहिली !

आभाळ भरलेले. रात्रभर विजांचे नर्तन चालूच होते. रात्री झोप थोडीच मिळाली. खोली बंद असूनही पहाटे थंडी वाजू लागली. मेघगर्जनांचा चौघडा, पर्जन्याचा सडा आणि वायुलहरींचे तांडवनृत्य असा संच घेऊन उषादेवी अवतीर्ण झाली आणि मैयाशी हितगूज करू लागली. रविराज मात्र दिवसभर रुसूनच राहिला. सायंकाळी पुन्हा कृष्णजलदांनी नभप्रांगणात दाटी केली.

मंदिराचे पुजारी रामदासजी. त्यांनी आपुलकीने गरम पाण्याने पाय धुतले. परातीमधील गरम पाण्यात काही वेळ पाय धरून ठेवले. खूप बरे वाटले. त्यांच्याकडून रामरक्षा म्हणून घेतली. उच्चारांबाबत मार्गदर्शन केले. उत्तर भारतीयांचे उच्चार आणि दाक्षिणात्यांचे उच्चार यांत जमीन-अस्मानाचा फरक. यावनी सत्तेचा हा परिणाम. सब गोलंकार अवस्था. आमच्या वाणीमुळेच की काय नकळे, इकडील जनांमध्ये अस्मादिकांविषयी आदरभाव जागृत होत असावा ! रामदासजींना दुपारी सुवाच्य अक्षरात रामरक्षेची शुद्ध प्रत लिहून दिली.

अमरकंटकला शिवरात्रीला पोचू नये ही मैयाचीच इच्छा असेल बहुधा. वस्तुतः यात्रा आणि गर्दी यांबद्दल मला विशेष आकर्षण नाहीच मुळी. त्यात अशी पावसाळी हवा. अमरकंटकला या मेळ्यासाठी लाखो लोक जमतात म्हणे. या गदारोळात वस्ती करायला निवांत असे ठिकाण मिळणे सशाच्या शिंगासारखेच दुर्लभ. आणि इतक्या लोकांची सोयसुद्धा कोण, कशी करणार ? अमरकंटकला महाशिवरात्र व्यतीत केल्याने तीन परिक्रमा केल्याचे पुण्य पदरी पडते, असे श्रद्धावंत मानतात. तसले पुण्यसंपादनाचे उद्दिष्ट कधीच बाळगलेले नव्हते.

*परी कर्मफळी आस न करावी ।·आणि कुकर्मी संगति न व्हावी ॥*

*हे सत्क्रियाचि आचरावी । हेतूविण ॥*

अशी ज्ञानेशांची सांगी आहे. हेतुरहित कर्माचरणातच जीवनाचे सार्थक आहे. नव्हे, तेच जीवन आणि तेच खरेखुरे कर्म होय.

गरम पाण्याने पाय बरे झाले. फाटलेली बोटे सांधली. यासाठीच नसेल ना मैयाने येथे राहवून घेतले ? दोन दिवसांचा मुक्काम हलवून भरल्या अंतःकरणाने सर्वांचा निरोप घेतला. सायंकाळी आकाशात अभ्रे पाहून पुढील पाऊल थबकले. पुढे फसगत ठरलेली म्हणून टिकई टोला गावी राहायचे ठरवून कुटी, मंदिर कुठे दिसते का पाहू लागलो. येथे साऱ्याचीच वाण. गावातील लोक दखलसुद्धा घेईनात.

एके जागी चार जण बसलेले. मख्खासारखे. ताकास तूर लागू देईनात. तेव्हा किंचित उपहासगर्भ वाणीने, कृतककोपाने बोललो—

"अरे, साडेतीन हात जमीनही तुमच्यापाशी नाहा काय रे ? आम्हाला जेवणाची गरज नाही. फक्त रात्र काढण्यासाठी जागा ! तीही नाही ? ही रे कसली तुमची गृहस्थी ?"

रात्रीचा मुक्काम आता आंब्याच्या झाडाखालीच करायचा असे ठरवून टाकले. एवढ्यात समोर दिसली दोन तरुण मुले. (माझे बोलणे त्यांनी एकले होते.) एक राममिलन व दुसरा सुहिंदर सिंग. 'नर्मदे हर' झाल्यावर त्यांना म्हटले—

"तुमच्या गावात साधी झोपण्याची व्यवस्था होत नाही. असले कसले हे गाव !"

राममिलन म्हणाला, "राहा इथे."

"इथे म्हणजे कुठे ? तुझ्या घरी ? काही ठिकाण दाखवशील की नाही ? शाळा कुठे आहे ?"

तेव्हा त्यांनी शाळा दाखविली. नशीब म्हणजे शाळेच्या चारी भिंती जागेवर होत्या. जमीन साधी होती. फरशा नव्हत्या.

शाळेत आसन लावतो आहे एवढ्यात, बैसाखुसिंग आणि बिरेनसिंग उपस्थित झाले. आदिवासी गाव, तरीही त्यांनी नंतर अगदी आस्थेने विचारपूस केली. भात-भाजीचे साधेच पण रुचकर जेवण बनविले आणि आम्ही चौघे जण पोटभर जेवलो.

झोपायची तयारी करणार इतक्यात प्रचंड गडगडाट होऊन पाऊस धो धो कोसळू लागला. झाडाखाली झोपणार होतो. मग काय दशा झाली असती ? मैयाचीच कृपा ! गंमत म्हणजे त्या लांबलचक शाळेमध्ये गळत नव्हता असा एकच कोपरा होता. साडेतीन हात जमिनीचा. तशा त्या अवस्थेतही गाढ झोपी गेलो.

मिऱ्या गावातून सरळ गाडीवाट पकडली आणि मुख्य राजमार्गास लागलो. तेथून तडक अमरकंटक. सलग आठ तास चालत राहिलो. कुठे पाच मिनिटे विसावलो असेन एवढेच काय ते ! जवळजवळ दहा मैलांचा रस्ता भुंडकोना वन परिक्षेत्रामधून गेलेला. सर्वत्र निलगिरी वृक्षांची लागवड केलेली. उंचच उंच सडसडीत, फिक्कट पांढुरके असे ते वृक्ष आणि ती वनश्री पाहून मन उल्हसित झाले. दोन मैल लांबीचा आणि पाच हजार फुटांहून अधिक उंचीचा तो भुंडकोना घाट चढताना दुबळ्या शरीराची दमछाक झाली; पण परिक्रमेचा चौथा हिस्सा अमरकंटकला पुरा होणार याचेच समाधान असल्यामुळे इतर गोष्टींकडे लक्षच होते कुणाचे ?

मैकल पर्वतांच्या रांगांमध्ये पठारावर वसलेले अमरकंटक. हिरव्यागार वनराईने नटलेला हा परिसर नयनमनोहर खराच. मैयाचे हे उगमस्थान. करंगळीएवढी पाण्याची सतत धार ज्या कुंडात पडत असते त्याला नर्मदाकुंड म्हणतात. या कुंडावरच नर्मदामंदिर बांधलेले आहे. रोज सकाळी व सायंकाळी मैयाची आरती होते. या कुंडाला परिक्रमावासीयांनी प्रदक्षिणा घालायची नाही. कारण त्यामुळे परिक्रमा भंगते. कुंडामध्ये भक्तिभावाने लोक

पैसाअडका टाकतात. वर्षाकाठी एकदा मेळा संपल्यावर कुंड रिकामे केले जाते. या वेळीही कुंड स्वच्छ केलेले होते.

पावसामुळे सगळीकडे रिपरिप झालेली होती. अमरकंटकला कपडे स्वच्छ पाण्याने धुवायचे असा विचार होता; पण पाणीच कुठे होते. नदीचे मूळ आणि ऋषीचे कुळ शोधू नये म्हणतात ते याचमुळे नसावे ? गटारासारखी मैयाची येथील दशा पाहिली आणि कसेसेच वाटले. रामघाटावर बांध घालून पाणी अडविलेले होते. त्यात श्रद्धेने डुबी मारली. गंगेचे पाणी आणि गटाराचे पाणी यांमध्ये ज्या वेळी भेद दिसणार नाही त्या वेळी ज्ञान झाले आहे असे समजावे असे कुणाचे तरी वचन आहे. दुसऱ्या दिवसापासून पहिला तांब्या त्या धरणातील नर्मदाजलाचा घेऊन उर्वरित स्नान तिच्या काठावरील विहिरीच्या पाण्याने करीत असे. अर्थात हेही पाणी तिचेच ना !

स्नान उरकत असताना एक व्यक्ती ताटकळत उभी असलेली आढळली. शुभ्र लुंगी व उपरणे, अर्धवट पिकलेल्या दाढीजटा. स्नान होताच 'नर्मदे हर' असे अभिवादन केले आणि आपल्या आश्रमात यावयाची विनंती केली. नामदेव शिंपी समाजातील हरिराम ही सिय नामदेव रामघाटावरच कुटी बांधून राहिलेले. नर्मदामंदिरात जाऊन रुद्रपाठ पुरा करून आलो. त्यांनी विचारपूस केली. त्यांना म्हणे काही वर्षांपूर्वी स्वप्नात 'आदेश' असा शब्द ऐकू आला. हा नाथांचा परवलीच्या शब्दांपैकी एक. त्यांना याचा अर्थ कळला नव्हता. आजपर्यंत कोणी नाथ भेटला नाही म्हणे ! आमची गाठ पडल्यावर त्यांना अत्यानंद झाला होता. ज्ञानदेव व नामदेव दोन्ही महाराष्ट्रीय संत. समकालीन आणि परस्परांमध्ये जिवाभावाचे नाते असलेले. ज्ञानदेवांच्या व नामदेवांच्या सांप्रदायिकांची आज योगायोगाने भेट झाली असे त्यांना म्हटले. त्यांनी सुरुवातीपासूनच आपल्या आश्रमात बराच काल व्यतीत करण्याबाबत विनवणी केली. चातुर्मास करावा, निदान फाल्गुनाचा मलमास तरी तेथे घालवावा, अशी अगदी कळकळीची विनंती केली; पण आमची परिक्रमेची तऱ्हाच वेगळी. तथापि चार दिवस राहण्याचे मान्य केले.

महात्मा गृहस्थाश्रमी. निरपत्य. चाळीशीच्या आसपास वय. माताजी त्यांच्याहून वयाने लहान, पण केशकलाप बव्हंश पिकलेला. नामदेवांनी अखंड रामायणाचा बारा वर्षांचा संकल्प सोडलेला. तीन वर्षे होऊन गेलेली. पाळीपाळीने कोणी ना कोणी रामचरितमानस वाचीत असे. कधी स्वतः महात्मा, कधी त्यांची पत्नी, कधी गावातील कोणी सज्जन, तर कधी परिक्रमावासी असा पाठ अखंडपणे चालू राही.

त्या रात्री मध्यरात्रीनंतर जाग आली. दोनचा सुमार. पाहतो तर नामदेवजी पठण करीत होते. चट्कन उठून बसलो. ऐकत राहिलो. त्यांना मोकळे करावे असे वाटले. किती वेळ वाचत बसणार ? जवळ गेलो. मी बसतो म्हटल्यावर त्यांनी आसन सोडले 'श्रीराम जयराम जयजय राम' असा नामगजर करीत. दुसऱ्याने सुरुवात करण्यापूर्वी असा गजर करण्याचा प्रघात आहे.

यापूर्वी तुलसीरामायण उघडण्याचा योग आलेला नव्हता. शाळेमध्ये हिंदीच्या पाठ्यपुस्तकातील वेच्यांपलीकडे तुलसींच्या वाङ्मयाशी संबंध यथातथाच. डी.व्ही. पलुस्करांनी गायलेली तुलसींची दोन-तीन भजने कानांवरून गेलेली असतील इतकेच. शिवाय विषयलंपट, भोगासक्त तुलसी स्त्रीच्या भर्त्सनेमुळे एका क्षणात विरागी बनला आणि नंतर कधीही नामरूपात्मक सांसारिक पसाऱ्यात तो गुरफटू शकला नाही. एवढ्या जुजबी ज्ञानापलीकडे तुलसीची ना ओळखदेख. त्यामुळे प्रथमच या अवधी भाषेतील ग्रंथाचे वाचन करायचे होते. तरीसुद्धा महात्म्यांच्या वाग्यज्ञातील खारीचा वाटा उचलावा असे अंतःकरणपूर्वक वाटले. नव्हती पारायणाची सवय वा भाषेचा परिचय. मागे कधीतरी गुरुचरित्राचे व ज्ञानेश्वरीचे एकेकदा पारायण केले होते इतकेच काय ते !

कोणताही शास्त्रोक्त पाठ करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती असतात. कोणी निव्वळ ग्रंथच वाचीत जातो. म्हणजे ओव्या, श्लोक, अभंग क्रमानुसार वाचीत जातो. कोणी पल्लव लावतो. म्हणजे ग्रंथातील एखादी ओवी वा श्लोक पल्लव म्हणून निवडायची आणि प्रत्येक ओवीपूर्वी, श्लोकापूर्वी तो पल्लव म्हणायचा. ज्ञानदेवांचा हरिपाठ म्हणताना जसे प्रत्येक अभंगाच्या अखेरीस 'हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा ! पुण्याची गणना कोण करी' असा चरण म्हणण्याची पद्धत आहे. हा चरण एकदा म्हणणे याला पल्लव म्हणतात व दोनदा म्हणण्याला संपुट लावणे असे म्हटले जाते. रामायणाचा पाठ करताना अशी पल्लव लावण्याची पद्धत होती. चौपाई दोहा असा जिथे जिथे बदल असेल, पृष्ठारंभ होई तिथे तिथे त्यांतील निवडक दोहा म्हणायचा. मला हे सगळेच नवीन होते; पण ध्यान देऊन त्याचा अवलंब केला. क्वचित कोठे स्खलन झालेही असेल; परंतु सकाळी साडेसहापर्यंत म्हणजे सलग साडेचार तास वाचीत राहिलो. पूर्वानुभव नसताना, अक्षरे नजरेखालून गेलेली नसतानाही ही किमया साध्य झाली ही नवलाचीच गोष्ट नव्हे काय ?

तुलसींची वाणी अद्भुत. प्रत्ययकारी. अलंकारप्रचूर आणि तितकीच साधी, सरल, सुलभ. उत्तरेत सर्वत्र तुलसीरामायणाचा प्रभाव जनमानसावर आहे. त्याचे कारण त्याची प्रासादिक आणिं प्रेमरसाने ओथंबलेली भाषाच म्हटली पाहिजे. ज्ञानदेवांनी जशी महाराष्ट्रावर मोहिनी घातली आहे, तशीच तुलसीदासांनी उत्तर भारतावर ! माझ्यासारख्या अनभिज्ञालासुद्धा या भाषेने आकृष्ट केले म्हणजे त्या भाषाप्रभूचे केवढे सामर्थ्य ! आबालवृद्धांच्या जिभेवर तुलसी बसलेला पाहून त्याच्या लोकविलक्षण प्रतिभेपुढे कुणीही नतमस्तक व्हावे !

अमरकंटकच्या नर्मदामंदिरातील ध्वनिक्षेपकावरून एके दिवशी सकाळी गीतेचे श्लोक ऐकू आले. वाणी कशी स्वच्छ, अस्खलित व कर्णमधुर ! या भागात क्वचितच कानी पडणारी. सुब्बलक्ष्मीच्या धाटणीचा स्वर. मोहित झालो. कोळी जमातीचा एक आठ-दहा वर्षांचा बालक रोज सकाळी मंदिरामध्ये पठण करतो असे कळले. तुलसीरामायण, गीता, विष्णुसहस्रनाम, नर्मदाष्टक असे काही. मध्य प्रदेश शासनाकडून मासिक पन्नास रुपये

मानधन त्याला मिळते. ब्राह्मणकुलोत्पन्नांचे उच्चार ऐकल्यानंतर या शूद्र बालकाचे शुद्ध संस्कृत उच्चार ऐकून कोणी मंत्रमुग्ध झाला नाही तरच नवल ! याला दैवी वरदानच म्हटले पाहिजे.

माधानच्या गुलाबराव महाराजांची अशा वेळी आठवण येते. महाराज म्हणजे विसाव्या शतकातील चमत्कार होय ! शूद्र जातीत जन्मलेल्या महाराजांना बालपणीच अंधत्व प्राप्त झाले. लौकिक शिक्षणाचा गंध नाही. तथापि रामायण, महाभारत, भागवत, कालिदासादी कवींचे ग्रंथ, पुराणे, ज्ञानेश्वरी, गाथा असे अनेक संस्कृत, प्राकृत ग्रंथ त्यांना मुखोद्‌गत होते. इतकेच नव्हे, तर संस्कृत व मराठी भाषांमध्ये त्यांनी गद्यपद्य रचनाही बरीच केली आहे. पाश्चात्त्य विचारवंतांचे अनेक सिद्धांत अभ्यासून त्यांचे मार्मिक खंडनही केले आहे. कला, काव्य, नाटक, विज्ञान, तत्त्वज्ञान यांतील विविध अंगांचा सखोल चिंतनात्मक अभ्यास त्यांनी केलेला होता. अनेकविध विषयांवरील त्यांचे असाधारण प्रभुत्व पाहिले की, आश्चर्याने थक्क व्हायला होते आणि 'बालपणीच सर्वज्ञता। वरी तयाते' हे ज्ञानेश्वरांनी केलेले योगभ्रष्टाचे वर्णन स्वाभाविकच नजरेसमोर तरळते.

नामदेवांच्या कुटीत चार दिवस राहिलो. त्यांनी चांगले आदरातिथ्यही केले. बारा वर्षांच्या संकल्पातून काही काळ मुक्तता मिळती म्हणजे कुणीतरी ती जबाबदारी उचलली असती तर, त्यांना नर्मदापरिक्रमा करायची होती; पण कोण घेणार हे लोढणे गळ्यात ? मला त्यांनी एकदा सुचवलेही; पण कुठेही अडकून न पडण्याचा आमचा स्वभाव ! आपण संसारात पुरते अडकून पडलो याचे शल्यही त्यांना बोचत असावे. त्यांनी विवाहानंतर बळेच निरोधन करून अपत्य होऊ दिले नसावे. मधूनच विकारांच्या तडाख्यांनी घायाळ होऊन दुःखी-कष्टी होत असत. नैसर्गिक ऊर्मींना बलात्काराने दाबून टाकण्याचे कर्म म्हणजेच वैराग्य होय. त्याने पुण्यसंपादन होते किंवा या शारीरिक गरजांनाच तुच्छ लेखून त्यांच्यावर जय मिळविणे हेच जीवनातील श्रेष्ठ प्राप्तव्य आहे अशा विकृत समजापोटीच समाजामध्ये दांभिकता वाढीस लागते. विषयांना विषमय न लेखता त्यांमधील विषांचे अमृतत्व ओळखणे, विषालाच पचवून अमृतत्व प्राप्त करणे महत्त्वाचे असते; परंतु विषयांचाच त्याग करण्याची जी प्रवृत्ती असते ती अनर्थकारी असते. विषयांना निर्विष करावे लागते. ते गुरुकृपेलाच शक्य असते.

*विषयव्याळे मिठी । दिधलिया नुठी ताठी ।*
*ते तुझिये गुरुकृपादृष्टी । निर्विष होये ॥*

नामदेव सरलहृदयी, सगुणोपासक, आत्मदर्शनासाठी तळमळणारे; परंतु भय आणि आसक्ती सुटत नाही याची खंत आहे. अर्थात ही जाणीव असणे म्हणजे आपण सत्यदर्शनाच्या मार्गावर आहोत असा अर्थ नव्हे काय ? आपल्यातील उणिवेची जाणीव होणे ही सत्यशोधनातील प्रथम पायरी होय. तथापि, सगुणदर्शनाची वा इतर कशाचीही आस असणे म्हणजे अहंकारालाच फुलवीत राहणे नव्हे काय ? आशा आहे तोवर दुःख

आहे. त्याचप्रमाणे सगुणोपासना-निर्गुणोपासना, भक्तिमार्ग-ज्ञानमार्ग असे भेद जोपर्यंत चित्तात जागे आहेत तोपर्यंत ही अशीच फरफट होत राहायची !

*हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो ।*
*म्हणौनि भक्तांमाजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ॥*
*सदा स्वरूपानुसंधान । हेचि भक्ति हेचि ज्ञान ॥*

चार दिवस असेच काही बाही बोलत राहिलो. अखेर निरोप घ्यायची वेळ आली त्या वेळी नामदेवजींना गहिवरून आले.

आता दक्षिणतटावरून परिक्रमा सुरू करायची. या कुटीसमोरच दक्षिणतटावर येण्यासाठी तासभर लागेल असा अंदाज. त्यानंतर मैयाच्या काठाने न जाता डिंडोरीपर्यंत सरळ सडक पकडायची अशा विचार पक्का केलेला. सायंकाळपर्यंत पंधरा-वीस मैल मजल सहज मारता येईल असाही हिशेब मनाशी केलेला; पण कसले काय ! 'दैवमन्यत्र चिंतयेत्' म्हणतात ना ?

नर्मदामंदिरामागे माईचा बगीचा. तेथून जवळच शोण नदीचा उगम. या दोन्ही स्थानांचे दर्शन करूनच दक्षिण यायचे असा परिक्रमेचा नियम. त्यामुळे बगीच्याची वाट पकडली सर्व तटावर दूर पसरलेल्या पहाडांच्या रांगाच रांगा. ते हिरवे-निळे डोंगर व वनश्री पाहत निघालो. सपाटी संपली आणि डोंगराउतारावरील वाट सुरू झाली. पुष्कळ अंतर उतरलो पण सपाटी येईना. वाट चुकल्यासारखे वाटले म्हणून माघारी वळलो. घाटी चढायला सुरुवात केली. नुकतेच जेवण झालेले. दुपार होऊ घातलेली. उभी चढण. त्यामुळे घामाघूम झालो. अर्धी वाट चढलो तर वाटले मागे वळावे. वाट बरोबर असेल. पुन्हा उतरू लागलो. त्या किर्र जंगलात चिट्पाखरूसुद्धा नजरेस पडेना. काय करावे. वाट बरोबर नव्हे म्हणून पुन्हा वळून चढणीस लागलो. तीन वेळा संशयपिशाच्चाने ग्रासले. अखेर ही वाट सोडून मागे वळायचे आणि कुणा माहीतगाराकडून चौकशी करून माईचा बगीचा गाठायचा असे ठरविले. वर आलो तेव्हा छाती फुटून निघाली. आईचे दूध आठवले. तोंडास कोरड पडली. सारे जेवण जिरून गेले होते.

एक म्हातारी डोकीवर भलाथोरला बोजा घेतलेली दृष्टीस पडली. या परिक्रमावासीयांची बोचकी पाहून विस्मय वाटे. केवढा हा जोजार ! आपल्याला तर काखोटीची पिशवीही जड वाटते आणि ही माणसे कशी एवढाली ओझी वाहतात बरे ! सत्तरीच्या पलीकडील, पाच फुटांच्या आसपास उंचीची ही बाई भोपाळकडील. घरच्या त्रासाला वैतागून ती परिक्रमेच्या मार्गाला लागली. माझ्यासारखी तीही वाट चुकली होती. इकडे पुढे वाट नाही असे सांगितल्यावर म्हणाली–

"भगवान् भेटला. आता माझी साथ सोडू नको. मी तुझ्या खाण्यापिण्याची सारी व्यवस्था करीन."

म्हटले–

"दक्षिणतटावर अमरकंटकपर्यंतच सोबतीस राहीन. तिथे कुणी परिक्रमावासी गाठून देईन. माझी साथ-संगत परवडण्यासारखी नाही."

भूक खूप लागलेली. माईच्या बगीच्यामध्ये त्या वृद्धेने मुगाची खिचडी बनविली. पोटभर जेवलो. बगीच्यात विविध जातींची झाडे. त्यांच्या त्या थंडगार सावलीत विसावलो. म्हातारीची इतर परिक्रमावासीयांशी गाठ घालून दिली आणि पुढे सटकलो. वाटेत कैलासाश्रम लागला. अनौपम्य रमणीय स्थान. खूप उंचीवर. आश्रमाच्या खिडकीतून समोर पाहिले आणि मैकल पर्वताच्या क्षितिजात विरत जाणाऱ्या त्या हिरवट निळ्या रंगाच रंगांनी मंत्रमुग्ध झालो. दृष्टीचे पारणे फेडणारे ते रोमहर्षक दृश्य ! हिमालयातील कैलासाची आठवण करून देणारे ते स्थान असल्यामुळे आश्रमाला 'कैलासाश्रम' असे सार्थ नाव दिल्याचे स्वामीजी बोलले. रामकृष्ण मिशनचे हे स्वामीजी आरक्त वर्णाचे, दाढीजटा संपूर्ण शुभ्र, साठीपलीकडील वय, तरीही दणकट शरीरयष्टी, मुद्रा करारी.

आश्रमाच्या परिसरात फुलझाडांची व फळझाडांची लागवड केलेली. डोंगरात ऊससुद्धा लावलेला दिसला. पाण्याची चांगली सोय केलेली. मंदिराचे बांधकाम सुरू. स्वामीजी म्हणाले−

"माईच्या बगीच्यात यायचे परिक्रमावासीयांना काय कारण? पूर्वी कोणी इकडे फिरकतही नसे. शोण नदीच्या उगमाकडे जाण्याची टूमही हल्लीच निघालेली. तुम्हाला हा चांगलाच दंड झाला. नर्मदामंदिराच्या पाठीमागून दक्षिणतटावर गेला असता तर हे कष्ट वाचले असते !"

अभावितपणे म्हटले−

"कुणी सांगेल त्याप्रमाणे आम्ही मार्ग अनुसरतो. आम्हाला काय ठाऊक आतल्या गोष्टी ? नाहीतर कशाला आलो असतो इकडून ? आणि परिक्रमेत कष्ट हे व्हायचेच."

मैयाची इच्छा समजून अमरकंटकलाच त्या दिवशी दक्षिणतटावर वस्ती केली.

नाथ संप्रदायाचा पसारा मोठा, संपूर्ण भारतभर विस्तारलेला. योगींद्र गोरक्षनाथांच्या अलौकिक सामर्थ्यामुळे नाथांचे तत्त्वज्ञान समाजाच्या तळागाळापर्यंत जाऊन पोचले. त्यांनी जेथे वास्तव्य केले असेल त्या स्थानाला त्यांच्या नावाने ओळखले गेले असावे. गोरखपूर नावाची गावे भारतात सर्वत्र पसरली असावीत. मैयाच्या तटावरही गोरखपूर नावाचे गाव आहे. त्या गावात नाथ पंथाचा कोणी साधू वा मठ वा मंदिर असेल असा एक विचार उगाच चमकून गेला आणि रात्रीची वस्ती तेथे करावी अशा निश्चयाने चालत राहिलो. सरळ गाडी रस्ता पकडलेला. चांदणी रात्र त्यामुळे दिवस मावळला तरी वाटचाल चालूच. नेहमीप्रमाणेच नर्मदाष्टक, स्तोत्रे, गीताध्याय म्हणत त्या लयीत पावले टाकीत होतो. एवढ्यात पाठीमागून हाका ऐकू आल्या. एक इसम धावत आला. आपल्या घरी रात्र घालवावी असा आग्रह केला. गावात मठ वा मंदिर असून, ते दूर अंतरावर होते व तेथे काहीच सोय होण्यासारखी नव्हती हे त्याच्याकडून कळले. पाय थकलेले आणि हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागणे

शहाणपणाचे ठरलेले नव्हते. ती मैयाचीच इच्छा होती. म्हणून त्याच्याकडे राहण्यास रुकार दिला.

सोहतलाल साहूंचे रस्त्यावरच घर व ट्रक-टायर-दुरुस्ती व हवा भरण्याचे दुकान. त्यांचे जेवण तयार झालेले; पण ते अशुद्ध. अपवित्र, कांदालसूण मिश्रित. त्यांच्याच मनात किंतू आला. मला अपवित्र जेवण कसे द्यायचे? आपल्या मुलीला स्नान करायला सांगून तिच्याकरवी ताजा शुद्ध स्वयंपाक त्याने करविला. त्या दिवशी खरोखरच चविष्ट जेवणाचा योग होता.

*केल्याने देशाटन पंडितमैत्री सभेत संचार।*
*शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसे फार॥*

प्रवास, विद्वानांची संगत, सभेमध्ये उपस्थिती आणि शास्त्रग्रंथांचा व्यासंग या चार गोष्टी माणसाला चतुर बनवितात. नर्मदापरिक्रमेमुळे चातुर्याचा लाभ कितपत झाला, याबद्दल शंका असली तरी रोज नवनवीन अनुभवांची शिदोरी गाठीस घेऊन पुढील वाट चोखाळायची हे मात्र अंगवळणी पडले.

मोहतारा गाव डिंडोरी रस्त्यावरच. नेहमीप्रमाणेच मस्तीत दंग होऊन चाललो होतो. कुणीतरी हाक मारल्याचा भास झाला. तसाच पुढे गेलो तर पाठीमागून एक माणूस धावत आला आणि मला बोलावल्याचे म्हणाला. पाठी आलो. एक रुबाबदार तरुण रस्त्यावर उभा दिसला. म्हणाला–

"यहाँ रुकिये. सदावर्त लेकर जाइये."

"हम सदावर्त नही लेते. तैयार भोजन ही करते है."

"तो मिलेगा भोजन. घर चलिये."

"इतने सबेरे भोजन? हमारा स्नान भी हुआ नही. उस के बिना हम भोजन नही करते."

"मैया पास में ही है. दो-तीन किलोमीटर दूरीपर. वहाँ से स्नान करके आना. तबतक भोजन बनेगा."

त्याच्या माणसाबरोबर घरी गेलो. दहाचा सुमार. डिंडोरीला पोचायचा मानस रहित. घरासमोरच धर्मशाळा. तिथे एक धनाढ्य शेठजी, एक मुनीजी आणि इतर दहा-पंधरा जण उतरलेले. मैयाची आरती सुरू होती आणि आता अखंड रामायणाचा आरंभ होणार होता. अनायासे त्यात सहभागी होता येईल, असे वाटले. स्नानार्थ मैयावर जाऊन आलो. दोन-तीन किलोमीटर म्हणता म्हणता पाच-सहा किलोमीटर अंतर निश्चित असावे. कारण रुद्राची एकादष्णी पुरी झाली तरी वाट संपता संपेना. मैयाचे सुभग दर्शन बऱ्याच दिसांनी झाले याचे समाधान होते.

तीन-चार हजार वस्तीच्या या गावातील कुरार समाजातील मोहनलाला चौधरींचे प्रतिष्ठित घराणे. मालदार माणूस. घरातील वातावरण सुसंस्कृत. स्वतः चौधरीमहाशय चांगले शिकलेले. मध्य प्रदेश शासनाच्या महसूल खात्यात नोकरी केलेली. काही काळ

शिक्षकी पेशाही. अत्यंत धार्मिक, आर्जवी, शालीन आणि सरळहृदयी असा हा गृहस्थ. आता शेती आणि पिठाची, भाताची आणि तेलाची गिरणी या व्यवसायात लक्ष घातलेले. सारी मुले सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित. शेती साठ-सत्तर एकर. भात, गहू, कडधान्ये, अशी पिके घेतली जातात. घरासभोवार केळी, सफरचंद, संत्री, मोसंबी, लिंबू, पपई, आंबा, फणस अशी लागवड. परसातच विहीर. पंप बसवलेला. झाडावर तजेला नाही. थंडीच्या कडाक्यामुळे बहुधा पाने करपून गेलेली, तरीसुद्धा त्या बागेत बसल्यावर मन रमून गेले.

संपूर्ण परिक्रमेमध्ये या चौधरींच्या घरचे जेवण अप्रतिम. जेवणाचा थाट तर काही औरच! बसायला पाट आणि ताटाखालीसुद्धा पाट. गरमागरम जेवण. वरणभात, पोळी, भाजी, दूधसाखर, पापड. अगदी ब्राह्मणी पद्धतीचे आणि स्वच्छ! घरातील नीटनेटकेपणा व टापटीपही नजरेत भरण्याजोगी!

मुनीजी मौनव्रत धारण केलेले. ही त्यांची तिसरी परिक्रमा. शेठजी कोट्यधीश आहे म्हणे. सर्वांचा खर्च तोच करतो. अखंड रामायणात काही काळ वाचायला बसलो. संध्याकाळी मुनीजी, चौधरीजी व इतर काही जण असे फिरून आलो. मौन धारण करून इतर सर्व व्यवहार खाणाखुणांनी करायचे असला दांभिकपणा कशासाठी? या महाशयांची नजरही किती चंचल! चित्तस्थैर्य साध्य झाल्यानंतर नजरसुद्धा स्थिरावते. शारीरिक हालचालीही मंदावतात म्हणजे धाव कमी होते. हव्यास कमी होतो; पण यांच्या ठायी त्यांतले काहीच दिसले नाही.

सायंकाळी आरतीनंतर एकत्र बसलो असताना हे मुनीजी अकस्मात् बोलू लागले. आश्चर्य वाटले; पण ते माझ्याशी म्हणून बोलले असे मागाहून कळले. दिवसा मौन पाळतात व रात्री क्वचित बोलतात.

"परिक्रमा पूरी करने की इतनी जल्दी क्या है? ऐसी भागदौड करने से शांती नही मिलनेवाली. आराम करो. उस से ही शांतीलाभ होंगा. अविश्वास रखनेसे परिक्रमा का कोई फल नही मिलेंगा।"

"हमे परिक्रमा से कोई फल पानेका ही नही है. मैया के किनारे हम थोडे ही शांती ढूँढते फिरते है? अपने अंदर ही शांती होती है ना कही बाहर! अपने विचार अपने लिये, हमारे हमारे लिये ठीक है।"

अधिक बोलण्यात काही अर्थ नव्हता. आमच्यावर निष्कारण आगपाखड करून त्यांनी आपली शांती मात्र बिघडवून घेतली. तीन-तीनदा परिक्रमा करूनसुद्धा चांचल्य कमी न होता शांतीसाठी भटकत राहायचे याचा अर्थ काय? माणूस याचा काही विचारच करीत नाही. अंतर्मुखता येत नाही. हीच माणसाची खरी शोकांतिका नव्हे काय?

काही वर्षांपूर्वी एक माणूस भेटला होता. पवनारच्या विनोबाजींच्या आश्रमात तो अधूनमधून जात असे. तिथले ते शांत वातावरण, विनोबाजींसारख्या सत्पुरुषाचा सहवास यामुळे मन कसे हरखून जाई. चित्त शांत होई; परंतु म्हणाला कसा– "आठ दिवसांत या वातावरणाचा कंटाळा येऊ लागतो." त्याला म्हटले की, ही कसली मनःशांती, ही तर

आत्मवंचना होय.

विनोबाजींनी कुठेतरी एक छोटीशी बोधकथा सांगितली आहे. या संसाराच्या जंजाळापासून मोकळीक मिळावी म्हणून साधनेसाठी एक माणूस वनात गेला. तेथे त्याने एक झोपडी उभारली आणि ध्यानधारणादी अभ्यास आरंभिला. काही दिवसांनी अंतःकरणाला शांती लाभली असे वाटले म्हणून तो परत घरी आला. सायंकाळी नेहमीप्रमाणे ईश्वरचिंतनास बसल्यावर घरातील एक लहान मूल काही गडबड करू लागताच याची शांती भंग पावली. तो त्रागा करू लागला. तात्पर्य काय तर 'शांती शांती' करीत जग धुंडाळत फिरून शांतिलाभ होत नसतो.

*अंतरी संतत राहे श्रीगोविंद । परी मतिमंद पाहेचि ना ॥*
*नाभीत कस्तुरी असता जवळी । हिंडे रानोमाळी मृग जैसा ॥*

अशी ही भ्रांत अवस्था.

मस्तरामची भेटही येथेच झाली. हा नागा साधू. 'मस्तराम' हे नाव चौधरीजींनी ठेवलेले, तो आपल्याच मस्तीत दंग असल्यामुळे. मोहनलाल भाविक आणि सेवाभावी. गप्पांच्या ओघात सहजपणे गमतीने म्हणाले–

"हम साधुओं की सेवा करना चाहते हैं लेकीन मस्तराम हमे मौका ही नही देते ।"

यावर मस्तराम उत्तरले–

"साधू की सेवा आसान नही है ।"

मोहनलाल लगेच म्हणाले–

"देखो तो सही. आप बोलेंगे वैसा करने की हम जरूर कोशिश करेंगे ।"

मस्तराम किंचित उखडून म्हणाले–

"क्या करेंगे ? हम कहेंगे आपका यह मकान गिरा दो. क्या आप गिरा देंगे ? वृथा बाते किसलिये करते है ? हम साधू उल्टी खोपडीके होते है !"

मोहनलाल हसून म्हणाले, "इसीलिये हम इन्हे मस्तराम कहते है ।"

नागाजींनी लगेच आपली बॅटरी हातात घेत म्हटले,

"आप को सेवा करना है न ? इस में सेल भर के दे दो ।"

मोहनलालनी संतोषाने बॅटरीतील सेल आणवून दिले.

चौधरींच्या घरी आदरातिथ्यामध्ये काही कमी नाही. भोजनाप्रमाणेच अंथरुणाचीही अप्रतिम व्यवस्था. नीटनेटकी मऊ गादी. त्यावर स्वच्छ धुतलेला पलंगपोस आणि पांघरायला तशीच गुबगुबीत, मुलायम स्पर्शाची शुभ्र दुलई. अशा उबदार मायेचा त्या दिवशी मी धनी होतो.

दोन दिवसांच्या पाहुणचारानंतर पुढे निघालो तर मोहनलाल म्हणाले– "आजचा दिवस राहा." गमतीने म्हटले, "राहायला काही हरकत नाही; परंतु मैयाचे स्नान परवडत नाही. चार-पाच मैल चालत जायचे नि यायचे त्यापेक्षा तेवढेच अंतर पुढे जाईन पुन्हा

केव्हातरी येईन." खरोखर अशी प्रेमळ, जीव लावणारी माणसे भाग्यानेच लाभतात.

बूढी माँ आणि मैया यांच्या संगमावरील देवगाव. समोरच मानोट. उंच टेकाडावरील धर्मशाळा. दिवसभर चोवीस मैलांची वाटचाल. शरीर पार थकलेले; परंतु मैयाच्या त्या खळखळाटाने चित्तवृत्ती सचेत झाल्या. स्नान उरकून धर्मशाळेत प्रवेश केला आणि धुनीशेजारी रुद्रपाठ करीत बसलो, कुडकुडत. सिद्धपुरीजी टिक्कड भाजत बसलेले. येथे तीन संन्यासी होते. आमच्यासारखेच निःसंग. आम्ही चौघेही बिनओळखीचे. त्यांच्या भोजनात वर्णी लागली.

आळंदीला अध्ययन झालेले अनंतानंद स्वामी. तिशीचे वय. प्रसन्नवदन. आकाशवृत्ती धारण केलेली. भारतभ्रमण केलेले. त्यांच्या वाणीमध्ये सुस्पष्टता आणि मोहकता होती. दक्षिणेकडे आचारविचारांची शुद्धता, कर्मठता, मंदिरातील पूजापाठ इत्यादींचा प्रभाव आहे, तर उत्तरेकडे याचा अभाव; पण भक्तिभावना प्रबळ. श्रेष्ठ आचार्य ही दाक्षिणात्यांची देणगी. साधुसंतांचा मळा बहरला उत्तरेत. भक्तीचा उगम झाला दक्षिणेत. महाराष्ट्रात ती बहरली, यौवनात आली आणि उत्तरेत ती मुरली, प्रौढ झाली. आज तिचा वृद्धापकाळ चालू आहे. पतिव्रतेचे वार्धक्यच जणू! या मनोहारी विश्लेषणावरून या तरुण संन्याशाच्या सूक्ष्म निरीक्षणाची कल्पना यावी!

दुसऱ्या दिवसाच्या अरुणोदयाबरोबर सारे कापडी पांगले. सिद्धपुरीजी आमच्या साथीला राहिले. साठीच्या आसपास वय. ब्राह्मण असूनही उच्चार अशुद्ध. उत्तरेकडील तऱ्हाच अशी, त्यामुळे त्यांना दाक्षिणात्यांच्या शुद्ध उच्चारांबद्दल आदर. आपल्याला महिम्नस्तोत्र आणि विष्णुसहस्रनाम शुद्ध स्वरूपात शिकवावे अशी त्यांनी मला आग्रहाची विनंती केली. ठीक आहे असे म्हणून शिकवणी स्वीकारली; परंतु दोन-चार दिवसांत शिष्यच कंटाळला. साठ वर्षांचे जिभेवरचे संस्कार असे थोडेच लोप पावणार! वळचणीचे पाणी आढ्यास नेण्यासारखे अवघड काम हे.

ॐकारेश्वर येथील मार्कण्डेय आश्रमामध्ये एका फलकावर अनमोल वचने लिहिलेली आहेत.

*रास्ता चलना स्वच्छ चाहे फेर हो।*
*काम करना उत्तम चाहे देर हो।*
*सम्मत्ति लेना भाईकी चाहे बैर हो।*
*भोजन करना माँ से चाहे जहर हो।*
*पत्नी करना पतिव्रता चाहे बेनूर हो।*
*न्याय करना सत्य चाहे अमीर या फकीर हो।*
*कुलवान की पहचान होती है उसकी शानसे।*
*विद्वान की पहचान होती है उस की जबान से॥*

वाणीवरून, भाषेवरून मनुष्याच्या विद्वत्तेची, सुसंस्कृतपणाची पारख होते असा

अनुभव येतोच. मार्कण्डेय आश्रमात भोजनारंभी गीतेचा पंधरावा अध्याय म्हणण्याचा प्रघात आहे. मीही त्या संन्याशांच्या सुरात सूर मिसळला. जेवणानंतर संगतीस असलेले नागाजी म्हणाले–

"योगानन्दजी, मै गौर से सुनता था। आप का पाठ ही सब में अच्छा लगा।"

शुद्ध आणि स्वच्छ वाणीचा प्रभाव जनमानसावर पडत असतोच.

मंडला शहराच्या समोर मैयाच्या दक्षिणतटावर बनजर संगमावरील पुरवा गाव. वटवृक्षाच्या छायेत आसन लावलेले. जवळच राधाकृष्ण मंदिर. मैयाचा प्रशस्त, फरसबंद घाट. दिवस मावळताना सिद्धपुरीजी आणि स्वामी अनंतानंद सरस्वती यांच्यासह येथे आलो. या ठिकाणी वस्तीला असलेल्या दिनेशानंदांनी शुभ्र ब्लँकेट अंथरले. 'नर्मदे हर' असे अभिवादन करून आसनस्थ झालो. हे ब्लँकेट त्यांनी माझ्यापाशीच ठेवायला सांगितले. आणखी एका ओझ्याची भर!

स्वामी दिनेशानंद वृंदावनच्या 'सोऽहं' आश्रमातील. सध्या ते आपले गुरुबंधू स्वामी दिव्यानंद यांच्यासमवेत येथे आले आहेत. प्रसन्न व्यक्तिमत्त्व. शांत स्वभाव, तांबूस वर्ण, मुंडित मुद्रा, अंगावर भगवी वस्त्रे आणि मृत्तिकेचा एक कटोरा एवढीच काय ती यांची संपत्ती. मृदू व संयत वाणी. ना कसला अभिनिवेश ना कसली आशाआकांक्षा. असा हा निर्लेप साधू. काही वर्षांपूर्वी परिक्रमेतील चातुर्मास मंडला शहरात केलेला असल्यामुळे, या परिसरात त्यांचा भक्तगण तयार झालेला. त्यांच्या लाघवी स्वभावामुळे तसेच मृदुमधूर वाणीमुळे आकृष्ट झालेले येथील रहिवासी त्यांच्या भेटीस येत असतात. अधूनमधून स्वामीजी या भागात येऊन राहतात.

स्वामीजींना भेटायला येणाऱ्या लोकांच्या नाना तऱ्हा. कुणी शेतकरी, तर कुणी व्यापारी, कुणी शिक्षक, तर कुणी विद्यार्थी, कुणी अधिकारी, तर कुणी कर्मचारी, कुणी पंडित तर कुणी अडाणी. समाजातील नाना थरांतील, नाना वर्गांचे भाविक त्यांच्याकडून आपल्या सांसारिक अडीअडचणींपासून सुटण्याचा मार्ग सापडतो का यासाठी येत असतात. या लोकांची दृष्टी वरवरची. विचार उथळच. आध्यात्मिक वृत्ती अल्पांशानेच दिसणारी. हा गोंड इलाखा तसा अश्रद्धच. लोक भारी चिकित्सक– आमच्या कोंकणवासीयांसारखे. देशकालपरिस्थितीला अनुरूप असाच स्वभाव बनणे हा निसर्ग आहे. येथे सधनता कमी असावी. कष्टांच्या मानाने फळ अल्प, त्यामुळे स्वाभाविकच वृत्ती कद्रू बनत असावी. या मंडला नगरीमध्येच म्हणे श्रीमदाद्यशंकराचार्य व प्रकांड पंडित मंडनमिश्र यांचा वाद होऊन आचार्यांनी सनातन वैदिक धर्माची पताका येथे रोवली होती.

माखन माखन संतोने खाया छास जगत वपरानी हो जी.

हे संत कबीरांचे वचन अशा या व्यवहारी जगाला तंतोतंत लागू पडते. लोकांची ताकानेच तृप्ती होते; पण संतजन मात्र लोणी खात असतात. लोणी काढण्याची चिकाटी सामान्य लोकांपाशी नसते, हेही सत्य आहे.

येथे मैयाचा प्रवाह चंद्रकोरीसारखा असून, ती उत्तरवाहिनी झाली आहे. संगमामुळे आणि संथपणामुळे येथे डोहसुद्धा तयार झाला आहे. प्रशस्त घाटावर सायंकाळच्या निःशब्द वातावरणात मैयाच्या पात्रावरून येणाऱ्या मंद-उष्ण वायुलहरींमुळे मन उल्हासित होऊन वृत्ती शांत बनतात. दोन्ही तटांवरील दाट झाडीमुळे परिसर नितांत रमणीय असा. मंडला शहरातील लुकलुकणारे विजेचे दिवे त्यात आणखी भर घालतात. या ठिकाणी नावेतून वाहतूक चालते.

स्वामी दिनेशानंद क्वचितच शंकानिरसन करीत. ते काम या वेळी त्यांनी स्वामी दिव्यानंदांकडे सोपविलेले. दिव्यानंदांची भाषा तिरकस आणि आवेशपूर्ण. ज्ञानमदाने फुरफुरलेली. स्वभाव रागीट, तामसी, अहंकारविशिष्ट. मीही काही बोलावे असे स्वामी दिनेशानंदांनी सुचविले; पण स्वस्थ राहिलो. श्रवण करीत. स्वामी अनंतानंद मात्र बोलले.

दुसऱ्याच दिवशी मोठा बाका प्रसंग उभा राहिला. स्वामी अनंतानंद विषय प्रतिपादनाच्या ओघात गीतेच्या पंधराव्या अध्यायातील 'निर्मानमोहा जितसङ्गदोषा' या श्लोकावर काही भाष्य करीत होते. त्या वेळी त्यांनी स्त्री-पुरुषसंबंधाचा दाखला देताच, स्वामी दिव्यानंदांनी त्यांना रोखले. याबाबत तुम्हाला अनुभव आहे का, असा प्रतिप्रश्न त्यांनी केल्याबरोबर वादाला तोंड फुटले. स्वामी अनंतानंदांना त्यांच्या विवेचनात मध्येच नाक खुपसल्यामुळे सर्वांसमोर अपमानित झाल्यासारखे वाटले, तर दिव्यानंदांचे म्हणणे तार्किक. स्वानुभवावाचून पोपटपंची करू नये, असे त्यांचे मत.

अखेर स्वामी अनंतानंद तेथून निघून गेले. गीतेच्या ज्या पदावर विवेचन चालू होते त्याचा वक्ताच मुळी मान व मोह यांनी ग्रासलेला. शिवाय दिव्यानंदांचा संगदोषही त्याला जिंकता आला नाही आणि दिव्यानंदांची घमेंड आणि खुमखुमी तर काही औरच. अध्यात्मावर लंब्याचवड्या बाता मारणारे हे संन्यासी हाणामारीची भाषाही करू लागले. साधू-संन्याशांनी कसला न्यास केला आहे म्हणायचे ? त्यांच्यामध्येही मानापमान, अहंकार, बळाचा दर्प, काम, क्रोध, लोभमोह, एषणा, आदी विकारांचे थैमान चालूच राहते. म्हणूनच कोणता आखाडा श्रेष्ठ, अग्रपूजेचा, स्नानाचा प्रथम मान कुणाचा याबाबत सिंहस्थ, कुंभमेळा अशा प्रसंगी खूनखराबा होतो. अखेर प्रत्येकाचे पाय मातीला लागलेले असतात हेच खरे ! देह असतोपर्यंत त्यांच्याही भावभावना शिल्लकच राहतात. मोठमोठी तत्त्वज्ञाने उभारून, नाना धर्ममते प्रस्थापित करून, संप्रदाय, आखाडे, पंथोपपंथांची निर्मिती करून आपल्या अहंकाराच्या स्फुल्लिंगाला चेतवीत राहणे याहून वेगळे काही असत नाही. ज्याला हे उमगते तो मात्र या जंजाळातून सुटतो.

*ज्ञानचि ते आंधारे ॥ ज्ञानासिचि करी ॥*

असे ज्ञानराज म्हणतात ते याच अर्थाने.

दिनेशानंदांचे भक्त आवश्यक त्या साऱ्या वस्तू पुरवीत, त्यामुळे अन्नपाण्याची ददात नव्हती. तांदूळ, गहू, कडधान्ये, फळ-फळावळ, भाजीपाला, मिरची, मसाला, दूध, तूप, तेल,

गूळ, साखर असे अनेक पदार्थ तिथे जमत. दिनेशानंदांशी पहिल्या क्षणापासूनच गट्टी जमलेली. ते अगदी प्रेमाने वागत. त्यांच्याशेजारीच माझे आसन. त्यामुळे गप्पाही होत. तथापि, दिव्यानंदांना हे रुचत नसावे. आमची ब्याद कधी हालते इकडे त्यांचे लक्ष असे. हे फुकटचे खातात असा त्यांचा भाव असे. आम्ही कुमारी-भोजन केलेले नसल्यामुळे ते येथे उरकून घ्यावे अशी दिनेशानंदांनी इच्छा प्रदर्शित केली. त्याला मान दिला. मैयाने कुमारी-भोजन अशा प्रकारे करून घेतले. या डबलेवालेबाबांच्या अकृत्रिम स्नेहपालवाखाली चार दिवस कसे चुटकीसरशी निघून गेले. त्यांनी आणखीही राहण्याचा आग्रह केला; पण पावसाळ्यापूर्वी परिक्रमा पुरी करण्याचा मनोदय असल्यामुळे आता हिशेब करूनच वाटचाल करायची होती.

महाराष्ट्रात सात जूनला पावसाला सुरुवात होते. मध्य प्रदेशात पंधरा दिवस उशिरा. दररोज किमान पंधरा मैल चाल व्हायचीच. कधी अधिकही. पंचवीस-तीस मैल. पण रेवा सागरातून परिक्रमावासीयांना उत्तर तटावर नेणारी नाव अक्षय्य तृतीयेला बंद होते हे कळल्यावर मात्र प्रवास काटेकोरपणे, हिशेबी वृत्तीने केला पाहिजे हे पक्के झाले. अक्षय्य तृतीयेनंतर पावसाळी हवेमुळे समुद्र खवळतो, मोठ्या लाटा उसळतात आणि मग सागरात नाव लोटणे धोक्याचे असते. याकरिता तत्पूर्वी चार-आठ दिवस तरी नाव सुटण्याच्या जागी पोचणे अगत्याचे होते. रोज किमान पंधरा मैल चाल झालीच पाहिजे हा नियमच करून टाकला मग. शेवटची फेरी जर का चुकली तर सारेच मुसळ केरात जाणार होते. दसरा-दिवाळीपर्यंत दक्षिणतटावरच अडकून पडावे लागणार होते.

सिद्धपुरीजींची प्रकृती नाजूक. शरीरयष्टी स्थूल. शरीराला विशेष कष्ट न देता जमेल तेवढे चालायचे . चांगलेसे ठिकाण पाहून पोटापाण्याची व्यवस्था करायची हा त्यांचा खाक्या. आमच्यासारख्या मनस्वी माणसाचे आणि त्यांचे जमायचे कसे? तरीसुद्धा हा मनमिळाऊ आणि शांत वृत्तीचा माणूस असल्याने त्याची संगत काही दिवस लाभली. त्यांना भराभर चालता येईना आणि आम्हाला लवकर जायची घाई. यामुळे एकमेकांची कुचंबणा होऊ लागली.

उत्तर तटावरील पाँठा गावी एका महात्म्याच्या कुटीत रात्र घालविली होती. महात्म्यांच्या चेतराम साहूनामक शिष्याने आदरसत्कार केलेला होता आणि दक्षिणतटावर आल्यावर भेटीस बोलाविले होते. सिद्धपुरीजी थकलेले होते. त्यांना कुठे भिक्षा मिळाली नाही म्हणून छिंदवाह गावी आलो आणि चेतरामला पुकारले. तत्परतेने तो पलीकडील तीरावरून आला. आमची एका झोपडीत राहण्याची व्यवस्था केली. धुनी पेटवली. रात्री नवाच्या सुमारास आपल्या गुरुजींसह तो जेवण घेऊन आला. पुण्याच्या वै. सोनोपंत दांडेकर यांचे प्रशिष्य असलेले चेतरामचे गुरुजी. त्यांच्या मुखातून ज्ञानोबा-तुकोबांची अभंगवाणी ऐकून संतोष झाला. महात्मा अंगठेबहाद्दर, पण ईश्वरोपासनेसाठी थोडीच पदव्यांची गरज असते! आम्हीच घटापटादी चर्चेमध्ये वेदान्त अडकवून टाकला आहे.

तिलवारा घाटावर पोचलो त्या वेळी चांगलाच अंधार पडला होता. खूपच वाटचाल झाल्यामुळे थकवा आलेला. सिद्धपुरींची साथ सुटली. येथील महात्म्याच्या कुटीत अखंड रामायणाचा पाठ चालू; परंतु पाठकांच्या चहापाण्याची वा भोजनाची काहीच व्यवस्था नाही. महात्मा गांजा पिऊन ब्रह्मानंदसागरात मस्त डुबताहेत अशी अवस्था. एकीकडे रामायणपाठ तर दुसरीकडे रामलीला. कोकणातील खेळे किंवा दशावतार याचीच ती हिंदी आवृत्ती असावी. रामलीला पाहण्याचा योग आला असूनही, अंतरंगातून ती पाहावी अशी ऊर्मीच उठली नाही. डोळे मिटून स्वस्थ पडून होतो. रामलीलेमध्ये जालंदरनाथांचे कथानक होते, पात्रांचे आवाज सुरीले होते. उपस्थित प्रेक्षक हास्यविनोदात रंगले होते; परंतु उठून पाहावे असे वाटले नाही एवढे मात्र खरे !

एकदा एका इसमाने पुसले–

"एकटेच परिक्रमा करता काय ?"

"नाही."

"मग आणखी कोण आहे बरोबर ?"

"गुरुदेव."

"दिसत तर नाहीत. मागे आहेत काय ?"

वर आकाशाकडे बोट केले. तो निमूट चालू लागला.

परिक्रमेमध्ये एकाची साथ सुटली की, लगेच दुसरा साथीदार उपस्थित होई. मग माझ्या योगक्षेमाची काळजी घेतली जाई. 'श्रीगुरूसारिखा असता पाठिराखा ! इतरांचा लेखा कोण करी !' असे ज्ञानदेव म्हणतात.

भेडाघाटला मैयावरील प्रसिद्ध धबधबा. धुवाँधार प्रपात. याची उंची फारशी नसली तरी संगमरवरी कातळाला चिरून मैयाचा प्रवाह अनेक धारांनी येथे उडी घेतो. प्रेक्षणीय स्थळ असल्यामुळे भारतातीलच नव्हेत, तर परदेशी पर्यटकही मोठ्या संख्येने येथे येऊन जातात. मला काही हे स्थान त्या दृष्टीने रमणीय वाटले नाही. दक्षिणतटावरून खूप अंतर चालून जावे लागते. मैयाच्या धारा ओलांडाव्या लागतात आणि खूप अडचण. दगडधोंड्यांचा खच. त्यामुळे प्रयत्न सोडून द्यावा लागला. परिसरातील विविध प्रकारचे दगडगोटे गोळा केले; परंतु नसते ओझे कशाला म्हणून फेकूनही दिले.

स्वामी प्रेमानंद आणि मनसुखा जोशी असे दोघे मुंबईचे गुजराथी. त्यांच्या सोबतीला आणखीही तिघे जण. त्या दिवशी अमावास्या असल्याने आपल्याबरोबर दुपारी भोजनास राहावे असे आमंत्रण त्यांनी दिले: गव्हाच्या भाकऱ्या करून त्या बारीक कुस्करायच्या, त्यात गूळ, तूप घालून त्याचे लाडू करायचे. आमटीभात आणि हे लाडू असे मोठे रुचकर जेवण त्या वनश्रीने नटलेल्या प्रदेशात केले.

सायंकाळचा मुक्काम भेडाघाटसमोरील सरस्वती घाटावरील वाळवंटात. थंडी कमी होऊ लागलेली. पहाटेस मात्र गारठा जाणवत असे. भेडाघाटच्या राजहंस संस्कृत

पाठशालेचे आचार्य श्रीसत्यनारायण द्विवेदी यांनी निरोप मिळताच, सहा जणांसाठी शिधा आणून दिला. दुपारचे जेवण उशिरा व भरपूर झाल्यामुळे रात्री उपवास.

येथील संगमरवरी कातळ कसा नितळ आणि स्वच्छ आहे! इतरत्र काळसर रंगाचा आढळतो. या परिसरातील सिलिकायुक्त खडक फोडून त्याचे ढीग ठायी ठायी आढळले. यापासून पूड करतात म्हणे.

मैयाकिनारी बोरी-बाभळी खूप. बाभळीचे काटे तर तळपायातून आरपार वर यावेत एवढाले. काही ठिकाणी काटेरी झुडपे. त्यांची वाटोळी फळासारखी बोंडे अशी काही काटेरी की, एकाच वेळी दहा-पाच काटे पायांत रुतावेत! कोकणात कोचे असतात त्याहून कितीतरी जहाल. संपूर्ण परिक्रमेत कधीही बाभळीच्या काट्यांचा त्रास झाला नसला, तरी बारीक काटे नेहमी पायात मोडायचेच. स्नानाच्या वेळी पाय स्वच्छ झाले की, ते दिसत. क्वचित एखादा काटा बाजूला राहिला तर दोन-तीन दिवसांनी पुवळणास येऊन तो आपोआप निघून येई. त्या दिवशीही काटेरी बोंडावर पाय पडला व एकदम पाच-सहा काटे रुतले. एक काटा तर खोटेत आतवर गेला. काही केल्या निघेना. मुक्कामावर लंगडत लंगडत कसाबसा पोचलो. मनसुखांनी हां हां म्हणता पाय मोकळा केला. अगदी हलक्या हातांनी. समाधान वाटले.

प्रेमानंद आणि मनसुखा बालमित्र. एक संन्यासी तर दुसरा संसारी. अविवाहित आणि शेअर बाजारात नोकरी करणारा. दोघे बरोबरीने तीर्थयात्रा करीत असतात. स्वामी प्रेमानंद पुण्याचे गुळवणीमहाराज यांचे अनुग्रहित. स्वभावाने तापट, चंचल आणि लहरी. तंत्रविद्येबद्दल आस्था असलेले. आग्रही आणि आत्मप्रौढी मिरविणारे. मनसुखा अत्यंत शांत, विवेकी. सर्वांशी मिळून, मिसळून वागणारे. प्रेमळ तसेच सेवाभावी. एका पायाने अधू. मनसुखांच्या आग्रहाखातरच चार दिवस संगतीस राहिलो.

गोंड प्रदेशात ज्याप्रमाणे त्या अनामिक सोबत्याबरोबर गावागावांतून फिरावे लागे, त्याचप्रमाणे या मंडळींबरोबर राहिल्याने गावोगाव सदावर्तांतून जावे लागे. स्वतः सदावर्त घेतले नाही तरी क्वचित त्यांचा शिधा वाहिला. ज्वारी वा गव्हाचे पीठ, डाळ, रामरस (मीठ), अशा वस्तू सदावर्तात मिळत. थोडेसे तूप वा तेलही मिळायचे फोडणीसाठी. कुठे मूठभर तर कुठे पोटभर. कुणी नुसते पीठच देई, तर कधीकधी सगळे पदार्थ मिळत. काही सदावर्तांतून परिक्रमावासीयांना आवश्यक ती सारी भोजनसामग्री पोटभर मिळण्याची व्यवस्था असली, तरी वाटप करणारे लोकच आपली तुंबडी भरत असतात. सदावर्तातील अनुभव हे ऐकीवच.

ब्रह्माणनंतर पुन्हा एकटाच. टळटळीत दुपार. लिंगा गावचे महात्मा छत्तरपूरला भिक्षेसाठी गेलेले. तेथून पुढे झालो. छत्तरपूर समोरच्या किनाऱ्यावर असल्याचे ध्यानी येताच राधेश्याम, श्यामलाल, कन्हैयाराम, शुभराम आदींची आठवण आली. लिंगा गावी आल्यावर भेटीस बोलवावे असे त्यांनी सुचविलेले; पण कळवायचे कसे?

मैयाच्या पुळणीत एक म्हातारी एका नावाडी तरुणापाशी वार्तालाप करीत होती. थोडा

वेळ थांबलो. गप्पा मारल्या. तो नावाडी मोठा भाविक निघाला. त्याने आपणहून छत्तरपूरला निरोप घेऊन जाण्याचे मान्य केले. त्याच्या झोपडीत विसावलो. चिठी लिहिली आणि प्रतापसिंगाने आपली नाव प्रवाहात लोटली. त्या टेकाडावर एवढे भणाणणारे वारे की, उभे राहण्यासही त्रास व्हावा. समोर मैयाचा निळाभोर विस्तीर्ण डोह. त्याच्या मध्यभागी मोठाले खडक. पाण्यावर उठणाऱ्या लाटा खडकांशी टकरा घेत होत्या. त्या लाटांचा तो पाठशिवणीचा खेळ, ते फेसाळणारे पाणी आणि जलाशयाचा नीलवर्ण यामुळे चंडकिरणांचा ताप सुसह्य होत होता.

या स्थानाला मकरकुंड म्हणतात. या डोहातील दोन मगरी अधूनमधून या खडकांवर आरामात पहुडतात असे ऐकले. मैयामध्ये मगरी आढळतात असे जरी ऐकले होते तरी परिक्रमेच्या संपूर्ण काळात कुठेही मकरदर्शन घडले नाही. शूलपाणीच्या झाडीत उत्तरतटावरील ककराना-धर्मराईच्या वाटेवर एका इसमाने असेच सांगितले होते. तेथील पाचूच्या रंगाच्या त्या गहनगूढ डोहामध्ये गळाभर पाण्यात बसून अंगाची होणारी लाही लाही थांबवावी म्हणून मैयात शिरलो. खाली बसणार एवढ्यात बाजूने जाणाऱ्या एका भिल्लाने जलाशयात मगरमच्छांचे वास्तव्य असल्याची धोक्याची सूचना दिली. पुन्हा काठावर आलो.

प्रतापसिंग नित्यनेमाने गीतेचा हिंदी अनुवाद वाचतो. समाधान वाटले. संस्कृत गीताध्यायांची नुसती पोपटपंची करणाऱ्या लोकांपेक्षा गीतार्थ वाचणारा श्रेष्ठ होय आणि त्यानुसार आचरण करणारा श्रेष्ठतर होय. आम्ही फक्त घाण्याचे बैल ! उसाची चिपाडे खाणारे. रस पिणारे दुसरेच.

वाउगा तो शीण वृथा शब्दज्ञान। नाही समाधान अंतर्यामी॥ असे स्वरूपानंद म्हणतात ते उगाच ? रामकृष्ण परमहंससुद्धा म्हणत की, तोंडाने नुसते 'सोऽहं' 'सोऽहं' असे बडबडून काय करायचे आहे. परमेश्वराचा भाव तुमच्यामध्ये उतरणे, त्याचे सामर्थ्य तुमच्या ठायी प्रकट होणे महत्त्वाचे असते. 'तज्जपस्तदर्थभावनम्' असे पातंजलयोगसूत्र सांगते. त्याचा भावार्थही हाच. आपण जे वाचतो त्याप्रमाणे वागतो काय अशी पृच्छा आपणच आपणास करणे हाच खरा गीतापाठ.

*आपुला आपण शोध घ्यावा । अंतर्यामी ॥*

हा शोध घेणे, आपल्या वृत्तीचा खेळ तटस्थपणे पाहणे हे कठीण आहे खरे; परंतु त्याचीच गरज असते. नाहीतर–

*एक भाव नाही माझा । तरी पाल्हाळ तें ॥*

असे ज्ञानोबा म्हणतात. त्या नावाडी तरुणाच्या ठिकाणी जो भाव आढळला, त्यावरून त्याला गीता कळली असे वाटले. बा.भ. बोरकरांची एक कविता आहे.

*जीवन त्यांना कळले हो ॥*
*मीपण त्यांचे पक्व फळापरि*
*सहजपणाने गळले हो ॥*

प्रतापसिंगाला जीवनाचे सूत्र गवसले होते. त्याने एका परिक्रमावासियाच्या भोजनाची व्यवस्था केली. एवढेच नव्हे, तर दोन तासांचा प्रवास करून पलीकडल्या तीरावर तो जाऊन आला.

वेदाध्ययन करणारे ब्राह्मण वेदाज्ञा प्रमाण मानावी, वेद म्हणजे परमेश्वराचे निश्वास होत आणि त्यांना परमेश्वरासमान पूज्य मानावे असे म्हणतात; पण वेदांचा अर्थ कुठे त्यांना कळत असतो ? ही पढतमूर्खता काय कामाची ?

मनःकामना पूर्ण व्हाव्यात यासाठी सप्तशतीचे पाठ करतात; पण केवळ अर्थहीन बडबडीमुळे फलप्राप्ती होते कुठे ? एक माणूस रोज श्रद्धापूर्वक गोरखपूरच्या गीता प्रेसने छापलेल्या सप्तशतीचा हिंदी अनुवाद वाचत असे, काही कामना मनी बाळगून. एक राजा आपले राज्यवैभव गमावून बसला. त्याने देवीची उपासना आरंभली. देवी प्रसन्न होऊन राजाला पूर्वीचे वैभव लाभते अशी ती कथा. राजाने दररोज भक्तिभावाने आपले बोट कापावे आणि तो रक्ततिलक आपल्या उपास्याच्या कपाळी लावावा असा एक प्रसंग आहे. या माणसाने त्या राजाप्रमाणे देवीच्या भालप्रदेशी आपल्या रक्ताचा टिळा लावायला सुरुवात केली. त्याचा भाव फलद्रूप झाला. त्याची इच्छा पूर्ण झाली. तात्पर्य काय, तर माणसाची भावनाच फलदायक ठरत असते.

छत्तरपूरहून काही वेळाने राधेश्याम व श्यामलाल जेवण व दूध घेऊन आले. त्यांनी आपले वचन पाळले.

*जात न पूछो साधू की पूछ लीजिये ग्यान ॥*

असे कबीर वचन आहे. साधूपाशी आत्मज्ञानाची चर्चा करावी, त्यावरून त्याची पारख करावी. तो कोणत्या जातीचा आहे याची चौकशी करण्याचे कारण नाही, असा मथितार्थ.

उत्तरेकडे साधूसमाजाचे प्रस्थ भारी. बाह्य लक्षणे धारण केली की, झटपट साधू बनता येते. अंगावर भगवी वस्त्रे, सर्वांगाला भस्माचे वा गंधाचे पट्टे, दाढीजटांचा भलाथोरला संभार, गळ्यात, हातात रुद्राक्ष, तुळस वा स्फटिक यांच्या माळा, हातात दंड, कमंडलू, शंख, त्रिशूल, चिमटा, पायांत खडावा असा सरंजाम असला म्हणजे माणूस साधू बनला असाच समज दृढमूल झालेला असावा. विवेक, वैराग्य, प्रसन्नता, निर्मोहीपणा, निरहंकारित्व, अंतर्मुखता, चित्तसमत्व ही अंतर्लक्षणे उदित झाली का, याचा कोणी विचारच करीत नाही आणि म्हणूनच मग साधूची जातकुळी शोधली जाते.

पुनासा गावामध्येच एक मुलगा भेटला. चौदा-पंधरा वर्षांचा. साधू बनण्याची त्याची इच्छा होती. म्हणून आमच्याबरोबर यायला तयार झालेला. साधू कशासाठी बनायचे असे त्याला विचारले तेव्हा आई-वडिलांच्या जाचाचा वीट आला आहे असे तो म्हणाला. त्याला म्हटले–

"बाबा रे, दुसऱ्या कुणाच्या लाथा खाण्यापेक्षा आई-वडिलांच्या लाथा खाणे परवडले ! तुला जगाचा अनुभव आला नाही. वस्त्रे पालटून का कधी साधू बनता येते ? एवढे सोपे

आहे का ते ? खरेखुरे वैराग्य जर अंगी बाणले नसेल तर ती स्वपर-वंचनाच ठरते. तेव्हा हा विचार सोडून दे."

मला नेहमी एक कथा आठवते. एका झाडावर एक घुबड राहत असे. रात्र झाली की, त्याचा घूत्कार घुमू लागे. रात्रीच्या नीरव शांततेचा भंग करणारा तो विचित्र आवाज लोकांना अशुभकारक वाटे. ते त्याला शिव्याशाप देत. दगड मारीत. घुबडाला दुःख होई. अखेर हा गाव सोडून दुसऱ्या गावी चालते व्हावे असा आपला निर्णय त्याने मित्राला सांगितला. मित्र हसून म्हणाला, "अरे, गाव बदलल्यामुळे तुझा आवाज थोडाच बदलणार आहे ? तिथेही लोक तुला शिव्याशापच देणार आहेत !"

ज्ञानेश्वरीमध्ये एक दृष्टान्त आहे. एक बाई आपल्या मारकुट्या नवऱ्याच्या जाचाला कंटाळली. रोज आपला लाथाबुक्क्यांचा प्रसाद किती दिवस सहन करायचा ? म्हणून तिने दुसरा दादला शोधला, तर तो दांडक्याने बदडू लागला. तेव्हा वैतागाने, कसल्याही त्राग्याने केलेली कुठलीही गोष्ट आपलीच घोर फसवणूक करीत असते.

उत्तरतटावरील वासुदेवानंद सरस्वतींच्या गरुडेश्वर येथील आश्रमानंतर सरदार सरोवर प्रकल्पाच्या पुढे शूलपाणीची झाडी सुरू होते. या झाडीत पहिल्याच दिवशी ललितकुमार परमार नामक एक परिक्रमावासी भेटला. ऐन उन्हाळ्याचे दिवस. त्याने गरुडेश्वरपासूनच परिक्रमा सुरू केलेली. त्यात ही शूलपाणीची झाडी भारी बिकट ! झाडीतील भिल्ल परिक्रमावासीयांना लुबाडतात हे ठाऊक असूनही त्याने आपल्यापाशी चीजवस्तू बाळगलेली ! दुसऱ्याच दिवशी तीरकमठाधारी भिल्लांनी लुबाडून जवळजवळ सारी चीजवस्तू लंपास केली. ललितला अक्षरशः नागवे केल्यावर तो रडू लागला. गुजराथ विद्यापीठातून एम.ए.ची पदवी घेतलेला हा तरुण गुजराथ राज्य परिवहन महामंडळामध्ये नोकरीस होता. क्षत्रिय जातीचा; परंतु शारीरिक कष्टांची मुळीच सवय नव्हती त्याला. अचानक परिक्रमा करण्याची ऊर्मी उमटली आणि त्यानंतर साधू बनावे अशी आकांक्षा त्याने बाळगलेली होती. त्यामुळे त्याला म्हटले– "जवळपासचे सर्व नाहीसे झाल्यावर असा दुःखी-कष्टी होतोस. मग कसला होणार तू साधू ? शरीराला कष्टांची सवय नाही. थोडेसे चालल्यावर पायांना फोड येतात. भिल्लांनी केलेल्या दगडफेकीमुळे घाबरून दूर पळतोस. तू कसला क्षत्रिय ? गीता वाचतोस ना ? त्यामधील क्षत्रियाची लक्षणे वाचलीस कधी ?

*शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् !*
*दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ! !*

क्षत्रिय जात्याच शूर, तेजस्वी, धैर्यशील, दक्ष आणि रणधुरंधर असतो. आणि तू असा पळपुटा ! तेव्हा पूर्ण वैराग्य अंगी बाणल्याशिवाय नोकरी सोडण्याचा विचारच करू नकोस. तुला जमत नसेल तर आताच परिक्रमा सोडून घरी जावेस हे उत्तम !

*जयाचे ऐहिक धड नाही । तयाचे परत्र पुससी काई ॥*

अशी विचित्र त्रिशंकू अवस्था होण्यापेक्षा आधीच सावध होणे शहाणपणाचे ठरते.

क्षत्रियाच्या गुणांसंदर्भात एक दृष्टान्तकथा चांगली लक्षात राहिलेली. धनुर्विद्यापारंगत शिष्याच्या ठायी आपल्या गुरूपेक्षा श्रेष्ठ व्हावे अशी दुर्वासना उत्पन्न झाली. यासाठी आपल्या उत्कर्षाच्या मार्गातून गुरूंची धोंड बाजूला करावी असा दुष्ट विचार मनात सुरू असताना, समोरून गुरुजी येताना दिसले. त्यांच्या डोक्यावर लाकडाची मोळी होती शिष्याने गुरूंच्या दिशेने एक बाण सोडला. संकटाची चाहूल लागताच गुरूंनी आपल्या डोक्यावरील मोळीतील एक लाकूड असे भिरकावले की, तो बाण माघारी वळून शिष्याच्या मर्मी लागला. शिष्य खाली कोसळला. त्याची विकल अवस्था पाहून गुरूंचे हृदय द्रवले. त्यांनी लगबगीने बाण उपसून काढला आणि शिष्यावर औषधोपचार केले. आपल्या कृपावंत गुरूशी केलेल्या प्रतारणेचा त्याला खेद वाटला. गुरूंनी त्याला उदार अंतःकरणाने क्षमा केली. शिष्य म्हणाला, "ही विद्या तुम्ही मला शिकविली नाही. आता ती शिकवावी." गुरुजी म्हणाले, "माझे गुरुजी पर्वतावरील गुहेत राहतात. त्यांच्यापाशी जाऊन विद्या ग्रहण कर !"

शिष्य त्याप्रमाणे पर्वतावर गेला. आपल्या गुरूंच्या गुरूंची सेवाशुश्रूषा करून विद्या शिकविण्याची विनंती केली. गुरूंनी त्याला आपल्यामागून यायला सांगितले. काही अंतरावर एक कडा लागला. ते झपझप खाली उतरू लागले. थोड्या वेळाने शिष्य कुठवर आला हे पाहण्यासाठी त्यांनी वळून पाहिले तो शिष्य कड्यापाशीच उभा असलेला दिसला. त्यांनी त्याला उतरायला सांगितल्यावर खाली उतरायला भीती वाटते असे तो बोलला.

गुरुजी उपहासाने हसले. म्हणाले, "तू क्षत्रिय आणि तुझ्या मनात भीती ? मग तुला ही विद्या कशी मिळणार ?"

तेव्हा सर्वसंगपरित्याग करून साधू बनणे ही सोपी गोष्ट नव्हे; पण या जगात सारेच मुळी पोटार्थी बनल्यावर साधू समाजही त्याला कसा अपवाद असेल ? यामुळेच साधूचीही जातकुळी शोधली जाते. साधूंचे विविध आखाडे, नाना पंथ, नाना मते असतात व प्रत्येकाची बाह्य लक्षणेही वेगवेगळी असतात.

माछा रामघाट येथे मैयाच्या काठी, प्रवाहापासून चाळीस फूट उंचीवर, राधाकृष्ण मंदिराच्या आवारातील धर्मशाळा. काहीशी पडझड झालेली. सकाळी सकाळीच चंदेरी वाळू तुडवीत चालताना पायांना विशेष कष्ट जाणवत नसले तरी जाडी रेव आणि घट्ट झालेली वाळू तळपायांना अशी काही खुपते की, नकळतच पावले मंद पडू लागतात. साडेनऊच्या सुमारास उन्हाने शरीर तापू लागले म्हणून विश्रांतीची निकड भासली. काठावर येताच मंदिर दिसले. तडक धर्मशाळेत घुसलो. मंदिराचे पुजारी दामोदरजी. 'नर्मदे हर' म्हणत त्यांनी खाटेवर मृगाजीन अंथरले. विराजमान झालो. भोजनाची चौकशी झाली. यदृच्छेने मिळेल ते स्वीकारतो असे म्हटल्यावर त्यांनी गावातून सामान मागविले. पुरीभाजी, भजी व मिठाई असा मिष्टान्न स्वयंपाक.

गप्पांच्या ओघात म्हणालो, "तुम्ही मृगचर्म कशासाठी अंथरले ?" त्यावर ते म्हणाले,

"आपण ब्राह्मण आहा. तेव्हा आपला योग्य सत्कार नको का करायला ?" पुन्हा गमतीने पुसले, "मी ब्राह्मण आहे हे तुम्हाला कसे कळले बुवा ?" चटकन ते उत्तरले, "अहो, तुम्ही ज्या आवेशाने येथे प्रवेश केला ना त्यावरून ! शिवाय तुमची वाणी. वस्त्रे पांघरलेले पोटार्थी साधू आत येतच नाहीत. ते तिथे दाराशीच घुटमळतात. तेथूनच पुकारतात." गंमत वाटली.

त्याच रात्री बनखेडी गावातील संन्यासी महात्म्याच्या कुटीत दाखल झालो. बराच उशीर झालेला. चांदणी रात्र होती म्हणूनच त्या वालुकामय प्रदेशातून चालत राहिलो. कुटीबाहेरील लोखंडी कोचावर विराजित स्वामी वयाने तरुण. पस्तिशीची उमर. त्यांनी सुहास्यवदनाने स्वागत केले. भोवताली भक्तमंडळी जमलेली. मी महाराष्ट्रीयन असल्याचे कळल्यावर ते मराठीतून बोलू लागले. वाणी स्वच्छ. म्हणाले–

"नाथ संप्रदायात तुम्ही कसे काय गेलात ? चूक झाली तुमची. ब्राह्मणांनी संन्यासमार्ग स्वीकारायचा असतो."

"असे का !"

"तुमच्या संप्रदायाची, गुरुस्थानाची कुठे कुणी चौकशी नाही केली ?"

"विशेष कुणी नाही केली बुवा चौकशी !"

"यापूर्वी विचारले नसेल पण यापुढे विचारतील. काही ठिकाणी वाईट अनुभव येतो. उलटसुलट प्रश्न विचारून परीक्षा घेतात. संन्याशाच्या वस्त्रांमुळे समाजात प्रतिष्ठा मिळते. पोटापाण्याचा प्रश्न सुटतो."

मनात म्हटले की, हाच का खराखुरा उद्देश ! मग त्यांनी भोजनाची चौकशी केली. म्हटले– "जशी गुरुदेवांची इच्छा !"

"तुम्हाला आटा, डाळ देतो. जेवण बनवा."

"आम्ही तयार जेवण मिळाले तरच जेवतो. स्वतः बनवीत नाही."

"आमची भंडाऱ्याची वेळ टळली आहे. दुपारी गावात भोजनास गेलो होतो. म्हणून रात्रीचे जेवण करणार नाही."

"ठीक आहे. आम्ही थोडेच आपल्यापाशी जेवण मागितले आहे ? तसेच झोपू."

यावर स्वामीजींचे भक्त म्हणू लागले की, गावातून जेवण आणू या. स्वामीजींनाही आम्ही उपाशी झोपावे हे प्रशस्त वाटले नसावे. त्यांनी पुजारीजींना जेवण करायला सांगितले. जाड पण मस्त मुलायम पोळ्या आणि गुरगुटी डाळ. अशी डाळ यापूर्वी कुठेच खाल्लेली नव्हती. स्वामीजी आणि पुजारीसुद्धा आमच्याबरोबर पोटभर जेवले. गमतीने म्हटले–

"स्वामीजी, आज मला दुप्पट पुण्य लाभले आहे. कारण तुम्ही उपाशीपोटी झोपणार होता; पण माझ्यामुळे तुम्हाला पोटभर जेवण मिळाले. खरे की नाही ?"

जातीची चौकशी करण्याची सवयच जडलेली लोकांना. विनाकारण. यांना ना कसले देणे घेणे. यात काही जण फुकटचा उपदेश आणि सल्ला देणारेही. संवादाचा नमुना असा–

"तुमची जात कोणती ?"

"का रे बाबा ?"

"तुम्ही त्या ठाकुराकडे जेवलात म्हणून !"

"तुला रे का पंचाईत ?"

"तुम्ही ब्राह्मण असून इतरांकडे कसे जेवता. ब्राह्मणाघरचेच जेवण घ्यायला हवे !"

"तू तुझ्या घरी का बोलावीत नाहीस मग ? हा फुकटचा उपदेश काय कामाचा ?"

उत्तरतटावरील खेडीघाटच्या अलीकडील मुक्कामावरून त्या दिवशी भल्या पहाटे निघालो होतो. उत्तररात्री चांदणे असले की, लवकर उठून चालायला सुरुवात करायची. कारण त्या वैशाख-वणव्यात दुपारी जमिनीवर पाय ठरत नसत. सरळ डांबरी रस्ता पकडला होता. सायंकाळपर्यंत चौतीस मैलांचे अंतर तुडवायचे होते. पायांना चटके बसू लागले. घशाला कोरड पडली, म्हणून रस्त्यालगतच्या एका घराच्या आश्रयास गेलो. ते एका ब्राह्मणाचे घर होते. त्याने जेवण बनवायला सांगितले; पण आमचा नियम त्याला सांगितला. तसाच लवंडलो. बाहेर अतिथी उपाशी झोपलेला असताना ब्राह्मण आत पोटभर जेवला. नंतर बाहेर येऊन त्याने गप्पाही मारल्या. साऱ्या समाजाची धुरा वाहण्याची जबाबदारी ब्राह्मणांवर. त्यांचेच आचरण लोपल्यावर समाज अधोगतीस जाणार हे उघडच आहे.

चोवीस अवतार येथील शिवमंदिरात सायंकाळी वस्ती केली. जुनेपुराणे शिवमंदिर. घुमटीबाहेरील पडवीत आसन लावले. मंदिरासमोरच एक वैष्णव महात्मा राहतात. जराशाने ते आले. त्यांनी भोजनाची चौकशी केली. ते सदावर्त देत असतात. सातूचे पीठ आणि गूळ. आपल्यापाशी भांडे नाही तेव्हा त्यांच्याच भांड्यातून पीठ द्यायला सांगितल्यावर ते एकदम उखडलेच. म्हणाले, "तुम्ही स्वतःची भांडी बाळगीत नाही ? कुणाकडीलही भांडी वापरता ? स्वतः जेवण बनवीत नाही म्हणजे कुणाकडेही जेवता ? परिक्रमेचे नियम पाळीत नाही म्हणजे काय ? अशाने तुमची परिक्रमा फलद्रूप ठरणार नाही !"

निक्षून म्हटले, "आम्ही कोणाकडीलही जेवण घेतो. फक्त भाव पाहतो. भावभक्तिहीन ब्राह्मणाच्या घरचे पाणीही पिऊ नये. उलट श्रद्धायुक्त अंतःकरणाच्या अन्त्यजाकडील भोजन घ्यावे. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, 'आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया;' पण याचा अर्थ असा नव्हे की, ऊठसूठ कोणाच्याही घरी भोजन करतो."

महात्मा समंजस होते. अधिक काही बोलले नाहीत.

दक्षिणतटावरील कोठीया गाव. रात्री मंदिरात वस्ती केलेली. उज्जैनचे आणखी दोघे साधूही होते. त्यांनी एक माकड बाळगलेले. या माकडाने ठिकठिकाणी गाजवलेले प्रताप कानी आले होते. आज ते आमच्या राशिस्थानी उगवले होते. रात्री आमच्या गप्पा चाललेल्या असताना त्याने नजर चुकवून पिशवीचा पुरा धांडोळा घेऊन ती फाडून टाकली. डायरी फाडली. बाकी काही नव्हतेच.

अंथरूण-पांघरूण ठेवण्यासाठी धड पिशवी असावी म्हणून दुसऱ्या दिवशी टिमरावन

गावात वर झालो. कोणी शिंपी मिळतो का त्याची चौकशी केली. रामदयाल नामक माणूस भेटला. त्याने पिशवी शिवून द्यायचे कबूल केले. शिवाय दुपारचे जेवण करून जा म्हणाला. त्याची विनंती मान्य केली. स्नान करून येतो म्हटल्यावर आपण मेहरा म्हणजे हरिजन असल्याचे सांगितले. चट्कन बोललो– "जशी मैयाची इच्छा !" मैयाने भोजनाची व्यवस्था केली आहे. तुम्ही जेवण बनवा ! स्नान करून येईपर्यंत पिशवी दुरुस्त करून त्याने खोली शेणाने चांगली सारवून चूल मांडली होती. मला पाहताच म्हणाला, "पाणी घेऊन या आणि स्वयंपाक बनवा." मी माझा नियम त्याला सांगून म्हटले, "तुम्हीच जेवण बनवा. मी जेवीन. स्वच्छ जेवण बनवा म्हणजे झाले." किती आनंद झाला त्याला ! स्नान करून त्यानें पाण्याने भरलेली घागर भरून आणली. पुनः म्हणाला, "जेवण बनवा." त्याला परत सांगितले, "तुमचा भाव शुद्ध आहे ना ? मला तुमच्या हातचे जेवण चालेल." त्याने खिचडी बनविली. गावातून मठ्ठा आणला. पोटभर जेवलो. घरातील सर्वांनी उरलेले अन्न प्रसाद म्हणून ग्रहण केले.

*जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥*
*आणिक न ये माझ्या मना । हो का पंडित शहाणा ॥*

हेच खरे.

मैयाचे पात्र ओलांडले की, परिक्रमा भंग पावते आणि मग पुनश्च हरिःॐ. केलेले सारे व्यर्थ होऊन जाते. काही काही जागी नजरचुकीने प्रवाह ओलांडला जातो. शास्त्रोक्त परिक्रमा करणाऱ्यांना, अगदी डोळ्यांत तेल घालून राहावे लागते. मैयाच्या जलाला पदस्पर्शही करायचा नाही, पुलावरसुद्धा चढायचे नाही इतके कडक नियम. काही ठिकाणी मैयाने प्रवाह बदललेला आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा यांसारख्या नद्या पर्वतीय प्रदेश सोडून त्यांच्याच गाळाने बनलेल्या भूभागावरून वाहू लागतात तेव्हा दर वर्षी त्यांचा प्रवाह थोडा थोडा मार्ग बदलतात. काही काही जागी प्रवाह वलयाकार बनतो. चंद्रकोरीची टोके ज्या वेळी जवळ येतात त्या वेळी मोठे वळण घेण्याऐवजी नदी जवळचा मार्ग पकडते आणि महापुराने मधील सारा प्रदेश उद्ध्वस्त करते. त्या अर्धचंद्राकार नदीच्या पात्रातून क्वचित पावसाळ्यात पाणी वाहते. नाहीतर तो भाग तलाव बनूनच राहतो. इंग्रजीत याला meandering असे म्हणतात. गौघाट येथे मैयाने असाच प्रवाह बदललेला आहे. सध्याची वाहती धार येथून चार मैलांवर राहते. जुन्या प्रवाहाला 'बूढी माँ' असे नाव आहे. तेच नर्मदाकुंड. मधल्या प्रदेशात आता गाव वसले आहे व शेतीही होऊ लागली आहे. परिक्रमावासीयांना मात्र वाहत्या धारेजवळून जाता येत नाही. गौघाट येथेच यावे लागते.

शेतांवरील बांधांवरून गौघाट येथील नर्मदामंदिराकडे चाललो होतो. तेवढ्यात आश्रमातील कुत्रे भुंकत सामोरे आले. चांगले धष्टपुष्ट कुत्रे. तसाच पुढे चालत राहिलो, तर पाय चाटीत निघाले. नवल वाटले. विश्वच त्रिगुणात्मक असल्यामुळे कुत्र्यांमध्येही त्रिगुणात्मक प्रकृती वास करून आहे याचा प्रत्यय आला. नुकतीच घडलेली घटना. सकाळी

सकाळी निघालो होतो, तर एकाएकी चार-पाच कुत्री अंगावर चालून आली होती. 'भुकत दे कुतरवा' असे म्हणून पुढे निघालो, पण ती पिच्छा सोडीनात. अगदी जवळ येऊ लागताच हातातील 'मस्तराम'ने दिलेला दंडा गरगर फिरवला, पण ती अधिकच चवताळली. मग मात्र उभा राहिलो. दगड उचलून एकेकाला टिपत राहिलो. मधूनच दंड फिरवला. त्याबरोबर त्यांनी पलायन केले. गोंड भागात एका झोपडीजवळून जाताना एक मोठा उंचापुरा शिकारी कुत्रा दात विचकीत आला. लाठी फिरवताच तो अधिक बिथरला. तेवढ्यात त्याचा मालक आला. म्हणाला की, सरळ निमूट निघून जा. त्याच्या वाटेला जाऊ नका. तर असे हे सत्त्वरजतमात्मक जग.

नेमाड भाग अति अश्रद्ध. गोंड प्रदेशासारखाच. चिकित्सक आणि आपमतलबी. हंडियापासून ॐकारेश्वरापर्यंत सदावर्तेही विशेष नाहीत म्हणे. रस्त्याने चालताना कोणी भेटला तरी 'नर्मदे हर' पुकारणार नाही. एवढेच काय, आपण जरी अभिवादन केले तरी त्याला प्रतिसाद नाही मिळणार! ॐकारेश्वरानंतर प्रदेश बरा असेल असे वाटले होते; पण तेथेही तीच तऱ्हा. दगडापेक्षा वीट मऊ एवढेच काय ते! शिवभारती नागाजी म्हणत की, या प्रदेशातील लोक पुरते सट्टेबाज. ते स्वतः याच भागातील. काही ठिकाणी गृहस्थ साधूंची सेवा करतात हे खरे, पण कोणत्या ना कोणत्या तत्कालिक लाभाच्या आशेनेच!

*दावी चमत्कार त्यास नमस्कार। लोकव्यवहार ऐसा असे॥*

असे स्वामी स्वरूपानंदांनी म्हटले आहे. या जगात ज्याच्यापाशी काही सामर्थ्य आहे, जो धनाढ्य आहे, बुद्धिवान आहे, बलवान आहे, कुलशीलसंपन्न आहे अशा माणसाबद्दल लोक आदर बाळगतात. त्यालाच समाजात प्रतिष्ठा असते. शिवाय समाजाला येनकेन प्रकारेण भुलविण्याची ज्याची पात्रता आहे अशा माणसाचीही चलती असते.

गुरू मच्छिंद्रनाथांनी गोरक्षनाथांना एका गावात भिक्षा मागायला पाठविले. दिवसभर फिरूनही जेमतेम अन्न मिळाले. दुसऱ्या दिवशीही तीच तऱ्हा. तेव्हा तिसऱ्या दिवशी गोरक्ष बाहेर पडले आणि भर बाजारात आपल्या यौगिक सामर्थ्याने अधांतरी आसन लावून बसले. गावात कोणी महायोगी प्रकटला आहे ही बातमी हां हां म्हणता सगळीकडे पसरली. मग मात्र भगतगणांची रीघ लागली. कुणी धन, कुणी धान्य, कुणी कपडालत्ता तर कुणी फळफळावळ अशा वस्तू त्यांच्या समोर आणून ठेवल्या. गोरक्षांच्या आसनापर्यंत तो ढीग वाढला. बराच वेळ झाला तरी आपला शिष्य का आला नाही हे पाहण्यासाठी स्वतः गुरुजी निघाले. तो त्यांच्या कानी या महासामर्थ्यशाली साधुपुरुषाची ख्याती पोचली. जवळ जाऊन पाहतात तर गोरक्ष समाधी लावून बसलेले. मच्छिंद्रनाथांनी पुकारले–

"अरे, गोरक्षा, हे काय चालविले आहेस?"

गोरक्ष उद्गारले– "गुरुजी, दावी चमत्कार त्यास नमस्कार!"

अल्पस्वल्प सिद्धिलाभ झालेले साधू सामान्यजनांच्या अडीअडचणी निवारतात आणि नंतर त्या चिखलात गळ्यापर्यंत बुडून जातात. मग मात्र अवहेलनेपलीकडे दुसरे काही

त्यांच्या नशिबी नसते.

मलासुद्धा कुठेकुठे लोक हात पाहायला सांगत, काही सांसारिक अडचणीपास सुटका होण्याचा मार्ग विचारीत, तर काही जण सट्ट्याचा आकडाही विचारीत. नेम भागात एका डगरीवरील हॉटेलवाल्याने चहा घेऊन जायला सांगितले. आम्ही चहा घे नव्हतो; परंतु उन्हाळ्यामध्ये आम्ही एक क्लृप्ती शोधून काढली होती. कुणी 'चहा घ्य म्हटले की 'गूळपाणी द्या' म्हणायचे. कोकणात बाहेरून दमूनभागून आलेल्या माणसाल गूळपाणी देण्याची प्रथा होती. गुळामधील क्षार आरोग्याला हितकारक असतात आणि शरीरातून घाम निघून गेल्यामुळे आलेला थकवा गूळपाण्यामुळे दूर होऊन तरतरी येते. त हॉटेलवाल्याकडेही 'चहा घेत नाही, गूळपाणी द्या' असे म्हटले. तेथून पुढे निघाल्याव नागाजी म्हणाले, "हॉटेलवाला तुम्हाला आकडा विचारणार होता; परंतु तुमच्या एकंद वागणुकीवरून तुमच्यापाशी हा विषय काढायची हिंमत झाली नाही. तरीसुद्धा हे लोक एव वस्ताद असतात की, ते तुमच्या बोलण्याच्या अनुरोधानेही आकडा शोधतात."

मोहिपुरा गाव तसा लहान. अदमासे पंधराशे लोकवस्तीचा. सायंकाळ झाल्यामुळे एक घरात मोकळ्या जागी आसने लावली. पाचपन्नास जण जमा झाले. त्यांनी काही ऐकवा म्हटल्यावर सुचेल ते सहजपणाने बोलत राहिलो. सारे जण अगदी शांत चित्ताने श्रवण करी होते; परंतु सारे पांगल्यावर नागाजी म्हणाले, "योगानंदजी, तुम्हाला काय वाटले? हे लोक मोठ्या श्रद्धेने तुमचे बोलणे ऐकत होते असे? अहो, भारी बिलंदर आहेत हे. तुम्ही ज बोललात त्यातून आपल्याला काही सापडते का हे पाहत होते. उद्या सकाळी आडाखा बांधू आकडा लावायला जातील बघा."

दुसऱ्या दिवशी गुढी पाडव्याचे जेवण एका रजपुताकडे उरकून आम्ही पुढे निघाले तर दोघे जण पुढील रस्ता दाखवायला सोबत निघाले. बराच वेळ आमच्याबरोबर चालत राहिले. अखेर एका जागी थांबले आणि त्यांचा निरोप घेऊन पुढे चाललो. जरा वेळाने माग वळून पाहिले तर ते तिथेच उभे होते. म्हणून हात उंचावून 'अच्छा' म्हटले. त्याबरोबर त्य दोघांनी एकमेकांच्या हातावर आनंदाने टाळी दिली आणि ते मागे फिरले. नागाजींना म्हटले "खरे आहे तुमचे म्हणणे. आता ते पंजा लावणार बघा."

हंसोट गाव रेवा सागराच्या काठावरील. मैयाचे स्नान कोठे करावे म्हणून चिखल तुडवीत प्रवाह शोधीत होतो. खुळेपणाच होता तो. कारण भडोचच्या पुढे नर्मदेचे पाणी खारट. हंसोटला तर चिखलच चिखल. परिक्रमेच्या सुरुवातीच्या काळात एके ठिकाणी किनाऱ्यावरील चिखलात उतरलो होतो आणि चिखलात फसणे म्हणजे काय याची कल्पन आली होती. चिखलात रुतलेला वाघ आणि लोभी ब्राह्मण यांची कथा लहानपणी वाचली होती. त्यामुळे हंसोटच्या चिखलात पाय घसरू व रुतू लागल्यावर लगेच माघारी वळलो आणि आता मैयाचे प्रवाहस्नान अशक्य असल्याचे कळून चुकले. एका कोळ्याने घरी नेऊन मसाल्याचे दूध दिले. निरोप घेताना 'आकडा कोणता लावू' असे विचारून मोठ्या

आपत्तीत लोटले; पण लगेच देवाचे नाव घेऊन कोणताही आकडा लावायला सांगून तेथून सटकलो.

उत्तरतटावरील शूलपाणीची झाडी संपल्यावर चिखलदा गावातील शिवमंदिरात थांबलो होतो. मंदिराचे पुजारी बद्रीप्रसाद शर्मा. कुणा साधूने त्यांना एक वस्तू कापडात शिवून जमिनीत पुरून ठेवायला सांगितली. एक महिन्याने लक्ष्मीचा लाभ होईल असेही त्याने सांगितले. बरेच दिवस उलटले म्हणून मला त्याबाबत विचारले. जमिनीतील वस्तू काढायला सांगितली. पिशवी उघडून पाहतो तर ती होती काजूची बी ! बद्रीप्रसादांनी काजू कधीच पाहिलेला नव्हता. म्हणून त्यांना समजावून सांगितले. साधू लोक अशा अंधश्रद्ध वा अर्धवट लोकांना ठकवितात व तेच त्यांना चांगले वाटतात. समाजाची तऱ्हाच अशी विचित्र आहे की, एकीकडे अशा घोर फसवंणुकीमुळे ते साधूंची निंदानालस्ती, निर्भर्त्सना करतील, तर दुसरीकडे आणखी कुणाच्या भजनी लागतील ! पदोपदी ठेचा खाऊनही हे लोक काही बोध घेत नाहीत. हे पुजारीमहाशयही त्यातलेच. कारण ते मला आपल्या भवितव्याविषयी विचारू लागले, तेव्हा स्पष्टच सांगून टाकले की, एवढी फसवणूक होऊनसुद्धा तुम्ही माझ्यावर विश्वास कसा ठेवता? गंडादोरा, मंत्रतंत्र वगैरे आम्ही जाणत नाही. केवळ परमेश्वरावर श्रद्धा ठेवा. त्याची भक्ती करा. म्हणजे कल्याण होईल.

महाराष्ट्राला लागूनच असलेला हा नेमाड प्रदेश. इंदोर रियासतीखालील म्हणजेच होळकरांच्या आधिपत्याखालील. नर्मदा व तापी या नद्यांमधील हा प्रदेश. त्यामुळे महाराष्ट्राचा यावर छाप असणे अगदी स्वाभाविक. येथे सर्वत्र काळा दगड आढळतो. घरे, मंदिरे,. घाट इ. वास्तूंची बांधणी काळ्या दगडांतील आणि बांधकामाची पद्धतसुद्धा आपल्यासारखीच. रावेर येथील काळ्या दगडाचा सुंदर घाट आज काहीसा दुर्लक्षित. दगड कुठेकुठे निखळलेले. वाहूनही गेलेले. प्रवाह उत्तरतटाकडे वळला आहे व या घाटाजवळ तलाव बनला आहे. प्रवाहामध्ये झाडेझुडपे आणि लहानमोठ्या गोट्यांचा खचच खच.

घाट चढून वर आलो आणि दगडी वास्तू नजरेस पडली. कमानीतून प्रवेश केला. सुंदर इमारत. बहुधा सराई म्हणजे धर्मशाळा असावी. दगडविटांचे बांधकाम इतके पावसाळे जाऊनही कसे भक्कम ! तीन सोप्यांची ही इमारत असून, मधल्या पटांगणात एक दगडी छत्री आहे. त्यावरील संगमरवरी पाटी पाहून जवळ गेलो व वाचू लागलो–

'This chhatri is believed to contain the ashes of the Peshwa Bajirao who died in 1740 A.D.'

शाळेतील इतिहासात शिकलो होतो की, नर्मदातटाकी रावेरखेडी मुक्कामी थोरले बाजीराव पेशवे यांचे मोहिमेवरून परतून येत असताना प्राणोत्क्रमण झाले. स्मृती चाळविली गेली. त्या पराक्रमी राऊच्या समाधीचे दर्शन होताच मराठी अस्मिता जागी झाली. मोगल साम्राज्याला एकाकीपणे टक्कर देऊन हिंदू-पदपातशाहीची स्थापना करणारे दख्खनचे छत्रपती शिवराय आणि त्यांच्यानंतर त्यांची ती धर्मकीर्तिध्वजा सतत उंचावीत दिल्लीपर्यंत

धडक मारणारा ऐतिहासिक थोर पुरुष म्हणजे बाजीराव पेशवे. अवघ्या विसाव्या वर्षी पेशवेपदाची धुरा समर्थपणे पेलून धरीत, सदैव घोड्यावर मांड ठेवून आणि तळहातावर शिर घेऊन अखंड तलवार गाजविणाऱ्या त्या शत्रुंजय वीराचे स्मरण होताच ऊर भरून आला. चाळीस वर्षांचे उणेपुरे जीवन ! आणि केवढे हे महान कार्य. पाच मिनिटे तेथे विसावलो. स्तब्ध राहिलो. कवी भा.रा. तांबे यांची कविता आठवली—

*रे हिंदबांधवा । थांब, या स्थळी अश्रु दोन ढाळी ॥*
*ती पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली ॥॥*

या छत्रीचे आजचे भकासपण आणि उपेक्षित अवस्था काळजाला स्पर्शून गेली. पण यात नवल कसले ? या विश्वाच्या अवाढव्य पसाऱ्यामध्ये शाश्वत असे काय आहे ? चंद्र, सूर्य, तारे जिथे लोप पावणार आहेत, आज या घडीलाही किती नवीन तारे उदयास येत असतील, कितीक मावलतही असतील तिथे या अशा उपेक्षेची खंत कशाला करायची ? हे असे चालायचेच. किती राजेरजवाडे आणि त्यांची प्रचंड साम्राज्ये आजपर्यंत या काळाच्या उदरात गडप झाली असतील ! आम्ही उगाच आमच्या कर्तृत्वाची शेखी मिरवायची ! कालाय तस्मै नमः !

मुळात परिक्रमा हे खडतर व्रत आहे; पण सुमारे तीन हजार किलोमीटरच्या या वाटचालीत दोन्ही तटांवरील सुमारे अडीचशे किलोमीटर लांबीची शूलपाणीची झाडी तर विशेष कष्टप्रद. दक्षिणतटावरील सातपुडा पर्वताच्या रांगा आणि उत्तरतटावरील विंध्याद्रीची शिखरे यांमधून मैयाचा नागमोडी प्रवाह वाहतो. दक्षिणतटावरील मध्य प्रदेशातील राजघाटापासून सुरू होणारी ही झाडी गुजराथमधील शूलपाणीश्वराच्या मंदिरापाशी संपते. यामधील अदमासे साठ किलोमीटर प्रदेश महाराष्ट्राच्या धुळे जिल्ह्यात मोडतो.

जिज्ञासु परिक्रमावासी किंवा साधू वगळता इतर परिक्रमावासी या झाडीच्या वाटेलाच जात नाहीत. उत्तरतटावरील झाडीतून तर पाच टक्केही लोक जात नसतील. ते सडकेनेच वाहने पकडून झाडीपार होतात. या झाडीतील भिल्ल लूटमारी करीत असल्यामुळे, आपल्यापाशी जमविलेली चीजवस्तू, पैसाअडका सुखासुखी कोण बरे गमावील ?

राजघाट नावाला साजेसा. प्रशस्त आणि सुंदर बांधणीचा. स्वच्छ आणि रमणीय परिसर. वासुदेवानंद सरस्वती यतिवर्यांनी बांधलेले दत्तमंदिर दिमाखात उभे आहे. मंदिरातील मूर्ती, मंदिर आणि आवार मोठे देखणे. आत कृष्णधवल फरशी बसविलेली. स्वच्छता, टापटीप आणि निवांतपणा येथे आढळतो. बाहेर शीतल सावली देणारे वृक्ष. असे प्रसन्न वातावरण. दोन तटांना जोडणारा, मैयाच्या पात्रातून जाणारा दगडी रस्ता. पावसाळा ओसरल्यावर पाणी कमी झाले म्हणजे या फरसबंद रस्त्यावरून वाहतूक चालते.

झाडी जसजशी जवळ येऊ लागते तसतशी एकेक वस्तू गळायला सुरुवात होते. पतई घाटावरील स्वामीजींनी दिलेला मैयाचा प्रसाद म्हणजेच तो रग थंडी कमी होताच छिपानेरच्या त्या अन्नपूर्णामातेला समर्पित केला. दक्षिणतटावर छिपानेरला बजरंगदासजींचा

आश्रम आधुनिक धर्तीचा. उत्तरतटावरील बडा छिपानेर व दक्षिणतटावरील छोटा छिपानेर. बजरंगदासजींना समाधिस्थ होऊन बराच काळ लोटलेला. या आश्रमाचे उत्तराधिकारी कोणी पाश्चिमात्य. सध्या ते बहुतेक काळ परदेशातच वास्तव्य करून असतात. आश्रमातील एका खोलीत अध्यात्म, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवरील बरेच संस्कृत, हिंदी व इंग्रजी ग्रंथ पाहून ते चाळून पाहावेत, निदान त्यांची नावे तरी उतरून घ्यावीत असा विचार तरळून गेला; परंतु जमले नाही.

या आश्रमात दोन-तीन बंगाली साधू-साधक, एक दाक्षिणात्य संन्यासी भेटले. त्यांतील एका वंगदेशीय ब्रह्मचाऱ्याने समोरील तीरावरील दादाजींच्या आश्रमालगतच्या साध्वी अन्नपूर्णादेवींना माझा निरोप कळवून येथे बोलावून घेतले. त्यांनी प्रथम मला ओळखलेच नाही, परंतु पूर्वस्मृतींना उजाळा देताच त्यांना ओळख पटली. नर्मदामाईचा तो रग त्यांनी आनंदाने स्वीकारला. त्यांचा तो प्रफुल्लित चेहरा पाहून समाधान वाटले. त्यांनी त्यांच्याकडील जेवण करून जावे असे सुचविले; परंतु पुढे जाणे गरजेचे होते.

दिनेशानंदांनी दिलेले शुभ्रवर्ण ब्लँकेटसुद्धा वेदा नदीच्या संगमावरील टेकाडावरील वेदवेदेश्वर मंदिरातील त्या गुजराथी साधकाला देऊन मोकळा झालो. उरलेले सामान म्हणजे तांब्या, शाल, विरविरीत टॉवेल, चष्मा, डायरी, बॉलपेन. सुरुवातीला विचार होता या सामानानिशीच झाडीत घुसायचे. नर्मदामाईची इच्छा असेल तर सहीसलामत निसटूही. या वस्तूंची काय पत्रास! जीवनावरच जिथे फुंकर मारलेली आहे तिथे या गोष्टींचा मोह कुठला? तरीसुद्धा काही जणांनी सल्ला दिला की, भिलखेडा गावातील एक सज्जन माणूस परिक्रमावासीयांचे सारे सामान विनामोबदला आपल्यापाशी ठेवून घेतो आणि परतीरावर आल्यावर ज्याचे त्याला ते परत मिळते. तेव्हा त्याच्याकडे सामान ठेवावे.

दैनंदिनी, बॉलपेन, चष्मा यांचा तर भिल्लांना काडीमात्र उपयोग नाही. ते कशाला त्या वस्तू हिरावतील असे प्रथम वाटले; पण कुणा चक्रम भिल्लाने चष्मा मोडून टाकला तर त्याचा उपयोग कुणालाच नाही अशी अवस्था व्हायची या दूरगामी पोक्त विचाराने त्या वस्तू त्या सद्‌गृहस्थापाशीच ठेवायचा निर्णय पक्का केला. विश्वनाथजींचा तांब्या त्यांना परत करायचा होता. राहिली केवळ शाल. अखेर साऱ्या वस्तूच ठेवून दिल्या आणि झाडीतील प्रवासाला उत्साहात सुरुवात केली.

शिवभारती नागाजी आणि मी असे दोघे जण. कमरेला जांघ्या, एका हातात तुंबा आणि दुसऱ्या हातात बांबूचा दंडा एवढाच काय तो सरंजाम. नागाजींनी आपली शाल टरकावून त्याच्या चार लंगोट्या बनविल्या. दोन त्यांना व दोन मला. एक कमरेला व दुसरी डोक्याला. तंबाखूचे व्यसन असल्यामुळे त्यांनी डोईच्या लंगोटीत काडेपेटी अडकवलेली. उंच डोंगरातील पायवाटेने मुकाट भ्रमण चाललेले. डोळ्यांना चष्मा नसल्याने दूरवरचे स्पष्ट दिसत नसे. मैयाच्या पात्रातील कातळावर लोळत पडलेल्या एका भिल्लाने साद घातली. लगेच खाली उतरून जवळ गेलो. त्याच्या सादाला जुमानले नाही तर विनाकारण आपत्तीस

निमंत्रण दिल्यासारखे व्हायचे. शिवाय आम्ही पडलो निःसंग ! भीती कसली ? शे-दोनशे फुटांवरूनही डोईत काही लपविले असल्याचे त्याच्या तीक्ष्ण नजरेने हेरले होते. विडी पिण्याचा बहाणा होता त्याचा. नागाजी समानशील. त्यांनाही तलफ आलेली होतीच, पण त्यांचे निरीक्षण दांडगे. भिल्लाच्या मनीचा हेतू त्यांनी बरोबर ओळखला होता. आमच्या कफल्लकपणाबद्दल त्या भिल्लाची खात्री पटली व आम्ही सहीसलामत सुटलो.

भिल्लांची भाषा धेडगुजरी. ना धड हिंदी, ना मराठी ना गुजराती. सरमिसळ झालेली त्यांची भाषा अंदाजानेच समजून घ्यायची. सारेच भिल्ल काही लुबाडीत नाहीत. त्यांतही काही सज्जन असतात. ते मदत करतात, खाऊ घालतात. दक्षिणतटावरील भिल्लांचे म्हणणे असे की, उत्तरतटावरील लोक इकडे वाटमारी करतात. अर्थात समाजात सर्व प्रकारचे लोक असतात. सावाप्रमाणे चोरही असतात. काही 'संवचोर'ही असतात म्हणजे वरून साव आणि आतून चोर. झाडीत असेही काही भिल्ल आहेत की ते तुमची उत्तम बडदास्त ठेवतात आणि नंतर दुसऱ्याकरवी लुबाडतात. आम्ही मुळातच नागवे, त्यामुळे आमच्याकडून त्यांना काय मिळणार होते व म्हणून आमची बडदास्त कशाला कोण ठेवील बरे ?

आमची वाट या झाडीतदेखील कधी अगदी प्रवाहाजवळ तर कधी दूरवरून. कधी सपाटीवरून, तर कधी अगदी उंच पर्वतामधून. काटेकुटे, वाळवंटे, दगडगोटे या साऱ्यांची वाण येथेही नाही. झाडी म्हणजे जंगल असेल असा कुणाचाही समज होईल. कदाचित उंच डोंगरात आतवर जंगल असेलही; परंतु आमच्या प्रवासात अरण्य कुठेही आढळले नाही. शिशिरऋतू पर्णगळीचा. त्यामुळे झाडे अगदी भणंग भिकाऱ्यासारखी. उघडेबोडके डोंगरच सगळीकडे पसरलेले. क्वचित् काही जागी आम्रवृक्षाचे हरित दर्शन मनास किंचित दिलासा देणारे. एरवी सगळाच आनंदीआनंद. वसंतोत्सव सुरू व्हायचा होता. वरून खदिरांगार दृष्टीतून आग ओकणारा भास्कर आमची सत्वपरीक्षा घ्यायला उत्सुक. पळता भुई थोडी व्हायची. दहा वाजल्यानंतर पाऊल टाकायला मन कचरायचे. एखादा मोठासा खडक किंवा भिल्लाची झोपडी याशिवाय अन्य आसरा नाही. तहानेने घशास कोरड पडायची. एवढासा तुंबा कधीच रिकामा होऊन जायचा. अशा स्थितीत मैयाच्या प्रवाहापाशी पोचायचे म्हणजे महादिव्यच ते !

मैयाकिनारी वाळवी फार. कोकणातल्यासारखी. किंबहुना अधिक. त्यामुळे नुसत्या जमिनीवर रात्री पडलो किंवा काही किरकोळ पटकूर आंथरले तर जमिनीतून ही वाळवी कधी कुठून प्रकट होईल आणि चावा घेईल याचा नेम नसे. ढेकूण चावल्यावर जसे शरीर हुळहुळते तशा वेदना सहन करीत राहायचे. मग झोपेचे खोबरेच ! झाडीतल्या वाळूतही मुंग्या ! भगवंताची वा निसर्गाची किमया खरोखर विलक्षण. या मुंग्या पृथ्वीच्या पाठीवर, पाणी आणि आग यांचा अपवाद करता कुठेही आढळतात. त्यांच्या जाती अनेक. थंडीच्या त्रासातून बचाव झाला तर या मुंग्या पाचवीला पूजल्यासारख्या हजर व्हायच्या. परिक्रमेत यामुळे निम्म्याहून अधिक काळ अल्प झोपच मिळाली.

त्या दिवशी टिकईटोला गावात झाडाखाली झोपायचा योग हुकला; परंतु या झाडीत मात्र त्या भिल्लाच्या अनुग्रहामुळे त्याच्या झोपडीबाहेरील आम्रवृक्षाखालीच आसन लावावे लागले. दूर जंगलातील लुकलुकणारी पेटती झाडे आणि आकाशातील नक्षत्रचांदण्यांचे सौंदर्य पाहत रात्र काढली. आकाशमंडपाखाली झोपल्यावर वर टांगलेली ती नक्षत्रफुले निरखताना हरखून जायला होते आणि या विशाल विश्वपटलावरील अहंकारी मानवाचे क्षुद्र स्थान लक्षात येऊन वृत्ती अंतर्मुख बनते.

शूलपाणीच्या झाडीमध्ये कुठे सदावर्त मिळत असेल असा विचार स्वप्नातदेखील यायचा नाही; पण नियमाला अपवाद असायचाच. उत्तरतटावर हापेश्वर हे स्थान तसे प्रसिद्धच; पण दक्षिणतटावरील निमगव्हाण गावचा केशव वसावे नामक तरुण भिल्ल म्हणजे भांगेत उपजलेली तुळसच होय. पाय भाजू लागल्याने मैयाच्या पात्रात थोडा वेळ बसलो. स्नान उरकून दुपारची विश्रांती घेण्यासाठी पहाडातील टपऱ्यांकडे निघालो, तर या केशवाची भेट झाली. या दुर्गम पर्वतीय भागातसुद्धा गळ्यात तुळशीची माळ घालणारा पंढरीचा वारकरी सापडावा. एवढेच नव्हे, तर परिक्रमावासीयांसाठी धुळे, शहादा, इ. दूरदूरच्या ठिकाणांहून धान्य जमवून ते वाटण्याचे काम हा माणूस करतो हे केवढे नवल ! आपल्या कल्पनांना धक्का देणाऱ्या अशा बऱ्याच गोष्टी जीवनात पदोपदी अनुभवायला मिळतात. मागे एकदा बुजबुजिया गावी रात्री वस्ती केली होती एका चौकीत. तिथला ठाणेदार होता एक मुसलमान; परंतु त्याने भोजनासाठी आटा, डाळ दिली होती. धर्माने मुसलमान असूनही तो हिंदूंच्या आचारविचारांचे पालन करणारा होता. एवढेच काय; पण तो नित्यनेमाने हनुमान चालिसाही वाचीत असे !

पिपळसूद गावाच्या अलीकडील वाट खूपच दगडाळ. प्रचंड खडकांचा नुसता खच पडलेला. त्यातून चालणे महाकर्म कठीण ! एका दगडावर चढायचे पुन्हा खाली उतरायचे व दुसऱ्यावर चढायचे असा चढ-उतार करताना जीव मेटाकुटीस न येईल तरच नवल ! करकरीत ऊन, नुकतेच जेवण झालेले. नागाजींच्या डोक्यात सणक आल्याने निघाले पुढे. जळजळीत वाळूत पाय ठरत नसत, पळता भुई थोडी अशी स्थिती. मग कुठे झुडपाचा आश्रय शोधत राहायचे. पुन्हा पाय निवले की पुढे. दगडही भयंकर तापत व त्यावरून चालताना जीवघेणे चटकेही बसत. अखेर त्या अतिकष्टकर प्रवासाची सांगता रात्री एका भिल्लाच्या झोपडीत झाली. यजमान मराठी भाषक. आतिथ्यशील होता. नागाजींनी त्याच्या घरी खापरात भाजलेल्या गरमागरम भाकऱ्या खाल्ल्यावर दिवसभरचे श्रम कारणी लागले असे वाटले. रात्रीची झोपही बांबूच्या छानदार चटईवर. मग काय विचारता ! बऱ्याच दिवसांनी थोडी निवांत झोप मिळाली.

चैत्राचा महिना नुकताच सुरू झालेला. थंडीचा कडाका ओसरलेला असला तरी पहाटे गुलाबी थंडी शरीराला गुदगुल्या करायची. नदीकाठ व पर्वतीय प्रदेशामुळे गारठ्याचे प्रमाण बऱ्यापैकी. त्या दिवशी पहाटे जाग आली तीच मुळी आर्त किंकाळ्यांनी. दूरवरून

ऐकू येणारा रुदनाचा करुण ध्वनी अंतःकरण भेदीत खोलवर गेला. अस्वस्थता वाढली. घरमालकाकडे चौकशी केली. त्याने सांगितले की, कुणा भिल्लाची मुलगी गेले चार दिवस अडली असून, तिची सुटकाच होत नव्हती. पहिले बाळंतपण म्हणजे स्त्रीचा पुनर्जन्मच जणू ! या अडाणी आणि आडवळणी गावात ना कसली सुविधा ! वाहतुकीची सोय नाही. रस्ते, वाहने साऱ्यांचीच वाण ! पोटभर खायला नाही, अंगभर ल्यायला नाही, निवारा चंद्रमौळी झोपडीचा. पाण्यासाठी मैयाच्या दूरवरच्या प्रवाहापर्यंत पोचायचे तेही डोंगरातील अवघड आणि खडकाळ पायवाटांनी. शेती डोंगरउतारावरील आणि केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून. निसर्गाच्या लहरीवर नाचणारी ही माणसे. बाजारहाटासाठी, औषधपाण्यासाठी मैलोन् मैल तुडवावे तेव्हा तालुक्याच्या वा जिल्ह्याच्या ठिकाणी पोचायचे. त्यासाठी दोन-चार दिवसांची राखण ! किती खडतर जीवन ! आणि तरीही आपले सनातन वतन सोडायला हे आदिवासी भिल्ल तयार नाहीत ! एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असलेले जग विज्ञानाच्या प्रचंड भराऱ्या घेत आकाशाला गवसणी घालीत आपल्या प्रगतीचा दिमाख मिरवीत असतानाच दुर्गम प्रदेशातील आमच्याच रक्तामांसाची ही माणसे निकृष्ट आणि हलाखीचे जीवन कंठीत असलेले पाहून वैषम्य वाटणे स्वाभाविकच ! किती जीवांना रोगराई, कुपोषण, दुर्भिक्ष आणि दुष्काळ याच्याशी सामना करीत प्राणास मुकावे लागत असेल त्याची गणती कोण करणार ? परंतु 'करम की गती न्यारी संतो' असे संत म्हणतात तेही खोटे नाही.

झाडीतही मैयाची विविध रूपे मनाला भुलविणारी ! काही ठिकाणी तिचा वेग एवढा प्रचंड की, त्यावर दृष्टी ठरू नये. हरिद्वारला गंगेचा प्रवाह असाच जोरदार आहे म्हणे ! काही ठिकाणी ती अशी संथ आणि मूक की, तिच्या अबोल्यामुळे गलबलून जावे. कुठे ती अगदी कृश तर कुठे विशाल. कुठे तिची रुंदी एवढी कमी की, हरणाने या तटावरून त्या तटावर उडी मारून निघून जावे. हरिणकूद म्हणतात त्या जागेला. कुठे मैया इतकी उथळ की, तिच्यातून पायउतार होऊन पैलतीर गाठावा, तर कुठे गहनगूढ डोह तयार झालेले. कधी तिच्या मंजुमंजुल सुस्वर संगीतात रममाण व्हावे, तर कधी तिच्या निःशब्द मौनात आपणही मौन होऊन जावे. ते अनिर्वचनीय सुख किती काळ भोगले तरी तृप्ती होऊ नये आणि त्याची जाणीवही होऊ नये. अशी ही नानाविध नितान्त रमणीय आणि मनोहारी दर्शने !

शूलपाणीश्वराच्या मंदिराचे दुरूनच दर्शन घडले आणि दिवसभरचा सारा शीण संपून गेला. एका महादिव्यातून पार पडल्याचे समाधानही आतल्या आत अंकुरत होते. अस्तगिरीला सूर्यदेव विसावल्यालाही बराच काळ लोटला होता. रामनवमीचा दिवस. त्यामुळे शीतल चांदण्याचा वर्षाव होत होता. हातपाय धुऊन शे-दीडशे फूट उंचावरील त्या प्राचीन देवालयापाशी पोचलो. दिंडी दरवाजा बंद झालेला. पोटदरवाजातून प्रवेश केला. गडावरील प्रवेशद्वाराप्रमाणे तो प्रचंड दरवाजा. विशालकाय हत्ती सहजतेने आत प्रवेश करू शकेल असा लंबाचौडा. आतल्या बाजूला दगडी बांधकामाच्याच प्रशस्त देवड्या. तेथून

आतल्या बाजूला मंदिर आणि त्याच्या बाजूला ओसऱ्या. मोठे देखणे मंदिर. कलाकुसरीने नटलेले. येथील नंदी आणि शिवलिंग तर प्रेक्षणीय आणि पूजेची उपकरणीही अप्रतिम ! संपूर्ण मंदिराला दगडी कोट आहे. महाशिवरात्रीला या ठिकाणी जत्रा भरते. या पवित्र व पुरातन स्थळाचे दर्शन घेण्यासाठी दूरदूरचे भक्त येतात. लाखो रुपयांची कमाई पुजाऱ्याला होते. तथापि हा पुजारी मात्र त्याच्या वृत्तीवरून पाषाणपुजारी असल्याचे आढळते. पुजारीमहाशयांनी केवळ पीठ दिले. तोंडीलावणे काही नाही. केवळ एक भाकरी पाण्याच्या घोटाबरोबर खाऊन थकलेभागलेले शरीर देवडीवर झोकून दिले. नागाजी पार वैतागलेले दिसले. आजचा संगतीचा शेवटचा दिवस असल्याचे त्यांनी सांगून टाकले. म्हटले, "जशी आपली मर्जी."

सकाळी जाग येताच मात्र नागाजींनी पुढे जायची तयारी केली. मी मस्त लोळत होतो. 'एकला चलो रे' या विचारात. तेवढ्यात ते नेहमीच्याच प्रेमळ स्वरात म्हणाले–

"पुढे निघायचे ना ?"

म्हटले, "आपली संगत रात्रीच सुटली ! तुम्हीच सांगितले ना ? तुम्ही पुढे व्हा. मी आरामात निघणार !"

कठपोरला यायला दहा दिवस लागले. हल्ली नाव विमलेश्वरऐवजी कठपोर येथून सुटते असे समजले. गुजराथमधील लोक सेवाभावी व भाविक असल्याचे बऱ्याच जणांकडून ऐकले होते. गुजरातचा हा भाग सुपीक, त्यामुळे येथे सुबत्ता नांदते, तरीसुद्धा आमचा अनुभव इतरांहून वेगळा. वैयक्तिक अभिलाषा काहीच नाही, तरीही लोकांच्या सांगीमुळे गुजराथमध्ये शरीरावर मूठभर मांस चढेल असे वाटले होते एवढेच; पण अधिकच रोडावलो. गुजराथी लोक लक्ष्मीनारायणाचे उपासक.

*अंतरी वसता नारायणे । लक्ष्मीस काय उणे ॥*
*ही समर्थांची वचनें । सत्य मानणे त्रिवाचा ॥*

हा बोध त्यांनी चित्तावर ठसविलेला दिसतो. लक्ष्मीची कृपा व्हावी यासाठी तिच्या पतीची उपासना आरंभणे आवश्यक नव्हे काय ? त्यांचे साधू-संतही असेच राजस प्रकृतीचे. त्यांची राहणी उच्च. अंगावरील वस्त्रे, आभूषणे भारी. मौल्यवान. आम्ही पडलो शैव. त्या भणंगभिकारी स्मशानवासी शिवाचे भक्त. त्यामुळे अशा जीवांकडे लक्ष द्यायला त्यांना फुरसत नसते. अंगावरील कपडालत्ता, छानछोकीपणा असलेला साधूच त्यांना भावतो. ही माहितीही काही ऐकीव, काही आनुभविक.

अक्षय्य तृतीयेच्या आधीच आठ दिवस रेवासागरला पोचलो याबद्दल अतीव समाधान वाटले. पावसाळा जवळ येऊ लागला म्हणजे परिक्रमावासी थबकायला लागतात. पोटापाण्याची चांगली सोय होईल असे स्थान निवडून चातुर्मासासाठी ते तेथे राहतात. या दक्षिणतटावर इतक्या लवकरच लोक विसावू लागल्याचे पाहून आश्चर्य वाटले. काही जणांनी रेवासागर पार केल्यावर स्थिरावायचा विचार केला. आमची तऱ्हाच वेगळी. त्यामुळे

आम्ही सात जूनपर्यंत नेमावर गाठायचा निश्चय केलेला.

आखाती-अक्षय्य तृतीयेपूर्वीच वादळी वारे वाहायला सुरुवात झालेली. भडोचच्या समोर मैयाच्या प्रवाहापर्यंत पोचलो, पण पाणी गढूळ व खारट. ओहोटीची वेळ होती. येथील मैयाचे पात्र विशाल आणि त्यात मोठाली तारवे नांगरलेली. खालच्या बाजूस रेल्वेचा पूल. भडोच हे उत्तरतटावरील बकाल शहर. त्या तसल्याच पाण्यात कसेबसे स्नान उरकले आणि परत चार मैलांचे अंतर तुडवीत अंकलेश्वर येथे मुख्य रस्त्याला येऊन मिळालो. तेथील हनुमान मंदिरात दुपारी व रात्रीही वस्ती केली. आजचे या तटावरील मैयाच्या प्रवाहाचे अखेरचे स्नान. उत्तरतटावरसुद्धा भडोचच्या वर आठ-दहा मैलांवर झाडेश्वर येथे शुद्ध जलाचे स्नान घडले. अन्यथा सुमारे आठ-दहा दिवस मैयाकाठच्या अन्य पाण्यानेच आंघोळ उरकावी लागली. अर्थात नर्मदाकाठचे जल म्हणजे नर्मदाजलच होय असे मानतात.

अमरकंटकच्या अलीकडे पाऊस पडून मैयाचे पाणी गढूळ बनले होते. तेव्हा एकाने शास्त्रार्थ सांगितला की, नदीला जेव्हा पूर येतो तेव्हा ती ऋतुमती असल्याने अपवित्र, अशुद्ध समजली जाते. तेव्हा त्या पाण्याने स्नान केले नाही तर दोष लागत नाही. माणसानेच सारी शास्त्रे स्वतःसाठी बनविलेली. प्रत्येक बाबतीत पर्याय ठेवलेले आहेतच.

सरळ डांबरी रस्ता पकडूनच कठपोरकडे निघालो. वादळी वाऱ्याचा वेग एवढा जबरदस्त की, मोठ्या शिकस्तीनेच पावले टाकावी लागत होती. छाती फुटून निघायची पाळी आली. वाऱ्याच्या रेट्यामुळे शरीराची काठी डोलायची. हातातल्या लाठीचा चांगला उपयोग झाला.

कठपोर छोटेसे गाव. ब्राह्मणांची दोन, काही पटेलांची व इतर धीवर व तत्सम जातीच्या लोकांची घरे. काही दिवसांपूर्वीच नावेची फेरी झालेली होती आणि आता तर भन्नाट वारे! त्यात कोण नाव लोटणार? जोपर्यंत वारे पडत नाही आणि पुरेसे परिक्रमावासी जमत नाहीत तोपर्यंत या ठिकाणीच पडून राहणे भाग. मैयाची इच्छा. समाधान एवढेच होते की, नावेची एखादी फेरी होणार होती!

आता परिक्रमावासीयांच्या संगतीतच राहायला हवे होते. नाव कधी सुटणार याबाबत जागरूक राहणे अगत्याचे होते. नाहीतर 'हरी विठ्ठल' करीत येथेच चातुर्मास करण्याची पाळी यायची. यासाठी धर्मशाळा गाठली. तिथे आठ-दहा परिक्रमावासी अगोदरच आलेले. बरे वाटले. धर्मशाळा छोटीशीच. आत प्रवेश केला. काय करावे या विचारात असताना एका नेपाळी साधूची नजरानजर झाली. मध्यम बांधा, सडसडीत देहयष्टी, मुंडण केलेला प्रसन्न चेहरा, बारीक डोळे, गहूवर्ण आणि अंगावर भगवी कफनी अशी ती मूर्ती पाहून समाधान वाटले. त्याने अभिवादन केले– आणि आपले गोणपाट लांब पसरले. अर्ध्यावर मला आसन लावायला सांगितले. तलावावरून स्नान करून आलो. नेपालपुरीशी चार-दोन गोष्टी झाल्या. बाकीचे परिक्रमावासी जेवून मोकळे झाले. गोणपाटावर लवंडलो होतो. तेवढ्यात नेपाळपुरींनी भोजन बनविले. मला हाक मारली आणि आम्ही दोघे जेवलो.

दुसऱ्या दिवशी स्नान केल्यावर नेपाळपुरींबरोबर विमलेश्वराचे दर्शन करून आलो. दुपार झाल्यावर प्राणरक्षणार्थ दोन घासांची आवश्यकता होतीच. नेपाळपुरी म्हणाले, "चला, भिक्षा मागू या." सोबतीने निघालो. त्यांनी एका घरी जेवण मागितले. दोघांची सोय झाली. नेपाळपुरी म्हणाले, "मी एकटा असलो तर भिक्षा मागीत नाही, पण आज तुमच्यासाठी भिक्षार्थ फिरतोय." मैयाची लीला अगाध. अडीअडचणींतून पार पाडण्यासाठी ती सदैव कुणा ना कुणाच्या रूपाने उभी राहत असते, एवढे मात्र खरे.

स्वामी अखंडानंदांनी गुजराती भाषेमध्ये ज्ञानदेवीचा अनुवाद केलेला आहे. एका पटेलाच्या घरी भोजनासाठी गेलो असताना, एक वृद्ध गृहस्थ वाचीत असलेले पुस्तक कोणते ते पाहिले तर ज्ञानेश्वरी ! ऊर भरून आला. ज्ञानोबा माउलींबद्दल सर्वत्र आदराची, भक्तिभावाची भावना पाहून कोणा महाराष्ट्रीयनाला आनंद होणार नाही ! हातात घेऊन अनुवाद चाळला. अखंडानंदांनी ज्ञानदेवीचा केलेला गौरव वाचून धन्यता वाटली. ते म्हणतात–

"आनंदामृतनुं पान करावी पुष्टि आपनारी माता, आत्मस्वरूपनी प्रतीति करावी आपनारी भगिनी, निर्मळ अंतःकरणमाथी भक्तिरसनो प्रस्वेद उत्पन्न करणारी चंद्रिका, संतप्त हृदयने आराम आपनारी भागीरथी, हृदयाकाशमां वैराग्यनो परिमल फेलावनारी कमलिनी, ज्ञानानृतनी वृष्टि करनारी मेघपंक्ति, अज्ञानांधःकारनो विध्वंस करनारी विद्युल्लता, विकासपामेला संशयवृक्षना डाळपाखडा छेदन करनारी समशेर, संसारसागरमाथी तारीने बहार काढनारी नौका अने मुमुक्षुओंना मनने द्रवीभूत करनारी प्रेमरसनी दृष्टि ए सर्वनु एकत्र स्वरूप आ ज्ञानेश्वरीज छे ए बात प्रत्येकजणे खूब लक्षमां राखवी."

चौथ्या दिवशी पहाटे नाव सुटणार होती. मध्यरात्र उलटल्यावर एक एक करीत अठ्ठावीस जण जमले. यात आठ-दहा बायकाही होत्या. काही साधू तर काही संसारी होते. तरुण-वृद्धांचा तो समुदाय पैलतीरावर जाण्यास उत्सुक होता. यामध्ये ॐकारेश्वरच्या मार्कण्डेय आश्रमात भेटलेली गद्रे-पिंपळखरे ही मामाभाच्यांची दुक्कलही होती. नेमाड भागातील व शूलपाणीच्या झाडीतून पार होईतो संगतीस असलेले नागा शिवभारतीजीही येथे येऊन टपकले होते. अखेर रेवा सागरात नाव लोटण्याचा मुहूर्त सापडला. उत्तररात्री अडीच वाजता अंधुक चंद्रप्रकाशामध्ये साऱ्या जणांनी उच्चरवात नर्मदामाईचा जयजयकार केला आणि नाव लोटायला सुरुवात केली. अर्ध्या तासाने नाव पाण्यावर तरंगू लागली. उड्या मारून सारे आत बसले. नौकारोहणाचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. नक्षत्रमंडित आकाशातील त्या चंद्रकोरीच्या साक्षीने जलप्रवासाला सुरुवात झाली.

एवढ्या प्रदीर्घ जलपर्यटनाचा हा पहिलाच प्रसंग. स्वामी स्वरूपानंदांकडे पावसला जायचो त्या वेळी भाट्याच्या खाडीतून तरीने जावे लागे. तेवढाच काय तो अनुभव. त्या वेळी आजूबाजूला जमीन, वृक्ष, माणसे दृष्टीस पडत; पण आज मात्र सगळीकडे पाचूच्या रंगाचे पाणीच पाणी आणि त्यावरील आमची ही एकाकी नाव. नावेला दिशा दिल्याबरोबर

नावाड्यांनी शिडे सोडली. मतलई वाऱ्याच्या जोरावर काही वेळ नावेने चांगला वेग घेतला. सर्वांचा उत्साह नुसता ओसंडत होता. पहाटेच्या त्या रामप्रहरी कुणी नर्मदाष्टक, कुणी नर्मदेची आरती, तर आणखी कुणी काही भजने वा स्तोत्रे म्हणतोय. कुणी मूकपणेच ती नीरव शांती भोगतो आहे असे ते मोठे प्रसन्न दृश्य होते. परिक्रमेच्या उत्तरायणाचा अंतिम चरण सुरू झाला आहे या समाधानात आमचा नौकाप्रवास चालला होता.

झुंजूमुंजू झाले. हळूहळू दिशा फाकल्या. सूर्यनारायणाचे अग्रदूत धरतीकडे भरधाव निघाले आणि वारे साफ पडले. त्याबरोबर नावेचा वेग अगदीच मंदावला. नावाड्यांनी शिडे गुंाळली आणि ते वल्हवू लागले. मुंगीच्या पावलानेच ती पुढे सरकत होती. त्या प्रचंड जलाशयावरील आमची नाव एका ठिपक्याएवढी. लाटांवर नुसतीच वरखाली व्हायची. औताला बांधलेला टोणगा कितीही ढोसले वा फटकारले तरी ढिम्म हालत नाही व निषेधार्थ पाय आपटून पुन्हा तिथेच मख्खासारखा उभा राहतो तशी आमची नाव नाराज होती.

ऊन तापू लागले. अंगाला चटके बसू लागले. त्यातच स्त्रियांना उलट्या होऊ लागल्या. ओकून ओकून त्यांचा जीव बेजार झाला. कधी एकदा पैलपार होतोय असे होऊन गेले. एक म्हातारा परिक्रमावासी पलीकडील हरिका धाम दिसतो आहो असे सांगून साऱ्यांना दिलासा देत होता, पण किती वेळ झाला तरी समोरचा काठ काही दृष्टिपथात येईना. हा बुड्ढा मधूनच त्या डोकरीकडे (बायकांकडे) वळून वळून कसा पाहत आहे हे माझ्या कानात नागाजींनी हळूच सांगितले.

नर्मदामैयाला कुणीकुणी भक्तिभावाने नारळ, अगरबत्ती, वस्त्र, पैसा अर्पण करू लागले तेव्हा नावाड्यांनी त्या वस्तू आपल्याला द्याव्यात, अशी विनंती केली. या लोकांनी नावाड्यांना आटा-डाळदेखील दिली. आम्ही तिघे जणच– नागा, नेपाळपुरी व मी– अगदी कफल्लक. आमच्याजवळ दोन हात आणि एक मस्तक एवढेच काय ते !

या नावेतील प्रवासाबाबत निश्चित माहिती नाही. कुणी म्हणे शासनातर्फे ही सेवा उपलब्ध करून दिली जाते, तर कुणी सांगे नावाडी सेवाभावनेने पैलतीरी पोचवून पुण्यसंपादन करतात, तर कुणी म्हणे परिक्रमावासी नावाड्यांना चीजवस्तू वा पैसा देतात किंवा नावाडी त्यांच्याकडून मोबदला वसूल करतात. कदाचित असे असेल की, ही परिक्रमा सनातन स्वरूपाची असल्याने परिक्रमावासीयांना हे नावाडी पैलपार करीत असावेत आणि पूर्वापार परंपरेने त्यांना काही वतने, इनामे मिळाली असावीत. काही असो, आमच्यासारख्या नि:संगांना पैलतीरावर न्यायचे महापुण्य त्यांनी जोडले होते खास.

अखेर दुपारी दोनच्या सुमारास नाव हरिका धाम येथील किनाऱ्यास लागली आणि साऱ्यांचा जीव भांड्यात पडला. सारे पटापट खाली उतरले. ऐन उन्हाळ्याचा काळ. काही जणांजवळ केवढाले सामान ! ओलसर वाळूतून कोरड्या वाळूत पाय टाकले मात्र आणि मग भरदुपारी आमच्या नजरेसमोर काजवे चमकले. त्या पेटत्या खाईतून पळताना ज्या यातना सोसाव्या लागल्या त्या अननुभूत अशाच ! लहानपणी आमची आते चातुर्मासात

वाचीत असलेल्या कुठल्याशा पोथीत माणूस मेल्यानंतर त्याला भोगाव्या लागणाऱ्या यातना ऐकल्या होत्या. जिवंतपणीच हे भोग अनुभवास आले. यापूर्वी सातमात्रा आणि शूलपाणीची झाडी या भागात तळपाय पोळले होते; परंतु तिथे थोडाफार सावलीचा आसरा लाभला होता. येथे ना झाड ना झुडूप. ती काळी कुळकुळीत पुळण. सूर्यप्रकाशात चमचमणारी. काळा रंग म्हणून अधिकच ज्वलंत! फर्लांगभर अंतरही त्या वेळी शतयोजनांएवढे भासले. तेवढ्यात एक झोपडी दृष्टीस पडली. कसेबसे तिथपर्यंत पोचलो. हायसे वाटले. पाठून येणाऱ्यांना येऊ नका म्हणून ओरडलो, पण लक्ष कुणाचे होते? जो तो त्या दिव्यातून कसे पार होतो या विवंचनेत. डोईवर भलेथोरले बोजे घेतलेले वृद्ध स्त्री-पुरुष तर अधिकच अगतिक झालेले. त्यातील काही स्त्रिया तर रडायला लागल्या. त्यांना पुढे जाता येईना, मागे वळता येईना. बोजावर वा गोणपाटावर उभे राहायला सांगितले. त्यांची ती केविलवाणी अवस्था पाहून अंतःकरण कळवळले. खाली पाय पेटताहेत आणि वर आगीचा डोंब उसळलेला अशा त्या रणरणत्या अवस्थेतसुद्धा नेपाळपुरीसह साह्यार्थ धाव घेतली. दोन-तीन खेपा मारून त्यांचे बोजे त्या खोपटात आणून टाकले. समाधान वाटले. या विकल अवस्थेत त्या डोकरीचे घागरे ओले झाले इकडे नागाजींचे लक्ष (त्यांनीच हे सांगितले) आणि आमचे महाराष्ट्रीयन मित्र गद्रे-पिंपळखरे आरामात मिठाई खाण्यात मग्न! मीठी तलाईचा हा खट्टा अनुभव चिरस्मरणीय असाच!

मीठी तलाई येथील आश्रमाच्या आवारातील विहिरीवर स्नान उरकले. नागाजी व नेपाळपुरीजी यांनी जेवण बनविले आणि नंतर सायंकाळी अंभेटा येथील कृष्णानंद स्वामींच्या आश्रमात विसावलो. येथील शिवानंद ब्रह्मचारी आणि त्यांचा शिष्य आतिथ्यशील. गरम भाकरी व दूध असे साधेच पण अगत्यपूर्ण भोजन. रात्री उबदार पांघरूण मिळाल्यामुळे झोपही निवांत मिळाली.

नागाजींची साथ सुटली ती कायमची. नेपाळपुरी मात्र नंतर आठ दिवस सहवासात राहिले. भारी बडबड्या माणूस पण निर्मळ अंतःकरणाचा. सकाळी सातच्या सुमारास भडोच शहरात प्रवेश केला. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा संमिश्र वस्तीचे हे शहर. एकूण बकालच वाटले. मैयाकिनारी मंदिरांबरोबर मशिदीही हारीने उभ्या. मधूनच चर्चचा क्रूस नजर वेधून घेणारा. मैयाचे पाणी गढूळ आणि गटारांनी प्रदूषित झालेले. काठ असा अमंगळ तर घाटाची स्थिती काही भली नाही. अरबस्तानातील पैशाचा धुमाकूळ या शहरात दिसून येतो.

येथील दोन-तीन मजली स्वामिनारायणाचे मंदिर मात्र रेखीव आणि सुबक बांधणीचे. भिंतीसुद्धा रंगीत फरशांनी मढविलेल्या. आपली छबी प्रतिबिंबित होऊन उठावी अशा गुळगुळीत. येथे लक्ष्मीची कृपा असली तरी अन्नपूर्णा रुसलेली आढळली. तेथून पुढे झालो आणि झाडेश्वर गाठले. येथेच मुंबईकडून अहमदाबाद रस्त्यावरील पूल असून, त्यावरून सतत वाहनांची ये-जा चालू असते. झाडेश्वर येथे नवीन शिवालयाचे बांधकाम सुरू होते. बाजूलाच आश्रम. कोणी एक नाथ सांप्रदायिक येथे रोज रुद्रपाठ करून हवन करतो असे

समजले. या ठिकाणचा घाट छोटासाच पण सुस्थितीत आहे. मैयाचे मैलोन् मैल पसरलेले विशाल पात्र येथे गहनही आहे. लोकांना खबरदारीची सूचना देणारी पाटीही येथे लावली असून साखळीला धरून बुडी मारावी लागते.

कोरल येथील पुनीत आश्रम नावाप्रमाणेच पुनीत. पुनीतमहाराज कालवश झालेले; परंतु आजही या ठिकाणी अतिथि-अभ्यागताची राहण्या-जेवण्याची चांगली सोय केली जाते. सकाळी दहाच्या सुमारास येथे दाखल झाल्यावर अत्यंत आस्थापूर्वक स्वागत झाले. गूळपाणी घेऊन स्नानासाठी मैयावर. आश्रमामध्ये नळाचे पाणी असले तरी मैयाचे दर्शन आणि स्नानसौख्य काही औरच ! प्रवाह दक्षिणतटाकडे झुकलेला. त्यामुळे त्या गरम वाळूचे चटके सहन करीत चाललो. आठ-दहा मिनिटांचे ते अंतर. स्नान करून आश्रमात परतलो. रुद्रपाठ पुरा होतोय एवढ्यात भोजनाची घंटी वाजली. 'या रे सारे लहानथोर' असा सर्वांसाठी खुला असलेला हा आश्रम. येथे पंक्तिप्रपंच नाही. जेवणही सुग्रास आणि मुबलक-पोटभर. कोणताही पदार्थ अगदी मनमुराद खावा ! आग्रहपूर्वक वाढप. भात, भाजी, आमटी, पोळी, चटणी, गोड पदार्थ असे जेवण साऱ्या परिक्रमेत पुनीत आश्रमाशिवाय अन्य कोठेही मिळाले नाही हे सत्य.

आश्रमात साने गुरुजींच्या सहवासात राहिलेले एक वृद्ध गांधीवादी महात्मा भेटले. सर्वांची जातीने चौकशी करण्याचा त्यांचा शिरस्ता पाहून समाधान झाले. भोजन, चहा, सर्वांना मिळाला का याची दखल घेणारी व्यक्ती विरळाच ! पुनीत महाराजांच्या काळात या आश्रमामध्ये परिक्रमावासीयांची चांगली सेवा होत असे ऐकले. येथून अन्नसंतर्पणाबरोबरच वस्त्रपात्रादिकांचे दानही होत असे; परंतु परिक्रमावासीयांच्या अनुचित वर्तणुकीमुळेच ही दानक्रिया खंडित झाली म्हणे. चादरी, रग अशा वस्तू घ्यायच्या आणि पुढे विकून टाकायच्या अशी या लोकांची तऱ्हा. या वस्तू ज्या वेळी पुन्हा आश्रमातच येऊ लागल्या त्या वेळी एकंदर प्रकार लक्षात येऊन हा दानधर्म संपला.

दुसऱ्या दिवशी गावजेवण होते. त्यामुळे रात्रभर आश्रमाच्या विस्तीर्ण आवारात जेवणाची तयारी चालू होती. मोठमोठ्या चरांवर अवाढव्य पातेली व कढया चढवलेल्या. मिष्टान्न तयार होत होते. त्याच्या खमंग वासाने आसमंत भरून राहिलेला. भाज्या चिरल्या जात होत्या. भांड्यांचा खणखणाट, माणसांची बडबड आणि पदार्थांचा घमघमाट यांमुळे झोपेत सारखा व्यत्यय येत राहिला.

पुनीत आश्रमातून दुपारी जेवण उरकून प्रस्थान ठेवले आणि करकरीत तिन्हीसांजा झाल्यावर नारेश्वरच्या रंगावधूत स्वामींच्या आश्रमात पदार्पण केले. अतीव श्रम आणि ठिकठिकाणचे वेगळे मचूळ पाणी व अन्न यांमुळे पोटाची तक्रार सुरू झाली. जुलाब होऊ लागले. शरीर हल्लक बनले. थकवा येणे स्वाभाविक. दक्षिणतटावरही दोन-तीनदा अतिसाराचा त्रास झाला होता. अनियमित जेवणही याला कारणीभूत असू शकेल. त्याच बरोबर मैयाचे गढूळलेले पाणीही ! पण 'आपुला आपण वैद्य डॉक्टर' हा विचार रुजलेला

असल्यामुळे आपलेच उपचार करी. जुलाब सुरू झाल्याबरोबर पोटाला संपूर्ण विश्रांती देणे, हलके मालीश करणे आणि साखरेचे पाणी पीत राहणे हा तो साधा उपाय. एखाद-दुसऱ्या दिवसात आराम पडलाच पाहिजे. आश्रमात येताच नेपाळपुरींनी लिंबू आणि गूळ मिळविला आणि सरबत प्यायलो. सारी मरगळ निघून गेली आणि शरीर शांत झाले. गाढ झोपी गेलो.

नारेश्वर कोरलपासून चार मैलांवर. रंगावधूत स्वामी दत्त सांप्रदायिक. यतिवर्य वासुदेवानंद सरस्वतींचे सच्छिष्य. रत्नागिरी जिल्ह्यातील देवळे हा यांचा मूळ गाव. यांनीही नर्मदा परिक्रमा पुरी झाल्यावर या ठिकाणी आश्रम बांधला. अनेक साधूंना मैयाने असे आपल्यापाशी ठेवून घेतलेले आहे. अत्याधुनिक सुखसोयींनी सुसज्ज असा हा आश्रम. यात्रेकरू आणि परिक्रमावासी यांच्यासाठी येथे वसतिगृहे व धर्मशाळा बांधलेल्या आहेत. मंदिर आहे. दवाखाना आहे. संडास-बाथरूमची चांगली व्यवस्था असून, मैयावर पंप बसवून पाणी सर्वत्र खेळविलेले आहे. परिसरामध्ये कडुनिंबाची व आंब्यांची झाडे शीतल छाया देत उभी आहेत. फुलझाडे व शोभेची झाडेही आहेत. पुनीत आश्रमात साधूंना कितीही दिवस राहण्याची मुभा असली तरी या आश्रमात मात्र कुणालाही तीन दिवसांहून अधिक वास्तव्य करता येत नाही. येथील वातावरण थंड, शांत, आवार व आश्रम स्वच्छ, टापटीप लक्षणीय. येथे साऱ्यांना पोटभर जेवण मिळते; पण कोणताही पदार्थ हवा तितका– आग्रहपूर्वक– मिळेलच असे नाही.

दुसऱ्या दिवशी जाग आली तेव्हा हुशारी जाणवली. अनशन करायचे ठरविले. दवाखान्यातून औषध घेऊन आलो. नौली, प्राणायाम, अश्विनीमुद्रा असा पोटाचा हलका व्यायाम केला. उशिरानेच मैयावरून स्नान उरकून आलो. गरुडेश्वर व नारेश्वर ही स्थाने वासुदेवानंद सरस्वती आणि रंगावधूत स्वामी या गुरुशिष्यांमुळे प्रसिद्ध पावलेली. दत्त सांप्रदायिकांची ही पुण्यपावन तीर्थक्षेत्रे. येथे येणाऱ्या यात्रेकरूंमध्ये दत्तोपासकांचा भरणा अधिक असणार हे स्वाभाविक आणि त्यात महाराष्ट्रीयनही प्रामुख्याने आढळणार हेही खरेच. मुंबईकडील गुळवणी महाराजांचे अनुग्रहित शिष्य येथे भेटले. त्यांनी अत्यंत आस्था दाखविली. लाडू खायला दिले. औषधाच्या गोळ्याही जवळ ठेवण्यासाठी दिल्या. महाराष्ट्रीयन लोक भेटल्याने समाधानही झाले.

आश्रमात भागवतसप्ताह होता. त्यामुळे भजन-प्रवचनादी कार्यक्रमांचे आयोजन केलेले होते. भाविकांची ये-जा मोठ्या प्रमाणावर. दिवसभर आराम केल्यावर रात्री थोडा कढीभात जेवलो. नावेत जवळ असलेला तुंबा फुटल्यामुळे शूलपाणीच्या झाडीतील प्रवासासाठी पाण्याचे साधन हवे होते. आश्रमाच्या जवळच लालूमहाराज नामक एक मौनीबाबा राहतात. ते परिक्रमावासीयांना गरजेच्या वस्तू देतात असे ऐकलेले. त्यामुळे एखादे भांडे मिळाले तर पाहावे यासाठी नेपाळपुरींबरोबर त्यांच्याकडे गेलो. या महाराजांनी पूर्वी परिक्रमा केलेली आणि गुजराथीमध्ये एक प्रवासवर्णनपर पुस्तकही प्रसिद्ध केलेले. ते दिवसभर मौन पाळून रात्री भेटीस येणाऱ्यांशी मोजकेच बोलतात.

महाराज कृष्णवर्णीय. स्थूल शरीर. मध्यम बांधा. साठीची उमर. शांतभाव आणि अंतर्मुख वृत्ती. दाढीजटा बव्हंश शुभ्र. प्रसन्नवदन आणि बोलके डोळे. आश्रमात पाहिलेल्या दोन पाश्चात्त्य गौरांगना महाराजांच्या दर्शनार्थ आलेल्या. त्यांनी अत्यंत सुरील्या स्वरांत 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु' हा श्लोक म्हटला. पाश्चात्त्यांची गायन पद्धती आपल्याप्रमाणे मोकळ्या आवाजातील नसते. किरटी व चोरट्या गळ्याची ती गायकी ! पण या युवतींनी मात्र अत्यंत मोकळ्या स्वराने आणि शुद्ध उच्चारात हा श्लोक गायला. पाश्चात्त्यांची जिज्ञासू वृत्ती मात्र वाखाणण्याजोगी ! हजारो मैलांवरील अनोळखी प्रदेशात भ्रमंती करून ज्ञानसंपादणी करण्याचे व्रत अंगीकारणे आणि मोठ्या जिद्दीने, मेहनतीने व धैर्याने ते यथासांग पार पाडणे या त्यांच्या प्रवृत्तीला तोड नाही.

लालूमहाराजांनी अत्यंत सरळ, सोप्या भाषेत वरील श्लोकावर भाष्य केले. उपस्थितांतील एका स्त्रीने त्या युवतींना इंग्रजीमधून त्याचा भावार्थ कथन केला. श्रीगुरूंच्या ठायी ब्रह्मदेवाचे निर्माणसामर्थ्य, विष्णूचे पालनकर्तृत्व आणि रुद्राचे संहारकत्व कसे एकवटलेले असते याचे अत्यंत मार्मिक आणि नेमके विवेचन त्यांनी केले. श्रीगुरू शिष्याच्या ठायी श्रद्धा, जिज्ञासा उत्पन्न करतात, त्याच्या ठिकाणी असलेली आस्तिक्य बुद्धी विकसित करतात आणि अंतःकरणात दडून राहिलेल्या कामक्रोधादी विकारांचे निःशेष निर्मूलन करतात. महात्म्याच्या अंतर्मुखतेला आलेले सुवासिक फूलच जणू असे हे विवरण !

लालूमहाराजांनी पाण्यासाठी एक छानसे छोटे मडके दिले. लाल रंगाचे आणि नक्षीकाम केलेले. अन्य काही नकोच होते.

सकाळी प्रकृती सुधारल्याची जाणीव झाली. मैयावर स्नान उरकले. येथील मैयाचा प्रवाह वलयाकार. शांत आणि गहन. किनाऱ्यावर वृक्षांची दाटी. मैयाच्या दर्शनाने आणि स्नानाने आगळीच टुकटुकी प्राप्त होत असते. एकेकाळी घनदाट अरण्याने व्यापलेली ही निर्मनुष्य जागा. पण स्वामीजींनी तिचे एका रमणीय तीर्थस्थानात रूपांतर केले आहे. महापुरुषाच्या निर्वाणानंतर येणारी अवकळा या स्थानीही जाणवते.

बद्रीकाश्रमाची इमारत दुमजली. समोर सुंदर बांधणीचा घाट. खाली जवळजवळ शंभर फुटांवर मैयाचा शांत आणि खोल प्रवाह. निळे निळे पाणी दूरवर पसरलेले. अतीव मोहक दृश्य. आश्रमाची वास्तू अत्याधुनिक. संडास-बाथरूमची सोय. तळमजल्यावर मंदिर, आत अनेक देवतांच्या मूर्ती. कार्यालय आणि भोजनगृहही खाली आणि वरच्या मजल्यावर राहण्यासाठी खोल्या. महंतजींच्या परवानगीने येथे साधूंना राहता येते. मात्र आश्रमाचे नियम पाळावे लागतात. येथे खूप वेळ आरती चालते. सुमारे तासभर स्तोत्रे म्हणतात.

इकडे डाळढोकळ्याचे जेवण प्रिय. घट्ट डाळीमध्ये-वरणामध्ये कच्च्या पोळीचे तुकडे सोडावयाचे आणि उकळवायचे. मध्य प्रदेशात डाळबाटी प्रसिद्ध पदार्थ ! मी मात्र त्याला ढोरभोजन म्हणायचो. वस्तुतः बाटी हा खाद्यप्रकार तुपात भिजवून केला तर खरपूस आणि रुचकर लागेल, (हापेश्वर येथील मोहनदास महंतांसाठी तुपात भिजत घातलेली कुसकरलेली

बाटी पाहिली होती) पण नुसते वासापुरते तूप चोपडून त्याला कसली चव येणार? पाच-सहा वेळा तरी हा पदार्थ खाल्ला असेन पण कधीच आवडला नाही. कित्येक दिवसांनंतर येथे पेलाभर चांगले ताक प्यायला मिळाले.

वासुदेवानंद सरस्वतींचा आश्रम गरुडेश्वर येथे आहे. एक रात्र तेथे घालविली. आश्रमात जेवण मिळते, पण तीन रुपये भोजनशुल्क भरावे लागते. कोणा सज्जनाने जेवणाची व्यवस्था केली. सकाळी स्नान उरकून पुढे निघालो. झाडी जवळ येऊ लागलेली. नवाबांध सरदार सरोवर प्रकल्प मागे टाकून झाडीत प्रवेशलो. अंगावर दोन वस्त्रे. शूलपाणीश्वराच्या मंदिरानंतर गुजराथमध्ये मिळालेली. एक सफेद कटिवस्त्र गोरा घाटावरील साधुमहाशयांनी दिलेले व दुसरे काषाय उत्तरीय येवला येथील हनुमानस्वामींनी रामपुरा येथील रणछोडजी मंदिरात दिलेले. पांढरे वस्त्र झाडीतील एका साधूच्या कुटीत ठेवून दिले आणि भगवे वस्त्र भिल्ल हिरावून घेत नाहीत असे कळल्यामुळे प्रचीती घ्यावी यासाठी कमरेला गुंडाळले. हातात पाण्याचे मडके व बांबूची लाठी.

हापेश्वर येथील आश्रमामध्ये परिक्रमावासीयांची राहण्याची व भोजनाची चांगली व्यवस्था होते. दक्षिणतटावरसुद्धा येथून शिधा पाठवितात. झाडीत प्रवेश केल्यावर पहिल्याच दिवशी सायंकाळी ललितकुमार भेटला आणि दुसऱ्याच दिवशी सकाळी भिल्लांनी लुबाडले. कमरेला लंगोटी, हातात पाण्याचे मडके आणि दंडा एवढ्या सामानानिशी सायंकाळी हापेश्वरच्या आश्रमात प्रवेश केला. दोन दिवसांतच ललितच्या तळपायांना मोठाले फोड आले. आता विश्रांतीशिवाय पुढे पाऊल टाकणे शक्य होणार नव्हते. झाडीतून दोघांनी बरोबर प्रवास करायचा असे ठरविल्यामुळे त्याचे पाय बरे होईपर्यंत येथे राहणे भागच होते. आम्हाला उघडेबंब पाहून मोहनदास महंतांनी कमरेला गुंडाळायला एकेक अंगोछा– भय्या लोक डोक्याला गुंडाळतात तसला लाल रंगाचा पंचा– दिला. येथे सदावर्त मिळते तसेच तयार भोजनही !

सहा दिवस या ठिकाणी राहिलो. इतका दीर्घ मुक्काम कुठेच घडलेला नव्हता. काही असले तरी थकल्याभागल्या शरीराला विश्रांती मिळून अंगावर मूठभर मांस चढण्यासाठी याचा निश्चितच हातभार लागला. हा फायदा काय कमी मोलाचा? ललितने आपणहून भांग वाटण्याचे, फुलझाडांना पाणी फवारण्याचे व स्वयंपाकास मदत करण्याचे काम स्वेच्छेने स्वीकारले. आश्रमात आलेल्या पांथस्थांना, यात्रेकरूंना वा साधूंना 'राहा राहा' अशी आर्जवे करून त्यांच्याकडून कामे करवून घ्यायची इच्छा बाळगायची आणि सेवा करतो असे मिरवायचे याला काय म्हणावे? सगळीकडेच असले बाजारी स्वरूप आलेले आहे. जीवनात फुकटचे काही मिळत नाही; तसेच काहीही फुकट जात नाही. प्रत्येक गोष्टीची किंमत चुकती करावी लागतच असते. निसर्गाचा तसा नियमच आहे.

आश्रमातील झोपाळ्यावर थोडा वेळ बसलो आणि थकव्यामुळे तेथेच लवंडलो. झोप लागली. जाग आली तीच मुळी महंतजींच्या करड्या तारस्वरामुळे. त्यांचा पारा एवढा का

चढावा याचा काही उलगडा होईना, पण क्षणार्धात आम्हीच त्यांचे लक्ष्य असल्याचे ध्यानी आले.

"उठो वहांसे. अपने आसनपर बैठो" महंतजी कडाडले. माझ्यासारखा फाटका माणूस त्यांच्या झोपाळ्यावर बसण्याचा घोर अपराध घडला होता.

*ऐसी जगह बैठ कोई न बोले ऊठ ।*
*ऐसी बात कर कोई न बोले झूठ ॥*

या कबीराच्या वचनाचे विस्मरण झाल्याचे जाणवले.

'अपने को क्या अवधूत समझते हो ?' महंतजींनी आपली जीभ आणखी परजली. अजूनही लक्षात येईना की, भानगड काय आहे; परंतु त्यांच्या एकंदर बोलण्याचा रोख होता तो आमच्या मडक्यावर. पाणी प्यायला आणि शौचविधीसाठी एकच मडके वापरल्यामुळे त्यांचे माथे भडकले होते. त्यांच्या लेखी हे कृत्य अपवित्र, 'अब्रह्मण्यम्' सदरात मोडणारे. वस्तुतः सहजप्राप्त वस्तू मी वापरीत होतो. स्वच्छास्वच्छतेचे त्यांचे व आमचे नियम वेगळे असावेत बहुधा. त्यांचा रोष लक्षात आल्यावर हळूच म्हणालो–

"माझ्यापाशी दुसरे पात्र नाही त्यामुळे मडके वापरतो. तुम्ही जर एखादा तुंबा दिला तर वापरीन."

महंतजींचा स्वर मृदू झाला. त्यांनी लगेच एक मोठा तुंबा आणून दिला. त्यानंतर मात्र त्यांनी पुन्हा कोणताही अपशब्द वापरला नाही. मैयाची करणी खरोखरच अगाध !

आश्रमातील कोठारी, प्रेमदास आणि गंगादास ही माणसे खरोखरच प्रेमळ. प्रेमदास सहा दिवसांनंतर निरोप घेताना बोलला. गंगादासाप्रमाणे त्यानेही परिक्रमा केलेली. सदैव गोमुखीत हात घालून जप करण्यात मग्न. फणसासारखा वरून रूक्ष पण अंतरी रसाळ. मला आणखीही राहण्याचा आग्रह करीत होता. देवासमोर ठेवलेल्या नारळाचे अर्धेअधिक खोबरे मला त्याने प्रेमभराने खाऊ घातले. गंगादास तापट व अहंकारी. मंदिराची पूजा, भोजन करण्याचे काम त्याच्याकडे. आपले गुरुजी कुणाकुणाला जेवू घालतात आणि आपल्याला ते काम करावे लागते. गृहस्थांची सेवा करावी लागते. यामुळे गुरूवर नाराज. तथापि गुरूंच्या उष्ट्या ताटातच जेवणारा. ही प्रथा 'पती-पत्नी' मध्ये अजूनही कुठेकुठे पाहायला मिळते. श्रीगुरूंचे उच्छिष्ट भक्षण करणे हे महाभाग्याने लाभते असा एक समज आहे. मीही एकदा स्वामीजींच्या उच्छिष्टांतील दहा-पाच शितांचा वाटेकरी होण्याचा मान मिळविला होता, तर हा गंगादास आश्रमातील कामामुळे साधना घडत नाही म्हणून त्रासलेला दिसला.

हापेश्वर-ककराना आणि ककराना-धर्मराई असा दोन दिवसांचा प्रवास असल्याचे गद्रे-पिंपळखरे यांनी सांगितलेले. ही दुक्कल चालण्यात वस्ताद होती हे निखालस खरे ! परंतु त्यांच्यात आणि आमच्यात परिस्थितीचा जमीन-अस्मानाएवढा फरक होता. दोघेही नवजवान – पंचविशीतील. परिक्रमेच्या सुरुवातीलाच त्यांनी शूलपाणीच्या झाडीत प्रवेश केलेला. त्यामुळे अगदी ताजेतवाने. 'अपना हाथ जगन्नाथ' ही त्यांची वृत्ती. त्यामुळे पोटभर

जेवण व म्हणूनच शरीर राखून. याच कारणाने सशक्त-सक्षम. विशेष म्हणजे त्यांचा प्रवास थंडीच्या दिवसातील. आणि आमची परिस्थिती ? ती तर अगदी याच्या विरुद्ध. आम्हा सोबत्यांच्या वयात फरक, चालण्याच्या गतीत फरक, शारीरिक क्षमतेत फरक. ही झाडी परिक्रमेच्या अंतिम चरणात आक्रमायचा प्रसंग. त्यामुळे शरीर थकलेले. आकाशवृत्तीमुळे पार दुर्बल झालेले. ललितकुमार तर 'नेहमीची रोड' असा ! दिवस कडक उन्हाळ्याचे. ऊन्ह मी म्हणणारे ! हातात पाण्याचे मडके वागवून पार हैराण झालेलो. अर्थात त्यातील अमृतोपम नर्मदाजलाने तृषार्त जीव शांत, तृप्त होत असे हे विसरता येणार नाही. समाधानाची गोष्ट एकच होती की, दक्षिणतटापेक्षा रखरखाट थोडा सौम्य भासत होता. वसंतऋतू पर्णागमाचा ! त्यामुळे वृक्षवल्लरीवरील ती लवलवती लुसलुशीत हिरवट पोपटी पालवी त्या वैशाखवणव्याच्या जळजळीत झळांना काहीशी शीतल बनवीत होती. डोळे निवून जात.

भिल्लांच्या त्या ओसाड भागातदेखील ककराना येथील संगम आणि त्याच्या काठावरील टेकाडावरील मंदिर व धर्मशाळा आढळणे ही आश्चर्याची गोष्ट नव्हे ? झपाझप टेकडी चढून मंदिर गाठले. समोर संगम, पैलतीरावरील उंचच उंच पर्वत, पाठीमागेही डोंगर, वाऱ्याचा झोत अंगावरून वाहतोय, सायंकाळची निःस्तब्ध वेळ, आकाशात संध्यारंग उधळलेले, असे ते विलोभनीय दृश्य पाहून चित्त समाधानात डुंबून गेले.

तिसऱ्या दिवशी मात्र धर्मराई गाठायचीच अशा निश्चयाने पाऊल उचलले आणि एकेक 'मामा' भाच्यांच्या भेटीस येऊ लागला. 'आपणासारिखे करिती तत्काळ' असे तुकाराममहाराज सद्गुरूंबाबत म्हणतात. हे 'मामा'सुद्धा आपल्या 'भाच्यांना' 'आपणासारिखे' करून सोडतात. निसुगपणे भाच्यांना 'निःसंग' करून सोडण्याची यांची 'हातवटी' तर सद्गुरूंच्याच तोडीची. मोक्षपथाची वाटचाल करणाऱ्यांना ही युक्ती दाखविणारे हे मामा सांगातीच होत. भगवान शंकरसुद्धा नर्मदाभ्रात्यांच्या या अजब कर्तबगारीमुळे वैतागून सर्वांगाला राख फासून कैलासाला चालता झाला असावा ! ककराना, कतरखेड, दसाना ही गावे मामांच्या वहिवाटीची. यांना नर्मदामाईचे वरदान आहे म्हणे आणि लूटमारीचा व्यवसाय करणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आपल्याकडील फकीर, वासुदेव, वाघ्यामुरळी, नागरधारी, भुत्ये, सरवदे, कडकलक्ष्मी, दरवेशी इ. प्रमाणे या विसाव्या शतकाच्या अखेरीसही ते उरीपोटी बाळगून आहेत. धन्य धन्य या नर्मदाभ्रात्यांची आणि धन्य त्यांच्या निष्ठेची !

अस्मादिकांचा तुंबा आणि मडके या वस्तू त्यांना फारच आवडल्या. त्या त्यांनी मागून घेतल्या. 'काय उणे आम्हा विठोबाचे पायी !' या इवल्याशा वस्तूंचीही आसक्ती उरली असेल तर काय कामाची ती परिक्रमा ? महंत मोहनदासजींनी दिलेल्या अंगोछाची कौपीन बनविली होती. ती जाड दिसत होती. त्यामुळे काही पैसाअडका त्यात लपविल्याचा संशय काही पोरांना आला आणि ती लंगोटीही मागू लागली. त्यांनी पिच्छा पुरवला असता तर खुशाल सोडून दिली असती ! तेवढ्यात एक मामा प्रकटला. गमतीने त्यास म्हटले की, ही

पोरे लंगोटीही मागतात. यांना काय म्हणावे ! तो मामा खरोखरच उदारहृदयी निघाला आणि त्याच्या कृपेमुळे लंगोटी बचावली. ललितकुमारने मात्र झगडून झगडून गीतेचे पुस्तक आणि तांब्याचा गडू झाडीतून सुखरूप पार केला. मडके, तुंबा गेल्यामुळे सारखे मैयावर जावे आणि मनसोक्त पाणी प्यावे असा क्रम दिवसभर चालू राहिला. रस्ता फारच अडचणीचा. सावलीसाठी एकही झाड नाही. कुठेतरी प्रचंड खडकाच्या आड लपून आतपाचा ताप निभवायचा. दिवसभरात पोटात अन्नाचा कण नाही, तरीसुद्धा हा झाडीचा अखेरचा दिवस Doom's Day आहे असे गमतीने म्हणत मार्ग आक्रमीत राहिलो. चित्तवृत्ती कशी उल्हसित !

श्याम ढळली. धर्मराई काही जवळ येईना. शरीर पार थकलेले. अंगात आगीचा भडका उडालेला. पुढे जाण्यातही काही अर्थ नव्हता. तेव्हा ललितकुमारला म्हटले की, आपण बुवा आता या वाळूतच कोसळणार. गुरुदेवांची इच्छा असेल तर ते येथेच भोजन देतील. धर्मराईच्या अलीकडील दोन-तीन मैलांवरील तो गाव. दोन-तीन तरुण मुले स्नानासाठी मैयावर आलेली. आम्हाला पाहताच त्यांनी 'नर्मदे हर' असे अभिवादन केले आणि गावात जेवणाची व्यवस्था करतो असे आपण होऊनच सांगितले. गुरुदेवांनी खरोखरच पाठराखण केली म्हणायची. मैयाने आपले ब्रीद राखले नाही असे व्हायचे नव्हते. गळाभर पाण्यात शिरलो. ते उष्णोदक शरीराला लागताच शरीराची नसन् नस मोकळी झाली. शिणवटा कुठल्या कुठे नाहीसा झाला. त्या तरुणांबरोबर गावात आलो. बलवतसिंगांच्या घरची गरम गरम बाजरीची भाकरी आणि अधमुरे दही अशा त्या आगळ्यावेगळ्या भोजनाची रुचीच काही न्यारी !

परिक्रमेच्या पाच महिन्यांहून अधिक कालावधीमध्ये मैयाने उपाशीपोटी कधी निजू दिले नाही हे जितके खरे, तितकेच तिने संक्रांत, होळी पौर्णिमा, गुढीपाडवा यांसारख्या सणावारी काही ना काही गोडधोड आपल्या लेकराला भरविले हेही खरे. तिच्या या अपरंपार कृपेचे महिमान काय गावे ?

*अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनः पर्युपासते !*
*तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ! !*

या भगवदुक्तीचा प्रत्यय पुऱ्या परिक्रमेत येत राहिला.

संक्रांतीच्या दिवशी छिदगावहून निरालाजींचा प्रेमळ निरोप घेऊन पुढे झालो आणि दुपारी बाबरी घाटावर पोचलो. मला पाहताच एक तरुण गृहस्थ स्नान करून घरी चाललेला थबकून उभा राहिला. जवळ येताच त्याने अभिवादन करून घरी जेवायला चलण्याची विनंती केली. सत्यनारायण दुबेनामक हा गृहस्थ एम.ए.(इंग्लिश) असून, माध्यमिक शाळेतील शिक्षक होता. घरी वृद्ध वडील, एक भाऊ. सारी माणसे श्रद्धाळू आणि प्रेमळ–आस्थेवाईक. डाळवाटीचे जेवण प्रथमच येथे मिळाले.

होळी पौर्णिमेच्या दुपारी दक्षिणतटावरील लुचगाव येथे डॉ. मोहनलाल सिंगोरिया

यांच्यातर्फे आम्हाला भोजन होते– मनमोहन निरालाजींनी स्वहस्ते बनविलेले. टिक्कड, मूगडाळीचे वरण, दहीसाखर, आंबालिंबू लोणचे असा खास बेत. दिवसभरात आठ-दहा तरी जुलाब झालेले. त्यामुळे बेतानेच जेवायचे होते. न जेवून चालण्यासारखे नव्हते. जेवणानंतर डॉक्टरमहाशयांनी साऱ्यांना आरती ओवाळली आणि एकेक रुपया प्रत्येकाला दक्षिणा म्हणून दिली. पुढे सुमेरसिंगांच्या घरी गोड बुंदी व लस्सी घ्यावी लागली. पोट तर चांगलेच जडावलेले. रात्री कुणालाही जेवायची इच्छा उरलेली नव्हती. गोंदागावी मैयाला एक छोटी नदी मिळते. हातपाय स्वच्छ धुऊन विश्रांती घ्यायच्या मनःस्थितीत होतो. रात्री जर अल्पसे गोडधोड-मेवामिठाई-मिळाले तर खायचा बेत सर्वांना सांगितला. मान्य झाला.

समोरील तीरावरून काही जण मेळ्याहून परतलेले. आमच्याशी बोलत चालले. येथेच मुक्काम करावा असे त्यांनी म्हटल्यावर 'ठीक आहे' म्हणून गावात निघालो. नर्मदाप्रसाद चौहाननामक एक गृहस्थ भलताच भाविक आणि आग्रही दिसला. आम्हा तिघांना त्याने आपल्या घरी नेले. जेवणाची चौकशी केली; पण आमचा साभार नकार ऐकून अखेर त्याने पेलाभर दूध प्रत्येकापुढे ठेवले. त्याच्या भावनेला मान देण्यासाठी नाइलाजाने ते दूध रिचवले. जराशाने त्याने अदबीने विचारले, "थोडा मावा खाणार का?" आमच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. इच्छा प्रदर्शित केल्यावर त्याने मावा आणविला. श्रीखंड खाण्याचा विचार डोक्यात येताच, दही साखर मिळाली. इकडील लोकांना 'श्रीखंड' हा पदार्थच ठाऊक नाही! अपेक्षेप्रमाणेच थोडासा मावाही मिळाला. मनीचे कोड माईने असे पुरविले.

मोहिपुरा गाव शूलपाणीच्या झाडीच्या अगोदर. येथे गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी रात्री वस्ती केली. गावात रा. स्व. संघाचा प्रभाव. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष शिक्षित लोक बरेच. गुढीपाडव्याचे जेवण करूनच पुढे जावे, असा त्यांचा आग्रह. म्हणून मानसिंगनामक रजपुताकडे बाटी, रव्याचे लाडू आणि पुरणपोळीचा बेत. पुरणपोळी आपल्याहून जरा वेगळी. अशा प्रकारे पाडव्याचा सण साजरा झाला.

गुजरातमध्ये दक्षिणतटावरील सहराव येथील रात्रीचा मुक्काम हलविला तेव्हा सकाळी एक जण म्हणाला की, गावात कुणाकडे तरी लग्न असून उपस्थित राहा, लाडू मिळतील. गंमत वाटली त्याच्या सल्ल्याची. त्याला सांगितले की, लाडू खाण्यासाठी थांबणारे आम्ही लोक नाही. कुणी विनंती केली तर राहतो इतकेच. शिवाय मैयाची इच्छा असेल तर ती लाडूही खाऊ घालील. पुढे निघालो. मैयाचा प्रवाह मोठे वळण घेऊन जिओर गावी दक्षिणतटाकडे आला असल्याने, काठावर येऊन पुढील मार्गाची चौकशी केली. आठचा सुमार. एका घरी चार जण सकाळचे ऊन खात बसले होते. एक जण म्हणाला–

"आता येथे राहा. जेवण करून जा."

म्हटले, "ही काय जेवणाची वेळ आहे?" आठ वाजले असतील नसतील, त्यावर म्हणतो कसा, "ब्राह्मणभोजन आहे आज." म्हणजे जेवण ब्राह्मण करणार आहेत असा अर्थ.

विनोदाने बोललो, "मी ब्राह्मण आहे हे तुम्हाला कुणी सांगितले ?"

तो उद्गारला– "ब्राह्मणाचे तेज कुठे लपते काय ?"

अजब गोष्ट वाटली. म्हणालो, "आणि ब्राह्मण आम्हाला आमची जात विचारतात !"

या नगीनभाईकडे त्या दिवशी श्राद्धानिमित्त ब्राह्मणभोजन होते. स्नान करून आलो. थोडा वेळ काही पुस्तके, मासिके चाळली. दुपारी जेवणात लाडू होते. मैयाने त्याच दिवशी लाडूभोजन करविले.

आपले मन भारी द्वाड. कधी ते दगा देईल याचा भरवसा नसतो. त्याला दाबून टाकावयाचे म्हटले तर ते अधिक जोराने उसळी घेत असते. त्यामुळे त्याच्या कलानेच जावे असे सारे साधू-संत सांगतात.

*मानीत मानीत घालावे । मूळाकडे ॥*

असे म्हणतात. ज्ञानोबा एके ठिकाणी म्हणतात की,

*का जे यया मनाचे एक निके । जे देखिलिये गोडीचिया ठाया सोके ॥*
*म्हणौनि अनुभवसुखचि कवतिके । दावीत जाइजे ॥*

मनाची एक चांगली गोष्ट अशी की, आवडीच्या ठिकाणी ते सोकावते. म्हणून त्याला कवतिकाने, त्याच्या कलाकलानें आत्मसुखाची गोडी लावीत जायला हवे.

विश्वनाथजी ब्रह्मचारींचा शिष्य सुदामा एक-दोन जागी भेटला होता. सहज बोलताना कामवासना उफाळून मनाला भारी क्लेश होतात असे म्हणाला होता. कामिनी-कांचनाचा मोह भल्याभल्यांना गोत्यात आणतो. ज्ञानेशांनी म्हटले आहे–

*हठियाते जिणिजे । इहीचि जगी ॥*

या कामक्रोधावर हट्टाने, बळजबरीने काबू मिळवू पाहणाऱ्यांनाच त्यांनी जिंकावे अशी अवस्था होते.

उत्तरतटावरील शूलपाणीच्या झाडीत दुपारी एका भिल्लाच्या झोपडीबाहेरील अंगणात विसावलो होतो. या भिल्ल स्त्रिया अनावृत उरोजांच्या. त्यांतील एक नवयौवनसंपन्न पीनस्तनी गौरकाय तरुणी आपल्या बालकाला वात्सल्यभराने स्तनपान करीत असताना तिकडे सहज नजर गेली आणि अगदी क्षणभर का होईना वृत्ती विचलित झाली. ताबडतोब गुरुदेवांचे स्मरण जागे झाले. हे विकार अशा प्रकारे कधी चोरून आक्रमण करतील याचा काही नेम नसतो. भगवान शंकरांसारख्या तपोबल विरागी पुरुषाचीसुद्धा त्या पुष्पधन्व्याने क्षणात समाधी उतरवलीच ना ?

म्हणून वृत्तींचा निरोध करण्यापेक्षा वृत्ती विरागी बनणे महत्त्वाचे असते. बाबा आर्वीकरांनी दिव्यामृतधारेमध्ये पातंजलयोगसूत्रातील 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' या योगाच्या व्याख्येमध्ये 'योगश्चित्तवृत्तिविरागः' असा बदल सुचविला आहे. बळजबरीपेक्षा सहजपणाने वृत्ती अंतर्मुख होत जाणे हेच अध्यात्माचे मर्म होय.

उत्तरतटावरील कोटेश्वर महादेवाचे प्राचीन स्थान. परिसरात राम, शिव, नर्मदा, हनुमान

इत्यादी देवतांची मंदिरे. दोन-तीन धर्मशाळा. संस्थानी राजवटीतील कोटेश्वरचा घाट काळ्या दगडातील. सुबक, देखणा, अजूनही सुस्थितीत असलेला. या ठिकाणी संगमही आहे. मला जी काही स्थाने आवडली त्यांमध्ये हे एक. येथील मैयाच्या विस्तीर्ण जलाशयाचे ते सौंदर्य अनिमिष नेत्रांनी पीत राहण्यातील सौख्य अपरंपार. सायंकाळच्या त्या नीरव शांततेत भद्रासन लावून घाटावरील उंच कट्ट्यावर स्वस्थ बसून राहिलो. मे महिन्याची अखेर असल्याने नैऋत्य मोसमी वाऱ्याच्या मंद शीतल लहरी आपल्या मृदूल स्पर्शाने अंगावर रोमांच उठवीत होत्या आणि अंतःकरणात आल्हाददायी सुखसंवेदना फुलवीत होत्या. पतई घाटावरील बालकराम स्वरूपानंद स्वामींचे शिष्य ब्रह्मानंदजी येथे भेटले. अमरदासनामक साधूच्या कुटीत भोजन व्यवस्था झाली. रात्री अनिर्वचनीय निद्रासुख लाभले.

सकाळी सकाळीच कोटेश्वर सोडले आणि रक्ती आव पडायला सुरुवात झाली. चिखलदा येथील शिवमंदिरामध्ये दुपारी कसाबसा येऊन दाखल झालो. भिलखेडा येथे ठेवलेल्या वस्तू आणवल्या. दिवसभरात किमान पंचवीस वेळा शौचास जावे लागले. साधू समाजामध्ये असा नियम आहे की, बहिर्दिशेला जाऊन आल्यावर स्नान केले पाहिजे. मंदिरात वस्ती केलेली. कळ आली की, दोन फर्लांगावरील मैयाचा काठ गाठायचा. पुलाखाली विधी उरकायचा. स्नान करायचे व मंदिरात परतायचे. तीन-चारदा असे झाल्यावर विचार केला की, यातच सारा शक्तिक्षय व्हायचा. आंघोळ करकरून गारठायला व्हायचे. यास्तव पुलाच्या बाजूलाच पदपथावर आडवे पडून राहावे. पुलावरून पाण्याचा मोठा पाइप गेलेला. त्यालाच एक नळ जोडून पाण्याची व्यवस्था केलेली होती. आयतीच सोय झाली.

आमांशाचा एवढा त्रास यापूर्वी झाला नव्हता. परिक्रमा पुरी व्हायला थोडाच अवधी असताना हे विघ्न उपटले होते. त्यामुळे परिक्रमा खंडित तर होणार नाही ना, अशी कुशका क्षणभर स्पर्शून गेली. शरीर थकलेले होते, तरी अंतःकरण अखंड उल्हासित ! एखादा दिवस येथे विश्रांती घ्यावी असा एक विचार होता; परंतु ललितकुमारने पुढे जायचा आग्रहच धरला. अखेर मलवाडा येथील संतदासांच्या कुटीत आश्रयास आलो. रक्ती आव पडतच होती. वाटेत बऱ्याच वेळा बसावे लागले. आता निव्वळ कळच यायची. नुसते पाणी ओतूनच परतायचे असा क्रम कुटीत आल्यावर सुरू राहिला. संतदासांनी मात्र चांगली व्यवस्था केली. साखरपाणी आणि लंघन यांच्या योगाने दोनच दिवसांत आराम पडला. शरीराचा भोग तटस्थपणे भोगण्याची युक्ती साधली की, मग वैषम्य वाटत नाही. रक्तशुद्धी म्हणजेच शरीरशुद्धी झाली असे समजून शांत राहत असे.

जून महिना लागला. वादळी पावसाची सुरुवात झाली. महाराष्ट्रात रोहिणीचा पाऊस सुरू झाला असणार. सेमलदा गावात वस्ती करण्याबाबत कुणीतरी सुचविले; पण तसाच पुढे निघालो. मैयाचा आदेश झुगारला गेला. या भागातील वाळवंटात स्थापलेली अनेक लहानलहान शिवलिंगे पाहत, मंदिरांतील उद्ध्वस्त अवशेष पाहत पुढे चाललो. एका

मंदिरातील नंदीचे शिरकाण केलेले, तर दुसऱ्या मंदिरांतून नंदीचे उच्चाटन झालेले दिसले. आकाशात ढगांनी दाटी केली आणि पावले झपाझप उचलू लागलो. ललितकुमारला धावडवत नेले आणि उरदणा गावात एका घरी आश्रय घेतला. तत्क्षणी धो धो पर्जन्यवृष्टी सुरू झाली. [परिक्रमेची सांगता थोड्याच दिवसांत होणार म्हणून उत्साह वाढीस लागलेला. बैलगाडीचे बैल घरी परतताना जसे दुडक्या चालीने चालतात तशी ओढ स्वाभाविकच लागलेली.]

दुपारपर्यंत जवळजवळ बारा मैलांची रपेट करून चिडी संगमावरील शुक्लेश्वर महादेवाच्या मंदिरात पोचलो. प्रथमतः येथील महात्मा आम्हास थारा देण्यास नाखूष दिसला. अतिथीला पुढील घरे दाखविणाऱ्यांच्या जातकुळीतील असावा बहुधा; पण आम्ही पडलो महाखट. आता यापुढे कुठे जाणार नाही, येथेच राहणार, असा निश्चय व्यक्त केला. मग मात्र त्याला आमच्या तपोबला( ?) पुढे [हा त्याचाच शब्द !] नमावे लागले आणि त्याने आमची चांगली बडदास्त ठेवली. जेवण बनविले. गव्हाचे टिक्कड आणि आंब(ट)रस. घरचा आमरस नाही तर नाही, पण कसा का असेना मैयाने या हंगामातील आमरसाची इच्छा पुरविली. अजून वेळ गेलेली नव्हती. पुढे कुठेतरी सुंदर आमरसपुरीचे जेवण मिळूनही जाईल कदाचित. बऱ्याच दिवसांची दैनंदिनी लिहून काढली. उत्साह बराच टिकून राहिला. हा महात्मा नंतर बराच आस्थेवाईक वाटला; परंतु ललितकुमारची सेवा करायला मात्र नाराज दिसला. माझ्याबरोबर असल्याने त्याला हे कर्म करावे लागले. नंतर त्याने ललितला माझी साथ सोडू नये असा सल्लाही दिला.

या ठिकाणी बाभळीचे बनच जणू काही. त्यामुळे राजस्थानामधून उंटांचे तांडेच्या तांडे येथे उदरनिर्वाहासाठी येतात असे समजले. खूप उंट, उंटिणी व त्यांची पिले तिथे होती. उंटिणीचे दूध पिण्याचाही योग आला होता; पण 'नको' म्हटले. निसर्गाची लीला कशी विलक्षण पाहा ! आम्ही काट्यांना भितो, त्यांच्यापासून दूर पळतो पण त्यांनासुद्धा या जगात निरंकुश वाढू द्यायला निसर्ग तयार नाही. शेळ्या, उंट यांच्यासारखे शत्रू त्यांना निर्माण करून ठेवलेले आहेत. 'जीवो जीवस्य जीवनम्' हेच या निसर्गातील एकमेव सूत्र आणि तत्त्व !

राणी रूपमतीचा मांडूगड वा मांडवगढ. इतिहासप्रसिद्ध. मैयाच्या किनाऱ्यापासून वीस मैलांहूनही अधिक अंतरावर असावा. चिडीसंगमाहून पुढे हतनोर, खुजावाँ असे मैयाकिनाऱ्यानेच सरळ चालत राहिलो तर परिक्रमा भंग पावते. त्यामुळे वाकडी वाट करून या मांडूगडावरील नर्मदाकुंडाचे दर्शन आणि स्नान करावे लागते. मांडूगढाचा राजा नर्मदेचा महान भक्त. त्याच्या भक्तीने संतुष्ट झालेली नर्मदामाता गडावरील कुंडात गुप्तरूपाने येऊन राहिली आणि तिने राजाला असे आश्वासन दिले की, 'परिक्रमेचा मार्ग मांडूगढावरूनच जाईल. परिक्रमावासीयांना येथे यावे लागेल. अन्यथा परिक्रमा खंडित होईल.'

हा गड पुरातन असावा. पुरातन काळी गडावर खूप वस्ती असावी असे

ठिकठिकाणच्या किल्ल्यांकडे पाहिले की, ध्यानी येते. किल्ल्यांची भक्कम आणि प्रचंड स्वरूपाची बांधकामे पाहून थक्क व्हायला होते. पाश्चात्त्यांच्या प्रभावामुळे आम्ही आमच्या पूर्वजांचे असाधारण कर्तृत्व विसरलो आहोत. आधुनिक विज्ञानाच्या डोळे दीपविणाऱ्या प्रगतीमुळे पूर्वीचे लोक अडाणी होते असे आम्ही इतिहासात शिकतो. परदास्यश्रृंखलेमध्ये बद्ध होऊन आम्ही वैचारिक गुलामी नकळत स्वीकारलेली आहे आणि त्यामुळेच की काय आमच्या अभिमानास्पद वैभवाला वंचित झालो आहोत. असे असले तरी पुरातनकालीन शिल्पे आणि वाङ्मय आजही पूर्वसूरींच्या ज्ञानाच्या उत्तुंग झेपेची साक्ष देत दिमाखात मिरवीत आहेत. ही प्रचंड बांधकामे, सुंदर कुशलतेने विनटलेली कोरीव कामे काय त्यांच्या अडाणीपणाची द्योतक आहेत ? आजच्या विज्ञानानेही स्तिमित व्हावे अशी ही अचाट कामे खरोखरच आमच्या पूर्वजांविषयीचा आदर द्विगुणित करतात.

मांडूगड बारातेराशें फूट उंच असावा. पूर्वेकडील चढण गाडीवाटेसारखी आहे. महाराष्ट्रातील काही किल्ल्यांवर चढताना होणारी दमछाक येथे नाही. सायंकाळची वेळ आणि आपल्यामध्येच दंग असल्यामुळे या किल्ल्यांची भयंकरता आणि भव्यता जाणवली नसावी कदाचित. गडावरील पठारी भाग मात्र विस्तीर्ण. येथे काही हजारात वस्ती असावी. तालुक्याचे ठिकाण असल्याने येथे कचेऱ्या, बाजारपेठ, शासकीय वृक्षरोपणीही आहे. धारपासून येथे येणाऱ्या सडकेवरून वाहतूकही सुरू असते.

येथील राजवाड्याचे बांधकाम मोगल शैलीचें. संपुर्ण संगमरवरी बांधकाम. सुंदर कोरीव काम आजही सुस्थितीत. गडावर शेतीही केली जाते. येथील राणी रूपमतीचा महाल खूप उंचावर आणि एका टोकास. आज फक्त दगडी वास्तूच उरलेली आहे. काळ्या दगडातील ही दुमजली इमारत– वरून आसमंताचे विहंगम दृश्य चित्ताकर्षक. इतक्या अंतरावरूनही मैयांचे दर्शन घडते. या ठिकाणी वाऱ्याचा प्रचंड वेग धोकादायक असा. फार जपावे लागते.

गडावरील नीलकंठ महादेवाचे स्थान साठ-सत्तर फूट खोलवर. स्थान पुरातन असले, तरी मंदिर अकबरकालीन असल्याची शिला लावलेली आहे. संपूर्ण काळ्या दगडातील काम; परंतु मोगलकाळात बरीच मोडतोडही करण्यात आलेली आहे. मंदिरासमोरील कुंडांतील पाणीच वापरतात; परंतु कधी उपसत नाहीत. आतील पाण्यात आम्रवृक्षाची पाने व फळे पडतात व ती कुजतात. तेच काळे पाणी वापरायचे. समाधान एवढेच की, यात उतरून कोणी स्नान करीत नाही. मंदिरासमोर खिरणीचे झाड पाहिले. त्याची बकुळीच्या फळांसारखी छोटी पिवळट रंगाची फळे तुरट गोड अशी. मध्य प्रदेशात टिमरू, मोह यांचीही खूप झाडे. टिमरूची फळे लोक आवडीने खातात म्हणे; पण ती खाल्ल्याने माझ्या तोंडाची चवच गेली. मोहाची फुले रसाळ पण मदभरी, किंचित् उग्रट. थोडीशी खाल्ल्यावर कंटाळा येतो. यांच्यापासून दारू तयार करतात.

दुपारी राममंदिरात गेलो. येथील रामाची मूर्ती चतुर्भुज आहे. मंदिर साध्या बांधणीचे.

एका सीतारामांनी हसतमुखाने स्वागत केले. या ठिकाणी परिक्रमावासीयांना सदावर्तही दिले जाते. महत रामनारायणदास काशिक्षेत्री शास्त्राभ्यास केलेले. प्रेमळ स्वभाव व शालीन वृत्ती. विद्वत्तेचा दर्प कुठेच आढळला नाही. दुपारच्या जेवणात वाटीभर मधुर आमरस होता. जेवणानंतर निरोप घेतला. महंतांच्या बोलण्यात आस्था होती. राहण्याचा आग्रह झाला. पैसे पाहिजेत का अशी विचारणाही केली. अखेर निघताना त्यांनी प्रसाद म्हणून पाच आम्रफळे दिली.

रेवाकुंड गडावरच; पण पाच किलोमीटर अंतरावर. सर्वत्र विविध झाडे वाढविलेली दिसली. रेवाकुंडापाशी पोचताच अपेक्षाभंग झाला. पाणी इतके गढूळ आणि त्यावर एवढे शेवाळ माजलेलें की, तेथे स्नान करण्याचा धीरच झाला नाही. माझे स्नान मार्जनावरच उरकले. ललितने मात्र अत्यंत श्रद्धेने आत बुडी मारली. गडावरून उतरण्याची ती वाट मोठी बिकट; परंतु विनाकष्ट उतरलो.

रात्रीचा मुक्काम एका खेडेगावात करून पहाटे चांदण्यात पुढील रस्ता पकडला आणि दुपारी साध्वी अहल्याबाई होळकरांनी वसविलेल्या महेश्वर नगरीत आलो. बाजीराव पेशव्यांनी उत्तरेत मुसंडी मारल्यानंतर अनेक मराठी माणसे उत्तर हिंदुस्थानात स्थायिक झाली. त्यात होळकर, शिंदे आणि गायकवाड या मराठी सरदारांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. रघुनाथराव पेशव्यांनी तर अटकेपार भगवा ध्वज फडकवला आणि मोगली सत्ता खिळखिळी करून सोडली. गुजराथमधील बडोद्यास गायकवाड, मध्य प्रदेशातील इंदूर येथे होळकर आणि ग्वाल्हेर येथे शिंदे यांनी आपला स्वतःचा जम बसविला. मल्हारराव होळकरांची सून साध्वी अहिल्याबाई मोठी कर्तबगार. अत्यंत सालस, धर्मपरायण आणि बुद्धिमान. प्रजाहितदक्ष. इतर संस्थानिकांप्रमाणे ऐषारामात दिवस न घालविता तिने धर्मोद्धाराचे आणि समाजोन्नतीचे कार्य अत्यंत निष्ठापूर्वक केले. काशिविश्वेश्वर, सोरटी सोमनाथादी अनेक मंदिरांचे जीर्णोद्धार केले. गंगा, नर्मदादी नद्यांवर ठिकठिकाणी घाट बांधले. ठायीठायी धर्मशाळा बांधल्या. पाणपोया उभारल्या. अन्नछत्रे उघडली. विद्वानांना आश्रय दिला. विविध कलांना प्रोत्साहन दिले. नर्मदातटाकी महेश्वर नगरी वसविली. आणि विणकरांना आश्रय देऊन वस्त्रोद्योगास चालना दिली. आजसुद्धा महेश्वरी साड्या प्रसिद्ध आहेत.

येथील नर्मदेचा घाट केवढा प्रशस्त आणि देखणा! दुपारच्या त्या रणरणत्या उन्हात पर्णपाचूच्या वर्णाचा विस्तीर्ण गहिरा जलाशय वाऱ्याच्या झुळकांनी मंद मंद आंदोळत होता. त्यावर उठणाऱ्या त्या लहरी घाटाशी लपाछपीचा डाव खेळत खुदुखुदू हसताना पाहून काही काळ भान हरपून गेले. सारे शरीर निवून गेले. घाटावरच्या त्या राजवाड्याचे शिल्प अप्रतिम! अंतर्बाह्य कोरीव कामाने मढविलेले. खांब, भिंती, तुळया, छते, प्रवेशद्वारे, खिडक्या, जिने, कमानी, चौथरा सारे सारे कसे कोरीव व रेखीव. विविध प्रकारच्या नक्षी, फुले, फळे, पशुपक्षी इत्यादींनी विनटलेले ते शिल्प म्हणजे स्थापत्यशास्त्राचा एक सुंदर

आदर्शच जणू! असे देखणे शिल्प निर्माण करण्यात कारागिरांनी आपल्या कुशलतेची परमावधीच गाठलेली. नजरेने अखंड पीत राहावे आणि तरीही अतृप्तीच जाणवावी अशी जी एक अवस्था असते त्याचा प्रत्यय येथें येतो. आज मात्र या राजवाड्याच्या काही भागात शासकीय कार्यालये वसली आहेत.

कोठावा येथील कुटीमध्ये चातुर्मास करण्याचा ललितने निर्णय घेतला. त्याची संगत सुटली. पाय खूप झिजल्याकारणाने व हे स्थान आवडल्यामुळे तो तेथेच राहिला. खूप उंच डोंगरावरील ती कुटी. येथे शंभरेक गाईगुजी असूनही दुधाचे दुर्भिक्ष्य. डोंगराळ भागातील गुरांची अवस्थाच अशी. चढउतार करण्यातच त्यांच्या शरीरातील सारी शक्ती खर्च होते; मग कुठले दूध? कुटीच्या समोरच नर्मदा-कावेरी संगम. वास्तविक कावेरी हा मैयाचाच दुसरा प्रवाह. बहुधा फत्तेगड येथे मैयाचा प्रवाह दुभंगतो आणि मधील पर्वताला वळसा घेऊन हे दोन्ही प्रवाह कोठावा येथे एकत्र येतात. मधल्या पहाडावरच ॐकारेश्वरचे प्रसिद्ध ज्योतिर्लिंग वसलेले असल्यामुळे परिक्रमेच्या काळात तेथे जाताच येत नाही. परिक्रमापूर्ती झाली की ॐकारेश्वरावर नर्मदाजलाचा अभिषेक करावयाचा असतो.

परिक्रमा आरंभिली त्या वेळी एकटा होतो आता तिची अखेर आली त्या वेळीही एकटाच उरलो. आपल्या जीवनात देखील आपण एकटेच येतो आणि जातोही एकटेच. मधल्या काळात अनेक सखेसोबती भेटतात; पण तो गोतावळा मागेच राहतो. या परिक्रमेतसुद्धा मैयाने अनेक सोबत्यांच्या रूपात साथ केली; पण शेवटी सीतावाटिका, धावडीकुंड, लक्कडकोटची झाडी एकट्यानेच पार करीत पाच महिन्यांनंतर पुन्हा नेमावरच्या ब्रह्मचारींच्या आश्रमात प्रविष्ट झालो. प्रथम येथे आलो त्या वेळी किंचित हुरहूर अंतरी दाटलेली होती; पण आज एका आगळ्याच शांतीनें अंतःकरणाचा गाभारा भरून राहिला होता.

या विसाव्या शतकात परिक्रमा किती सुलभ झाली आहे! हजारो वर्षांपूर्वी किंबहुना इंग्रजी अमदानीतही परिक्रमा करताना किती अडचणी येत असतील! एकेकट्याने प्रवास करायचा म्हणजे खरीखुरी तपश्चर्याच होती ती! या काळातही हिमालयातील पहाडातून व अरण्यातून भटकणे किती थरारक असेल नाही? या परिक्रमेत मात्र असा चित्तथरारक अनुभव दुर्मिळ झाला आहे, तरीही लोकांना परिक्रमा करणे म्हणजे महाभयंकर कर्म वाटते, मोठा त्याग वाटतो. पोटभरू परिक्रमावासीयांच्या वृत्तीमुळे सदावर्ते रोडावली असली तरी अजूनही पुरेसे अन्न मिळत असते. कुणी पैसा-अडका, वस्त्रप्रावरणही देत असतो. हजारो वर्षांपूर्वी काय स्थिती असेल? क्वचित् कुठे ऋषिमुनींचे आश्रम असतील. कंदमुळे, फळे यांनी जंगले खच्च भरलेली असतील एवढेच! पण अनेक श्वापदांनी गजबजलेल्या जंगलातून, चोरलुटारूंच्या जाचातून सहीसलामत पार पडणे महाकठीण असेल, तरीही ही परंपरा आजतागायत अखंड आहे याचे कौतुक वाटते. नर्मदामाईची ही करुणा होय.

सारा चित्रपट डोळ्यांपुढून सरकून गेला आणि आता कसे शांत शांत वाटते आहे.

थोड्याच वेळापूर्वी मुरलीधर त्रिवेदींबरोबर मैयाच्या पात्रात गळाभर पाण्यातून अर्ध्या अंतरावर आत जाऊन आलो. त्यांनी दाखवले ते नर्मदेचे नाभिस्थान. कोणी ॐकारेश्वराला मैयाचे नाभिस्थान मानतात. नर्मदामैयाःच्या सान्निध्यात असताना क्वचित विकल्प आले. उगाच संशय जागा झाला; परंतु मैयाने म्हणा वा गुरुदेवांनी म्हणा अखंडपणे पाठीशी राहून प्रतिपाळ करून या आवर्तनाची सांगता करविली. ॐकारेश्वरला जाऊन जलाभिषेक करण्याचा मानस नाही. तसली शास्त्रोक्त परिक्रमा होतीच कुठे? परिक्रमेचे फळ लोक म्हणतात तसे मिळाले असो वा नसो; पण परिक्रमा निर्विघ्नपणे पार पडली हे फळ अलौकिकच नव्हे काय? कृपाप्रसादच तो. मन मैयाच्या ठायी रुंजी घालीत आहे. त्यामुळे मैयाचा निरोप घ्यायचा तो केवळ शरीरानेच.

■

# नर्मदापरिक्रमेच्या मार्गावरील गावांची माहिती

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| | | **उत्तर तट** | | |
| १ | ९-१-८३ रविवार | नेमावर | | नर्मदेचे नाभिस्थान, ग्वाल टेकडी, सिद्धस्थान, सिद्धेश्वर मंदिर, राधाकृष्ण मंदिर, विश्वनाथ ब्रह्मचारी यांचा आश्रम. (परिक्रमेचा आरंभ) |
| २ | | जामनेर | २ | जांबुवती संगम, बाबा आत्माराम समाधि |
| ३ | | गोनी संगम | ३ | गोनी नदी संगम |
| ४ | ९-१-८३ रविवार | चिचली | ३ | ककेडी संगम (रात्री राममंदिरात वस्ती) |
| ५ | | बिजलगाव | ८ | |
| ६ | १०-१-८३ सोमवार | छिपानेर | ६ | धुनीवाले दादाजींच्या आश्रमात वस्ती |
| ७ | | रानीपुरा, चौरसाखेडी, सातदेव टिंगला, सीलकंठ | १० | सातदेव येथे पाताळेश्वर, सीप नदी संगम, राममंदिर |
| ८ | ११-१-८३ मंगळवार | मंडी, नीलकंठ | ६ | नीलकंठेश्वर महादेव, कोलारनदी संगम भीमपाल. (महंत वैकुंठगिरीमहाराज यांच्या आश्रमात) |
| ९ | १२-१-८३ बुधवार | छिदगाव (काळी) | ६ | (मनमोहन निराला यांच्या कुटीत) |
| १० | | खामगाव, बाबरी | ५ | टिमरनी संगम |
| ११ | | जाजना, खेगाव, मठागाव, निलाई, मर्दानपुर | १३ | मर्दानघाटावर शिवमंदिर |
| १२ | १४-१-८३ शुक्रवार | आवली घाट | ३ | पुरातन मठ, शिवमंदिर, नर्मदाडोह (ब्रह्मचारींच्या आश्रमात) |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| १३ | १५-१-८३ शनिवार | राजिम पिथोडा तालपुरा घाट | १० | (पंजाबी संन्यासी रामानंदपुरी यांच्या कुटीत) |
| १४ | | जहानपुरा, सातत्तुमडी | ३ | |
| १५ | | नीनौर, मकोडिया | ५ | भागनेर नदी संगम, पंचमुखी हनुमान, पुढे सप्तधारा संगम. |
| १६ | | मडकला, मंडी, होलिपुरा | ६ | |
| १७ | | तिंदरी नदी संगम | ४ | तिंदरी नदी संगम |
| १८ | | महुआघाट | ३ | |
| १९ | १६-१-८३ रविवार | कालाकोह, शिरहाट, बुधनी | १० | राममंदिर (बुधनी येथे नर्मदा मंदिरात) |
| २० | | गडरिया घाट | २ | गडरिया नाला संगम, बंगाली बाबांचे स्थान |
| २१ | | जैतपुरा घाट | ३ | जैसिंह नदी संगम |
| २२ | | जोशीपुरा, रामनगर | ६ | नर्मदा मंदिर |
| २३ | | बांदराभान | ४ | पुरातन मृगनाथ आश्रम |
| २४ | | जहानपुर | ३ | चांदनी नदी संगम |
| २५ | १७-१-८३ सोमवार | शहागंज | ३ | (रमेश पुरोहित यांच्या घरी) |
| २६ | | मडावन (बनेठा) | ४ | नागाबाबांचा आश्रम |
| २७ | | इंगोरिया, कुसुमेली | ५ | कुसुमेली नदी संगम |
| २८ | | सनोडिया, हतनोर | ३ | राममंदिर |
| २९ | | सरदारनगर | ३ | रामजानकी मंदिर |
| ३० | १८-१-८३ मंगळवार | जैतपुरा, नांदनेर | | पुरातन ॐकार, रामजानकी, नर्मदा मंदिर (पं. हरगोविंद पाठक यांच्या घरी) |
| ३१ | | कंकर घाट, कुसुमखेडा | ५ | सत्यनारायण मंदिर |
| ३२ | | भारकच्छ | ८ | रामजानकी मंदिर, मंदाकिनी क्षेत्र |
| ३३ | | गडखारा | २ | दुमजली भोलेश्वर आश्रम |
| ३४ | | गोराघाट | ५ | राधाकृष्ण मंदिर |
| ३५ | | बिसरे, सनखेडा | ६ | रामजानकी मंदिर |
| ३६ | | मोतलसर | ३ | नारदी नदी संगम, नारदेश्वर मंदिर |
| ३७ | १९-१-८३ बुधवार | बगलवाडा | | वरुणगंगासंगम, रामजानकी मंदिर (धर्मशाळेत वस्ती) |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ३८ | २१-१-८३ गुरुवार | सतरावन, भोपा, मोआर, मांगरोल | | तेदानी नदी संगम, मांगरोल येथे, हनुमान मंदिर (रेवाविश्राम पाठशालेत) |
| ३९ | | कोटवार, अलिगंज | ५ | महादेव मंदिर |
| ४० | | सिवनी, बराह, खुनिया, केतुधान | ११ | राधाकृष्ण मंदिर, नजीक खांड नदी संगम. |
| ४१ | २१-१-८३ शुक्रवार | मोहोड | २ | (धनराजगिरी महंतांच्या आश्रमात) |
| ४२ | | नरहरा, उडिया घाट, बौरास | ११ | रामजानकी मंदिर मेळा भरतो |
| ४३ | | चौरास, बांसखेडा, केलकच्छ | ११ | |
| ४४ | | अनघोरा | ३ | जनकेश्वरतीर्थ |
| ४५ | २२-१-८३ शनिवार | पतईघाट | ५ | एक खांबी महादेव, सर्व सिद्धेश्वर मंदिर (बालकराम स्वरूपानंदांच्या आश्रमात) |
| ४६ | | सिद्धनाथ, शुक्लघाट | ६ | पुरातन सिद्धांची समाधि, स्वयंभू शिवलिंग सीनोर नदी संगम, |
| ४७ | | रिछावर, रमपुरा, नाईखेडा, टिमरावन | ६ | रामजानकी मंदिर |
| ४८ | २३-१-८३ रविवार | हीरापूर | ३ | (चंद्रभान पाठकाच्या शेतावर) |
| ४९ | | करोंदी | ८ | वैष्णवसाधूची कुटी, चैत्रपौर्णिमेस मेळा |
| ५० | | बिलथारी | ६ | बलीतीर्थ (दुपारी ब्रह्मचारींच्या कुटीत) |
| ५१ | | सिमरिया, झिरी | ५ | रामजानकी मंदिर |
| ५२ | २४-१-८३ सोमवार | वराह कढाई, छत्तर पूर | ५ | (शांतीलाल बाबांच्या संगतीत) |
| ५३ | | बैलपूर, खिरी, रुकवारा, चाबरपांठा, ब्रह्माण्ड घाट | १३ | चारशे वर्षांपूर्वीचे रामजानकी मंदिर ब्रह्मेश्वर व शिव मंदिर |
| ५४ | | सातधारा | २ | भीमकुंड, अर्जुनकुंड, ब्रह्मकुंड, सूर्यकुंड अशी सप्तकुंडे आहेत. |
| ५५ | | सगुनाघाट | ८ | |
| ५६ | | धुवाँधार | ३ | प्रपात |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ५७ | २५-१-८३ | गुर्सी | ३ | (धर्मशाळेत वस्ती) |
| ५८ | मंगळवार | रामपुरा, केरपाणी | ७ | गुंफा |
| ५९ | | बछुआखेडा, पिठोरा | ६ | पुरातन राममंदिर, गोंड राजाच्या राजवाड्याचे भग्नावशेष |
| ६० | २६-१-८३ | मुर्गाखेडा | ३ | (साधूच्या कुटीत) |
| ६१ | बुधवार | जैतपूरा, डोंगरपुरा, रोहिणी, कुराया, अभोग, नीमखेडा, हीरापूर, जोगी पुरा | १३ | हरिणीनदी संगम, राजवाडा, दूरवर आद्यशंकराचार्यांची गुहा |
| ६२ | | पालदा | ४ | पार्वती शिवमंदिर |
| ६३ | | ब्रह्मकुंड | ३ | जमिनीतून झरे, देवशिला |
| ६४ | | कुडा, झलोन | ९ | रामजानकी मंदिर |
| ६५ | २७-१-८३ गुरुवार | सुन्नाचा, छरौवा | ८ | सहस्रावृत तीर्थ, सौगंधी वनतीर्थ, (त्यागी प्रेमदासींच्या कुटीत) |
| ६६ | | अगवा, गोरा | ६ | नर्मदा, शिव मंदिर, ब्रह्मोदतीर्थ |
| ६७ | | नीमखेडा, झांसी, बेलपठार | ६ | बलीची यज्ञभूमी |
| ६८ | | मालकछ, जलेरी | १० | शिवतीर्थ मंदिर, अभिषेकपात्र |
| ६९ | | सिद्धघाट | ३ | उंचावर शिवमंदिर |
| ७० | २८-१-८३ | रामघाट, पिपरिया | ३ | (केवटाच्या घरी) |
| ७१ | शुक्रवार | भेडाघाट | ८ | दुपारी राजहंस संस्कृत पाठशालेत |
| ७२ | | गोपालपुर | ५ | जलप्रपात |
| ७३ | | लमेटा | २ | सरस्वती नदी संगम, पिपलादमुनी तपस्याश्रम |
| ७४ | | त्रिशूलघाट, रामनगर | ५ | त्रिशूलभेदतीर्थ, मुकुट क्षेत्र, हनुमान मंदिर |
| ७५ | | तिलवाडा | २ | नवा आश्रम, पुरातन तिलभाडेश्वर |
| ७६ | २९-१-८३ शनिवार | ग्वारीघाट | ५ | श्रीपाद आश्रम, नर्मदामंदिर (स्वामी प्रेमानंदांच्या आश्रमात) |
| ७७ | | जलहरी घाट, गौरसंगम | ५ | गौर नदीचा संगम |
| ७८ | ३०-१-८३ | नादिया, वसा घाट | ११ | (संन्याशांच्या कुटीत) |
| ७९ | रविवार | नंदिकेश्वर | ८ | हिंगना नदी संगम |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ८० | ३१-१-८३ | छूलिया घाट | ८ | (संन्याशांच्या कुटीत) |
| ८१ | सोमवार | टाटीघाट | १३ | |
| ८२ | १-२-८३ मंगळवार | छुटका, कूडापांठा | १० | दुर्गा, शिव मंदिरे, महावीर कुटी (साधूच्या कुटीत) |
| ८३ | | पिवरिया, किकरा, पद्मी | ८ | बाइली संगम |
| ८४ | | कुरभे चिरी | ७ | महोदर संगम |
| ८५ | २-२-८३ बुधवार | नारायणगंज, चिरई डोंगरी | १० | गरम पाण्याचे कुंड (संन्याशाच्या कुटीत) |
| ८६ | | बनारी, फुलसागर | १० | |
| ८७ | | जलेरी, सहस्रधारा | १० | सहस्रबाहुतीर्थ, त्यागी आश्रम |
| ८८ | ३-२-८३ गुरुवार | गौदी मंडला | ६ | गोंड राजाचा किल्ला, राजेश्वरी, काली, व्यासनारायण, शिव, नर्मदा, हनुमान मंदिरे, हनुमानघाट, संत सीताराम दासजीचा आश्रम-समाधी (आश्रमात वस्ती) |
| ८९ | | खैरी, अमावाला, देवरी, पादरी, पुतरा, रामनगर | १६ | |
| ९० | ४-२-८३ शुक्रवार | जामगाव, बघनेरा, मोहिया, पटपुरा, पौडी, लिंगा | १८ | (मानोट येथे वटवृक्षाखाली) |
| ९१ | | खैरी, कौआ डोंगरी, बिलगडा | १० | शंकर मंदिर |
| ९२ | ५-२-८३ शनिवार | दुपट्टा, चिमका टोला, चक्रदेही | १० | दुपट्टा संगम (पटेलाच्या खोपटात) |
| ९३ | | खापा, फडकी, सिवनी | ११ | |
| ९४ | ६-२-८३ रविवार | कुटराई घाट | ६ | सनगी नदी संगम, पुढे बराडी संगम (साधूच्या कुटीत) |
| ९५ | | फुलवाई, सारंगपूर | ७ | |
| ९६ | ७-२-८३ सोमवार | कनेरी, कछारी, जैतपुरा, दुवा, पटवारा | १५ | (ताकिम घाटावरील साधूच्या कुटीमध्ये) |
| ९७ | | रमपुरा, मालपुरा | ८ | कन्हैया नदी संगम |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ९८ | ८-२-८३ मंगळवार | सिंगारपूर, घूसिया | ८ | (हिरालाल नंदेश मास्टरजींच्या घराजवळील खोपटात) |
| ९९ | | विक्रमपूर, साहपूर | १५ | |
| १०० | | जोगी टिकरिया | १० | राम, शिव मंदिर, कटोरी संगम |
| १०१ | ९-२-८३ | देवरा | ३ | (छिद्दीलालच्या घरी) |
| १०२ | बुधवार | लुकापुर, भेसलाघाट, लूटेगाव | ७ | करारी नदी संगम, लछमन मंडवा, रामतीर्थ |
| १०३ | १०-२-८३ गुरुवार | रामघाट, अधीरघाट, रुसी, हर्रा टोला, झंडीटोला कुंडी कापा | १३ | दुधी येथील साधूच्या कुटीत कुल्हाडी संगम |
| १०४ | ११-२-८३ शुक्रवार | बीजापूर, चंदनपूर, लालपुरा, पाखाटोला, खुनियाटोला, | | टेडी संगम, (वसंतपूरच्या प्राथमिक शाळेत) |
| १०५ | १२-२-८३ शनिवार | कंचनपूर, सोभनाथ | १५ | देवरी नदीसंगम (सोभनाथ येथील पटवारीच्या धर्मशाळेत) |
| १०६ | १४-२-८३ | पीपल टोला, दम्हेडी, | ३ | (टिकईटोला येथील शाळेत) |
| १०७ | सोमवार | भीमकुंडी | १५ | |
| १०८ | १५-२-८३ मंगळवार | सरवाही, मरवाही, विलासपूर, पडरिया, महंदी टोला, हरई टोला | १५ | (बेलघाटावरील साधूच्या कुटीत) |
| १०९ | | मीरापूर, फर्रासेवर, दमगढ | १३ | |
| ११० | | दूधधारा, कपिलधारा | ५ | |
| १११ | | कोटितीर्थ, चक्रतीर्थ, | ६ | कपिल पिप्पला संगम |
| ११२ | १६-२-८३ बुधवार | दैत्यसदन, अमरकंटक | २ | नर्मदेचे उगमस्थान. अनेक मंदिरे व आश्रम. उगमस्थानी नर्मदाकुंड व मंदिर. महाशिवरात्रीस जत्रा. (नामदेवांच्या कुटीत) |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| | | **दक्षिणतट** | | |
| १ | | माईचा बगीचा | २ | |
| २ | | सोनमुढा | १ | शोण नदीचा उगम |
| ३ | २१-२-८३ सोमवार | अमरकंटक | ३ | मार्कंडेयाश्रम, भृगुकमंडल व मंदिर (साधूच्या कुटीत) |
| ४ | | कबीर चौथरा | ५ | |
| ५ | | जनकपूर | ७ | सडकमार्ग |
| ६ | | करमंडल | ३ | करगंगा संगम. नर्मदा ६ कि. मी. वर |
| ७ | | करंजिया, थानाटोला, रामनगर | ११ | नर्मदा ६ कि. मी. वर |
| ८ | | कण्वसंगम | ४ | |
| ९ | | तुडारसंगम | ६ | नर्मदा ८ कि. मी. दूर |
| १० | २२-२-८३ मंगळवार | सुवाग्राम, गोरखपूर | १० | सिवनी संगम-नर्मदा ५ किमी. वर (सोहतलाल साहूंच्या घरी) |
| ११ | २३-२-८३ बुधवार | लोटी टोला, मोहतारा | १२ | नर्मदा ५ किमी. दूर (गोहनलाल चौधरी यांच्या घरी) |
| १२ | | गाडासराई | ८ | चिकरार नदी संगम, नर्मदा ८ किमी. |
| १३ | | बोदर | ८ | दूर |
| १४ | | कुकुडमठ | १० | नर्मदा ७ किमी. दूर<br>रणमुक्तेश्वर, शिवमंदिर, गोमती गंगा |
| १५ | | बिछिया | ६ | किनारी आद्यशंकराचार्य मंदिर<br>कोतराल नदी संगम |
| १६ | २५-२-८३ शुक्रवार | डिंडोरी | ८ | राममंदिर, गायत्री मंदिर (जीवनलाल सोनपाली यांच्याकडे) |
| १७ | | रामपुर, इमलिया, सक्का | २५ | सडकमार्ग |
| १८ | २७-२-८३ रविवार | हर्रा टोला | १५ | बाडनेर संगम. नर्मदा ११ किमी वर (धर्मशाळेत वस्ती) |
| १९ | | चाबी, मोहगाव | २६ | जगदग्नीच्या कामधेनूचे स्थान. नर्मदा ८ किमी दूर |
| २० | २८-२-८३ सोमवार | देवगाव | १५ | बूढी गंगा (बइनेर) संगम, जमदग्नेश्वर मंदिर (धर्मशाळेत वस्ती) |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| २१ | १-३-८३ मंगळवार | बिल्वगाव, चंदवारा, रामनगर | १६ | हृदयशाहची राजधानी, किल्ला (गांधी स्मारकात वस्ती) |
| २२ | | सीतारपटन | १० | सुरवननदी संगम, वाल्मिकी आश्रम कार्तिक पौर्णिमेस जत्रा |
| २३ | २-३-८३ बुधवार | मधुपुरी | ८ | ५ किमी अंतरावर योगिनी गुंफा, मार्कंडेयांचे तपस्यास्थान (परिचारिकेच्या बिऱ्हाडी) |
| २४ | | धुगरा, सूरजकुंड | ५ | हनुमान मंदिर |
| २५ | ३-३-८३ गुरुवार | महाराजपूर | ८ | बनजर संगम (राधाकृष्ण मंदिराबाहेर वटवृक्षाखाली स्वामी दिनेशानंदांसमवेत) |
| २६ | | सहस्रधार | ५ | गधैया संगम |
| २७ | ८-३-८३ मंगळवार | मानादेही, सुरनदेही, बुजबुजिया | ८ | (हनुमान भक्त मुस्लिम चौकीदाराकडे) |
| २८ | ९-३-८३ बुधवार | घाघा, अहमदपूर, सुरेंद्रनगर, सालदंडा, सिंगारपुरी | २१ | बर्गी धरणाखाली गावे बुडल्यामुळे नवीन सडकमार्ग |
| २९ | १०-३-८३ गुरुवार | पाटण, केवलारी, ककरा, केदारपुरा, चरगाव, | ८ | (छिंदवाह येथे मैयाकिनारी खोपटात) |
| ३० | | फिंदरई, रोटा | १३ | |
| ३१ | ११-३-८३ शुक्रवार | अनकवाडा, करैया, हनाई, चमरगाव, लेहडी | १६ | (बीजासेन गावात कलावतीबाई या छोट्या गुसाई मुलीच्या घरी) |
| ३२ | | ईसरपूर, पनाररझर, जेम्हेडी, देवरादेवरी | १५ | |
| ३३ | | सूरजपुरा, केलकुटी, सालवाडा | ११ | |
| ३४ | १२-३-८३ शनिवार | चुनिधा, हरदुली, धर्मदा, कॉलनी, बर्गी | ५ | (बर्गी धरणाजवळील शिवमंदिरात) |
| ३५ | | पारा, मगरदा, खिरहनी | १३ | |
| ३६ | | ग्वारी घाट | ५ | |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ३७ | १३-३-८३ | तिलवारा घाट | १८ | (साधूच्या कुटीत) |
| ३८ | रविवार | रतनपूर, घनसौर | १६ | |
| ३९ | | त्रिशूलघाट | ३ | मृगवनतीर्थ, वराहतीर्थ, त्रिशूलभेदतीर्थ धुवाँधार प्रपात |
| ४० | १४-३-८३ सोमवार | लमेठी, सरस्वती घाट | ८ | इंद्रेश्वर, पिपलेश्वर (मैयाच्या वाळवंटात) |
| ४१ | १५-३-८३ मंगळवार | वगदरी, धुधरू (रामघाट) | १० | सनेर नदी संगम, संगमेश्वर मंदिर |
| ४२ | | सगडा, धरती कछार भडपुरा | ७ | |
| ४३ | | भीकमपूर, झांसी, देवगाव | ६ | |
| ४४ | १६-३-८३ | बिलखेडी | ८ | |
| ४५ | बुधवार | जमनिया, धोंधा | ६ | मेळा भरतो |
| ४६ | | ब्रह्मकुंड, बुधघाट | १० | |
| ४७ | १७-३-८३ गुरुवार | सांकलघाट, घाना, मुरवाडा, घुघरी, पिपरिया | १५ | (घुघरी येथे वाळवंटात) |
| ४८ | | कढाइया, गरारू घाट | ८ | प्राचीन गरुड, शिव मंदिरे |
| ४९ | १८-३-८३ शुक्रवार | बमोरी, समनापूर, चिनकी | ७ | (पटेलांच्या धर्मशाळेत) |
| ५० | | झुनार, धुरपूर, पिपरिहा | १० | धुवाँधार धबधबा |
| ५१ | | सगुनघाट, संगमेश्वर | ३ | सेढ संगम, संगमेश्वर शिवमंदिर |
| ५२ | १९-३-८३ शनिवार | खामगाव, सप्तधारा, ब्रह्माण्ड घाट | | राधाकृष्ण, पीसनहारी मंदिर, वराहमूर्ति, (नर्मदा मंदिराजवळील धर्मशाळेत) |
| ५३ | | वडिया, अंडिया, लिंगा | १५ | सूखेन संगम. मकरकुंड |
| ५४ | २०-३-८३ रविवार | घघरोला, पिठोरा, धाना, कोठियाघाट | ११ | शंकर गंगा संगम (मंदिरात वस्ती) |
| ५५ | | भावनेर, बिछु आकुडी, | ५ | |
| ५६ | | थलेरी, ककरा, भटेरा, टिमरावन | ७ | लहेरा संगम |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ५७ | २१-३-८२ सोमवार | रिछावर, सोकलपूर | ११ | नर्मदामंदिर, शंकर नदी संगम संगमेश्वर शिवमंदिर (पतई घाटासमोरील वाळवंटात) |
| ५८ | | उसराल, अनघोरा, गुरियापानी | ६ | रोरा नदी संगम |
| ५९ | | पीपलपानी घाट, सोनाडहर | ६ | नर्मदेत कुंड, भूमानंदस्वामी समाधी |
| ६० | २२-३-८३ मंगळवार | केरकच्छ, महुआखेडा, पिठराज, खिरहाटी, झिकोली नेवार, जमुनाघाट | १६ | नेवार येथे साधूच्या कुटीत<br>नर्मदेमध्ये धर्मशिला |
| ६१ | | संदूक (सिरसिरी), खेरी | ६ | दुधी नदी संगम, स्वामी शिलानंदकुटी |
| ६२ | | बुधनी, सुरेला काटी | १० | अचना नदी संगम |
| ६३ | २३-३-८३ बुधवार | सांडिया, सीवनी | | (राममंदिरात) |
| ६४ | | खेरपाडा, माछा रामघाट | ६ | कृष्णा संगम |
| ६५ | | अजेरा, भानपूर, गलेचा, भटगाव | | उद्ध्वस्त नर्मदामंदिर |
| ६६ | २४-३-८३ गुरुवार | मदनपूर, सांकला, गजनई, मोहोरी, बनखेडी | ११ | (संन्याशाच्या कुटीत) |
| ६७ | | रायन संगम | ३ | |
| ६८ | | ईसरपूर, पामली, रामनगर | ६ | राममंदिर, मारु संगम, पांडवद्वीप |
| ६९ | | सतवासा, झालसेर, सांगारवेडा | ८ | राधाकृष्ण मंदिर |
| ७० | २५-३-८३ शुक्रवार | भारागाव, वोसली, बछवाडा, नसिराबाद, भटवाडा, गणेरा, गौघाट | १४ | वृद्ध रेवाकुंड, १२ योगिनी, ३ सिद्ध स्थान (गौघाट नर्मदामंदिरात) |
| ७१ | | बागलखेडा, आरी, चपलाना | १३ | |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ७२ | | रायपूर, मालाखेडी, होशंगाबाद | ८ | तवा नदीसंगम, सूर्यकुंड, बांदराभान येथे कार्तिक पौर्णिमेस मेळा, होशंगाबाद येथे साठानी घाट, हनुमान, नर्मदा, शिव, शनि, जगन्नाथ इ. मंदिरे, नर्मदा संतसंग भवन |
| ७३ | २६-३-८३ शनिवार | डोंगरवाटा, हासलपूर, रेंढाल | १० | (त्यागीजींच्या कुटीत) |
| ७४ | | पांडुरणा, केवलारी, खोकसर | १० | कौसल्या नदी संगम. गौरीशंकर महाराजांचा आश्रम, समाधी. |
| ७५ | | टिघरिया | ५ | |
| ७६ | २७-३-८३ रविवार | कैलासघाट, नानया, फुलेरा | १० | हथेडा संगम, लक्ष्मीकुंड (कुलंडा गावी पटेलांच्या घरी) |
| ७७ | | आवली घाट, इंद्रावती संगम | ८ | इंद्रावती संगम |
| ७८ | | गवारा भेला, घौघरा, पथौडा, बाबरी | ११ | |
| ७९ | २८-३-८३ सोमवार | डिमार, कजली, चांदवाडा, भिलाडिया | ११ | शिवमंदिर, राममंदिर, राधाकृष्ण मंदिर (शिवानंद स्वामींच्या आश्रमात) |
| ८० | २९-३-८३ मंगळवार | हमीदपूर, लुचगाव, गोंदागाव | ११ | गोमती संगम (नर्मदाप्रसाद चौहानाच्या घरी) |
| ८१ | | गंगेश्वर, छिपानेर | ६ | राम मंदिर, बाबा बजरंगदास समाधी व आश्रम |
| ८२ | ३०-३-८३ गुरुवार | लछेरा, शामसाबाद, जालौद | ८ | हरिहरेश्वर मंदिर, रतिरामबाबांची समाधि (शिवमंदिरात वस्ती) |
| ८३ | | गोवद घाट | ३ | शिव, राम मंदिर |
| ८४ | | सूरजभान, मनोहरपूर, बमोरी, हंडिया | ११ | |
| ८५ | १-४-८३ शुक्रवार | मालकुंड, गोलामेदा | ६ | वाळवंटांत वस्ती |
| ८६ | | सिवनी, उचावनघाट | ७ | नर्मदेचे दोन प्रवाह |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ८७ | | उधाल, लालाखेडी, जोगा किला घाट | १० | प्राचीन किल्ला, नर्मदेच्या दोन धारा |
| ८८ | | भलसाडा, भैसवाडा, अजनाला | १३ | अजनाला संगम |
| ८९ | २-४-८३ शनिवार | लीलधा, गढीघाट | ४ | मेचक संगम. राधाकृष्ण मंदिरात |
| ९० | | पुण्यघाट | २ | प्राचीन मंदिर |
| ९१ | | पाटखेडा | ५ | जलप्रपात, मांधाता तीर्थ |
| ९२ | ३-४-८३ रविवार | भुआनी, लाडवा, बलकेश्वर | | शिवमंदिर (धर्मशाळेत वस्ती) |
| ९३ | | बलडी | ५ | नर्मदा ५ किमी दूर |
| ९४ | | बुनास, नगपुरा | ८ | छोटी तवा संगम |
| ९५ | ४-४-८३ सोमवार | निरगुडिया, खाखा, पूर्णी बलवाडा | १४ | नर्मदा ८ किमी दूर (रात्री वस्ती) |
| ९६ | | भगोनी, चांदेड, सलका पनासा | १८ | माता मंदिर |
| ९७ | ५-६-७ / ४ /८३ मंगळवार, बुधवार, गुरुवार | हनुमत्या, धावडी, पालकी, सातमाता | २२ | धावडी कुंडांत पूजेसाठी बाण मिळतात. धबधबा. कातळावर वाळवंटांत व सातमाता येथील शिवमंदिरात |
| ९८ | | कावेरी संगम | ४ | |
| ९९ | | वाराही संगम, चंद्रवेगा, एरंडीसंगम, पितृतीर्थ ॐकार मांधाता | ६ | ॐकारेश्वर ज्योतिर्लिंग, मार्कंडेय संन्यासाश्रम |
| १०० | ८-४-८३ शुक्रवार | बिलोरा, खेडीघाट (मोरटक्का) | १३ | बिलोरा गावी रजपुताकडे |
| १०१ | | कहार, बडिआली, टोकसर, गोमख | १३ | नीलकंठेश्वर, दूधाधारी महाराजांची समाधी |
| १०२ | | प्रीतनगर, कांकरिया | ५ | नर्मदेमध्ये गंगेश्वर |
| १०३ | | रावेरखेडी | ८ | थोरले बाजीराव पेशवे यांची समाधी |
| १०४ | | खडकसंगम | २ | |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| १०५<br>१०६ | ९-४-८३<br>शनिवार | बकावा, मर्दाना<br>नवगाव, मलगाव,<br>भटियाण, सातपीपला | ८<br>१० | मोरध्वज तीर्थ (शिवमंदिरात) |
| १०७<br>१०८<br>१०९ | १०-४-८३<br>रविवार | लेपाघाट<br>माकडखेडा<br>कहोरा | १०<br>३<br>३ | वेदानदी संगम, (वेदवेदेश्वर मंदिरात)<br>मर्कटी संगम, मर्कटीतीर्थ<br>मांडव्याश्रम गुंफा |
| ११०<br><br><br><br>१११<br><br>११२ | ११-४-८३<br>सोमवार | नावडी टोला,<br>सहस्त्रधारा, बलगाव,<br>अकबरपुरा, खलघाट,<br>टाकाखल<br>चिचली, दौलतपूर,<br>कठोरा<br>नंदगाव, ब्राह्मणगाव | २०<br><br><br><br>११<br><br>१० | साठ लिंगी तीर्थ, साहक नदी संगम,<br>(धर्मशाळेत)<br><br><br>बर्खड संगम, ग्यारा लिंगी तीर्थ<br><br>ब्रह्मावर्त तीर्थ, ब्रह्मेश्वर व पित्रेश्वरशिव |
| ११३<br>११४<br>११५ | १२-४-८३<br>मंगळवार | विश्वनाथपुरा, चैनपुरा<br>मारुचिचली<br>बरवई, केसरपुरा | ४<br>४<br>५ | (राममंदिरात)<br>देवनदी संगम<br>नाहली नदी संगम |
| ११६ | १३-४-८३<br>बुधवार | मोहिपुरा | २ | धर्मशाळेत |
| ११७<br><br>११८<br><br>११९ | १४-४-८३<br>गुरुवार | दत्तवाडा, छोटा वर्धा<br><br>आवली, शेगावा,<br>पिपलोद<br>खेडी, कसरावद,<br>करवई, एकलडा,<br>राजघाट | ८<br><br>८<br><br>५ | कपालेश्वर, अग्नितीर्थ<br>(बलरामदासांच्या कुटीत)<br>सुसार नदी संगम<br><br>सहस्त्र यज्ञ तीर्थ, रोहिणीतीर्थ, बावन<br>गंगा घाट, दत्तमंदिर |
| १२० | १५-४-८३<br>शुक्रवार | भीलखेडी | ३ | सामान ठेवण्याचे ठिकाण |
| १२१<br>१२२<br>१२३ | १६-४-८३<br>शनिवार | मेघनाथ तीर्थ<br>भोती ग्राम<br>बीजासन तीर्थ | १३<br>२<br>५ | <br>गोयद (गौरवाती) संगम |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| १२४ | १७-४-८३ | बोरखेडी, तुरखेडी | ८ | झलकन नदीसंगम (वाळवंटांत) |
| १२५ | रविवार | हिरण्यफालतीर्थ | ८ | |
| १२६ | | आर्याकी चौकी | ८ | |
| १२७ | | बृहद्दल घाट (ब्राह्मण गाव) | ११ | बृहद्दल नदी संगम |
| १२८ | १८-४-८३ सोमवार | भूयेगाव (भूसाघाट) | १६ | नकराचौकी नदी संगम (झाडाखाली) |
| १२९ | १९-४-८३ | निमगव्हाण, दमखेडा | १० | खाडा नदी संगम |
| १३० | मंगळवार | पेड्रा | ६ | |
| १३१ | २०-४-८३ बुधवार | डेहरी, सनखेरी समद्र-खेडी, सिंदूरी संगम | १३<br>१६ | (पिपळसूद गावी भिल्लाघरी) |
| १३२ | २१-४-८३ गुरुवार | शूलपाणी | | रुदकुंड, मार्कडेय गुंफा, रणछोड मंदिर, चक्रतीर्थ (शूलपाणीश्वर मंदिरात) सरदार सरोवर धरणामुळे उपरोक्त शूलपाणीच्या झाडीतील मार्ग बदलणार आहे. |
| १३३ | | मोखडी | ५ | मोक्षगंगा संगम |
| १३४ | | उलूकतीर्थ | ६ | नवागाव धरण |
| १३५ | २२-४-८३ | लीमडी, गोरागाव | ६ | गोरा कॉलनी (साधूच्या कुटीत) |
| १३६ | शुक्रवार | भैरवझाप, गोराघाट, पिपरिया | ६ | पिप्पलाद आश्रम |
| १३७ | | इंद्रवाणी, रावेर, आनंदेश्वर, मुंडेश्वर, रामपुरा | १३ | शुकतीर्थ, रणछोडजी मंदिर |
| १३८ | | लुकेश्वर तीर्थ | २ | अमरवाही संगम. भौमेश्वर तीर्थ |
| १३९ | २३-४-८३ शनिवार | गोपालेश्वर, सहराव | ५ | धनेश्वर, जटेश्वर, मंगलेश्वर, शंखचूडेश्वर, बद्रिकेदारनाथ, पाराशरतीर्थ (शूलपाणीश्वर मंदिरात) |
| १४० | | तेजोनाथ, बांदरिया, जिओर | ८ | वानरेश्वर, ब्रह्मेश्वर, रामेश्वर |
| १४१ | | कठोर | ५ | हनुमंतेश्वर |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| १४२ | २४-४-८३ रविवार | पोयचा, नलेश्वर, खंड, शुकेश्वर | १८ | करंज्या संगम, नागेश्वर तीर्थ (शुकेश्वर मंदिरात) |
| १४३ | २५-४-८३ सोमवार | ओरी, कोटनार, शिसोदरा, कारनरोला, ब्रह्मेश्वर, ब्रह्मेश्वर, बालिकेश्वर, आसा | २० | (दगडू महाराजांच्या आश्रमात) |
| १४४ | | पंचमुखी हनुमान, तारकेश्वर, इंद्रकेश्वर, वीरमगाव | १३ | |
| १४५ | २६-४-८३ मंगळवार | सरसांड, बडवाना, करसनपुरी | ११ | देवेश्वर, शक्रेश्वर, मणिनागेश्वर, (मणिनागेश्वर मंदिरात) |
| १४६ | २७-४-८३ बुधवार | भालौद, टोटी दरा, तरशाडी | १५ | गौतमेश्वर, अहल्येश्वर, रामेश्वर, सिद्धेश्वर, तामेश्वर, (भक्ताच्या घरी) |
| १४७ | २८-४-८३ गुरुवार | सिद्धेश्वर, पोरा, लाडवा, कलकलेश्वर, मोटा संकजा, उचडिया | ३० | वारणेश्वर, पराशरेश्वर, कुसुमेश्वर, सोमेश्वर, अनर्केश्वर, सर्पेश्वर, मोक्षतीर्थ |
| १४८ | | ग्वाली, मार्कंडेश्वर, गुमानदेव, नौगवा, सांबादितीर्थ | ११ | गोपेश्वर तीर्थ, हनुमान मंदिर |
| १४९ | २९-४-८३ शुक्रवार | अदाडा, माडवा, अंकलेश्वर | १० | सिद्धेश्वर, मार्कडेय तीर्थ, मांडलेश्वर तीर्थ (हनुमान मंदिरात) |
| १५० | | अक्रूरेश्वर, बलबलाकुंड, सहजोत, मांटियार | २५ | रामकुंड, सिद्धकुंड, सिद्धरुद्रेश्वर वैद्यनाथतीर्थ, सूर्यकुंड |
| १५१ | ३०-४-८३ शनिवार | सीरा, मोठिया, उत्तरराज, हसोट, बासनोली, कठ पोर, बिसोद, विमलेश्वर | २१ | नर्मदेश्वर, उत्तरेश्वर, मातृतीर्थ, हंसेश्वर तीर्थ, बासवतीर्थ, कोटेश्वर, (कठ पोर धर्मशाळेत) कठ पोर येथून रेवासागरातून पार होण्यासाठी नाव सुटते. |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| | | **उत्तरघाट** | | |
| १ | | हरिधाम, मीठीतलाई, | १० | जमदग्नितीर्थ, रामतीर्थ, लुंठेश्वर, |
| | | लोहारिया, लखिगात्र, | ५ | शिवलिंग मंदिर, दूधनाथ महादेव, |
| | | भूतनाथ | | |
| २ | | दहेज | | पंचवटी, भगवती मंदिर, दधीची आश्रम |
| ३ | १-५-८३ बुधवार | अमेठा | ३ | नीलकंठेश्वर, सोमनाथ, अभियानाथ (कृष्णानंद आश्रमात) |
| ४ | | सुवा, | ८ | सोमेश्वर |
| ५ | | कलादरा (कोल्याद) | ५ | कपिलेश्वर, एरंडी संगम |
| ६ | | बैगनी, कपालेश्वर | ६ | |
| ७ | | कुंजा | २ | मार्कंडेश्वर, आषाढीश्वर, वल्कलेश्वर |
| ८ | | कासवा, मेगाव | ३ | कंथेश्वर, गणितातीर्थ |
| ९ | | मुनाड, समनी | ६ | मुन्यालय, अप्सरेश्वर, डिडीश्वर, सुंडीश्वर |
| १० | ५-५-८३ | अमलेश्वर | १० | |
| ११ | गुरुवार | भारभूतेश्वर | ८ | |
| १२ | | बरुआ, टिंभी | ८ | ऋणमोचन तीर्थ, सुवर्णबिंदेश्वर |
| १३ | | दशकन्या तीर्थ | २ | |
| १४ | | भृगुक्षेत्र (भडोच) | | वालाखिल्य, सिद्धेश्वर, सोमेश्वर, ब्रह्मेश्वर, नर्मदेश्वर, दारुकेश्वर, कुलेश्वर, मत्स्येश्वर इ. अनेक स्थाने. |
| १५ | | महारुद्र, जाडेश्वर | ८ | मैयाचा खोल डोह |
| १६ | | तावरा | ४ | कपिलेश्वर |
| १७ | | कलौद | ४ | गोपेश्वर, कोटेश्वर |
| १८ | ६-५-८३ | शुकतीर्थ | ५ | हुंकारेश्वर (रस्त्यावरील शेतात) |
| १९ | शुक्रवार | भागलेश्वर, निकोरा | १६ | |
| | | अंगारेश्वर | ३ | |
| २० | | धर्मशाला | ३ | अमाहकतीर्थ, ब्रह्मशिला |
| २१ | | रुक्मजी तीर्थ, झनोर | ५ | रामतीर्थ, शिवतीर्थ, जयवराह |
| २२ | | नादग्राम | ५ | नंदातीर्थ |
| २३ | | दिलवाडा | ३ | सोमतीर्थ |
| २४ | ७-५-८३ शनिवार | मोटी कोरल | २ | कुबेरतीर्थ (पुनीत महाराज आश्रमामध्ये) |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| २५ | ८-५-८३ रविवार | सायर, फतेपूरघाट | १० | कपर्दिकेश्वर, नर्मदेश्वर, नारेश्वर (रंगावधूत स्वामींच्या आश्रमात) |
| २६ | | कोठिया | ५ | चंद्रप्रभासतीर्थ |
| २७ | १०-५-८३ मंगळवार | रणापूर, दिवेर | | कुंबुकेश्वर तीर्थ, कपिलेश्वर, त्रिलोचन तीर्थ |
| २८ | | मांडवा, मालसर | ६ | पांडुतीर्थ |
| २९ | ११-५-८३ बुधवार | कटोई, सीनोर, दाबापूर | १० | कोटेश्वरतीर्थ, आंगिरसतीर्थ, (बदरिकाश्रमामध्ये) |
| ३० | | कंजेरा, अंबाली | ११ | सौभाग्य सुंदरीमाता, अंबिकेश्वर तीर्थ |
| | | अनसूया, झाजर | | अनसूयामाता, जानकेश्वरतीर्थ |
| ३१ | | बरकाल | ६ | संकर्षणतीर्थ |
| ३२ | | मोलेथा | ६ | कोटेश्वरतीर्थ |
| ३३ | | नंदोरिया, काल्होडिया | ३ | नरनारायणतीर्थ, गंगानाथतीर्थ |
| ३४ | | यमहास, चांदोद | | सप्ततीर्थे— चंडिकादेवी, चंडादित्य इ. |
| ३५ | १२-५-८३ | करनाली | ३ | सामेश्वर, (कुबेरभंजरी मंदिरात) |
| ३६ | गुरुवार | बखाडा, चूडेश्वर | ११ | अश्वपर्णी संगम |
| ३७ | १३-५-८३ शुक्रवार | तिलकवाडा | ६ | मातृतीर्थ, गौतमेश्वर, तिलकेश्वर (नर्मदामंदिरात) |
| ३८ | | मणिनागेश्वर, वासणा, | ५ | कपिलेश्वर |
| ३९ | | रेंगण, साजरोली, | ११ | केदारेश्वर, अगस्तेश्वर |
| ४० | १४-५-८३ शनिवार | गरुडेश्वर | ६ | कुमारेश्वर, करोटीश्वर (वासुदेवानंद सरस्वतींच्या आश्रमात) |
| ४१ | | भीमकुल्या संगम, गमोडा | ३ | संगमेश्वर |
| ४२ | १५-५-८३ | बागडिया, बेडगाव | ११ | धरणाजवळ झोपडीत |
| ४३ | रविवार | कपिलतीर्थ | ६ | शूलपाणीच्या झाडीची सुरुवात |
| ४४ | १६-५-८३ | माकडखेडी, | १६ | (तुंबडी घाटावर वस्ती) |
| ४५ | सोमवार | पायली, चोरवारो | १३ | |
| ४६ | | देवली, | १० | |
| ४७ | १७-५-८३ मंगळवार | हापेश्वर | १३ | बाणगंगा संगम (मोहनदास महंतांच्या आश्रमात) |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ४८ | २४-५-८३ मंगळवार | सकराना | १६ | (भिल्लाच्या घरी) |
| ४९ | २५-५-८३ बुधवार | अंजनवारू, हथिनीसंगम | २० | (ककराना शिवमंदिरात) हथिनीनदी संगम, २२ खांबांचे शिवालय |
| ५० | | कतरखेडा, दसान | १० | वैजनाथ शिव |
| ५१ | | हरणफाल | २० | कार्तिकस्वामीनिर्मित तीर्थ |
| ५२ | २६-५-८३ | धर्मराई | ५ | (बलवंतसिंगाच्या घरी) |
| ५३ | गुरुवार | मेघनाथ | १० | |
| ५४ | २७-५-८३ शुक्रवार | कोटेश्वर | | कोटेश्वर महादेव व इतर जुनी मंदिरे (अमरदासांच्या कुटीत) |
| ५५ | २८-५-८३ शनिवार | चिखलदा | ३ | पंचकुंडतीर्थ, नीलकंठेश्वर, अग्नेश्वर, विश्वामित्रांची तपोभूमी (शिवमंदिरात) पलीकडील तीरावरील सामान आणतात. |
| ५६ | २९-५-८३ रविवार | गांगली | १० | बगाड संगम (मलवाडा येथे संतदास कुटीत) |
| ५७ | | अक्कलवाडा | ५ | बागु संगम |
| ५८ | ३१-५-८३ मंगळवार | बुधवाडा, जुनाखेडा, सेमरदा उरदणा | ६ | (उरदणा गावी मंगूसिंगांकडे) |
| ५९ | १-६-८३ | बडा वर्धा | १० | काकडिया संगम, विष्णुतीर्थ |
| ६० | बुधवार | ऋद्धेश्वर, मानसंगम शुक्लेश्वर, हतनोर | १५ | दारुकेश्वर तीर्थ |
| ६१ | | खुजावाँ, पगारा | १८ | वक्रतुंड गणेश |
| ६२ | | देवली, कालीबावडी | १० | |
| ६३ | २-६-८३ गुरुवार | मांडवगड | १० | रेवाकुंड, प्राचीन किल्ला, राजवाडा, रूपमतीमहाल, नीलकंठमहादेव, राममंदिर |
| ६४ | | लोहारिया | १० | |
| ६५ | ३-६-८३ | सुंदरेल | १० | (भगवानिया गावात) |
| ६६ | शुक्रवार | खलघाट | १० | |
| ६७ | | त्रिवेणीतीर्थ | ५ | कारमबूटी संगम |
| ६८ | | जलकोटि | २ | सहस्त्रधारातीर्थ |

| अनु. | दिनांक वार | गावाचे नाव | अंतर (कि. मी.) | विवरण |
|---|---|---|---|---|
| ६९ | | महेश्वर | ५ | ज्वालेश्वर, भर्तृहरि गुंफा, पंढरीनाथ, अहिल्याबाईचे शिवमंदिर, राजवाडा |
| ७० | | मंडलेश्वर | ८ | गोनी नदी संगम |
| ७१ | ४-६-८३ | | २ | (नागनाथ मंदिरात) |
| ७२ | शनिवार | नान संगम | ५ | नान नदी संगम |
| ७३ | | पथराल | १० | मालन नदी संगम |
| ७४ | | वेगाव, पीतामाली | १० | पिपलेश्वर शिव, पीतामाली संगम |
| ७५ | | दारुकेश्वर | १३ | खुलार नदी संगम |
| ७६ | | सेमलदा | ३ | विमलेश्वर तीर्थ |
| ७७ | | बडवाह | ५ | नागेश्वर तीर्थ |
| ७८ | ५-६-८३ | खेडी घाट | ५ | होळकरवाडा, दत्तात्रेय मंदिर |
| ७९ | रविवार | चारुसंगमेश्वर | ३ | चोरल नदी संगम |
| ८० | | कोटेश्वर | ३ | गंगानदी संगम |
| ८१ | ६-६-८३ | चोवीस अवतार | ६ | कावेरी संगम (शिवमंदिरात) |
| ८२ | सोमवार | सैलानी घाट | ५ | बरवतगड किल्ला |
| ८३ | | रामपूर | ८ | कुकाडसंगम |
| ८४ | | पोटला | १० | |
| ८५ | | सीतावाटिका | ५ | |
| ८६ | ७-६-८३ | धावडीकुंड | १३ | (शिवमंदिरात) |
| ८७ | मंगळवार | प्रेमगड | ८ | खाडानदीसंगम, संगमेश्वरशिव |
| ८८ | | भटखेडा, लक्कड कोट कालादेव (कालभैरव) | १० | |
| ८९ | ८-६-८३ | पामाखेडी | १० | (राममंदिरात) |
| ९० | बुधवार | धर्मपुरी | ११ | धर्मेश्वर शिव |
| ९१ | ९-६-८३ | कीटीघाट | १० | |
| ९२ | गुरुवार | फतेगड | १० | दंतोनी संगम |
| ९३ | | बागडीसंगम | १३ | |
| ९४ | १०-६-८३ शुक्रवार | नेमावर | १० | (विश्वनाथजींच्या आश्रमात परिक्रमा पूर्ण). |

*

# विहंगमावलोकन

आपापल्या दृष्टिकोणानुसार अनेकांनी माणसाच्या व्याख्या केल्या आहेत. विचार करतो तो माणूस. समूहाने राहतो तो माणूस. वगैरे वगैरे. गीतेने म्हटले आहे 'श्रद्धामयोऽयं पुरुषः'. येथे पुरुष हा शब्द लिंगवाचक नसून 'माणूस' या अर्थी आहे. यच्चयावत् मनुष्यजात श्रद्धावान् आहे असा त्याचा अर्थ. ज्ञानेशांनी 'भजनशील, यजनशील' असे शब्दप्रयोग वापरले आहेत. आपण जन्मापासून कुणा ना कुणाचे अनुसरण, अनुकरण करीत असतो. कधी जाणतेपणी तर कधी अजाणतेपणी. अगदी देवाधर्मावर विश्वास न ठेवणारे, त्यांना मोडीत काढा असे जाहीरपणे म्हणणारे समाजवादी वा साम्यवादी सुद्धा त्यांच्या मान्यवर नेत्यांच्या शब्दांवर, त्यांनी उभारलेल्या तत्त्वज्ञानांवर, पोथ्यांवर भरवसा ठेवून असतातच ना? देव असो, धर्म असो, कोणी अवतारी पुरुष असो वा कोणी प्रेषित-देवदूत असो, कोणताही विधिविधानात्मक ग्रंथ असो, माणूस त्यावर अवलंबून राहत असतो. त्याच्या आधारावर जगत असतो. हे या जगातील निखळ सत्य आहे. तात्पर्य, माणूस श्रद्धावान् आहे आणि त्याच्या श्रद्धेनुसारच त्याचे दैनंदिन व्यवहार चालत असतात.

अशा या श्रद्धाळू माणसाचे जीवन सुखदुःखांच्या उभ्याआडव्या धाग्यांनी विणलेले असते. माणूस सदैव सुखदुःखरूपी भोवऱ्यात गटांगळ्या खात राहतो. यातून सुखरूपपणे तारून नेणारा कोणी समर्थ त्याला हवा असतो. मागणी तसा पुरवठा या न्यायाने तो मिळतोही. आणि मग नाना पंथोपपंथ, त्यांच्या नाना उपासनापद्धती आणि विविध उपास्यदैवते उदयाला येतात. हा क्रम अनादिकालापासून आजतागायत सुरू आहे आणि जोपर्यंत मानवजात अस्तित्वात आहे तोपर्यंत अप्रतिहतपणे चालूच राहणार आहे. माणूस मग व्रतवैकल्ये आचरतो, तीर्थाटन, वाऱ्या करतो, संतसज्जनांचा सहवास साधतो, पोथ्यापुराणांची पारायणे करतो, मंदिरांपुढे लांबच लांब रांगा लावून तासन् तास मुकाटपणे दर्शनासाठी ताटकळत राहतो. उद्देश हा की, आयुष्यात पदोपदी ठेचा खायला लावणारी संकटे दूर व्हावीत, दुःखपरंपरा लोपून जीवन सुखमय बनावे. हे जे 'सुख सुख' म्हणून माणूस समजत असतो, ते मिळविण्यासाठी तो या उपासनांमधील कष्ट उपसत राहतो. मग कितीही त्रास सहन करावा लागला, तरी तो त्याचा स्वीकार करतो. या काल्पनिक सुखाच्या मागे धावणाऱ्या या माणसाच्या हातून नकळत अनेक गोष्टींचा त्याग घडत असतो. अशा प्रकारे स्वेच्छेने तो केवढीही मोठी तपश्चर्या करीत असतो.

नर्मदापरिक्रमा हीदेखील अशीच एक तपश्चर्या. परिक्रमा म्हणजे प्रदक्षिणा. परि म्हणजे सभोवार. क्रम म्हणजे फिरणे. दक्षिण म्हणजे उजवी बाजू. वस्तूला उजवीकडे ठेवून तिच्या

सभोवार फेरी घालणे म्हणजे प्रदक्षिणा घालणे होय. नर्मदापरिक्रमा म्हणजे नर्मदेला उजव्या हाताकडे ठेवून तिच्या काठाकाठाने भ्रमण करणे होय. परिक्रमा कुठूनही सुरू करता येते. दक्षिणतटावरून वा उत्तरतटावरून. तथापि उत्तरतटावरून सुरू करणे प्रशस्त मानले गेले आहे. उत्तर ही दिशा शिवाची तर दक्षिण दिशा यमाची. मृत्युदेवतेची. मृत्यू अपवित्र वा भयकारी या समजुतीतूनच दक्षिण दिशा वर्ज्य मानलेली असावी. परिक्रमेचा आरंभ करण्यास उत्तर तटावरील अमरकंटक हे स्थान श्रेष्ठ, नेमावर वा ॐकारेश्वर मध्यम आणि धडोच हे गौण मानलेले आहे. कोणी नेमावरला नाभिस्थान मानतात तर कोणी ॐकारेश्वरला. असे जरी असले, तरी लोक आपापल्या गावातूनच, मग ते दक्षिणतीरावरील असले तरी, परिक्रमा सुरू करतात.

भारतामध्ये अनेक नद्या आहेत. या नद्यांच्याच पाण्यावर मानवी जीवन संपन्न बनते. त्यामुळेच त्यांना लोकमाता म्हणतात. माणसाच्या मनात सर्वच नद्यांबद्दल आत्मीयतेची, आदराची भावना वसत असते. नदीचे दर्शन होताच श्रद्धेने नतमस्तक होण्याची वृत्ती सार्वत्रिक आहे. नद्यांचे संगमसुद्धा पवित्र मानले गेले आहेत. त्यांच्या तीरांवर अनेक तीर्थक्षेत्रे वसलेली आहेत. या तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करणे, तेथील क्षेत्रपतीचे दर्शन करणे, या पुण्यसलिल सरितांचे स्नान करणे या गोष्टी पुण्यप्रद मानल्या गेल्या आहेत. असे असले तरीही परिक्रमा केली जाते ती नर्मदेचीच. आपल्या धर्मामध्ये गंगा नदीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. स्नानाच्या वेळी 'हर गंगे भागीरथि' वा

*गङ्गा गङ्गेति यो ब्रूयाद्योजनानां शतैरपि ।*
*मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति ॥*

असे गंगेचे स्मरण करण्याची प्रथा आहे. याचे कारण गंगास्नानाने जीवन कृतार्थ बनते ही भारतीयांची श्रद्धा आहे. हरिद्वार, काशी, प्रयाग, गया ही हिंदूंची पुण्यक्षेत्रे या नदीवरच वसली आहेत आणि त्यांच्या तीर्थयात्रा घडाव्यात यासाठी आजही माणसे तळमळत असतात. तरीसुद्धा परिक्रमा नर्मदेचीच का? आणि तीसुद्धा आजकालची नसून अगदी पुराणकाळापासून रूढ आहे असे का? नर्मदास्नानाला गंगास्नानाइतकेच महत्त्व आहे याचेही अप्रूप वाटते.

मला वाटते फक्त नर्मदेचीच परिक्रमा करणे शक्य आहे. इतर नद्यांच्या तुलनेत नर्मदातीरावरील भ्रमण सुलभ असावे. गंगा, सिंधु, ब्रह्मपुत्रा, कृष्णा, गोदावरी आदी नद्या नर्मदेपेक्षा आकाराने व लांबीनेही मोठ्या आहेत आणि त्यांची मुखेही विशाल आहेत. नर्मदेचा प्रवाह उगमापासून मुखापर्यंत अखंड आहे. गंगा-ब्रह्मपुत्रादी नद्यांचा प्रवाह अखंडित असला, तरी त्यांचा उगम दुर्गम बर्फाळ पहाडी प्रदेशात आहे, तर कृष्णा, गोदा यांचा उगमही अशाच अवघड जागी असून त्या उगमाकडील काही भागी उन्हाळ्यात ठणठणीत कोरड्या पडतात. सुगमता आणि अक्षुण्णता यांमुळेच नर्मदामाईची थोरवी अगाध असावी आणि याच कारणांमुळे नर्मदापरिक्रमेची परिपाठी रूढ झाली असावी. आणखी एक

गोष्ट अशी की, भौगोलिकदृष्ट्या भारताचे उत्तर आणि दक्षिण असे विभाग करणारी ती मध्यगा आहे. यामुळेही ती उत्तर भारतीयांना व दक्षिणवासियांना सारख्याच अंतरावरील म्हणून सारखीच जवळची वाटत असावी.

नर्मदेचा उगम मध्यप्रदेशातील मैकल पर्वताच्या रांगांमधील पठारावर वसलेल्या अमरकंटक या स्थानी होतो. इथे तिची धार अगदी करंगळीएवढीच पडते. उगमस्थानी कुंड बांधलेले असून तेथे नर्मदामंदिराशेजारीच इतर देवतांचीही मंदिरे उभारलेली आहेत. मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या तीन राज्यांतून वाहात ती अखेर गुजरातमधील भडोचजवळ पश्चिमसागराला मिळते. त्याला रेवासागर म्हणतात. येथे तिचा विस्तार प्रचंडच आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे उगमापासून मुखापर्यंतचा तिचा अर्ध्याहून अधिक प्रवास पर्वतीय प्रदेशांतून झालेला आहे. अनेक डोंगरांना कातरून चूर्ण करीत तिने आपला मार्ग आक्रमिलेला आहे. इतर नद्यांच्या बाबतीत सुरुवातीचा प्रवास पहाडी मुलुखांतून होतो आणि नंतर त्या एकदा का सपाटीवर उतरल्या की, अगदी मुखापर्यंत सपाटी सोडत नाहीत; पण हिची तऱ्हाच आगळी. मैकल, विंध्य आणि सातपुडा या पर्वतांच्या रांगांमधून ती पुरःसर झालेली आहे. तिची लांबी साडेआठशे मैल म्हणजे सुमारे साडेतेराशे कि.मी. आहे; परंतु पर्वतांमधून ती वेड्यावाकड्या उड्या घेत धावत असल्यामुळे आणि एकसपाटीत नसल्यामुळे परिक्रमा करताना बराच वळसा पडत असतो. शिवाय मधूनमधून झाडी असल्यानेही दूरचा मार्ग चोखाळावा लागतो. यामुळे परिक्रमा करण्यासाठी सुमारे दोनहजार मैल वा बत्तीसशे कि.मी. अंतर पार करावे लागते.

केवळ पारलौकिक कल्याण नजरेसमोर ठेवूनच परिक्रमा केली जाते असे नाही. पुरातनकाली, परिक्रमेची पायवाट रूळली, त्या वेळी, ती तशी असेलही कदाचित्; पण नंतर ती ऐहिक कामनापूर्तीसाठीही केली जाऊ लागली असावी. त्यामुळे परिक्रमापथावर सर्वसंगपरित्याग केलेल्या साधुसंन्याशांप्रमाणे संसारी लोकही वाटचाल करीत असतात. मनी काही हेतू धरून तो पूर्ण व्हावा यासाठी किंवा हेतुपूर्तीनंतर परिक्रमा करण्याचा प्रघात आहे. साधुसंन्याशांच्या बाबतीत कालहरणासाठी वा आध्यात्मिक उन्नत्तीसाठी परिक्रमेचा अवलंब केला जात असतो. अगदी गोरगरिबांपासून नवकोटनारायणांपर्यंत, अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत, अशक्तांपासून सशक्तांपर्यंत, मुमुक्षूंपासून सिद्ध-ज्ञान्यांपर्यंत भारताच्या कानाकोपऱ्यांतून आलेले समाजातील नाना थरांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुष या प्रवासात आढळतात. त्यांच्या मनीं नर्मदेविषयी अपार आदर दाटलेला असतो; पण अशा लोकांच्या जोडीला स्वार्थी, पोटभरू लोकांचाही समावेश होत असतो. परिक्रमावासियांच्या उदरनिर्वाहासाठी तीरांवर ठिकठिकाणी सदावर्ते असतात. श्रद्धावंत सज्जन परिक्रमावासियांना आटा, डाळ, तांदूळ, मीठमसाला इ. पदार्थ देत असतात. क्वचित् कोणी पैसाअडकाही देतो. कोणी वस्त्रपात्र देतो. पोटभरू लोक सारे सामान गोळा करतात आणि विकून त्याचा पैसा करतात. अशा लबाड, ढोंगी लोकांमुळेच परिक्रमेचा मार्ग

बिघडला आहे. समाजामध्ये परिक्रमावासियांबद्दल आदराबरोबर तिरस्काराचीही भावना वाढीस लागण्यास या अशा दंभाचाऱ्यांचा हातभार लागलेला असतो. यासाठीच की काय, परिक्रमावासियांना प्रमाणपत्र बाळगावे लागते.

परिक्रमेच्या मार्गावर ठिकठिकाणी झाडी आहे. त्यामध्ये भिल्लांच्या वस्त्याही आहेत. क्वचित् कुठे परिक्रमावासियांना त्रास होतो, पण साधना म्हटल्यावर असे कष्ट व्हायचेच. यांतून तावूनसुलाखून बाहेर पडण्यासाठीच ना परिक्रमा करायची ? परिक्रमेचा शास्त्रोक्त कालावधी तीन वर्षे तीन महिने तेरा दिवसांचा. पावसाळा लागला की, चातुर्मास करायचा. चांगलेसे ठिकाण पाहून तेथे चार महिने मुक्काम करायचा. दसरादिवाळीनंतर पाऊस ओसरल्यावर, नदीनाल्यांचे पाणी कमी झाल्यावर पुढील वाट धरायची. संगमावर तीन दिवस मुक्काम करायचा. अशा रीतीने परिक्रमा करायची म्हटली म्हणजे दिवसाकाठी सुमारे पाच कि.मी. अंतर चालायचे. याचाच अर्थ प्रतिदिनी एका गावाहून दुसऱ्या गावी स्थलांतर करायचे. या एवढ्या प्रदीर्घ काळात आपल्या दैनंदिन व्यवहारांपासून अलिप्त होऊन मैयाच्या तीरावर एकान्तसेवनात आणि आत्मचिंतनात दंग राहिल्याने माणूस स्वाभाविकच सद्विचारांनी आणि सद्भावांनी प्रेरित व्हावा हाच उद्देश या परिक्रमेच्या मुळाशी असणार, पण आजकाल अशी परिक्रमा करणारे लोक अगदी अल्पसंख्य असतील. जो तो लवकरात लवकर ती कशी पुरी करायची या विवंचनेत मग्न असणार. काही असले तरीही तीन हजार किलोमीटरहून अधिक अंतर नियमपूर्वक अनवाणी पायी आणि विनाछत्र माथ्याने सपाटीवरूनच नव्हे, तर डोंगरकपारीतून, रानावनातून, दगडाधोंड्यांतून, काट्याकुट्यांमधून, रणरणीत वाळवंटातून हसतमुखाने आक्रमिणे ही गोष्टही वाटते तितकी सोपी नाही हेही ध्यानी ठेवले पाहिजे.

मग नर्मदापरिक्रमेची अशी ही बिकट वाट धरावीशी वाटण्याचे कारण कोणते असा प्रश्न जिज्ञासु व्यक्तीच्या अंतःकरणात सहजच उमटतो. परिक्रमेतही असे काहीजण भेटले होते. कोणत्या हेतूच्या पूर्तीसाठी परिक्रमा करतो आहे असा त्यांचा प्रश्न असे, पण त्याला उत्तर तरी काय देणार ? श्रीगुरुकृपा, नर्मदामाईची करणी, अंतःप्रेरणा, सहजप्रवृत्ती असे शब्द आपण वापरतो. माझ्या लिखाणातही मधून मधून स्वाभाविकपणे तसे उल्लेख येत गेले आहेत. कार्यकारणभावाला काही अर्थ नसतो या मतापर्यंत आजचे वैज्ञानिक येऊन पोहोचले आहेत. आपल्या नित्याच्या व्यवहारातसुद्धा अशा काही घटना अनुभवास येतात की, त्यांचे सुसंगत विश्लेषण वा स्पष्टीकरण देता येत नसते, पण याला कारण आपली मर्यादित बुद्धी वा आकलनशक्ती. 'यो बुद्धेः परतस्तु सः ! बुद्धीच्या क्षितिजापलीकडेही अनंत अगम्य, अनाकलनीय गोष्टींचा गुप्त खजिना दडलेला आहे हे आपल्याला कळत नाही. आपल्याला जेवढे आकलन होते तेवढेच सत्य आणि त्यापलीकडील सारे असत्य असा अट्टाहास कुणाचाही असू नये. कारण नित्य संशोधनातून कालचे सत्य हे आजचे असत्य ठरते आणि आजचे असत्य हेच उद्याचे सत्यही ठरत असते. तेव्हा अंतःप्रेरणा वा

सहजप्रवृत्ती यांच्या मुळाशी सुप्तपणे कोणती ना कोणती शक्ती वास करीत असते. किंबहुना ती तुमच्या मेंदूमध्ये वा अंतःकरणात कळत नकळत संग्रहित केलेल्या पूर्वानुभवांची पूर्वसंस्कारांची– परिणामी प्रेरणा (resultant force) असते. समाजामध्ये ज्या ज्या वेळी अनाचार, अत्याचार माजतो म्हणजेच एखाद्या गोष्टीचा अतिरेक होतो, त्या त्या वेळी त्याचे पारिपत्य वा निर्मूलन करणारी एक शक्ती निर्माण होत असते हे आजवरचा इतिहास सांगतो. ही शक्ती अत्याचारविरोधी सुप्त भावनांची एकत्रित स्वरूपाची परिणामी प्रेरणा असते. निसर्गनियम हा असा आहे.

माझ्या नर्मदापरिक्रमेबाबतही हेच म्हणावे लागेल. गो. नी. दाण्डेकरांची 'कुणा एकाची भ्रमणगाथा' आणि 'स्मरणगाथा' ही पुस्तके वाचली होती. कोमल भाववृत्ती, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, तरल आकलनशक्ती, दुर्दम्य आशावाद, प्रखर जिज्ञासा आणि प्रचंड मनोबल अशा अनेक गुणांनी विनटलेले गो. नी. दांचे व्यक्तिमत्त्व ! जीवनावर उत्कटतेने प्रेम करणाऱ्या या पथिकाने परिक्रमेबाबत उत्सुकता निर्माण केली यात तिळमात्र संदेह नाही. त्याच कालावधीत श्रीबाबा आर्वीकरांची भेट झाली. यौवनाच्या उंबरठ्यावर या पुरुषाने घरादाराचा मोह सोडून, कोणतीही ऐहिक कामना न बाळगता केवळ आध्यात्मिक प्रेरणेने, अंतरात्म्याच्या दर्शनासाठी सारा भारतवर्ष पादाक्रान्त केलेला. अगदी अल्पकाळ का होईना, या महामना सिद्धप्रज्ञ ज्ञानियाचे सानिध्य लाभले. त्यापूर्वीच पांवसनिवासी स्वामी स्वरूपानन्द या नाथसंप्रदायी अलौकिक संताच्या कृपाप्रसादाचा धनी झालो होतो.

नाना देशींचे नाना लोक, त्यांच्या वागण्याच्या नाना तऱ्हा, नानाविध पंथ, त्यांच्या वेगवेगळ्या उपासना, विविध संप्रदायांतील साधुसंन्याश्यांच्या गाठीभेटी आणि निसर्गाचे जितेजागते सान्निध्य यांमुळे स्वाभाविकपणेच माणसाच्या वृत्ती अंतर्मुख होत असाव्यात. एक अनोखे समाधान त्याच्या अंतरी उदयास येत असावे असे अनेकांच्या अनुभवांवरून जाणवलेले असल्याने अशा भ्रमणाचे आकर्षण एका स्वच्छंदी पाखराच्या अंतर्यामी जागे होणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. ज्ञानेशांच्या ओव्यांच्या रुणझुणत्या पदन्यासाने मनावर अवचित मोहिनी घातलेली. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी स्वरूपानन्द, श्रीबाबा आर्वीकर, स्वामी रामतीर्थ, जे कृष्णमूर्ती अशा सत्पुरुषांच्या वाङ्मयाचा विलक्षण ठसा चित्तावर सहजच उमटून गेलेला. संन्यस्त जीवनाबद्दलचे आणि योगमार्गाविषयीचे जबरदस्त आकर्षण उपजलेले. ऐन तारुण्यात ऐहिक सुखोपभोगांचा मोहक पेला मुखाशी आला असतानाच असले निवृत्तीचे विचार हृदयाकाशात भरारी मारू लागलेले. या साऱ्यांचा एकत्रित परिणाम म्हणूनही निःस्पृह, निःसंग, निर्मम, निर्मोही, निरालम्ब, अपरिग्रही अवस्था हीच माणसाची चरम अवस्था होय याची जाणीव होऊ लागलेली. निःसंगपणाची धुंदी अंगप्रत्यंगाला अवघी व्यापून राहिलेली.

स्वामी स्वरूपानन्दांपाशी वीस वर्षांपूर्वी याबाबत बोलणे झाले होते. अनासक्तपणे भ्रमण करीत राहण्यालाच संन्यास म्हणतात असे ते म्हणाले होते; परंतु माझ्या त्या वेळच्या

अवस्थेवरून त्यांनी सूचित केले की, भ्रमण करून, पृथ्वीपर्यटन करूनही देहभाव गळून पडणार नाही. त्यासाठी 'ठायींचि बैसोनि करा एकचित्त' 'सोऽ हं' 'सोऽ हं'असा ध्यास लागून राहिला पाहिजे. देहभान नाहीसा होऊन आत्मभाव जागृत होण्यासाठी भ्रमण ही साधना करायची असेल तर तो व्यर्थ खटाटोप होय असाच स्वामींच्या म्हणण्याचा मथितार्थ होत. आणि त्यात तथ्यही होते. त्यामुळे भ्रमणाची ऊर्मी काही वर्षे तरी आपोआप जिरून गेली.

सन १९८२ चा ऑगस्ट महिना असावा. घरी झोपाळ्यावर मनसोक्त झोके घेत असताना एकाएकी नर्मदापरिक्रमा करावी या विचाराने अंतरात उसळी घेतली. भारतभ्रमणाच्या सुप्त ऊर्मीने हे व्यक्त रूप घेतले होते. गो.नी. दाण्डेकरांकडून परिक्रमेच्या संदर्भात विशेष काही माहिती मिळते का यासाठी त्यांना पत्र लिहिले. अगदी तत्परतेने त्यांचे देखणे पत्र आले. जुजबी माहितीचे. त्यांनी परिक्रमा केली त्याला चाळीसहून अधिक वर्षांचा काळ लोटलेला होता. या दीर्घ कालखंडांत भारतामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली. स्वातंत्र्य मिळून राजवट बदलली. भौगोलिक संदर्भ बदलले. भौतिक सुधारणा घडून समाजजीवनात आमूलाग्र परिवर्तन झाले. लोकांचे राहणीमान सुधारले. त्यांच्या आचारविचारांतही फरक पडला. या साऱ्यांचा परिणाम परिक्रमेवर होणार हे स्वाभाविकच होते. तेव्हा आता सरळ परिक्रमेची वाट धरावी हा विचार दृढ झाला. कुणापाशी वाच्यता न करता तडक नर्मदा गाठायची असा मनोदय होता. तथापि नंतर काही जणांना पूर्वसूचना देऊन १९८३ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात परिक्रमेचा पंथ पत्करला.

जूनच्या दहा तारखेला म्हणजे पाच महिन्यांनी परिक्रमेचे वर्तुळ पुरे झाले. ही परिक्रमा लौकिकार्थाने शास्त्रोक्त नव्हतीच मुळी. तो एक स्वच्छंद विहार होता. मुक्त मनाने नर्मदामाईशी साधलेली ती जवळीक होती. त्यात नव्हता कसला अभिनिवेश, नव्हती कसली एषणा. मग या परिक्रमेतून मला काय मिळाले असा प्रश्न कुणी विचारला, तर त्याला काय सांगावे ? या परिक्रमेच्या पाऊलवाटेवर नर्मदामैया म्हणा वा श्रीगुरुदेव म्हणा आपली सदैव पाठराखण करीत असतात याचा प्रत्यय पदोपदी येत राहिला. अडचणी आल्या असे क्षणभर भासले तरी त्याही त्यांच्याच कृपेचा भाग आणि त्यांतून सोडवणूक झाली तीही त्यांच्याच कृपेची नवलाई याची एक आगळीच अनुभूती अवघ्या जीवनाला वेटाळून राहिली. गीतेत भगवंतांनी–

*अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।*
*तेषां नित्यभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥*

असे जे अभिवचन दिले आहे त्याची प्रतीती क्षणोक्षणी येत राहिली आणि चित्त निधडे बनले. त्यामुळे परिक्रमेपासून काही मिळवायचे नव्हते हे जरी सत्य असले, तरी आपलीच कसोटी घेणारा तो निकष होता असे म्हणावेसे वाटते. स्वामींनी एकदा कळविले होते–

*स्वयें जगन्नाथ साधकाचा हात । धरोनियां नीट चालवितो ॥*

*असों द्यावा चित्तीं एकनिष्ठ भाव । भक्तालागीं देव सांभाळितो ॥*

काही असो, आनंदकेंद्रामधून आनंदत्रिज्या घेऊन काढलेले आनंद वर्तुळ वा आनंदगोल म्हणजेच ही परिक्रमा होती. ज्या कुणाला या लिखाणावरून या आनंदाच्या डोहात उडी घेऊन कृतार्थ व्हावेसे वाटले तर तोही आनंदाचेच अंग बनून राहावा एवढेच मी म्हणू शकेन.

नारळीपौर्णिमा, १९९६

# ।। श्रीमदाद्य शङ्कराचार्यकृत नर्मदाष्टक ।।

सबिन्दुसिन्धुसुस्खलत्तरङ्ग, भङ्गरञ्जितं
द्विषत्सुपापजातजातकारिवारि संयुतम् ।
कृतान्तदूतकालभूत भीतिहारि वर्मदे
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ १ ॥
त्वदम्बुलीन दीन मीन दिव्य सम्प्रदायकं
कलौमलौघभारहारिसर्वतीर्थनायकम् ।
सुमत्स्यकच्छनक्रचक्रचक्रवाकशर्मदे
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ २ ॥
महागभीरनीरपूरपापधूत भूतलं
ध्वनत्समस्त पातकारिदारितापदाचलम् ।
जगल्लये महाभये मृकण्डुसूनुहर्म्यदे
त्वदीयपाद पङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ३ ॥
गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा
मृकण्डुसूनुशौनकासुरारिसेविसर्वदा ।
पुनर्भवाब्धिजन्मसम्भवाब्धिदुःखवर्मदे
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ४ ॥
अलक्षलक्षकिन्नरामरासुरादिपूजितं
सुलक्षनीरतीरधीरपक्षिलक्षकूजितम् ।
वसिष्ठशिष्टपिप्पलादकर्दमादिशर्मदे
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ५ ॥
सनत्कुमारनाचिकेतकश्यपात्रिषट्पदै- ।
धृतं स्वकीयमानसेषु नारदादिषट्पदैः ।
रवीन्दुरन्तिदेवदेवराजकर्मशर्मदे
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ६ ॥
अलक्षलक्षलक्षपापलक्षसारसायुधं
ततस्तु जीवजन्तुतन्तुभुक्तिमुक्तिदायकम् ।
विरञ्चिविष्णुशङ्करस्वकीयधामवर्मदे
त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ७ ॥
अहोऽमृतं स्वनं श्रुतं महेशकेशजातटे
किरातसूतवाडवेषु पण्डिते शठे नटे ।

*दुरन्तपापतापहारिसर्वजन्तुशर्मदे*
*त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥८॥*
*इदं तु नर्मदाष्टकं त्रिकालमेव ये सदा*
*पठन्ति ते निरन्तरं न यान्ति दुर्गतिं कदा।*
*सुलभ्य देहदुर्लभं महेशधाम गौरवम्*
*पुनर्भवा न वै नरा विलोकयन्ति रौरवम् ॥९॥*
*इति श्रीमदाद्यशङ्कराचार्यविरचितं नर्मदाष्टकं सम्पूर्णम्।*
*नर्मदे हर। नर्मदे हर। नर्मदे हर॥*

* * *

## ॥ नर्मदामैयाची आरती ॥

*ॐजय जगतानंदी हो मैया जय जगतानंदी हो रेवा जय जगतानंदी।*
*ब्रह्मा हरिहरशंकर रेवा शिवहरशंकर रुद्री पालंती॥*
*हरि ॐ जय जगतानंदी ॥१॥*
*देवी नारदशारद तुम वरदायक अभिनवपदचंडी*
*हो मैया अभिनवपदचंडी हो रेवा अभिनवपदचंडी।*
*सुरवरमुनिजनसेवत सुरवरमुनिजनध्यावत शारद पदवंती॥२॥*
*देवी धूम्रकवाहनराजत वीणा वाजयंती*
*हो मैया वीणावाजयंती हो रेवा वीणावाजयंती।*
*झुमकत झुमकत झुमकत झननन झननन झननन रमती राजंती॥३॥*
*देवी बाजत तालमृदंगा सुरमंडळ रमती*
*हो मैया सुरमंडल रमती हो रेवा सुरमंडल रमती।*
*तोडि ताम् तोडिताम् तोडिताम् तुडडड तुडडड तुडडड रमती सुरवंती॥४॥*
*देवी सकलभुवनपर आप बिराजत निशदिन आनंदी*
*हो मैया सबयुग आनंदी हो रेवा युगयुग आनंदी।*
*गावत गंगाशंकर सेवत रेवाशंकर तुम भय मेटंती॥५॥*
*मैयाजीकी आरत जो नर पढ गावे*
*हो मैया जो नर पढ गावे हो रेवा जो नर पढ गावे।*
*भजत शिवानंदस्वामी ध्यावत हरिहर स्वामी वांछित फल पावे॥६॥*

बिंदूपासून सिंधूपर्यंत अखंड तरंगाकार प्रवाहाने विनटलेल्या आणि दुष्ट पापप्रवृत्तीमुळे प्राप्त होणाऱ्या जन्मपरंपरेचा नाश करणाऱ्या जलाने युक्त अशा तुझ्या

चरणकमलांना, कालस्वरूप यमदूतांची भीती हरण करून रक्षण करणाऱ्या देवी नर्मदे, मी नमन करतो. १

तुझ्या जलामध्ये विहरणाऱ्या दीनदुबळ्या मत्स्यांना दिव्यता प्रदान करणाऱ्या, कलियुगातील महादोषांचा परिहार करणाऱ्या सकलतीर्थांमध्ये वरिष्ठ अशा तुझ्या पादपद्मांना, प्रचंड मासे, कासवे आणि मगरींच्या समुदायांचे तसेच चक्रवाक पक्ष्यांचे कल्याण करणाऱ्या देवी नर्मदे. मी वंदन करतो. २

महाप्रचंड पुराने भूतलावरील सारी पापे धुऊन काढणाऱ्या आणि घनगंभीर नादाने पातकांच्या राशी आणि पर्वतप्राय संकटे यांचा चक्काचूर करणाऱ्या तुझ्या चरणांबुजांना, प्रलयकालीन महाभयाच्या वेळी मार्कण्डेय ऋषींना आपल्या ठायी आश्रय देणाऱ्या देवी नर्मदे, मी नमस्कार करतो. ३

मार्कण्डेय, शौनक, देवेंद्र ज्यांचे सदैव सेवन करतात, त्या तुझ्या जलाचे नुसते दर्शन होताच माझे भय कुठल्या कुठे पळून गेले. पुनर्जन्म तसेच संसारसागरातील दुःखांपासून कवचाप्रमाणे रक्षण करणाऱ्या देवी नर्मदे, तुझ्या पदकमलांना मी वंदन करतो. ४

अगणित किन्नर, देव आणि असुर ज्यांची पूजा करतात आणि ज्यांच्या तीरावरील लक्षावधी पक्षिगण जलाशय निरखीत धीटपणे अखंड कूजन करीत असतात, त्या तुझ्या चरणकमलांना, मुनिश्रेष्ठ वसिष्ठ, पिप्पलाद, कर्दमप्रभृतीचे कल्याण करणाऱ्या देवी नर्मदे, मी नमन करतो. ५

सनत्कुमार, नाचिकेत, कश्यप, अत्रि, नारदादी भृंगांनी ज्यांना आपल्या अंतःकरणांत साठविले आहे, त्या तुझ्या पादपद्मांना, सूर्य, चंद्र, रन्तिदेव, देवराज इंद्र यांच्या सत्कर्मांना विश्वात प्रतिष्ठा प्रदान करणाऱ्या देवी नर्मदे, मी वंदन करतो. ६

दृष्टादृष्ट लक्षावधी पातकांच्या राशींचा भेद करणाऱ्या, तसेच जीवजंतूंना भोग आणि मोक्ष प्रदान करणाऱ्या तुझ्या चरणांबुजांना, ब्रह्माविष्णुमहेशांना आपापल्या ठायी सुप्रतिष्ठित करणाऱ्या देवी नर्मदे, मी नमस्कार करतो. ७

भगवान् शंकरांच्या जटेतून निघालेल्या नर्मदेच्या तटावरील किरात, सूत, वाडव, पंडित, शठ, नट अशा समस्त जनांच्या मुखी अमृतोपम संजीवक असे नर्मदेचे गुणगानच ऐकू येते. दुस्तर पापतापांचा संहार करून सकल जीवांचे कल्याण करणाऱ्या देवी नर्मदे, तुझ्या पदकमलांना मी नमन करतो. ८

हे नर्मदाष्टक नेहमी त्रिकाळी जे निरंतर पठण करतात ते कधीही दुर्गतीला जात नाहीत. एवढेच काय, मानवदेहातील अतिदुर्लभ आणि गौरवास्पद असे शिवपद अनायासे प्राप्त झाल्याने ते जन्मबंधनातून मुक्त होतात व रौरवादी नरकांचे त्यांना दर्शनही घडत नाही. ९

REFBK 0028454

REFBK-0028454

# नर्मदे हर. . .

या पुस्तकाचे लेखक श्री रघुनाथ रामचंद्र गुण्ये हे स्थापत्यशास्त्राचे पदवीधर आहेत; पण त्यांनी व्यवसाय केला नाही, आणि प्रपंचही मांडला नाही. स्वामी स्वरूपानंद आणि बाबामहाराज आर्वीकर अशा सत्पुरुषांचा निकटचा परिचय त्यांना लाभला. आध्यात्मिक धारणा असलेल्या या सुविद्य व्यक्तीने नर्मदेच्या परिक्रमेत आलेले विविध अनुभव येथे शब्दबद्ध केले आहेत.

नर्मदेच्या तीरावरील सारा परिसर येत्या काही वर्षांत आधुनिक विज्ञानाच्या स्पर्शाने बदलून जाणार, आणि तसे झाल्यावर आजवरची नर्मदापरिक्रमा इतिहासजमा होणार. अशा या संधिकाळात, सहजसुंदर असे प्राकृतिक निसर्गवैभव आणि विशुद्धपावन असे आध्यात्मिक वातावरण बऱ्याच प्रमाणात शिल्लक असताना गुण्यांनी ही परिक्रमा केली आहे. आणखी पाचपंचवीस वर्षे उलटल्यावर केवळ स्मृतिरूपाने उरणाऱ्या नर्मदामैय्याच्या परिसरातील एका वेगळ्या वैभवाचे दर्शन पुढील पिढ्यांना या पुस्तकाच्याद्वारे घडू शकेल, ही त्याची सर्वांत मोठी जमेची बाजू आहे.

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह